# व्यक्तिमत्त्व विकास

## दिवाळी अंक २०२१




संपादक - श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

# वर्ष : ६

स्वागत मूल्य : 200/-

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**साप्ताहिक**
व्यक्तिमत्व विकास

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**संपादक -**
श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**कार्यकारी संपादक -**
डॉ. सुनिल दादा पाटील.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**अतिथी संपादक -**
कु. सुषमा माने-गावडे.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**अक्षर जुळणी -**
कवितासागर फीचर्स, जयसिंगपूर


-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

**विशेष सहाय्य -**
श्री. गजेंद्र चित्रुक.
श्री. राज धुदाट.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

या अंकात छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

## ...विशेष आभार...



**- मार्गदर्शक -**
श्री. विठ्ठल आप्पा कोळी.

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-



**- मुखपृष्ठ -**
ऐश्वर्या तेंडूलकर, कोल्हापूर

-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना
सदस्य
Member
International Diwali Ank Association

# ...अंतरंग...


- कोरोना काळातील शिक्षण संक्रमण../ सुषमा माने-गावडे.......................06
- सकारात्मक दृष्टीकोनाची अद्भुत शक्ती../ नितीन पाटील..........................10
- हवंच होतं मला../ सौ. मनीषा पिंटू वराळे...................................15
- कोरोना काळ आणि ऑनलाईन शिक्षण../ भूषण सहदेव तांबे....................16
- लगीन घाई../ संदिप रामदास मोकळे....................................... 20
- सकारात्मक विचार../ श्रीनिवास शेंडे....................................... 21
- माणसा../ नरेंद्र अ. वाकोडे................................................ 25
- शिक्षक जीवनाचा शिल्पकार../ प्रा. मनीषा नाडगौडा............................ 26
- कसे सांगू../ शिवानंद सविता बालाजी रत्नपारखे................................ 28
- निर्णयक्षमता../ श्रावणी योगेश जाधव......................................... 29
- आपला हात../ सचिन बेंडभर.................................................. 30
- सूर !../ प्रमोद वामन वर्तक.................................................. 31
- आयुष्याचे क्षण../ रोहिदास धना सोनवणे...................................... 33
- देश सुरक्षित तर../ रमेश कृष्णराव लांजेवार.................................. 34
- सरतं वर्ष../ हरिबा कोळी.....................................................38
- “देवमाणूस”../ राजेंद्र प्रल्हाद शेळके.........................................39
- आशेचा किरण../ रेणुका चंद्रकांत पांचाळ.......................................46
- नवी आशा../ अवंतिका महाडिक............................................... 47
- पाड्यावरची शाळा../ रामकृष्ण पांडुरंग पाटील................................ 51
- “नवस”../ विशाल मोहोड.................................................... 52
- पडता पाऊसधारा../ सौ. भारती सावंत.........................................55
- वाया गेलेला मुलगा../ प्रा. प्रवीणकुमार हेमचंद्र वैद्य............................ 56
- // आमराई //../ शिवा जोगदंड.............................................. 58
- श्रीमंत../ उमा पाटील....................................................... 59
- क्षण निरोपाचा../ शिवाजी नामपल्ले.......................................... 61
- व्हेन यू लॉस्ट युवर ऑटोबायोग्राफी../ संग्राम संतोष सलगर..................... 62
- लावणी../ गोविंद संभाजी श्रीमंगल.............................................67
- झुंज../ आनंदा बरगुले.........................................................68
- “विष्णू आश्रू काळे” एक प्रेरणादायी चरित्र../ सुनील दौलत खोडके................78
- मेरी../ अश्विनी खंडागळे..................................................... 79
- कलाटणी../ प्रज्ञा हंसराज बागुल..............................................83
- अजून घुमे पारवा../ रवींद्र जवादे............................................ 84

- स्नेहबंधाचे रंगीत धागे../ प्रशांत नामदेवराव ढोले....88
- ।। बरे तुझे ।।../ गणेश भाकरे....90
- सच्चे सेवक !../ नागेश सू. शेवाळकर....91
- याला जीवन असे नाव../ प्रा. वर्षा कावरे....96
- सर्वश्रेष्ठ धन : विचारधन../ प्रा. डॉ. नरहरी पाटील....97
- पोरा../ मुरहारी कराड....99
- वृध्दांचे पालकत्व../ ज्योती जयंतराव आळंदकर....100
- आई../ ऋतुजा रविंद्र गवस....102
- विणलेले घरटे../ अंकुश गाजरे....103
- आभाळ गेलं फाटून../ हरिश्चंद्र पाटील....119
- संस्काराची शिदोरी../ भास्कर बंगाळे....120
- डिजिटल शाळा उपयोगी?../ अंजली पाटील....125
- देवमाणूस../ मीना खोंड....126
- परतीचा पाऊस../ दत्ता वालेकर....130
- अशीही एक ईद../ डॉ. शीतल शिवराज मालूसरे....131
- सबला स्त्री../ श्रीमती माणिक क. नागावे....136
- तिरंगा../ श्रुती चौधरी....139
- ती कोण होती?../ अमृता श्रीरंग देशपांडे....144
- कारण मी दगड आहे../ व्यंकटेश काटकर....154
- केविन फायगी../ अभिषेक ठमके....155
- हायकू../ प्रकाश पोळ....159
- माझे कुटुंब, माझी जबाबदारी../ मयुरी मल्लिनाथ जायाप्पा....160
- मन उधाण वाऱ्याचे../ संध्याराणी जयहिंद कोल्हे....163
- वाटोळं../ युवराज मेघराज पवार....164
- ॥ चिमुकली मूठ ॥../ तुकाराम पुंडलिक खिल्लारे....173
- सायकल../ नागनाथ पाटलोबा बडे....174
- रहस्य../ डी.एन.मोरे....177
- "टपाल"../ सुमन ज्ञानदेव जाधव....178
- पंख पसरुनी वाटे !../ स्नेहा साळुंके....181
- कलामहर्षी बाबूराव पेंटर../ जयश्री दाणी....182
- भाकर../ डॉ. सतीशकुमार पाटील....185
- निसर्गधून../ सतिश कोंडू खरात....186
- वादळ झालो मी../ जयराम मोरे....189
- साहित्य चोरी आणि नैतिकता../ राहुल बोर्डे....190
- सकारात्मक स्व-संवाद../ महेश भा. रायखेलकर....193

# व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंकास
# उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार प्रदान

- कोल्हापूर

दिवाळी अंक स्पर्धा २०२० चा निकाल जाहीर 'आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना' आणि 'आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संग्रहालय' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या दिवाळी अंक स्पर्धा २०२० चा निकाल प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर नुकताच जाहीर करण्यात आला आहे.

राज धुदाट यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रत्येक वर्षी साजरा होणारा पुरस्कार वितरण सोहळा आणि दिवाळी अंकांच्या संपादकांचे एक दिवशीय विशेष अधिवेशन यावर्षी महापूर आणि कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित केले जाणार नाही.


१ १ २ वर्षांची दिवाळी अंक परंपरा ही खास मराठी अभिरुचीचे प्रतीक आहे.

शब्दोत्सव Festival of Letters 2020

आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना

द्वारा प्रायोजित दिवाळी अंक स्पर्धा

शब्दोत्सव २०२० Festival of Letters 2020

उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार

व्यक्तीमत्त्व विकास

या दिवाळी अंकास सन्मानपूर्वक बहाल करण्यात येत आहे. मराठी साहित्य संस्कृतीला भरभरून देणाऱ्या दिवाळी अंकाबद्दल विशेष कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता व दिवाळी अंकाच्या वैश्विक पातळीवरील विशेष संवर्धनासाठी या पुढील काळातही आपण प्रयत्न कराल ही अपेक्षा आणि त्यासाठी हार्दिक शुभेच्छा...!

कार्यकारी संचालक

आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटना

Post Box - 69, Bypass Road, Jaysingpur - 416101, District - Kolhapur, Maharashtra

02322 - 225500, 9975873569, 8484986064, sunildadapatil@gmail.com

यास्तव दिवाळी अंक पुरस्काराचे प्रमाणपत्र भारतीय टपालाच्या द्वारे पुरस्कार प्राप्त दिवाळी अंकांना पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला; तसेच यावर्षी झालेल्या प्रदीर्घ जागतिक लॉकडाऊन आणि सामाजिकदृष्ट्या निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे दिवाळी अंक २०२० च्या निकालास विलंब लागला. मात्र सालाबादाप्रमाणे या वर्षीसुद्धा दिवाळी अंक २०२१ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

११२ वर्षांची दिवाळी अंक परंपरा ही खास मराठी अभिरुचीचे प्रतीक आहे. दिवाळी अंकाची ही परंपरा वेगळ्या धाटणीत सुरु ठेवण्याचं काम आम्ही आनंदाने करत आहोत. ही परंपरा पुढेही अशीच सुरु राहील. अशी माहिती आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक संघटनेचे कार्यकारी संचालक डॉ. सुनील दादा पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# कोरोना काळातील शिक्षण संक्रमण



- अथिती संपादक

टी. व्ही. वर बातमी झळकली, ‘राज्यातील शाळा चालू करण्यास परवानगी’. बातमी ऐकताच अभ्यास करत असलेली माझी भाची मंजिरी आनंदाने जवळपास ओरडलीच, “आत्तू sss आमची शाळा सुरु होणार..” किती खुश झालेली ती. जवळ जवळ दीड वर्षे घरातून ऑनलाइन लेक्चर्सवर चालणाऱ्या शाळेपासून सुटका झाल्याचे भाव तिच्या चेहऱ्यावर दिसून येऊ लागले. मागची इयत्ता अशीच ऑनलाइन गेलेली. परत एकदा शाळेची घंटा वाजणार, प्रार्थना होणार, मैत्रिणी भेटणार, शिक्षकांचं शिकवणं, प्रसंगी ओरडणं या सगळ्याला पारख्या झालेल्या विद्यार्थ्यांची ती एक प्रतिनिधी म्हणून समोर उभी आहे आणि आपला गगनात न मावणारा आनंद व्यक्त करतेय असंच वाटू लागलं.

खरंच, या आगंतुकपणे आलेल्या छोट्या विषाणूनं सर्वांच्या आयुष्यात किती मोठा बदल घडवून आणला. अगदी घड्याळाच्या काट्यावर चालणारं चाकोरीबद्ध मानवी जीवन कोलमडलं. शैक्षणिक क्षेत्रावर तर याचा खूपच परिणाम झाला. नियमितपणे सुरु असलेल्या वर्गात अचानक एक नोटीस आली. एरव्ही नोटीस आली की, शाळेला, कॉलेजला एखादा दिवस किंवा दिवाळीची एकवीस दिवस सुट्टी असं सांगितलं की साऱ्यांचे चेहरे अगदी फुलून यायचे. पण यावेळी ही नोटीस आलेली ती ‘कोरोनासारखं संकट समोर येतंय. त्याचा अटकाव करण्यासाठी अनियमित काळासाठी शाळा बंद राहील.’ सुरुवातीला ही सुट्टी चांगली वाटली. पण शाळा बंद झाल्या तसे गजबजून उठणारे वर्ग अगदीच शांत झाले. मुलांचं शैक्षणिक नुकसान होऊ लागलं. म्हणून मग तोडगा निघाला तो ऑनलाइन शिक्षणाचा.

ऑनलाइन शिक्षण! काहींना परवडणारं तर अनेकांना न परवडणारं. या कोरोना लॉकडाऊनमुळं सगळंच ठप्प झालेलं. अनेकांचे रोजगार हातचे गेलेले. दोन वेळच्या भाकरीचा चंद्र नशिबी असेल की नाही याची भ्रांत आणि त्यात मुलांचं शिक्षण ऑनलाइन. यासाठी लागणारा कॉम्प्युटर किंवा स्मार्टफोन प्रत्येकासाठी उपलब्ध होईल की नाही याची चिंता कोणी केलीच नाही. आणि सुरुवात झाली ऑनलाइन शिक्षणाला. गरीब असो वा श्रीमंत प्रत्येक पालकाला आपलं भविष्य दिसतं ते आपल्या मुलांत. मुलांसाठी काहीही करायला तयार असणाऱ्या या पालकांनी आपलं अन मुलांचं भविष्य घडविण्यासाठी पोटाला चिमटे लावून ऑनलाइन शिक्षणासाठी

मोबाईल उपलब्ध करून दिले.

'संकोचला काळ आता संकोचली नि अंतरे,
विज्ञानाने घडविली जगी किती मन्वंतरे.'

असं म्हणत या विज्ञानाचाच एक चमत्कार असणाऱ्या मोबाईलमुळं मुलांचं ऑनलाइन शिक्षण सुरु झालं. 'वर्गात प्रत्यक्ष समोरासमोर शिकवलं तरी मुलांच्या डोक्यात शिरत नाही तर आता या मोबाईलवरून शिकवलेलं काय ढेकळं कळणार आहे?' 'आणि असं शिक्षण घेणारे विद्यार्थी गुणवंत ठरले तरी त्यांचं ज्ञान कितीसं वाढलेलं असेल?' अशा शंका आणि प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले. दहावी-बारावी ही तर शालेय जीवनातील महत्त्वाची शैक्षणिक वर्षं. यानंतरच पुढे कोण काय होणार हे ठरत असतं, भवितव्य अवलंबून असतं. पण याही परीक्षा झाल्या नाहीत. मागच्या इयत्तेतील गुणांवरून मुल्यांकन केलं गेलं आणि मुलांना अक्षरशः निकालात काढलं. हो! निकालातच म्हणेन. कारण मागच्या इयत्तेवरून मुल्यांकन करणं हा शासनासाठी योग्य पर्याय वाटला असेल, पण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने मात्र तो चुकीचा ठरतो. काही कारणास्तव मागच्या इयत्तेत कमी गुण मिळालेला विद्यार्थी जोमाने अभ्यास करून येणाऱ्या परीक्षेत अधिक गुण मिळवू शकतो हे कोणी ध्यानातच घेतलं नाही. आणि सरसकट मागच्या वर्षीच्या गुणांवरून मुल्यांकन केलं गेलं.

बरं, हे असं करताना मुलांना मानसिक त्रास झाला तो वेगळाच. एकवेळ सांगितलं जायचं की परीक्षा होणार तोच दुसऱ्या दिवशी परीक्षा होणं शक्य नाही अशी घोषणा व्हायची. तेव्हा परीक्षा होणार की होणार नाहीत याविषयी शिक्षणव्यवस्थेत एकमत होईपर्यंत विद्यार्थ्यांच्या डोक्यावर परीक्षेच्या चिंतेची टांगती तलवार. यामध्ये विद्यार्थ्यांचा असाही एक गट, ज्यांना परीक्षा होणारच नाहीत याची पक्की खात्री. त्यांनी अभ्यासात काहीच स्वारस्य दाखवलं नाही. तर इतर विद्यार्थी शाळा सुरु नसतानाही प्रत्येक विषयाचं योग्य आकलन व्हावं यासाठी जीव तोडून अभ्यास करत झटत राहिले. एवढं सगळं होऊन शेवटी काय झालं, सरसकट सगळ्यांना एकाच तराजूत तोललं गेलं. तेही मुलांनी स्वीकारलं. पण त्यानंतर समाजातून बोलली जाणारी खोचक बोलणी मात्र जिव्हारी लागू लागली.

'कोरोना आला ते तुमच्या पथ्यावरच पडलं. खिरापतीसारखे मार्क्स मिळाले.' 'कोरोना नसता तर तू काय रे पास झाला असतास. वाऱ्या करणंच नशिबी होतं.' 'कोरोनाचा लाभ उठवला या पोरांनी.' अशी एक ना अनेक बोलणी खावून 'का म्हणून आमच्याच वेळी हा कोरोना आला.' असं म्हणण्याची वेळ या विद्यार्थ्यांवर आली.

जी गत शालेय विद्यार्थ्यांची त्याहून अधिक वाईट कॉलेजच्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या, पास झालेल्या विद्यार्थ्यांची. आवडीच्या क्षेत्रात करिअर करायचंय म्हणून आवडीचा ट्रेड निवडलेल्या विद्यार्थ्यांनाही याचा फटका बसला. आधीच मोठमोठ्या कंपन्यांनी आर्थिक ताण कमी करण्यासाठी अनेकांना ब्रेक दिलेला. छोटी मोठी भरती

करून घेताना या कोरोना काळात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर, सक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जाऊ लागले. अनेक ठिकाणी कोरोना काळात मिळालेल्या पदवीवर शंका घेऊन मुलांना अक्षरशः डावललं गेलं.

या सगळ्यात या मुलांची काय चूक? परिस्थितीच तशी वाईट बनलेली असं आपण मनाला समजावत राहतो. पण नंतर विचार केला की लक्षात येतं, या अशा शंका येणं शंभर टक्के चुकीच्या आहेत असं नाही. काही क्षेत्रं अशी आहेत जिथं फक्त हे ऑनलाइन शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी चालणारच नाहीत. घरात बसून शेतीविषयक ऑनलाइन शिक्षण घेणारा विद्यार्थी किंवा सर्जरीविषयी ऑनलाइन माहिती घेणारा, धडाधड उत्तरं देणारा पोपटपंची डॉक्टर नक्कीच योग्य ठरणार नाही. त्यासाठी त्यांना प्रात्यक्षिक माहिती असणं गरजेचं आहे. आता आपल्या व्यवस्थेमध्ये कोणाला काय येतं किंवा कोण कशात निपुण आहे हे न बघता छापील सर्टिफिकेटवर, त्यातील गुणांवरच नोकरी मिळते, निवड केली जाते हा भाग निराळा. पण आत्ताच्या काळात मिळालेले अव्वाच्या सव्वा गुण बघताना समोर आलेला उमेदवार प्रात्यक्षिकरित्या किती निपुण आहे हेही तपासलं पाहिजेच.

कारण कोरोना पूर्व काळातील शिक्षण आणि आत्ताचे ऑनलाइन शिक्षण यात बरीच तफावत आहे. कोरोना आधीच्या काळातील प्रत्यक्ष शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हायचा. विविध परीक्षांमुळे विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता समजून यायची. शाळा, कॉलेजमध्ये घेतल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास होऊन आत्मविश्वासात वाढ व्हायची. शिक्षणाची, वाचनाची ओढ वाटायची. प्रॅक्टिकलच्या वेळेस तासनतास प्रयोगशाळेत उभं राहून नवनवीन प्रयोग करणारा विद्यार्थी विज्ञानाची कास धरायचा. विज्ञानाविषयीची निष्ठा, विज्ञानवादी विचार मनावर रुजायचे. या साऱ्या गोष्टींना ऑनलाइन शिक्षण घेणारे विद्यार्थी मुकले. आणि त्यामुळेच तर त्यांच्या सक्षमतेवर प्रश्न निर्माण झाले.

तेव्हा या साऱ्या गोष्टींचा सारासार विचार करून या मुलांसाठीही काहीतरी करणं गरजेचं आहे. किंबहुना ते महत्त्वाचं आहे. कारण जी मुलं आपल्या देशाचे भवितव्य, भविष्य ठरणार आहेत त्यांचा पाया कमकुवत ठेवणं कधीही योग्य ठरणार नाही. त्यादृष्टीनं योग्य ती पावलं उचलून शाळा, कॉलेजच्या प्रांगणात बहरणारी, शिक्षण घेणारी, सहशिक्षणातून आनंददायी वातावरणात नवनवीन संकल्पना शिकत व्यक्तिमत्वाचा विकास करणारी पिढी निर्माण होणं अत्यंत निकडीचं आहे. याबद्दल कोणासही शंका नसावी.

**- सुषमा जयसिंगराव माने-गावडे / शिरोळ**
**मो.- 7020072678**

# दिवाळी अंकाची विषयी..

दिवाळी अंक हे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. दिवाळी सणाच्या सुमारास निघणाऱ्या विशेष अथवा वार्षिक नियतकालिकांना दिवाळी अंक असे म्हणतात. मनोरंजन हा सन १९०९ साली छापला गेलेला मराठीतला प्रथम दिवाळी अंक होता. सन २००९ मध्ये दिवाळी अंकांचे शतक पूर्ण झाले आहे. काळानुरूप त्यात बदल झाला आहे. आता महाराष्ट्रात सुमारे १००० हून अधिक दिवाळी अंक प्रतिवर्षी प्रदर्शित होतात. या दिवाळी अंकामध्ये विशेष विषय घेऊन सुद्धा काही अंक प्रसिद्ध होतात. त्यापैकी "व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक" आहे. प्रत्येक वर्षी नवनवीन विषयांची सदरे दिवाळी अंकात प्रसिद्ध केली जातात. यावर्षी सुद्धा असाच प्रयत्न आहे.

प्राचीन काळी गुरु हा सर्वेसर्वा असे आणि केंद्रस्थानी गुरुच असे गुरु सांगेल ती पूर्व दिशा असे गणित होते. पण आज ह्या आधुनिकतेच्या आणि नवीन तंत्रज्ञान यांची सांगड जर घातली तर "विद्यार्थी" हा शिक्षणाचा केंद्रबिंदु आहे, फळा आणि खडू ही संकल्पना आजच्या युगात थोडी मागे पडली डिजिटल ह्या शब्दांन धूमाकुळच घातला.

कोरोनानंतर शिक्षण क्षेत्रात फार मोठे बदल घडून आले. सुरवातीला ते कठीण होते पण एकदा काय त्यांची सवय झाली कि ते सर्वांसाठी सोयीस्कर आणि फायदेशीर नक्कीच ठरेल अशी आशा आहे. शिक्षकाची भूमिका या पद्धतीत महत्वपूर्ण आहे. कारण स्मार्ट फ़ोन, लॅपटॉप याचा वापर करून शिकवणे पूर्णपणे वेगळ आहे त्यासाठी शिक्षकानी विद्यार्थ्यासाठी एक उत्तम गाईड बनल पाहिजे.

अंशतः माध्यमिक आणि महाविद्यालयीन स्तरावर काही प्रमाणात ही ऑनलाइन शिक्षण पद्धती प्रभावी ठरु शकते. पण प्राथमिक स्तरावर समस्या उदभवु शकतात. अनेक लहान मुले, मुली या सोशल मिडीयाच्या मायाजाळात अडकून बसलेली आपणास दिसत आहे. ० ते ५ वयोगटातील बालके सर्वसाधारणपणे दिवसातील ४ ते ५ तासांचा वेळ हा सोशल मिडीयाचा वापर करताना दिसते आहे. याचा परिणाम या बालकांच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिकतेवर होत आहे. अनेक विचारवंताना भविष्यातील पिढी ही सुदृढ, सक्षम, आत्मविश्वासू, मेहनती, रीतीरिवाज, परंपरा, त्याच बरोबर उत्तम समाज घडेल की नाही याची शाशंकता वाटत आहे.

यावर्षीचे दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ बनविताना सोशल मिडीयाच्या मायाजाळात अडकलेला आधुनिक भारताचा अभिमन्यूची दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या मायाजाळातून बाहेर निघण्याचा स्वच्छ, सुंदर, सोपा उपाय कोणता आहे? याच्या विचार अनेक बालक आणि पालकांना पडला आहे. या मायाजाळातून बाहेर कसे पडावे यासाठी यंदाच्या दिवाळी अंकात काही विशेष लेखांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व साहित्यिकांनी स्वत:चे दर्जेदार साहित्य पाठून दिवाळी अंकाची शोभा वाढविली आहे. आपल्या दर्जेदार साहित्याने **"व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०२०"** सालचा **"उत्कृष्ट दिवाळी अंक"** म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. याबद्दल मी सर्व साहित्यिकांचे मनापासून आभार मानतो.

**– संपादक**

# सकारात्मक दृष्टीकोनाची अद्भुत शक्ती



तुमच्या मनात नेहमी नकारात्मक विचार येतात का?
तुमच्या मर्यादित धारणा तुम्हाला मागे खेचत आहेत का?
तुमच्या जीवनात कठीण प्रसंग आल्यावर काय करावे हे सुचत नाही का?

असे विचार सर्वांच्या मनात येत असतात, या सर्व गोष्टींवर मात करण्यासाठी सकारात्मक विचार करणे फार जरूरी आहे.

जीवनात सकारात्मक दृष्टीकोन कसा ठेवायचा याकरिता ५ सूत्र या लेखात मांडले आहेत.

सकारात्मक दृष्टिकोन तुम्हाला कठीण प्रसंगाला धैर्याने तोंड द्यायला शिकवतो. अशा विधायक दृष्टिकोनामुळे तुम्ही आनंदी, आशावादी, उत्साही रहाल व प्रगतीकडे वाटचाल कराल.

ध्येय प्राप्तीच्या वाटचालीतील आव्हानं, अडथळे पार करण्यासाठी आत्मविश्वास देण्याचं काम सकारात्मक दृष्टिकोन करत असतो. आकस्मिक संकट, अपयश अथवा भीती यामुळे डगमगून न जाता धीराने सामना करण्याचे बळ सकारात्मकतेमुळे प्राप्त होते.

**सकारात्मकता याबाबत एक छोटीशी गोष्ट.**

एका छोट्याश्या दुष्काळी खेड्यात पाऊस पडत नव्हता. तेव्हा सर्व गावकरी देवाकडे पावसाची याचना करतात. त्यासाठी यज्ञाचं आयोजन करतात. दुसऱ्या दिवशी यज्ञाचा विधी सुरु होतो, तेव्हा एक मुलगा त्या ठिकाणी छत्री घेऊन येतो. त्याला आश्चर्य वाटते की त्याच्याशिवाय एकाही गावकऱ्यांनी छत्री आणलेली नव्हती.

जर लोकांना विश्वास आहे की यज्ञ केला तर पाऊस पडेल, मग कुणी छत्री का आणली नाही. मग तो मुलगा त्यातील एका समंजस वृद्धाकडे याबाबत विचारणा करतो. तो वृध्द सांगतो "बेटा, काही चांगलं घडावं, अशी सगळ्यांचीच ईच्छा असते पण आपण त्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांवर लोकांचा विश्वास नसतो, त्यामुळे अपेक्षित चांगले परिणाम मिळतील याची शाश्वती नसते.

तुमच्या प्रयत्नांवर विश्वास ठेवा आणि सकारात्मक दृष्टिकोन बाळगा. सर्व काही तुमच्या मनाप्रमाणे घडेल.

जीवनात सकारात्मक दृष्टीकोन कसा ठेवायचा याकरिता ५ सूत्र या लेखात मांडले आहेत. या ५ सूत्रांचा रोजच्या जीवनात अवलंब केल्यास तुम्ही नक्कीच सकारात्मक

रहालमात्र कुठल्याही आव्हानांचा सकारात्मकतेने सामना करू शकाल.

## पाहिले सूत्र : MBA

### M म्हणजे Meditation :-

ध्यानधारणा हे सकारात्मकता देणारे शक्तिशाली तंत्र आहे. मनात योग्य विचारांची मशागत ध्यानामुळे होते. विचारानुसार तुम्ही अपेक्षित गोष्टी घडल्याची तुम्ही मनात कल्पना करता, मग ते प्रत्यक्ष घडण्यासाठी कृती करता आणि एका कृतीशील दिवसाची सुरुवात करता.

ध्यानधारणा हे मनातील विचारांना वळण देणारे प्रभावी तंत्र आहे.ध्यानधारणा तुमच्या तणावाचे नियमन करते. तुमची

कल्पनाशक्ती, एकाग्रता, ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती यात सुधारणा होते. यातून तुम्हाला नवनवीन कल्पना सुचतात स्फूर्ती मिळते आणि तुमची क्रयशक्ती सुधारते.

ध्यानधारणेमुळे तणाव, चिंता निवळतात आणि मानसिक आरोग्य सुधारते.

### B म्हणजे Brisk Walk :-

रोज सकाळी चालण्याच्या सवयीचा तुमच्या सकारात्मकतेत मोठा सहभाग असतो. सकाळी लवकर उठुन प्रसन्न वातावरणात, हिरवळीवर चालताना तुम्हाला शांत आणि मस्त वाटत असतं. सकाळी हवेत प्राणवायूचे प्रमाण जास्त असते, याने आपणास ताजेतवाने वाटते.

पक्षांच्या किलबिलाटाने तुम्ही आनंदी आणि उत्साही होता. तुम्ही जेव्हा जलद चालता तेव्हा तुमच्या मेंदूत सेरोटोनिन संप्रेरक स्त्रवते, त्यामुळे तुमचा मूड आनंदी होतो आणि एक प्रकारची सकारात्मकता येते.

जलद चालल्याने शरीरातील रक्ताभिसरण सुधारते. शरीरातील प्रत्येक पेशी पर्यंत प्राणवायू पोहोचतो. त्यामुळे तुम्ही ताजेतवाने आणि उर्जावन होता. जलद चालल्याने स्नायूंना बळकटी येते. पर्यायाने तुम्ही दिवसभर उत्साही होऊन निश्चित केलेली कामे पुर्ण करू शकता. याचा फायदा मधुमेह व रक्तदाब असणाऱ्यांना देखील होतो.

### A म्हणजे Affirmation :-

स्वतःच्या अंतर्मनाला आपण ज्या सूचना देतो त्याला Affirmation म्हणतात. तुम्ही जर चांगल्या सकारात्मक गोष्टी स्वतःच्या अंतर्मनाला दिल्यास आणि त्या गोष्टी वारंवार लिहिल्यास तुम्ही तुमच्या अंतर्मनाला प्रशिक्षित करता, त्यामुळे मनावरचा ताण हलका होतो.

रोज सकाळी खाली नमूद केलेल्या स्वयंससुचना स्वतःसाठी तयार करा. मी सकारात्मक आहे, मी सर्वोत्तम आहे, मी शक्तिशाली आहे, मी निर्भय आहे, मी

आरोग्यसंपन्न आहे, मी आनंदी आहे, मी उत्साही आहे. अशी वाक्ये वारंवार बोलल्याने-लिहिल्याने तुमच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून येतील.

## दुसरे सूत्र : VIP

### V म्हणजे Visualisation :-

प्रत्येक गोष्ट दोन वेळा घडते. एकदा तुमच्या मनात, दुसऱ्यांदा प्रत्यक्षात. visualisation म्हणजे आपल्या अंतर्मनात आपली जी काही स्वप्ने किंवा ध्येय आहेत ते डोळे बंद करून Visualise करणे.

ही क्रिया खुप सोपी आहे. आपले स्वप्नं प्रत्यक्षात साकारलय अशी कल्पना करा. स्वप्न साकारल्याची अनुभूति घ्या. यामुळे तुमचं सुप्त मन कार्यान्वित होऊन तुम्हाला स्वप्न साकारण्याचे विविध मार्ग सामोरे येतील. त्यामुळे प्रोत्साहित होऊन तुम्ही स्वप्नपूर्तीसाठी कार्यरत व्हाल.

### I म्हणजे Identify :-

आत्मविश्वासी, समविचारी, हितचिंतक आणि मार्गदर्शक आणि सकारात्मक असलेल्या लोकांमध्येच रहा. त्यामुळे तुमच्या विचारशक्तीला चालना मिळेल. मग तुम्हालाही आत्मविश्वासाने आणि सकारात्मकतेने वावरणे शक्य होईल.

### P - Prayer :-

रोज देवाची प्रार्थना करा. प्रार्थना करण्यामुळे जगाचं नियमन करणारी शक्ती पाठीशी उभी राहते. ही भावना तुम्हाला सशक्त करते.

तुमचे आत्मिक बळ वाढते. प्रार्थनेमुळे तुम्ही जीवनातील अडीअडचणी, अडथळे यावर मात कराल.

प्रार्थनेमुळे आपले मन प्रसन्न होईल, मनात विधायक विचार येतील तसेच मनस्थिती चांगली राहील.

## तिसरे सूत्र : LAN

### L म्हणजे Love :-

प्रेम हे आनंदाचे, एकमेकांना सांभाळून घेण्याचे, इतरांच्या विचारांचा आदर करण्याचे प्रतिक आहे. इतरांशी प्रेमाने बोला. प्रेमामुळे मोठ्यातली मोठी अडचण एक क्षणात मिटू शकते. तसेच तुम्ही स्वतःवर सुद्धा प्रेम करायला शिकलं पाहिजे. यामुळे तुमची प्रतिमा स्वतःच्या नजरेत उंचावते, तुमचा आत्मविश्वास वाढतो. तुमचे व्यक्तिमत्व सकारात्मक होत जाते.

नवनवीन गोष्टी करून बघा. त्यामुळे तुमच्या सुप्त बुद्धीमत्तेची तुम्हाला जाणीव होईल.

जे चुकीचे घडले, त्यावर पश्चाताप करत बसु नका. स्वतःला माफ करायला शिका फक्त चुकांची पुरानवृत्ती टाळा.

छोट्या उपलब्धीवर स्वतःची पाठ थोपटा.

निसर्गाच्या सानिध्यात रहा, त्यासाठी प्रवास करा. शेती, नदी, समुद्र, हिरवळ यांचा आनंद घ्या. अश्या मोकळ्या हवेत फिरल्याने तुम्हाला स्वस्थ, शांत व सकारात्मक वाटेल.

तसेच तुम्हाला ब्रम्हांडातील प्रत्येक व्यक्तीला प्रेम द्या, प्रेमाने बोला म्हणजे Law of attraction नियमाप्रमाणे सर्वांकडून तुम्हालाही तेवढेच प्रेम मिळेल.

**A- Adapt :-**

जगातील बदलत्या वातावरणाशी, बदलत्या परिस्थितीशी जुळवुन घ्यायला शिका. आता कोरोनाचे उदाहरण घ्या. ह्या अवघड परिस्थितीत ही तुम्ही गेली एक वर्ष धीराने, योग्य ती काळजी घेऊन या आव्हानांचा सामना करत आहात म्हणजेच या परिस्थिती सोबत स्वतःला Adapt केले आहे.

याचप्रमाणे तुम्ही तुमच्या आयुष्यात येणाऱ्या प्रसंगाशी Adapt करा.

**N- New Skills :-**

जेव्हा तुम्हाला निराश, तणाव जाणवेल, तेव्हा नवा उपक्रम सुरु करा. नवीन कौशल्ये शिका. नवीन पुस्तक वाचणं, नाचगाणे, वाद्य वाजवणे यात वेळ घालवा. यामुळे तुमचं लक्ष नकारात्मक बाबींवरुन

कौशल्याकडे वळेल आणि तुम्ही प्रोत्साहित व्हाल.´

**चौथे सूत्र : GEM**

**G- म्हणणे Gratitude :-**

कृतज्ञता म्हणजे तुम्हाला जे जे मिळालाय त्याबद्दल कृतज्ञ भाव ठेवणे. तुम्हाला जे मिळालय त्याबदल्यात तुम्ही जगाला चांगलं देऊ शकता.

Gratitude तुम्ही संपूर्ण ब्रम्हांडला, निसर्ग, धरती, तुमचे आई-वडील, भाऊ बहीण, सर्व नातेवाईक, मित्र तसेच या ब्रम्हांडातील ज्यांनी तुम्हाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या मदत केली अशा सर्वांना कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. कृतज्ञता व्यक्त केल्याने तुम्हाला खुप चांगले वाटेल.तुम्ही जे काही ब्रह्मांडला देता ते कित्येक पटीने तुम्हाला परत मिळेल.

**E म्हणजे Enthusiasm :-**

यशस्वी लोकं यशाची मोठी शिखरे सर करतात कारण त्यांच्यात प्रचंड उत्साह असतो. उत्साहामुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते यामुळे तुम्ही यशासाठी सर्वोत्कृष्ट कामगिरी करु शकता.

**M म्हणजे Music :-**

संगित (गायन, वादन किंवा ऐकणे) हे जीवनात आनंद, उत्साह आणि सकारात्मक बदल घडवून आणण्यात नक्की प्रभावशाली आहे. आपल्या मेंदूबाबत शास्त्रज्ञानी असे म्हटले आहे की, संगिताने Dopamine संप्रेरके स्त्रवतात त्यामुळे व्यक्ती आनंदी होते.

**पाचवे सूत्र BAG**

**B म्हणजे Be Kind :-**

माझ्या स्वतःच्या आयुष्याचे Be kind to everyone हे ब्रीदवाक्यच

आहे. दयाळू असल्याने तुम्ही लोकांच्या उपयोगी पडू शकता. यामुळे तुमच्या मधील अहंकार, मत्सर, गर्व यावर मात कराल. व्यर्थ गोष्टीत वेळ वाया न जाता तुमची कार्यक्षमता वाढेल.

अल्बर्ट स्वीटतझर म्हणतात की, दयाळूपणामुळे तुम्ही असाध्य गोष्टी साध्य करु शकता.

सूर्याच्या उष्णतेमुळे बर्फ वितळतो, तसच दयाळूपणामुळे गैरसमज, अविश्वास आणि वाईट भाव नष्ट होतात. नात्यात कमालीची सुधारणा होते.

दयाळूपणामुळे तणावाला सामोरे जाणे सोपे होते कारण असं वागत असताना तुम्ही स्वतःच्या समस्या काही काळाकरता विसरता. दयाळूपणा तुम्हाला नम्रता शिकवतो.

**A म्हणजे Accept :-**

एखादी समस्या आली तर त्या परिस्थितीचा मनापासून स्वीकार करा. समस्येच्या संभाव्य उत्तरावर लक्ष केंद्रित करा. समस्येवर नाही. यामुळे समस्येची लवकर उकल होईल आणि तुम्ही आनंदी व्हाल. तसेच तुम्ही जसे आहात तसे स्वतःला स्वीकारा आणि म्हणा I am awesome.

**G म्हणजे Give :-**

तुम्हाला कधीही निराशेने ग्रासलं तर आजूबाजूच्या गरजू व्यक्तीला मदत करा. जेव्हा तुम्ही तुमचा वेळ, पैसा गरजू व्यक्तीला देता, तेव्हा तुमचा आत्मसन्मान वाढतो. त्यामुळे तुम्ही समाधानी व आनंदी होता. अशा प्रकारच्या गुणामुळे तुम्ही काही नैतिक मुद्दे उराशी घेऊन जगता आहात, ही भावना तुम्हाला सुखावुन जाते.

या ५ सूत्रांचा रोजच्या जीवनात अवलंब केल्यास तुम्ही नक्कीच सकारात्मक रहाल. मजेत रहा, स्वस्थ रहा, हसत रहा, मस्त रहा आणि जबरदस्त रहा.

**– नितीन पाटील**
**संस्थापक : उत्तुंग भरारी अकॅडमी**

# हवंच होतं मला....



हवं होतं मला कुबड्या टाकून चालायला
उड्या मारत पळत जायला
प्रत्येक स्पर्धेत जिंकून यायला
हवंच होतं मला....

सर्वांना जसं मी समजून घेतलं
जमेल तसं सर्वांना शहाण केलं
प्रसंगी आधार बनून सक्षम केलं
अगदी तसचं माझा आधार व्हायला
हवंच होतं मला....

कुणीतरी समजून घ्यायला
सुदृढ शरीरातल्या कोमल हृदयाला ओळखायला
हसणाऱ्या चेहऱ्यामागच्या रडणाऱ्याला बघायला
करारी नजरेतल्या मृदू भावनेला समजायला
हवंच होतं मला कुणीतरी ओळखायला
प्रत्येकाने फसवलं म्हणून....

परवानगी नाहीच मला थकायला
कितीही झाला त्रास तरी मला हरायला
इतकं पाषाणासारखं आयुष्य जगायला
परिस्थितीन शिकवलं मला कठोर व्हायला म्हणून कदाचित...

हवंच होतं मला चॅलेंज स्वीकारायला
प्रश्नांची उत्तरे स्वत:चं शोधायला
एक धाडसी माता म्हणून जगायला
रणरागिणी अशा वाघिणी घडवायला हवंच होतं मला....

**- सौ. मनीषा पिंटू वराळे / धरणगुत्ती**
**मो.- 7057225407**

**(- कवयत्री, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०१९ च्या अतिथी संपादक आहेत.)**

# कोरोना काळ आणि ऑनलाईन शिक्षण



कोरोना हे नाव जरी घेतले तरी पायाखालची जमीन पूर्णतः सरकते, कारण हा रोग एवढा भयानक आहे कि संपूर्ण जगावर त्याचा फार भयंकर परिणाम झाला आहे. संपूर्ण जगात या रोगाने हाहाकार माजवला आणि खूप लोकांचा या रोगाने बळी घेतला. भारतातसुद्धा या रोगाने खुप हाहाकार माजवला आणि सर्वच क्षेत्रावर त्याचा परिणाम झाला. शिक्षण क्षेत्र हे देखील त्यास अपवाद नसेल. कोरोनानंतर शिक्षण क्षेत्रावर फार मोठे बदल घडून येतील. सुरवातीला ते कठीण असतील पण एकदा काय त्यांची सवय झाली कि ते सर्वांसाठी सोयीस्कर आणि फायदेशीर नक्कीच ठरतील.

एनसीईआरटी शाळा उघडण्याच्या नव्या यंत्रणेचा शोध घेतील, तर युजीसी महाविद्यालये आणि विद्यापीठांसह उच्च शैक्षणिक संस्थांसाठी कार्यपद्धती राबवतील. सुधारित आसन व्यवस्था, वेळ बदलणे आणि वर्ग बदलणे यासाठी वेगवेगळ्या विभागांमध्ये वर्ग करणे ही शाळांमधील मुख्य वैशिष्ट्ये असू शकतात जेव्हा ते कोरोनव्हायरस साथीच्या आजारात पुन्हा उघडले जातील. केवळ शाळा दरम्यानच नाही तर शाळा बस सेवेसारख्या वाहतूक सुविधांवरही सामाजिक अंतर राखले जाणे आवश्यक आहे. एनसीईआरटीकडून या कार्यपद्धतींवर कार्य केले जाईल.

एनसीईआरटी शाळा सुरु करण्यासाठी नवीन यंत्रणा शोधत आहे, तर यूजीसी येत्या सत्रासाठी महाविद्यालये आणि विद्यापीठांसह उच्च शैक्षणिक संस्थांची कार्यपद्धती राबवतील. शाळांमधील स्वच्छता, आरोग्यविषयक मापदंड राखण्यासाठी एक टास्क फोर्स तयार करण्यात येईल. कोरोनाव्हायरसशी संबंधित समस्या हाताळण्यासाठी महाविद्यालयांना प्रत्येक संस्थेत कोविड -१ सेल तयार करण्यास सांगितले आहे. युजीसीने असे सांगितले आहे की ऑगस्टमध्ये नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी नवीन बॅचचे वर्ग सप्टेंबरपासून सुरु होतील, परंतु शाळा पुन्हा कधी उघडल्या जातील याविषयी स्पष्टता नाही.

लॉकडाऊन नंतर शाळा पुन्हा सुरु होईल "शाळा प्रशासन आणि शिक्षक शाळा पातळीवरील सर्व भागधारकांच्या विशिष्ट भूमिका व जबाबदाऱ्या निश्चित करणे, परिभाषा व स्थापना यासारख्या विविध कामे पार पाडतील. आरोग्य आणि स्वच्छता आणि इतर सेफ्टी प्रोटोकॉल किंवा मानक ऑपरेटिंग प्रक्रिया (एसओपी) शाळा पुन्हा सुरु करण्यापूर्वी आणि नंतर, शाळा कॅलेंडर आणि वार्षिक अभ्यासक्रम

योजनांचे पुनर्निर्धारण किंवा सुधारित करणे, लॉकडाऊन दरम्यान औपचारिक शालेय शिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांचे सहज संक्रमण सुनिश्चित करते. विद्यार्थ्यांचे भावनिक कल्याण सुनिश्चित केले जाईल. शाळा कुठल्याही गोष्टीची कमतरता गमावू नये यासाठी चेकलिस्ट तयार करतील. सीबीएसई चेकलिस्ट त्यांच्या सामायिक करतील.

कोरोनाव्हायरसमुळे लॉकडाऊन संपल्यानंतर मुलांच्या शालेय शिक्षणात बदल होईल. नवीन निकष व मार्गदर्शक सूचनांद्वारे शाळांची कार्यक्षमता सुधारित करावी लागेल. शाळांना वेगवेगळ्या आसन व्यवस्था, वेळापत्रकात बदल तसेच वर्गांचे विभाजन आवश्यक असेल. कोरोनाव्हायरस पुन्हा होण्याची शक्यता कमी असल्याने शाळा पुन्हा उघडल्या की प्रस्तावित सर्व उपाययोजना विचारात घेतल्या जातील.




शासनाने शाळा कधी आपले कामकाज पुन्हा सुरु करणार याबाबत काही स्पष्ट केले नाही. सध्या विद्यार्थ्यांचे आरोग्य हे सरकारसाठी महत्त्वाची चिंता आहे आणि कोरोनाव्हायरस परिस्थिती सामान्य झाल्यावरच शाळांना हिरवा कंदील दिला जाईल. शासनाने सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना आरोग्य सेतु अ‍ॅप डाऊनलोड करण्याचे आवाहन केले आहे जे सतत आवश्यक माहिती पुरवेल.

कोविड -१ च्या पार्श्वभूमीवर मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून देशभरातील शाळा आणि महाविद्यालये बंद आहेत. नॅशनल कौन्सिल फॉर एज्युकेशनल रिसर्च अ‍ॅड ट्रेनिंग (एनसीईआरटी) लॉकडाऊननंतर शाळा पुन्हा सुरु करण्याच्या मार्गदर्शक सूचनांवर काम करत आहे. सुचविलेल्या काही उपायांमध्ये शाळांमध्ये बराच काळ

असेंब्ली सेशन, सेमिनार आणि मेळावे होत नाहीत. याशिवाय सामाजिक अंतर कायम ठेवण्यासाठी शाळा एका वेळी फक्त ३० टक्के विद्यार्थ्यांना कॉल करतील. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये एका वेळी ३० टक्के विद्यार्थ्यांना कॉल करणे यासारख्या विविध गोष्टी सुचविण्यात आल्या आहेत.

महाविद्यालये तसेच शाळा आता जवळजवळ दोन महिने बंद राहण्यास सांगितले आहे. शिक्षक घरूनच ऑनलाइन वर्ग घेत असताना काही बोर्ड परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. स्वयंसेवक, दीक्षा आणि स्वयं प्रभा अशा ऑनलाईन शिकवण्याच्या पद्धतींचा वापर सुरू ठेवला जाईल. जे डिजिटल शिक्षणाचे परस्पर संवाद साधू शकतात, असे अहवालात ठळक करण्यात आले आहे. ही एक संधी मानली जाऊ शकते जी भारताची डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत करेल.

सध्य परिस्थितीत शाळा उघडल्या तर अनेक बदल होतील. मुलांच्या बैठव व्यवस्थेत तसेच शाळांच्या वेळांमध्येही बदल होईल. वर्गांना जास्तीत जास्त सत्रांमध्ये विभागलं जाऊ शकतं. एनसीईआरटीने शाळा उघडण्यासाठी नव्या व्यवस्थेवर भर देण्याच्या सूचना केल्या आहेत. उच्च शिक्षण संस्थांसाठी काम करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाने कॉलेज सुरु कधी होणार ते स्पष्ट केले आहे. नवीन विद्यार्थ्यांसाठी सप्टेंबरपासून तर जुन्यांसाठी ऑगस्टपासून कॉलेज सुरु होणार आहेत. मात्र शाळा कधी सुरु होणार हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

देशभरात करोना व्हायरसमुळे उद्भवलेल्या स्थितीमुळे मार्च २०२० च्या अखेरच्या आठवड्यापासून लॉकडाऊनस्थिती आहे. त्यामुळे तेव्हापासून शाळा, महाविद्यालये आणि अन्य सर्व शिक्षण संस्था बंद आहेत. बहुतांश राज्यांनी पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना परीक्षेशिवायच पुढील वर्गात प्रमोट करण्याचा निर्णय घेतला आहे. काही राज्यांतील दहावी, बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा शिल्लक आहेत. सीबीएसई बोर्डाच्याही काही परीक्षा शिल्लक होत्या, त्या लॉकडाऊननंतर होणार आहेत. परीक्षांच्या तारखांचीही घोषणा झाली आहे.

सर्व विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी आणि शाळेतील इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वरंक्षणासाठी वैद्यकीय सुरक्षा साहित्य (मेडिकल सेफ्टी किट) स्वतःहून वापरणे बंधनकारक असेल आणि कोणाजवळ ते नसेल त्यांना शाळेतून अतिदक्षता विभागातून पुरवले जाईल. जर कोणीही कायद्यांचे आणि नियमांचे उल्लंघन करताना आढळल्यास त्यावर योग्य कारवाई किंवा चेतावणी दिली जाईल. शाळेतून घेण्यात येणारे आरोग्याच्या काळजीचे निर्बंध हे सर्वांच्याच हिताचे असल्याने बहुतांश या प्रक्रियेला चांगलाच प्रतिसाद मिळणे आणि योग्य सहकार्य मिळणे नक्कीच अपेक्षित असेल.

कोरोनाव्हायरस (साथीचा रोग) सर्व देशभर (किंवा (साथीचा रोग)) साथीच्या रोगाने जागतिक स्तरावर कित्येक क्षेत्रे विस्कळीत झाली आहेत आणि शिक्षण याला

अपवाद नाही. शिक्षण क्षेत्राने देशभरातील शाळा, विद्यापीठे, कोचिंग संस्था आणि इतर शैक्षणिक संस्था बंद केल्याने याचा परिणाम झाला आहे.

यामुळे विद्यार्थ्यांना आणि भविष्यातील तयारीसाठी इच्छुकांना परिणाम झाला आहे. या परिस्थितीत, ऑनलाइन शिक्षण ही शहरातील चर्चेचा विषय बनली आहे आणि लॉकडाऊन दरम्यान बरेच ट्रेक्शन मिळवले आहे. शिक्षण तज्ञांचे मत आहे की शिक्षण थांबू नये, म्हणूनच शिक्षण ऑफलाइनमधून आभासी जगात गेले आहे.

या लॉकडाऊन परिस्थितीत वर्ग आयोजित करण्याचे एकमेव माध्यम म्हणजे ‘ लाइव्ह लेक्चर ’. आपल्याला आशा आहे की कमीत कमी ६० टक्के विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेण्यास सुरुवात केली. जर पालकांनी ते गांभीर्याने घेतले तर हा प्रयोग १०० टक्के यशस्वी नक्कीच होऊ शकतो. ऑफलाइन ते ऑनलाइन शिक्षणापर्यंतचे हे बदल शाळांना मोठ्या प्रमाणात मदत करेल.

कोरोनाव्हायरस विरुद्ध लढा देण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आरोग्य सेतू अँप डाऊनलोड करुन कोरोनव्हायरसशी संबंधित ताजी माहितीवर अद्ययावत रहाण्यास सांगितले जाईल. कोरोनव्हायरस प्रेरित लॉकडाऊनमुळे मार्च आणि मध्यभागी शाळा आणि महाविद्यालये बंद आहेत. शिक्षकांना ऑनलाइन पद्धतीने घरातून शिकवण्यास सांगितले गेले आहे. त्यांना विविध पद्धतींनी ऑनलाईन शिकवणी चालू ठेवण्याचे आवाहन केले जाईल. “आपण या परिस्थितीला संधीप्रमाणे मानले पाहिजे आणि डिजिटल पायाभूत सुविधा बळकट केल्या पाहिजेत.

“भारतीय शिक्षण क्षेत्र हळूहळू ऑनलाइन वर्गांची कल्पना स्वीकारत आहे कारण यासारख्या संकटाचा हा सर्वोत्तम उपाय आहे. जर मोबाईल, संगणक किंवा लॅपटॉप आणि मूलभूत इंटरनेट कनेक्शनसह सहाय्य केले तर विद्यार्थी जिथे आहेत तेथून वर्गात येऊ शकतात.”

कठीण काळ सर्वांवर आला
खूप काही त्याने शिकवले,
अमुलाग्र हे बदल जोपासू
यातच आता सर्वांचेच भले.!

**– भूषण सहदेव तांबे / मुंबई**
**मो.– 9029258038**

# लगीन घाई



प्रिये वाटते आज रातीला
तुझ्या संगें लगीन करावे
लग्नासारखा सखे सोबती
असतील चंद्रमा वरहाडी
असतील लुकलुकणारे
तारे आणि साक्षीस
असेल निळेभोर आकाश
आणि चमकणारे काजवे
मध्येच पावसाची एक
सर यावी व अक्षदा
म्हणून दोघांवर कोसळावी
आणि मध्येच एक तारा
तुटायला आणि आपल्या
मीलनाचा बहाना होवोवा
व रातसंध्याचा कुशीत
विसावा व नव्या स्वप्नांची
पहाट व्हावी गवतावर
जसे दवबिंदू पडावे



- संदिप रामदास मोकळे / औरंगाबाद
मो.- 9922224083

# सकारात्मक विचार

आजच्या करोना महामारीच्या काळात,सकारात्मक विचार करण्याचे (Positive thinking) धडे देणारे अनेक महापंडित समाजात आपल्या आजूबाजूला आढळतात.पण प्रत्यक्षात TV चॅनलवरील बातम्या आणि सिरियल, तसेच वर्तमानपत्रे, मासिके ह्यामधून रात्रंदिवस, खून,दरोडे, जाळपोळ, महिलांवरील अत्याचार, संसारातील कलह, घटस्फोट, अपघात, पुढाऱ्यांकडून होणारी जनतेची लूट, फसवाफसवी, साठेबाजी, राजकीय पक्षांनी केलेला घोडेबाजार, आत्महत्या, गुंडगिरी, अंधश्रद्धाचे बळी, ह्याच बातम्या बघायला व वाचायला मिळतात. ह्याला अपवाद म्हणून एखादी चांगली आनंद देणारी बातमी असली तर आपले नशीब समजायचे.

प्रसार माध्यमातून अश्या अवास्तव व काल्पनिक बातम्या पसरवण्याची पद्धत आपल्याकडे फार जुनी आहे. १९५७ साली जेंव्हा मी पुण्यात इंजिनीअरींगचा अभ्यासक्रम करीत होतो तेंव्हाही परिस्थिती हीच होती. पुण्यातील एक सर्वात जास्त खप असलेले वर्तमानपत्र आमचे घरी येत असे. त्यात अश्या विचित्र व कधीही न ऐकलेल्या बातम्या अधूनमधून येत असत. फरक एवढाच की त्या बातम्यांनी डोके तात्पुर्ते चक्रावून जाण्यापलिकडे समाजात इतर काही फारसे नुकसान किंवा क्षोभ होण्याची शक्यता आजच्यासारखी आढळून येत नसे. एकदा अशीच एक बातमी माझ्या वाचण्यात आली, बातमी होती पुण्याचे नजीक कात्रज येथून जवळच असलेल्या गावात एका शेतकऱ्याच्या




गाईने दोन तोंड असलेले वासरु जन्माला घातले आहे. हे वासरु गाईजवळ नेल्यावर हंबरडा न फोडता, दोन्ही तोंडातून चक्क आऽऽऽई असा आवाज व बैलाजवळ नेल्यावर बाऽऽऽऽबा असा आवाज काढत आहे. हा एक दैवी चमत्कार असून हे वासरु देवाचा अवतार असल्याची लोकांची खात्री पटली आहे. त्या वासराचे दर्शन घेण्यासाठी आजुबाजुच्या पंचक्रोशीतून भाविकांच्या रांगा त्या शेतकऱ्याच्या घराबाहेर लागल्या आहेत* आम्ही काही मित्रांनी कुतूहल म्हणून त्या

ठिकाणी सायकलवरुन जाण्याचे ठरवले. ह्या बातमीत नेहमीप्रमाणेच त्या शेतकऱ्याचा संपूर्ण पत्ता दिलेला नव्हता.योगायोग असा की त्या वृत्तपत्रातील एक वरिष्ठ आधिकारी माझे जवळचे नातेवाईक होते. मी तडक त्यांचे घरी गेलो व मला त्या शेतकऱ्याचा संपूर्ण पत्ता देण्याची विनंती केली. त्यांनी मला दिलेली माहिती मूळ बातमीपेक्षाही चक्रावून टाकणारी होती. ते हसून म्हणाले " अरे अश्या बातम्या वाचायच्या व लगेच विसरायच्या असतात. आमच्या कचेरीत एक विभाग आहे. त्यात काम करणाऱ्या मंडळींचे काम रोजच्या रोज प्रूफ तपासणे व वर्तमानपत्रातील सर्व स्तंभ पूर्ण भरले की नाही हे पहाणे हे असते. त्यांच्या पहाण्यात जर एखाद्या पानावर एखादी जागा रिकामी रहात असेल तर ती अश्या कपोलकल्पित गोष्टी घालून ते भरुन काढतात. मात्र दरखेपेस बातमीतील ठिकाणाचा नेमका व संपूर्ण पत्ता न देण्याची खबरदारी ते घेतात. ती जागा शक्यतो कुठल्यातरी लांबच्या प्रांतातील किंवा परदेशातील असल्याचे दाखवून देतात. ह्या खेपेस अतिउत्साहात, कात्रजचा पत्ता देण्याची चूक त्यांचेकडून झाली आहे. व तुझ्यासारखे इतर अनेक जण कचेरीत फोन करुन व पत्ता विचारुन आम्हाला सतावत आहेत.

ह्यातील विनोदाचा भाग सोडला तरी, ह्या सर्वाचा अर्थ बातम्या पुरवण्यासाठी आपल्या आजूबाजूला काहीच चांगले घडत नाही असे समजायचे कां ? का हा एक टेलिव्हिजनचा TRP, किंवा वर्तमानपत्राचा खप वाढवण्यासाठी केलेला खटाटोप आहे. आपल्याकडे एक प्रचलित म्हण आहे,*युद्धस्य कथा रम्याः* त्याच धर्तीवर "वाईट व विचीत्र कथा रम्याः* असा नवा शोध ह्या प्रसारमाध्यमांनी लावलेला दिसतो आहे.

आता सांगा अश्या परिस्थितीत माणसाचे मनात सकारात्मक विचार येणार तरी कसा ?

उलट हे सतत ऐकून व वाचून उदासीनता वाढते व मन उद्विग्न व विषण्ण होते. ह्यातून नव्या पिढीला काय शिकावयास मिळणार व त्यांचे भविष्य कसे साकारले जाणार ही एक मोठी समस्या व  चिंता आहे हे नक्की. अशीच एक गमतीदार गोष्ट मला आठवते ती अशी..

१९८० सालातील  माझ्या ऐन उमेदीच्या काळात टाटाकंपनीत मी एका नवीन मोठ्या वीजकेंन्द्र बांधणीच्या कामावर कार्यरत होतो. तिथे परदेशातून बरीच यंत्रसामग्री आयात करुन मुंबईत उभारण्यात येत होती. त्या कामासाठी परदेशातून त्या त्या मुळ कंपन्यांचे कुशल अभियंते येत असत. उभारणीचे काम पुरे झाल्यावर त्यांना आमच्या कंपनीच्या गेस्टहाऊसमधे आमंत्रित करुन एक छानसा निरोपसमारंभ व जेवणाचा कार्यक्रम मोजक्या मंडळींच्या उपस्थितीत आयोजित करण्याची आमची  प्रथा होती.

अश्याच एका जर्मन वयस्कर अभियंत्यास निरोपसमारंभात विचारले गेले कीं " तुम्ही गेले काही महिने इथे मुंबईत आहात, कसं काय वाटलं तुम्हाला ? आवडला कां आमचा देश?

तो जर्मन माणूस मोठा विनोदी व मार्मिक होता, तो म्हणाला "माझा  इथे येण्याआधी

देवावर आजिबात विश्वास नव्हता, पण इथे राहून आता देव आहे व तो भारतात तर नक्कीच आहे ह्या गोष्टीवर माझा पूर्ण विश्वास बसला आहे."

आम्हाला तो काय म्हणत आहे ते नीट कळले नाही. त्यानेच मग आम्हाला समजावून सांगितले. तो म्हणाला, "एकीकडे तुमच्याकडील सर्वच प्रसारमाध्यमे हा देश म्हणजे एक अत्यंत बेशिस्त, अशिक्षित, रानटी, गुन्हेगारी व्रूत्तीचा, देशद्रोही, आहे ह्याची जाणीव करुन देणाऱ्या बातम्या सतत पुरवीत असतात. व दुसरीकडे, तुमचा देश हजारो वर्षांपासून स्वतःची संस्कृती जपून प्रगतीची वाटचाल, हळूहळू का होईना पण करीत आहे. हा विरोधाभास पाहून असे वाटते की, तुमचा देश केवळ देवच चालवत असला पाहिजे. नाहीतर हे निव्वळ अशक्यच आहे. म्हणून माझा आता देवावर विश्वास बसला आहे."

त्या जर्मन माणसाच्या बोलण्यातील कुत्सित पणा सोडला तरी थोडक्यात कांय तर आपल्या ह्या महान देशात अनेक ऊत्तमोत्तम घटना सतत घडत होत्या व आहेत, पण त्याला प्रसिद्धी न देण्याची अनिष्ट प्रथा आपण वर्षानुवर्षे जोपासलेली आहे. हा आपण भोगलेल्या ९०० वर्षे गुलामगिरीचा परीणाम असावा. हा देश माझा आहे ही भावना अजूनही आपल्या मनात पुर्णपणे रुजलेली नाही. आणि म्हणूनच आपला देश सरंक्षण क्षेत्रात कसा आत्मनिर्भर बनत आहे व अत्याधुनिक विमाने, रणगाडे, पाणबुड्या, मिसाईल, आता देशात बनवू लागलो आहोत. ७० वर्षात प्रथमच काश्मीर खऱ्या अर्थाने कसा स्वातंत्र्य उपभोगीत आहे, भ्रष्टाचाराला कसा आळा बसला आहे, आपल्या देशात येणारे निर्वासितांचे लोंढे कसे नियंत्रणात आणले आहेत, दहशतवाद, बॉंब ब्लास्ट, धार्मिक स्थळांची अवहेलना, ह्यावर कसा चाप बसला आहे, आपल्या देशाची प्रतिमा बाहेरील विश्वात कशी उंचावली आहे, आपल्या देशाची महासत्तेच्या दिशेने कशी वाटचाल सुरु आहे, क्रीडा क्षेत्रात व ऊच्च शिक्षणक्षेत्रात आपण कशी झेप घेतली आहे, आपला देश चंद्र व ईतर ग्रहांवर यशस्वीपणे स्वतःची याने पाठवणारा ३/४ देशातील कसा एक ठरला आहे, IT क्षेत्रात आपण जगात कसे अव्वल स्थानावर आहोत, अशा अनेक स्फूर्तीदायक व सकारात्मक विचार करायला लावणाऱ्या बातम्या वाचायला व बघायला मिळणे दुरापास्त बनत आहे. सध्या योग्य अश्या शिक्षणाच्या प्रसाराने ह्यावर हळूहळू मात होताना दिसत आहे. पण हे परिवर्तन अत्यंत वेगाने होण्याची नितांत गरज आहे.नाहीतर आपल्या महान भारतात सर्व उपलब्धता व प्रगतीसाठी पुरक वातावरण असूनही आपण जगाच्या मागे पडण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

आपल्या रोजच्या जीवनात आपण ह्याचे भान ठेवले व आवर्जून काही तरी बोध देणाऱ्या, मनाला उभारी आणणाऱ्या व समाज आणि देशाच्या हिताच्या असतील अश्याच गप्पा मारण्याचे ठरवले पाहिजे. ह्याचा प्रसार करुन नवीन पिढीला ह्याची लहानपणापासून सवय लावली पाहिजे. ह्यापेक्षा सकारात्मक विचार आणखी काही वेगळा असूच शकणार नाही.

उदाहरणार्थ लहान मुलांना अश्या काही गोष्टी सांगाव्यात की त्यांची करमणूक तर होईलच पण चांगला संदेश त्यांचे पर्यंत पोहोचेल. ह्यावरून माझ्या ऐकिवात असलेली एक गोष्ट आठवली, ती अशी....

*ऊबूंटू* ही अफ्रिकेतील एक सुंदर गोष्ट आहे.ही गोष्ट प्रेरणादायी व मानवतावादी तत्वे शिकवणारी आहे.

मागासलेल्या व अत्यंत हलाखीची स्थिती असलेल्या अशा अफ्रिकेतील एका दुर्गम भागात एक सुशिक्षित तत्ववेत्ता गेला व तिथे त्याने मुलांच्या करमणूकीसाठी एक शर्यतीचा खेळ आयोजित केला. त्या खेळात त्याने एका झाडाखाली मिठाईने भरलेले एक बास्केट ठेवले व सर्व मुलांना त्या झाडापासून १०० मिटर लांब उभे केले. त्यांना सागण्यात आले की धावण्याच्या शर्यतीत जो त्या झाडापाशी पहिला पोहोचेल त्याला ती मिठाईने भरलेली बास्केट बक्षीस देण्यात येईल.

त्या इसमाने शर्यत सुरु करण्यासाठी शिट्टी वाजवली, पण त्यानंतर जे घडले ते आश्चर्य वाटण्याजोगे होते. *त्या सर्व मुलांनी उत्स्फूर्तपणे एकमेकांचे हात हातात धरले व सर्वजण एकत्रितपणे त्या झाडाकडे धावत सुटले. अर्थात ते सर्व एकाच वेळी बास्केट पाशी पोहोचले. मग त्या सर्वांनी ती मिठाई आपआपसात वाटून घेतली व त्याचा आनंद लुटला*

हे पाहिल्यावर त्या हुशार तत्वज्ञाने मुलांना हे असे कां केले म्हणून विचारले.

सर्वांनी एका स्वरात ऊत्तर दिले *ऊबुंटू*

ऊबुंटूचा अर्थ "मी आहे कारण आपण सर्व आहोत", ( I am because, we are )

इतर दुःखी असताना मी एकटाच कसा सुखी होउ शकतो ? व ह्या प्रश्नाचे उत्तर आहे *ऊबुंटू*

सर्वांचे सुखी असणे हेच मला सुखी बनवणारे आहे.

चला तर मग आपण सकारात्मक विचार करुन, खर्या अर्थाने *ऊबुंटू* जगायला

**- श्रीनिवास शेंडे / पुणे**
**मो.- ९१७५८९४७२७**

# माणसा



माणसा तू बन स्वच्छ
शुभ्र बगळ्या सारखा...
बनू नको स्वार्थी, धूर्त
काळा कावळ्या सारखा..!

माणसा तू बन शांत
मऊ पाकळ्या सारखा...
बनू नको क्रुर, कैदी
बॅड बावळ्या सारखा..!

माणसा तू बन धिट
शूर मावळ्या सारखा...
बनू नको नाजूक
नरम कोवळ्या सारखा..!

माणसा तू बन ज्ञानी
नको भोपळ्या सारखा...
माणसा तू बन गोड
कोकीळेच्या गळ्यासारखा..!

माणसा तू बन दानी
चवदार तळ्या सारखा...
बनू नको गद्दार
सापाच्या नळ्या सारखा..!

माणसा तू बन गुरु
शिकव फळ्या सारखा...
मुलांना फुलव तू
फुलाच्या कळ्या सारखा..!

माणसा तू बन माळी
माणूस पेर मळ्यासारखा...
वाईटाचा नाश कर
पिकातिल अळ्या सारखा..!

- नरेंद्र अ. वाकोडे / जळगाव जामोद
मो.- ९४२१४६५८५४

# शिक्षक जीवनाचा शिल्पकार
## (ऑनलाइन असो वा ऑफ़लाइन)



शिक्षक ज्याला राष्टनिर्माता म्हटल जात डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती हा दिवस शिक्षक दिवस म्हणुन देशात साजरा केला जातो विद्यार्थी, शिक्षक आणि पाठ्यक्रम ह्या तिन्ही घटकानी शैक्षणिक प्रक्रिया बनते या प्रक्रियेचा केंद्रबिंदु आजच्या आधुनिक काळात विद्यार्थी आहे. प्राचीन काळी गुरु हा सर्वेसर्वा असे आणि केंद्रस्थानी गुरुच असे गुरु सांगेल ती पूर्व दिशा असे गणित होते. पण आज ह्या आधुनिकतेच्या आणि नवीन तंत्रज्ञान यांची सांगड जर घातली तर विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदु आहे फळा आणि खडू ही संकल्पना आजच्या युगात थोडी मागे पडली डिजिटल ह्या शब्दांन धूमाकुळच घातला. सर्वच क्षेत्रात परिवर्तनाची सुनामी आली आणि भारतात देखील शिक्षण क्षेत्रात करोनाच्या भयंकर लाटेने शिक्षण क्षेत्र ही डिजिटल झाले. ऑनलाइन शिक्षण पद्धतिची सुरवात झाली. भारतीय विद्यार्थी आणि शिक्षका ना हे सारे नवीनच पण कोरोनाचा मार इतका जबरदस्त की या सर्व आधुनिक बाबी शिकाव्या लागल्या, काही फायदे आणि काही तोटे या ऑनलाइन पद्धतीमध्ये आहेत अस म्हटल तर वावग ठरणार नाही.

शिक्षकाची भूमिका या पद्धतीत महत्वपूर्ण आहे. कारण स्मार्ट फ़ोन लैपटॉप याचा वापर शिकणे इथ पासुन सुरवात बोलण मेसेज करण गूगलचा वापर करण सोप आहे पण शिकवणे पूर्णपणे वेगळ आहे त्यासाठी


#शिक्षकानी विद्यार्थ्यासाठी एक उत्तम गाईड बनल पाहिजे.

अनुभव घेऊन तो विद्यार्थ्या पर्यंत पोचवला पाहिजे.

त्यातील शैली पद्धती समजावून दिले पाहिजेत.

#प्रेरणा दिली पाहिजे (प्रेरक)

#स्वतःवर पूर्ण



विश्वास असला पाहिजे म्हणजे शिकवण्याची प्रक्रिया प्रभावी होईल.

# त्याच प्रभावी असण हे विद्यार्थ्यांसाठी आदर्श असल पाहिजे.

# स्वतः शिक्षकानी मुलांसाठी कष्ट घ्यावेत त्यांच्या वैयक्तिक विकासासाठी आणि feed back {स्वतःचे अभिप्राय) देण्यास शिकवले पाहिजे.

# ऑनलाइन शिक्षण पद्धतित शिक्षकानी प्रभावी संप्रेषणकार (effective communicator)असल पाहिजे. शिक्षक विद्यार्थी आणि विद्यार्थी विद्यार्थी यांच्यात संवाद झाले पाहिजेत तरच ही पद्धत रुढ़ होईल.

## ऑनलाइन पद्धत एकीकडे आधुनिकतेची नवीन संकल्पना आहे तर दुसरीकडे याचे तोटे देखील संभाव्य आहेत.

1) भारतात अजूनी तंत्रज्ञान अजूनी खेडोपाड़ि पोचले नाही.
2) सर्वच विद्यार्थी स्माटफोन चा उपयोग नाही करु शकत.
3) विजेची समस्या मोबाईल ची रेंज न येण नेटवर्क समस्या या तर आहेत.
4) शिकवणे किती वेळ चालावे याला सुद्धा वेळेची बंधणे.
5) मानसिक शारीरिक बाजु विधात्र्यांच्या बघाव्या लागतात.
6) वयोमर्यादेचा प्रश्न.
7) बसण्याचे ठिकाण आवजाची समस्या अश्या सर्व कठिण परिस्थितितुन जावे लागते.
8) मुलांच्या आवडी निवडी जपणे हे सर्व पालकाना जड़ जाते.
9) पालकांची भूमिका देखील महत्वाची आहे.

एकूणच काय तर अंशतः माध्यमिक आणि महाविद्यालयीन स्तरावर काही प्रमाणात ही ऑनलाइन शिक्षण पद्धती प्रभावी ठरु शकते. पण प्राथमिक स्तरावर समस्या उदभवु शकतात.

असो शेवटी गुरुकुल असो विद्यालयीन असो शालेय शिक्षक असो, शिक्षकाची भूमिका ही महत्वपूर्णच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन याना त्रिवार वंदन, सर्व शिक्षकाना नमन आणि शुभेच्छा...

गुरुविणा ज्ञान नाही मिळत.
प्रयत्न केल्याशिवाय फळ नाही मिळत.
ऑनलाइन असो वा ऑफ़लाइन शिक्षकाशिवाय त्याला गोडी नाही.

**- प्रा. मनीषा नाडगौडा / बेळगाव**
**मो.- 9241523418**


# कसे सांगू



आज फडफड करु लागली
अचानक माझी डावी पापणी,
भेट घडेल तिची नी माझी
नव्हतं माझ्या ध्यानीमनी....

खूप दिवसांनी आज
तिला भेटून बरं वाटलं,
तिच्यासाठी आता पुन्हा
मला जगाव असं वाटलं....

कसं सांगू मी तिला
जीव तिच्यात गुंतला,
जेव्हा पाहिले मी तिला
विसरलो साऱ्या जगाला.....



पाहुनी तिची अदा
घायाळ करी मनाला,
बोलणे तिचे मधाळ
वेड लावी जीवाला....

जन्मोजन्मी साथ
देशील का तु मला,
कसे सांगू मी तिला
जीव तिच्यात गुंतला.....

**- शिवानंद सविता बालाजी रत्नपारखे / पालम**
**मो.- 7057412642**

# निर्णयक्षमता



प्रत्येक व्यक्तिसमोर एका विशिष्ट ठराविक वेळेसाठी समोर खूप मोठे प्रश्नचिन्ह दिसते? कोणता निर्णय तो 'कसा आणि का' घ्यावा तेच समजत नाही. खूप विचार करून जेव्हा गुंता वाढत जातो, तेव्हा समोर फक्त आणि फक्त प्रश्नचिन्ह दिसते? कोणता निर्णय तो कसा आणि का घ्यावा.

आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर प्रत्येक परिस्थितीमध्ये प्रत्येक व्यक्तीला निर्णय घ्यावेच लागतात.एखाद्या विषयाची योग्य व संपूर्ण माहिती समजून घेवून त्या तत्वांचा विचार करून कोणतेही मत स्थिर करून निर्णय घेतले जात असतात. जो निर्णय घेणार आहोत किंवा घेतलेला निर्णय हा कधीच चुकत नसतो. तो फक्त सिद्ध करता येणं गरजेचं असतं. तुम्ही घेतलेल्या निर्णयांवरूनच तुमच्यातील निर्णय घेण्याची क्षमता ही समजत असते. दिवसभरात प्रत्येक व्यक्तीला लहान मोठे निर्णय घ्यावेच लागत असतात. ते निर्णय घेताना सर्वजण थोडा तरी विचार करतातच.

एखादा निर्णय घेताना खूप भीती वाटत असते. पुढे काय होईल? होणाऱ्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम काय होईल? जेव्हा स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायचे ठरवता तेव्हा नक्कीच इतर व्यक्तींच्या सल्ल्याची आवश्यकता असते. इतरांकडून सल्ला घेऊन निर्णय कसा घ्यायचा हे जेव्हा समजते. तेव्हा काही व्यक्ती निर्णय तर घेतातच. पण घेतलेल्या निर्णयावर त्या ठाम राहतीलच असे नाही. कारण घेतलेला निर्णय योग्य ठरेलच असेल याची काहींना खात्री नसते. म्हणूनच निर्णय घेत राहा. निर्णय चुकला तर ती चूक दुरुस्त करून पुन्हा तशी चूक न होता यशस्वी होता येते.

काळ कसोटीचा असो तरीही काही व्यक्ती खूप विचार करून सकारात्मक व नकारात्मक बाबी ध्यानात घेवून धैर्याने निर्णय घेत असतात. कोणताही निर्णय घेताना त्या व्यक्ती त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे इतर कोणालाही कोणताच त्रास होणार नाही याची काळजी घेतात. अशा व्यक्ती निर्णय घेण्यास सक्षम असतात.

प्रत्येक व्यक्तीची सर्वात उत्तम गुणवत्ता ही त्याची योग्य प्रभावी निर्णय घेण्याची क्षमता असते. कारण निर्णय घेताना काही व्यक्तींना कोणताच पर्याय हा योग्य व अयोग्य वाटत नसतो. भीती असते ती फक्त घेणारा निर्णय कसा असेल व घेतलेल्या निर्णयामुळे पुढे काय होईल? कारण जे व्हायचं ते होणारच असते. तरीही सर्व बाजूंनी योग्य निर्णय घेणे आवश्यक तर असतचं. पण प्रत्येक परिस्थितीत प्रत्येक व्यक्तीने घेतलेला निर्णय हा योग्य किंवा अयोग्य असले पाहिजेत असे नाही आणि ज्या हेतूने तुम्ही निर्णय घेता ते न घाबरता हिंमतीने पूर्ण केले पाहिजेत. कारण आपण घेतलेला एक चुकीचा निर्णय कधी कधी शेवटच्या टप्प्यात योग्य ठरतं असतो.

**- श्रावणी योगेश जाधव / रेठरे बुद्रूक**
**मो.- 7498798831**

# आपला हात..



हातावर पोट तेथे
हात मारतो कशाला?
घालू हातामध्ये हात
हात देऊ बुडत्याला

ज्याचे दगडाखाली हात
हात पाय गळालेला
हात हलवण्या त्याला
हात देऊ आधाराला

नको हात उगारणे
सदा हात आवरावा
हात घाईवर येणे
नच शोभते मानवा

देणे हातावर तुरी
सोडू हात दाखविणे
बरे नाही हातातले
हातोहात लांबविणे

हात ओला करायला
उगी पसरावा हात
सोड भिकार जगणे
नको जगू लाच खात

बरी झाकलेली मूठ
हात दावता अवलक्षण
नको हातचा राखाया
जावे संताना शरण

ज्याच्या हाती शस्त्र त्याला
कशी कळावी वेदना
हात मायेने फिरता
मिळे यश शांती मना

हातखंडा तु मानवा
हात चालव बघ ना
कर्तुत्वाला देता दिशा
हात पोहोचेल गगना

हातोहात फसविणे
नोहे बरे द्यावी साथ
जाण हाताची किमया
आपला हात जगन्नाथ

**– सचिन बेंडभर / पिंपळे जगताप**
**मो.– 9822999306**

# सूर !



शीर्षकावरून आता मी जगनमान्य असलेल्या सप्त सुरांव्यतिरिक्त, माझा कुठला नवा सूर लावणार आहे, असा शंकेचा सूर आपल्या मनांत उमटण्याची शक्यता आहे ! पण मंडळी, आपल्या रोजच्या जीवनात वेगवेगळ्या सुरांना खूपच महत्व आहे, हे आपण नक्कीच मान्य कराल ! आणि ज्याचा कान या विविध सुरांच्या बाबतीत थोडासा जरी तयार असेल, तर त्याच्या लक्षात मी काय म्हणतोय ते लगेच येईल ! माझं बोलणं आपल्या सगळ्यांना नीट समजण्यासाठी, मी तुमच्या माझ्या घरात रोजच्या रोज घडणाऱ्या, एका साध्या प्रसंगाची आठवण करून देतो !

सकाळी, सकाळी "अहो चहा घ्या !" असं मृदू सुरात बोलून चहाचा कप बायकोने आपल्या हातात दिला, तर सगळं अलबेल आहे, असं आपण खुशाल समजा ! पण तेच, जर का तोच चहाचा कप, टीपॉयवर ठेवतांना थोडा आपटून आवाज करत, "चहा ठेवलाय !" असं म्हणून ती लगेच मागे वळली, तर.... तर तुम्ही एक गोष्ट आपल्या मनाशी पक्की समजून चाला, की हे काही चहाच्या कपातलं वादळ नक्कीच नाही ! ही पुढे येणाऱ्या एखाद्या "तौक्ती" सारख्या वादळाची नांदी आहे ! अर्थात बायकोच्या या दोन्ही सुरांतला बदल कळण्याइतके, आपले कान त्यासाठी तयार हवेत, हे ही तितकेच खरे ! आणि उर्वरित दिवसात असं जर एखाद वादळ आलंच तर त्याला कसं तोंड द्यायचं, हे ज्याचे त्याने ठरवलेलं बरं, कारण प्रत्येक घरागणिक त्या वादळाची तीव्रता कमी जास्त असणार, हे तुम्ही पण मान्य कराल ! शिवाय या आधी आपल्यावर आलेल्या असल्या प्रकारच्या आपत्तीला, आपण सामोरे जावून, माझ्या सारखा त्याचा यशस्वी मुकाबला केला असण्याची शक्यता मला शंभर टक्के आहे !

सांगायचा मुद्दा काय, तर मानवाला सुरांचं ज्ञान उपजतच असावं, असं मला खात्रीशीर रित्या वाटतं ! अर्थात मुरब्बी "सुराधीशच" (pun intended) यावर योग्य "सुरात" आपली सुरीली मतं मांडतील, अशी मी खालच्या सुरात आशा व्यक्त करतो !

आता या आपल्या उपजत सुरांच्या ज्ञानाची कास, पुढे काही लोकं सोडतात व अनुक्रमे "सुरा" आणि नंतर काही जण तर हातात सुरे घेवून आपल्यातला असुर जागा करतात, ही गोष्ट निराळी ! पण ज्यांचे खरोखरचं शुद्ध सुरांवर मनापासून जन्मजात प्रेम आहे, असे सुद्धा काही लोकं याच जगात आहेत ! तर असे हे सूरप्रेमी याच सुरांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून, आपल्या सुरांचे रसिक मनावर गारुड करून, त्यांना मंत्रमुग्ध करतात, हे आपण अनुभवत असतोच ! म्हणतात नां, व्यक्ती तितक्या प्रकृती !

साधारणपणे असा एक अलिखित नियम आहे की, समोरची व्यक्ती कोण आहे हे जाणून, ओळखून आपण त्या व्यक्तीशी संवाद साधतांना आपल्या संवादाचा सूर ठेवावा

! आता हा नियम अलिखित असल्यामुळे तो किती जण पाळतात, हे सांगणे कठीण आहे ! जिथे लिखित नियम बदलण्यासाठी उच्च सुरात घोषणा देवून मोर्चे काढले जातात, तिथे असल्या अलिखित नियमांची काय पत्रास !

एखाद्या गायकाला साथ करणारे तबलजी आणि पेटी वादक जसे महत्वाचे असतात, तेवढाच त्याच्या मागे, सूर धरणारा त्याचा साथीदार पण त्याला तितकाच महत्वाचा वाटत असतो ! सुरमय साथ करणारा साथीदार एखाद्या गाण्याची रंगत नुसती वाढवतच नाही, तर त्याच बरोबर मुख्य गायकाला तो आपल्या साथीतून प्रोत्साहन पण देत असतो, हे अनेक प्रसिद्ध गायक, गायिकांनी वेळोवेळी मान्य केलेले आहेच !

कधी कधी वादविवाद करतांना, (का भांडताना?) आपण मांडलेल्या विचारांना, कोणी आपल्या सुरात सूर मिसळून, पाठिंबा दिला तर आपल्या अंगावर मूठभर मास चढते ! मग आपण सुद्धा आपला मुद्दा, दुसऱ्याला कितीही चुकीचा वाटला तरी रेटून मांडतो, हे काय मी आपल्याला वेगळे सांगायला हवे ? थोडक्यात काय, तर आपल्या सुरात कोणी सूर मिसळला, तर आपला सूर पण जरा बरा लागतो !

एखाद्याच्या बोलण्याच्या सुरावरून आपल्याला त्याच्या मूडची कल्पना येते, यावी ! अशावेळी आपण त्याच सुरात त्याची विचारपूस केली तर त्याला पण बरे वाटते ! नाहीतर तो संवाद उगाचच बेसूर होण्याची शक्यता असते !

शेवटी, काही कारणपरत्वे, कळत नकळत आपल्या सर्वांच्या कानावर पडणाऱ्या बेसूर सुरांना, सहन करण्याची ताकद देवून आपले जीवन, अधिक सुरमय आणि सुखी कर हीच त्या सर्वात्मक सर्वेश्वराकडे माझी प्रार्थना !

***ता.क.-*** संवादात “निरागस” शब्द आल्यावर, शंभरपैकी नव्वद लोकांच्या डोळ्यासमोर, एखाद्या गोंडस बाळाचा हसरा चेहरा येतो, हे त्रिवार सत्य आहे ! पण उर्वरित ज्या दहा लोकांना या शब्दातून “सूर” ऐकू येतो, तेव्हा त्यांच्या त्या सुरांची कट्यार माझ्या काळजात घुसते !

**- प्रमोद वामन वर्तक / सिंगापूर**
**मो.- 9892561086, (सिंगापूर)+6594708959**

# आयुष्याचे क्षण



आयुष्याचे सारे क्षण
वेचायचे नसतात
काही क्षण विखुरलेले
काही क्षण हरवलेले
काही मात्र जपायचे असतात

आयुष्यातील सारी सुखे
आठवायची नसतात
काही मिळालेली असतात
काही म्रुगजळ ठरतात
व काही सुखे मानायची असतात

आयुष्यातील सारी दुःखे
पचवायची नसतात
काही सहायची असतात
काही विसरायची असतात

आयुष्यातील सारी स्वप्ने
फुलत नसतात
काही वेड लावून जातात
काही नुसतीच तरळून जातात
काही मात्र आयुष्यच बनतात




**– रोहिदास धना सोनवणे / भुसावळ**
**मो.– ९८५२४४२४४६**

# देश सुरक्षित तर....



जगात भारत एकमेव असा देश आहे की याठिकाणी अनेक धर्माचे, पंथाचे, जातीचे, विविध संस्कृती व अनेक भाषा बोलणारे लोक रहातात. त्यामुळे आज भारताला शांतीचे उगमस्थान व आधारस्तंभ मानलेल्या जाते. यामुळे भारतात अनेक प्रकारची विविधता दिसून येते. त्यामुळेच इतर देशांप्रमाणे भारतात गृहयुद्ध सारखी परीस्थिती उद्भवली नाही आणि उदभवनार नाही. भारत ऋक्षिमुनी, साधुसंत, थोरमहात्म्ये, ज्ञानी, देव-दानव, देवी-देवता इत्यादींच्या पुण्यायीनेच आज आपण अमृत महोत्सवात पदार्पण केले आ हे . कारण जगाच्या पाठीवर भारतभुमिचा इतिहासच आगळावेगळा आहे. मर्यादा पुरूषोत्तम राम, गौतम बुद्ध, महम्मद पैगंबर, गुरूनानक, राजे-महाराजे इत्यादी महान विभूतींच्या छत्रछायेत भारताची जडनघडण झाली आहे. यांच्या आशिर्वादानेच स्वतंत्र लढा निर्माण झाला व १५ ऑगस्ट १९४७ ला तिरंगा ध्वज फडकवुन गौरवशाली इतिहास निर्माण झाला व भारतात खुशीचे वातावरण उदयास आले.

भारतात आपल्या पुर्वजांनी जी शिकवनुक व वागणूक दिली ती आताही अमलात आणली जाते. त्यामुळेच आज अमृत महोत्सवी भारत "विश्व गुरु" बनलेला आहे ही भारतासाठी स्वाभिमाणाची व गौरवास्पद बाब आहे. जगात २०० हुन अधिक देश आहेत. परंतु यात भारताची अनोखीच ओळख दिसून येते. कारण भारताच्या स्वतंत्र लढ्यात शांती व क्रांतीचा वापर करण्यात आला. एकीकडे क्रांतीकारी स्वातंत्रसेनानी आपल्या जिवाची पर्वा न करता स्वतंत्र लढ्यात तुटून पडले. तर दुसरीकडे मवाळवादी थोर पुरुषांनी शांतीच्या मार्गाने स्वतंत्र्याचा लढा सामोरं नेण्याचे काम केले. अशाप्रकारे क्रांतीकारी, जहालवादी व मवाळवादी थोर पुरुषांच्या मदतीने भारत १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्यामुळे आज आपण मोकळ्या वातावरणात वावरत व बागडत आहोत.

आज भारत ७५ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. यानिमित्याने संपूर्ण भारतवर्ष अमृत महोत्सव साजरा करून आपल्या पुर्वजांना, थोर महात्म्यांना, क्रांतीकारकांना नमन करीत आहेत. परंतु आजचा राजकीय पुढारी आपल्याला स्वतंत्र मिळवून देणाऱ्या थोरमहात्म्यांचे बलीदान विसरल्याचे दिसून येते. त्याकाळी सामाजिक बांधिलकी, बंधुभाव, आपुलकीची भावना, समाजसेवा, त्यागाची भावना होती. परंतु आजच्या राजकीय पुढाऱ्यांना या संपूर्ण गोष्टींचा विसर पडल्याचे स्पष्ट दिसून येते. आजचा मुठभर राजकीय पुढारी जनसेवेपेक्षा स्वत:ची व स्वत:च्या परीवाराची सेवा करण्यात मग्न असल्याचे दिसून येते. त्यामुळेच ते आज करोडपती झाले आहे.

भारतात गरीब वर्ग दिवसेंदिवस गरीब होत आहे व श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होतांना दिसत आहे. आज शेतकऱ्यांजवळ करोडो रुपयांची शेती असुन सुद्धा तो गरीबीत




वावरतो व संपत्ती शुन्य दिसून येते. परंतु आजचा राजकीय पुढारी निवडुण आल्यानंतर गडगंज संपत्ती कमवीतो व कमी वेळात आणि कमी दिवसांत करोडपती बनतो हे कृषी प्रधान देशाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. त्यामुळे आजही कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांची दैणाअवस्था दिसून येते याचे मुख्य कारण म्हणजे आजच्या राजकीय पुढाऱ्यांचे चुकीचे धोरण होय.

आपण राजकीय पुढाऱ्यांना समाजाची सेवा करण्याकरिता विधानसभेवर व लोकसभेवर पाठवितो. परंतु राजकीय पुढारी निवडुन आल्यानंतर त्यांना समाजाचा विसर पडतो व करोडो रुपयांची संपत्ती जमा करण्याच्या कामी लागतो. गेल्या ७४ वर्षात भारताने अगणित विकास केला यात दुमत नाही. हा विकास पुढेही प्रगतिपथावर जाईल अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो.

आज भारताची मान संपूर्ण जगात उंचावली आहे. कारण जग आतंकवादी,युध्दजन्य परिस्थिती, ग्लोबल वार्मिंग यामुळे भयभीत आहे. यावर उपाययोजनांचा उगम भारत भुमितुनच होवु शकतो अशी आशा व अपेक्षा संपूर्ण जगाला आहे. त्यामुळे संपूर्ण जग मोठ्या आशेने व आकांक्षाने भारताकडे पहात आहे. कोव्हिड-१९ ने संपूर्ण जगाला हादरवून सोडले. कारण अशी महामारी आयुष्यात कोणीच पहाली नाही. करोना महामारीने जगात करोडो लोकांना मृत्युच्या खाईत लोटले व अजूनही या महामारीने जगात अनेक लोक पिढीत आहे. करोना महामारीचा सुत्रधार चीन आहे ही बाब संपूर्ण जगाला ग्यात आहे.

चीनने करोना व्हायरस जगात पसरवुन व विस्तारवादी नितीचा वापर करुन सुपर

पॉवर बनण्याची स्वप्न पहात आहे. परंतु आज जगात चीनला त्याची जागा दाखवली असेल व टक्कर दिली असेल तर फक्त भारतानेच. कारण भारताला ७४ वर्षांचा अनुभव आहे की कोणाला कोणत्या पध्दतीने हाताळायचे. कारण भारत शत्रूना कसे हाताळायचे यांचे संपूर्ण डावपेच व ज्ञान जानतो की कोणाला कसे उत्तर द्यायचे. भारत सर्वप्रथम शांतीचा मार्ग अवलंबतो यांनी जर तोडगा निघत नसेल तर क्रांतीचा मार्ग अंगीकारून जशास तसे उत्तर देऊन शत्रुला त्याची जागा दाखवीतो. हा क्रांतीचा व शांततेचा मार्ग आजचा नसून ७४ वर्षजुना आहे. त्यामुळे थोर क्रांतिकारकांना, स्वतंत्रसेनानींना, थोर महात्म्यांना शत:शत:नमन करतो. कारण आज आपण जो मोकळा श्वास घेत आहोत. त्याचे मुख्य प्रणेते आपले थोर पुरुष व क्रांतीकारकच आहे. त्यामुळे भारताच्या १३५ कोटी जनतेने हे लक्षात ठेवले पाहिजे की "देश सुरक्षित तर आपण सुरक्षित"यापेक्षा मोठे कोणीही नाही.

करोना काळात भारताने जगात मोठ्या प्रमाणात व्हॅक्सीनचा पुरवठा करून मानवधर्म पाळला आहे व अनेकांचा जीव वाचवीला यांचे मुख्य कारण म्हणजे पुर्वजांचा आशिर्वादच म्हणावा लागेल. कारण आपण अफगाणिस्तानचे जीवंत उदाहरण पहाले आहे तेथील राजकीय पुढारी, पुंजीपती, खेळाडू, बॉलीउड क्षेत्र यांच्या जवळ पैसा व संपत्ती अमाप होती. परंतु देश सुरक्षित नसल्यामुळे आपला जीव वाचवुन विदेशात पलायन करावे लागले व त्याठिकाणी जे भेटेल ते काम करण्यास मजबूर व्हावे लागले. त्यामुळे अमृत महोत्सवाच्या निमित्ताने सर्वांनीच एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की "देश सुरक्षित तर आपण सुरक्षित". त्यामुळे मी सर्वांना आग्र करतो की आतंकवाद, अत्याचार, भ्रष्टाचार यांचा खात्मा करण्यासाठी सर्वच स्तरावरून कडाडून विरोध व्हायला हवा.

दु:खाची गोष्ट म्हणजे आजच्या परिस्थितीत भारतात भ्रष्टाचार शिगेला पोहोचला आहे. विजय मारल्या, निरव मोदी, मेहुल चौकसी सारख्या भगोड्यांनी देशातील अरबो रूपयांची संपत्ती लुटुन विदेशात फरार आहे. यामुळेसुध्दा देशाची आर्थिक परिस्थिती डगमगतांना दिसून येते. भारतात आतापर्यंत जेवढेही बँक घोटाळे निदर्शनास आले त्या सर्व घोटाळ्यांना खतपाणी घालण्याचे काम राजकीय पुढाऱ्यांनीच केले आहे. त्यामुळेच आज देशात महागाईचा डोंगर उभा झाल्याचे दिसून येते. हा स्वतंत्र भारताला कलंकच म्हणावा लागेल.

धोकाधाडी व भ्रष्टाचारामध्ये राजकीय पुढारी अग्रेसर आहेत यामुळे देशाचा विकास खुंटतो, महागाई व बेरोजगारी वाढते. आज राजकीय पुढारी यांच्या संपत्तीचा विचार केला तर भारताला तब्बल दहा वर्षे कोणाही जवळुन कर्ज घेण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे मी सरकारला विनंती करतो की भ्रष्टाचाराचा उगमस्थान ताबडतोब रोखायला पाहिजे. अन्यथा आजचा राजकीय पुढारी देशाला मृत्यूच्या खाईत न्यायला मागेपुढे पाहणार नाही. भारताची विदेश नितीमध्ये पकड मजबूत आहे यात तीळमात्र शंका नाही.

आजच्या परिस्थितीत भारतातील प्रत्येक राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवुन

करोडपती होत आहेत व अनेक बाहुली माफीयाराज चालवीतात याला रोखण्यासाठी सरकारने युध्दपातळीवर पाऊल उचलण्याची गरज आहे. तेव्हाच भारताची आर्थिक परिस्थिती आणखी मजबूत होण्यास बळ मिळेल. पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे पृथ्वी डगमगतांना दिसत आहे. यावर्षी अनेक पहाड, डोंगर दऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात भुस्खनन दिसून आले. याचे मुख्य कारण म्हणजे जंगल तोड होय. आज महाप्रलय, अती पाऊल, अती उष्ण, अती थंडी, सुनामी, भुकंप, वनवा लागने यामध्ये दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होतांना दिसत आहे. याला मानवच रोखु शकतो. त्यामुळे सरकारने वृक्ष कटाई थांबवून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

अमृत महोत्सहवाच्या निमित्ताने भारतातील प्रत्येक व्यक्तीने एक तरी झाड लावुन त्याची जोपासना केली तर ७५ व्या वर्षात आपल्याला १३५ करोड झाडे पहायला मिळेल. यामुळे वृक्षारोपण तर होईलच व अमृत महोत्सवाची आठवण नेहमीसाठी जीवीत राहील. कारण दिवसेंदिवस जंगल संपदा नष्ट होत आहे व औद्योगिकीकरण आणि शहरीकरण वाढत आहे. यामुळे जंगल संपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे याला रोखण्यासाठी व वाढते प्रदुषण कमी करण्यासाठी वृक्षलागवड काळाची गरज आहे. आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे. अनेक देशांजवळ अत्याधुनिक मिसाईल, अणुबॉम्ब अशाप्रकारे विनाशकारी हतीयार आहेत तरीही हे संपूर्ण देश शांती समझोता करायचा असल्यास भारताचे मध्यस्थीती महत्त्वाची मानतात. कारण जगाच्या पाठीवर भारतच शांतीचे प्रतीक व आधारस्तंभ आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.

अमृत महोत्सवाच्या निमित्ताने सरकारने शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, महागाई,वाढती लोकसंख्या यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे. वाढते प्रदुषण हे भारतासह जगासाठी मोठे आव्हान आहे. त्यामुळे दिवाळीच्या सणाला भारतात मोठ्या प्रमाणात फटाके फोडल्या जातात. परंतु वाढते प्रदुषण पहाता देशातील नागरिकांनी कमीत कमी फटाके फोडून दिवाळीचा सण साजरा करावा व प्रदुषणावर मात करण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे प्रत्येक सणाला एक तरी वृक्ष लावुन वृक्षारोपण करावे. अशी मी आग्रहाची विनंती करतो.

**– रमेश कृष्णराव लांजेवार / नागपूर**
**मो.– ९९२१६९०७७९**

# सरतं वर्ष

सरतं साल हे सरतं,
सरतं साल हे सरतं
जुन जाऊनी नविन येतं,
सुखदुखाच गाठोडंऽऽ
माझ्या मित्रा... मित्रा.......।।धृ।।

सरतं वर्ष हे, आलं धाऊन
कोरौनाला, सोबत घेऊन
घरी रहाव, म्हणे बजाऊन
गेल आम्हाला, ते समजाऊन
क्षणात सारे, वर्ष सरावे,
आनंद वाटे जीवा..
माझ्या मित्रा...............।।

जगच समदं, आबोल झालं
काय दिवस हे, वाईट आलं
वर्षाने या, एक शिकवलं
लढाव खंबिर, होईल भलं
मदत करावी,
एकमेकांना, धीर ही द्यावा तया
माझ्या मित्रा.................।।

नात्यामधला हा, गुंता वाढला
आपुलकीचा तो, स्वास कोंडला
प्रेतांचा ईथे, खच मांडला
माणुसकीचाहि, गंध सांडला
पाठचा असुनही, अग्नी द्यावया,
कुणी न आले पुढे
माझ्या मित्रा.................।।



वर्ष हे आल,
अकल्पीत घेऊन
मदतही केली,
जवळी जाऊन
हातावरच पोट
ज्यांच, गेले ते काऊन
डॉक्टर पोलीस, आले
धाऊन
एकमेकांच्या मदतीविना रे,
शक्य हे होईल कस?
माझ्या मित्रा.................।।

हात जोडुनिया, विनंती हरी
फिरुनी वर्ष असे, यावे न दारी
सुखी असावी ही, दुनिया सारी
कधी न यावी, अशी महामारी
लॉकडाऊन अन, मंदीरबंदी,
होऊ नये ती कधी
माझ्या मित्रा.............,।।

गेली कित्तेक, वर्षे निघुनी
असे वर्ष ना, यावे परतुनी
सुखाची भाजी, भाकरी देऊनी
आनंदाने वर्ष, जावे सरुनी
मिटता डोळे, वर्ष सरावे,
हसत जावे निघुन
माझ्या मित्रा.................।।

**- श्री. हरिबा कोळी / दानोळी**
**मो.- 7588270093**

# "देवमाणूस"



रेल्वे गाडीचा मोठ्याने हॉर्न वाजला. तेवढ्यात पांढऱ्या शुभ्र कपड्यावर काळा कोट घातलेल्या साहेबांनी दिमाखात हिरवा झेंडा दाखवला. व रेल्वे रुळावरुन हालली. करकर आवाज करत रेल्वेच्या चाकांनी खूप वेळेनंतर जागा सोडली. इंजन डब्बा जसे जसे जोरात ओढू लागले तशी चाके जोरात घुमू लागली. रेल्वेचा एकेक डब्बा रेल्वे स्थानकाला सोडून पुढे निघाला होता. माझा डब्बा शेवटचा होता त्यामुळे मी रेल्वेस्थानक निरखून पाहत होतो. माझी नजर गर्दीतील सर्व गोष्टींना मन भरुन पाहत होती. काही वेळातच माझा डब्बा सुद्धा रेल्वेस्थानक मागे सोडून इंजन सोबत गतिमान झाला होता. बिचारा काळ्या कोटातील साहेब शेवटपर्यंत हिरवा झेंडा दाखवत उभा होता. किती काळजी बिचाऱ्याला या रेल्वेतील प्रत्येक प्रवाशाची. त्याच्या हातातील या हिरव्या झेंड्यात काय ताकत होती. झेंडा दाखवताच एवढी मोठी लांबच लांब रेल्वे चालायला लागली. नुसती चालायला लागली नाही तर भरधाव वेगाने धावायला सुद्धा लागली होती. त्या हिरव्या झेंड्याच्या विचारात मी गर्दीतून आत शिरलो. एका सीटवर एक वयस्कर गृहस्थ बसले होते. मी त्यांच्या शेजारी जाऊन बसलो. हळूच नजर खिडकीतून बाहेर फिरवली. बाहेर पुसट पुसट हिरवे रंगीबेरंगी काहीतरी दिसत होते. बाहेरील दृश्य स्पष्ट दिसावे म्हणून माझ्या मानेने खूप आटापिटा केला. पण खिडकी जवळ ते वयस्कर गृहस्थ बसलेले असल्यामुळे मला बाहेरचे स्पष्ट दिसणे शक्य नव्हते. शेवटी मी निराश होऊन शारीरिक हालचाल थांबवून स्तब्ध बसून राहिलो. मी स्वतःच स्वतःवर रागावलो. आर्यन साहेब....! उशीर हा आपला नेहमीचा ठरलेला भाग आहे. त्यामुळे प्रत्येक बोगीतील स्वच्छ चांगली जागा गेलेलीच असते. सुदैवाने आज कमीत कमी बसायला तरी जागा मिळाली इतर वेळी उभेच जावे लागते. आज कदाचित अर्धा तास लवकर आलो असतो तर चांगली खिडकी जवळची जागा मिळवता आली असती. असो....! आता मिळाली त्या जागेवर शांत बसून राहू. अशी मनाची समजूत काढत मी शीटला डोके टेकवून डोळे मिटुन घेतले. आता माझे डोळे शांत होते. पण कानांनी डब्यातील लांबचा आवाज ऐकायला सुरुवात केली होती.

"चाय....! चाय....! गरमा गरम चाय....!"

"पाणी बॉटल....! ठंडा पाणी बॉटल....!"

"समोसा....! समोसा....! गरमा गरम समोसा....!"

थोड्या वेळापूर्वी रेल्वे स्थानकावरुन चढलेल्या विक्रेत्यांनी स्वतः जवळील पदार्थ विकायला सुरुवात केली होती. मी पक्के डोळे लावून कानांना सुद्धा शांत झोपायला सांगितले. तेवढ्यात शेजारच्या त्या वयस्कर गृहस्थांनी मला आवाज दिला.

"हॅलो साहेब....!"

"प्लीज आपण थोडा वेळ इकडे बसता का?"

"मी त्या गृहस्थाच्या आवाजाने पटकन डोळे उघडून त्यांच्याकडे पाहिले. त्यांनी परत एकदा मला विचारले."

"प्लीज आपण थोडा वेळ इकडे बसता का?"

"मी त्यांना पटकन विचारले. का बरं आजोबा....!"

"माझी गोळ्या घ्यायची वेळ झाली आहे."

थोडेशे काहीतरी खाऊन घेतो. म्हणजे गोळ्या घेता येईल. खिडकीतून खूप वारा आतमध्ये येतो. त्यामुळे तिथे दोन घास व्यवस्थित खाता येणार नाही. की पाणी व्यवस्थित पिता येणार नाही. त्यामुळे आपण थोडा वेळ खिडकी जवळ बसले तर खूप बरे होईल.

"मी त्यांना हो म्हणायच्या आत ते जागेवरून उठले सुद्धा व उभे राहून मला म्हणतात."

"आणि हो....! मला आजोबा म्हटलेले आवडत नाही. मी अजून मनानं तरुण आहे."

मी चुपचाप माझ्या जागेवरून उठलो व खिडकी जवळ जाऊन बसलो. मी हळूच खिडकीतून नजर बाहेर फिरकावली. पण मनात त्या गृहस्थाचा रागच आला. अतिशय वयस्कर, शरीर थकलेले, बोलतांना आवाजात थकवा, हात थरथर कापल्यासारखे हालत आहे. तरी हे आजोबा स्वतःला तरुण समजतात ही तर कमालच आहे. मी मनातल्या मनात थोडासा हसलो. मला जरा हे ग्रहस्थ विचित्रच वाटले. मी पूर्णपणे खिडकीकडे मान वळवून बाहेर पाहू लागलो.

निसर्गाचे अदभुत असे सौंदर्य दिसत होते. निसर्गाच्या नटलेल्या सौंदर्याने हा परिसर खूपच सुंदर दिसत होता. हिरवीगार उंच मोठी मोठी झाडे, काटेरी झुडपे, रंगीबेरंगी फुलांच्या वेगवेगळ्या बहरलेल्या वेली, दाट अशी झाडांनी एकमेकांसोबत केलेली गर्दी मनाला प्रसन्न करणारी होती. कदाचित या परिसरात पाऊस खूप पडत असावा. किंवा येथील माणसं कधीच झाडे तोडीत नसावी. यामुळेच एवढी सुंदर घनदाट झाडे आजही उभी आहेत अशा सुंदर निसर्गनिर्मित ठिकाणी राहणारी माणसं किती नशीबवान असतील. मी त्या नैसर्गिक सौंदर्यात हरवून गेलो. मला प्रवासात नेहमी नवीन ठिकाणचे वेगळेपण बघायला आवडते. मी नेहमीच वेगवेगळ्या ठिकाणची सुंदरता डोळे भरुन पाहतो व मनात साठवत असतो. ही हिरवळ रंगीबेरंगी निसर्गाची दुनिया मला नेहमीच भुरळ पाडत आलेली आहे. लहानपणी मी माझ्या गावी दिवस दिवस झांडा सोबत खेळायचो. पावसाळ्यात तर दरवर्षी न चुकता झाडे लावायचो. दर शनिवारी, रविवारी त्यांना पाणी घालायचो. मी माझ्या झाडांना खूण करायचो. माझी कितीतरी झाडे आता खूप मोठी झाली असेल. आजही त्यांच्या बुडाशी दगडाने केलेल्या खुणा स्पष्ट दिसतील. मी आज प्रवासात बाहेरच्या नैसर्गिक वातावरणाने बालपणात हरवून गेलो होतो. हे बाहेरील सौंदर्य डोळे भरून पाहता यावे यासाठीच तर खिडकी जवळची जागा पाहिजे असते. नाहीतर कुठेही बसले तर काय फरक पडतो. त्या आजोबांच्या

गोळ्या मुळे मला हे सौंदर्य पाहता आले. मी शांतपणे बाहेर बघत होतो. परंतु मनाने मात्र सगळीकडे फिरणे सुरूच होते. मी माझ्या मनासोबत निसर्गाच्या भ्रमंतीला दूर गेलो व तिकडेच गुंतलो. आजोबांनी मला आवाज दिला.

"अहो साहेब....!"

"या आता तुमच्या जागेवर आम्ही जातो आमच्या जागेवर. थोडी थंडी गार हवा घेतो."

आजोबा परत उठून स्वतःच्या जागेवर बसले. मी ही पूर्वीच्या जागेवर येऊन बसलो. माझा नैसर्गिक स्वप्नभंग झाल्यासारखे झाले. मला आता बाहेरचे काहीच दिसत नव्हते त्यामुळे मागचे काहीच आठवत नव्हते. मी मनातल्या मनात त्या गृहस्थावर चिडून झोपण्यासाठी डोळे मिटले. तेवढ्यात त्या गृहस्थांनी मला प्रश्न केला.

"नाव काय आपले?"

"काय करता आपण?"

मला आधीच त्या आजोबाची खूप चीड आली होती. वाटेल तेव्हा स्वतःच्या वस्तूप्रमाणे माझा वापर करून घेत होते. मी मात्र वेड्यासारखं आजोबा म्हणेल तसे वागू लागलो होतो. मला आजोबांचे बोलणे स्पष्ट ऐकू आले पण मी न ऐकल्यासारखे करून परत जास्त घट्ट डोळे मिटुन घेतले. आजोबांनी मला परत आवाज दिला.

"अहो साहेब....!"

"झोपताय काय?"

"आता झोपायला काय रात्र झाली का?"

शक्यतो माणसांनी रात्रीच झोपावे. दिवसभर काम करत राहावे. यासाठीच तर निसर्गाने बारा तास रात्र व बारा तास दिवस अशी रचना केली आहे.

मी मनाची इच्छा नसताना सुद्धा डोळे उघडले व त्या आजोबाकडे बघितले. जेवणामुळे आजोबांच्या चेहऱ्यावर थोडी तरतरी आली होती. आवाज पण कडक येत होता. त्यांनी परत विचारले.

"नाव काय आपले?"

"काय करता आपण?"

"मी आर्यन सावंत....!"

"भाभा अणुसंशोधन केंद्र मुंबई येथे वैज्ञानिक सहाय्यक या पदावर काम करतो."

"अरे वा छान....!"

"आणि राहता कुठे?"

"मी मुंबईलाच राहतो."

"माझे मूळ गाव कोकणात आहे. परंतु शिक्षण आणि नोकरी यामुळे गेली वीस वर्ष मी मुंबईतच राहतो."

"छान....!"

"एकंदरीत सगळं छान आहे म्हणायचं....!"

मी मानेनेच त्यांना होकार कळवला. आता त्यांना वाटले मी त्यांना नाव, गाव विचारेल. परंतु मी काहीच विचारले नाही. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली व शांत बसून राहिलो. त्यांनी न विचारताच सांगायला सुरुवात केली.

"मी यशवंत माने....!"

माझे मूळ गाव कोल्हापूर जिल्ह्यात आहे. पण आता मी सातारा मध्ये राहतो. मी आर्मी मध्ये तीस वर्ष लेफ्टिनेंट कर्नल या पोस्टवर काम केले. आर्मी मधून निवृत्त झाल्यानंतर वीस वर्ष बँकेत मॅनेजर म्हणून नोकरी केली. व गेल्या दहा वर्षापासून गोर-गरीब अनाथ मुलांसाठी मोफत सैन्य भरती अॅकडमी चालवितो. माझ्या अॅकडमीतील अनेक मुलांनी सैन्यामध्ये नोकरी मिळविली. आर्मी, नेव्ही, एअरफोर्स अशा तिन्ही दलात अनेक मुलं कार्यरत आहेत.

"आजोबा वयाने जवळ-जवळ ऐंशी वर्षाचे होते पण आवाजात आजही तोच कडकपणा दिसत होता."

"आर्यन साहेब....! मी आजही तरुण आहे."

मला अजून गोर गरीब, अनाथ मुलांसाठी खूप काम करायचे आहे. मी स्वतःला कधीच कमजोर व वृद्ध समजत नाही. माणसाने अजीवन तरुण राहावे. निर्व्यसनी, शिस्तप्रिय जीवन जगावे.

"बरोबर आहे का?"

मी मान हलवून बरोबर असल्याचे सांगितले. आजही आजोबांच्या चेहऱ्यावरील तेज व बोलण्यातील कडकपणा यावरून मला त्यांच्या स्वभावाचा अंदाज आला होता. मघाशी बोलताना त्यांनी मला आजोबा न म्हणण्याचे का सांगितले हे मला आता कळाले होते. एवढ्या वयात सुद्धा माणूस आनंदी व कडक शिस्तीने जीवन जगतो हे खरंच आश्चर्य जनक आहे. मी एक वयस्कर गृहस्थ समजून त्यांच्या बाजूला बसलो होतो. सुरुवातीला त्यांच्याकडे पाहून वाटले नाही ते एवढे शिस्तप्रिय व कडक स्वभावाचे असतील. मी त्यांना वृद्ध समजून पटकन दोनदा जागा बदलून दिली. थोड्या वेळा पूर्वीच्या माझ्या नैसर्गिक सौंदर्यात अशी अचानक शिस्त येईल मला वाटले नव्हते. मी मघाशी त्यांना आजोबा म्हणालो ते त्यांना का आवडले नाही हे मला आता कळाले होते. एका उच्चस्थ पदावर तीस वर्ष काम करून सुद्धा या माणसाच्या आयुष्यात किती साधेपणा आहे. आजोबांची बोलण्याची इच्छा पाहून मी ही त्यांच्याशी बोलायला लागलो.

"साहेब तुमची मुलं काय करतात."

"साहेब नाही....!"

"काका म्हणून हाक मारा मला."

"मी साहेबांचा मान घेण्याइतपत अजून मोठा झालो नाही. साहेब ही फार मोठी पदवी आहे. माझ्यासारख्या सामान्य माणसाला ही पदवी शोभत नाही."

"असो, काय म्हणालात आपण....!"

"तुमची मुलं काय करतात."

"मला मुलंच नाही."

वयाची ऐंशी वर्षे ओलांडल्यानंतर सुद्धा काकाच्या बोलण्यात दम होता. अतिशय उत्साहाने प्रसन्नतेने ते बोलत होते. मी मगाशी पासून फक्त ऐकत होतो. काकाजी सारखे बोलत होते. मी विचारलेल्या प्रश्नानंतर त्यांनी लगेच उत्तर दिले. त्यांना मूलबाळ नाही हे ऐकून मी शांतच बसलो. आपण त्यांना उगाच विचारले असे मला वाटले. या वयात नको त्या गोष्टीची विचारपूस करून काकांना उगाच जुन्या आठवणीचे दुःख कशाला असा विचार करून मी थोडावेळ शांतच बसलो. पुढे ते म्हणाले,

"मुलं का नाहीत हे जाणून घेणार का?"

"मी मानेने हो म्हणालो."

"अहो किती सोपे आहे."

"मी लग्नच केलं नाही त्यामुळे मुलं झालीच नाही."

मला पुन्हा एकदा आश्चर्य वाटले. या काकांचे जीवन खुप ध्येयवादी दिसते. यांच्याशी बोलून यांचे जीवन जाणून घ्यायला हरकत नाही. मी त्यांच्याकडे तोंड करून उत्साहाने ऐकू लागलो.

"अहो आर्यन साहेब....!"

"मी लग्न का केले नाही सांगतो."

"ऐका तुम्ही आता....!"

आम्ही सात भावंडे त्यात पाच बहिणी व दोन भाऊ. मी सर्वात मोठा त्यामुळे बालपणी माझे लाड तर झालेच नाही उलट लहान पणापासून जबाबदारी पडत गेली. घरी वडिलांना त्यांच्या कामात मदत करणे. लहान भावंडांना सांभाळणे. हे सर्व करत करत मी शिक्षण घेत गेलो. मला शालेय वयापासूनच देशसेवेची खूप आवड होती. माझे भारत भूमीवर खूप प्रेम होते. मी भारतभूमीच्या रक्षणासाठी तरुणपणातच वयाच्या अठराव्या वर्षी सैन्यामध्ये भरती झालो. कुटुंबातून सर्वांचा यासाठी विरोध होता. मी मोठा असल्याने घराच्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या, वडिलांना त्यांच्या व्यवसायात हातभार लावावा असे घरातील सर्वांना वाटायचे. परंतु माझा निश्चय मला रोखू शकला नाही. मी सैन्यामध्ये भरती झालो. मी भरती झाल्यामुळे घरच्यांनी मला खूप विरोध केला. सैन्यामध्ये भरती झाल्यामुळे माझी इच्छा पूर्ण झाली होती. मी पूर्ण वेळ देशसेवेत घालवत होतो. मला मिळणारे वेतन मी देशाच्या सेवेत शहीद झालेल्या कुटुंबांना दान करत असे. मी गेली तीस वर्ष देश सेवा करत असतांना कधीही सुट्टी घेतली नाही. घरी परत गेलोच नाही. सलग तीस वर्षे सेवा करून निवृत्त झालो. त्यानंतर मी बँकेत मॅनेजर म्हणून नोकरी केली. बँकेतून मिळणारे वेतन सुद्धा वृद्ध आश्रमाला दान करत होतो. बँकेत वीस वर्ष सेवा करून सेवानिवृत्त झालो. आता रिकामे बसून काय करावे या विचारात असतांना मी पेन्शनच्या पैशातून सैन्यभरती अकॅडमी सुरु केली. अनाथ व गरीब मुलांना या

अ़कॅडमीत शिक्षण, राहण्याची व्यवस्था सर्व मोफत होते. आता गेल्या दहा वर्षापासून या अकॅडमीत काम करत आहे. मला मिळणाऱ्या पेन्शन मधून व निवृत्तीच्या वेळेस मिळालेल्या फंडातून हे सर्व सुरु आहे.

आज पर्यंत कोणाचा एकही रुपया मी घेतलेला नाही. आजपर्यंत माझ्या अकॅडमीतुन अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन गेले व या भारत भूमिच्या रक्षणासाठी सैन्यामध्ये भरती झाले. देशसेवा ही सर्वात मोठी सेवा आहे. आपण या भारत भूमीची लेकरं आहोत. त्यामुळे या भारत भूमिसाठी जगाचे व या भारत भूमिसाठी मरायचे. माझ्या अकॅडमी मधील अनेक लेकरं माझा हाच वसा पुढे नेत आहे. याचा मला खूप अभिमान आहे. आयुष्यात यापेक्षा हक्काची व स्वतःची लेकरं आणखीन कोणती पाहिजे. मला आयुष्यात अनेकांचा बाप होता आले.

माझ्या वृद्धाश्रमातील अनेक आई-वडिलांचा मुलगा होता आले. "यापेक्षा दुसरे मोठे भाग्य कोणते?" मी एकदम शांतपणे ऐकत होतो. हे सर्व ऐकून माझे कान एकदम बधीर पडले होते. डोळ्यासमोर तर अंधार पडला होता. व मला माझ्या आयुष्यातील अहंकाराची चक्करच आली होती. आयुष्यभर दुसऱ्यासाठी जगणारा हा माणूस किती मोठा व महान आहे हे मला आता कळले होते. सुईच्या टोकावर मावेल एवढा सुद्धा अहंकार नसलेला हा माणूस खऱ्या अर्थाने देव आहे. स्वतःचे जीवन स्वावलंबीपणे जगत आजही सेवाभाव जोपासत आहे. मी पटकन सीटवरुन उठून त्यांचे पाय धरले व त्यांना बोलू लागलो. आपण खरंच आजोबा, साहेब, काका नाहीत. आपण माणसाच्या रुपातील देव आहात.

"त्यांनी मला थरथरत्या हातांनी उठवले."

"अहो आर्यन साहेब....!"

"मी देव वगैरे काही नाही."

"तुमच्या सारखाच एक सामान्य माणूस आहे."

मी शक्यतो प्रवासात येवढे कधीच कुणाला बोलत नाही. माझी जीवनाची ही कथा कुणाला सांगत नाही. तुम्ही तरुण व उच्चशिक्षित आहात. त्यामुळे तुमच्याशी एक मित्र म्हणून बोललो.

"सर आपण खरच देवमाणूस आहात."

"अहो....! असे भावनिक व्हायचे नाही."

माणसाला जीवनात अनेक कठोर परीक्षा द्याव्या लागतात. मी पटकन उठून माझ्या जागेवर बसलो. काकांनी मला संदेश दिला.

जीवनात चांगले कर्म करा, आयुष्य जगतांना थोडेसे दुसऱ्यासाठी जगा, अहंकार बाळगू नका, देशाप्रती अभिमान बाळगा.

"हो काका, नक्कीच....!"

तुम्ही सांगितलेल्या या सर्व सूचना मी लक्षात ठेवेल. या सूचनांचा माझ्या आयुष्यात मी नक्कीच वापर करेल. काकाजी एवढ्या वेळे पासून बोलून थकले असेल म्हणून मी

पटकन माझ्या जवळची पाण्याची बॉटल त्यांना देण्यासाठी पुढे केली.

"पाणी आहे माझ्याकडे साहेब....!"

असे म्हणून स्वतः जवळची पाण्याची बॉटल घेऊन त्यांनी दोन घोट पाणी पिले. स्वतःला साहेब म्हणू दिले नाही परंतु मला आदराने ते साहेब म्हणून बोलत होते.

"चला आर्यन साहेब मला उतरावे लागेल."

"माझे स्टेशन आता काही मिनिटात येईल."

"त्यांनी त्यांची छोटीशी पिशवी जवळ घेतली."

"आमच्या परिसरात आले कधी तर या अॅकीडमीला भेट द्यायला."

"हो नक्की....! काका."

"मी एक वेळ आवर्जून भेटायला येईल."

"त्यांनी हात जोडून नमस्कार केला."

"मी पुन्हा एकदा पटकन त्यांचे दर्शन घेतले."

त्यांनी माझ्या पाठीवर हात टाकून मला आशीर्वाद दिला. जीवनात जे काय करायचे ते प्रामाणिकपणे करा. तेवढ्यात रेल्वेचा हॉर्न वाजला. गाडी स्लो झाली. हळूहळू गाडी प्लॅटफॉर्मवर जाऊन उभी राहिली. काका हळूहळू उतरणाऱ्या प्रवाशांच्या मागे चालत चालत रेल्वेतून खाली उतरले. स्टेशन वरील प्रवाशांच्या गर्दीत हरवून गेले. मी खिडकीतून त्यांना शोधत होतो तेवढ्यात रेल्वे निघाली सुद्धा. मी खिडकीतून हात बाहेर काढून त्यांना बाय केले. कदाचित त्यांना माझा हात दिसला असेल की नाही हे माहीत नाही. पण आजच्या प्रवासात मात्र मला देवमाणूस भेटला हे नक्की.

फुलपाखरं ज्याप्रमाणे बसेल त्या ठिकाणी उडतांना स्वतःचा रंग मागे सोडून जातात. त्याप्रमाणे या अनोळखी गृहस्थाने जातांना मला जगण्याची खूप मोठी प्रेरणा दिली. माझ्या आयुष्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण केली. असे देवमाणूस सहजासहजी भेटत नाही. आपले नशीब आपल्याला हा देवमाणूस भेटला. आज मी प्रवासात खूप भारावून गेलो होतो. रेल्वेने आता खूप स्पीड घेतला होता. खिडकीतून खूप जोरात वारा आत येत होता. मी त्या थंडगार हवेत खिडकीतून बाहेर बघितले. बाहेरच्या निसर्गाच्या सौंदर्यात

**- राजेंद्र प्रल्हाद शेळके / किनगाव राजा**
**मो.- 9823425852**

# आशेचा किरण



दिवसासवे उगवे
आशेचा एक किरण
जिंकायचेय बळावर
येथील प्रत्येक रण

हार मानून कसे चालेल
अनमोल हे जीवन
अनुभवातून वेचायचं
जीवनरुपी धन

आशा आकांक्षा ह्या
अशायलाच हव्यात
त्यातून बऱ्याच गोष्टी
शिकायला हव्यात

आशाच नसत्या तर
काय झाले असते
मग बेचव हे जीवन
निरस झाले असते

आशेवर हा मनुष्य
जग देखील जिंकतो
अनमोल हे जीवन
आनंदात जगतो

धडपडत रहा सदा तू
निश्चितच आशेचा किरण उगवेल
जीवनाला मोड देऊन
नक्कीच तो हसवेल...

- रेणुका चंद्रकांत पांचाळ / वसमत
मो.- 8180858079

# नवी आशा



आज गंगू बाईंना पंख आल्यासारखे वाटतं होते कधी एकदा घर गाठते असे वाटत होते. "गंगुबाई "खरं तर हे त्यानां मिळालेले नाव होते.तर त्याचे खरे नाव होते गंगा चंद्रकांत कदम. नवरा गेल्यापासून स्वतः ला घर काम करण्यात जुपून घेतले बिलीडींग मधील सर्व मालकिणी त्याना गंगुबाईच बोलवत त्यामुळे सर्वच त्याना गंगुबाई बोलू लागले.

नवरा गेल्यानंतर खरंतर त्याची आयुष्याची कसरत चालू झाली. लहानपणी असताना वडीलांचे छत्र गेले त्यामुळे शिक्षण अर्थवट सोडावे लागले. आता सखाराम साठी त्याची ही सर्व खटपट होती."सखाराम " तिचा आयुष्याचा एकमेव आधार लहानपणीच वडीलांचे छत्र हरपले लहानपनापासूनच शांत स्वभाव जास्त कोणी मित्र नाही आपला अभ्यास नी आपण त्यामुळेच त्याने कधी शाळेत पहिल्यां तीन नंबरामध्ये यायचा. आपल्या आई वर त्याचे निनातं प्रेम होते शाळेतून आला कि घरातील उरलेली सर्व कामे तो करत असे. आपल्या आईला थोडी मदत होते असे त्याला वाटत होते. अगदी दहावीला असतानादेखील तो अभ्यास सांभाळून आईची मदत करत असे.

आज सखारामचा फायनल चा रिझल्ट झाला म्हणून तर गांगुताई सखारामला पेढे घेऊन निघाली होती.चाळीत पोहोचता क्षणी सखाराम धावत आला व आईच्या पाया पडला दोघांच्या डोळ्यात अश्रू होते पण आज हे अश्रू आनंदाचे होते.

आज गंगुबाई खूप आनंदी होती हे शिंदेसाहेबांचा लक्षात आले आज कित्येक वर्षा नंतर त्याचा चेहऱ्यावर हसू पहिले शिंदवाहिनी देखील कधीच ओळखले व शिंदेवाहिनी म्हणल्या "गंगुबाई, आज काही विशेष घडले का"? गंगुबाईपण हसत म्हणल्या "साहेब माझा पोरगा सखाराम चांगल्या मार्कन पास झाला जी "यावर त्यानीं विचारपूस केली व हातात आपल्या कंपनीचे कार्ड दिले व भेटावयास सांगितले. गंगुबाईना खूप आनंद झाला. "शिंदे रेसिन कंपनी" पाटी पहिली व सखारामला खात्री पाटली हातात फाईल होती तिकडे सुरक्षारक्षक नाव घेतले व

New Hope

FOR A BRIGHTER FUTURE

जावयाव्यास सांगितले सखाराम व शिंदे साहेबांची बातचीत झाली आपल्याला जसा व्यक्ती हवा होता तसा मिळाला म्हणून खूप खुश झाले अगदी आईप्रमाणे निघाला सखाराम काममध्ये प्रामाणिक होताच. अशा प्रकारे दिवसेंदिवस त्याच्या कामातील प्रगती पाहून शिंदेसाहेबांनी त्याचा पगार देखील वाढवाला त्यामूळे गंगुबाईंनी देखील आपली कामे सोडून दिली सखाराम आईला म्हणाला, “बस आता आई आता तू फक्त आराम करायचा”.आता गंगुबाईचे दिवस पालटू लागले चाळीमधूनआता बिल्डिंगमध्ये नवीन घर घेतले. घरात नव नवीन वस्तू आल्या.

शिंदे सरांच्या बहिणीची मुलगी सरिता पुण्यावरून आली होती. मामाकडून प्रॅटिकली व्यवसायचा अनुभव घ्याचा होता तिला, पाणीदार डोळे, पुरेशी उंची, चेहऱ्यावर शांत भाव साधी सरळ. आज मामा सरिताला घेऊन कंपनीत गेला सर्वांशी ओळख करून दिली, “हा सखाराम माझा उजवा हात” ओळख करून देताच सखारामने वर पण पहिले नाही फक्त हात जोडून नमस्कार केला. तोच सरिताला भावाला आजकालच्या मुलानंसारखे काही उनाडपणा नाही. तो एका क्षणात मन घेऊन गेला आज सरिताला काही सुचत नव्हते. कॉलेज मध्ये असताना खूप जणांनी तिला विचारले पण तिने पहिल्यापासूनच ठरवले होते प्रथम नजरेत जो भावेल त्यालाच ती होकर कळवेल. परंतु इकडे तर तिचीच विकेट गेली होती. मामाजवळ मुद्दाम सखारामचा विषय काढतं होती मामाचाही ते लक्षात आले.

शिंदेसर यांनी सरिताला शिकवण्याची जबाबदारी दिली.

मग सरिता व सखाराम एकत्र कंपनी पाहू लागले हळूहळू सखाराम पण सरितामध्ये मिसळू लागला. घरी जाऊन सरिताबदल आईला सांगू लागला.

शिंदेना पण सखाराम आवडत होता आता त्यानीं ठरवले आपणहून घरी जाऊन मागणी घालावी तसा सविताला फोन करून सविस्तर सांगितले. सविता सरिताचीआई शिंदेची एकुलती एक बहिणाबाई आपल्या भावा पुढे कधी बोली नाही दोघाची मते तशी सारखीच असायची अगदी राम लक्ष्मन बोलायचे त्याना.

भाडंण हा विषय नसायचा दोघांमध्ये. सांगितल्या वर लगेच ती बोली, “अरे दादा सरिता तुझी भाची, तू काही वाईट पाहणार आहेस, तूला जे योग्य वाटते ते कर मी येते नंतर .”

“गंगुबाई, ओ गंगुबाई कुठे आहात असा आवाज येताच गंगुबाई पटकन आल्या, अरे बापरे! साहेब तुम्ही मला बोलवान धडायचं तुम्ही उगा आलात, अगदी बावरून गेल्या

तेवढ्यात शिंदे बोले अहो घाबरु नका, मी आज तुमचा सोयरा म्हणून आलो आहे”. बाजूला सरिता उभी होती पाहता क्षणी सरिता वाकली व पाया पडली पाहता क्षणी सरिता मनाला भावली. गंगुबाई ना सर्व न सांगता समजले.

सखाराम हॉस्पिटलच्या बाकावर डोकं ठेवून शून्यात पाहत होता त्याच्या समोरून

नर्सेस, डॉक्टर, कर्मचारी, पेशंट यांची वर्दळ चालू होती. पण त्याचे कोणाकडेही लक्ष नव्हते. भुतकाळातील आठवणीने त्याचे डोळे भरून आले होते. आईची आठवण तर तो दररोज काढत होता पण सरिताने त्याला खूप संभाळले होते. त्याचे व सरिताचे लग्न आईने भरभरून दिलेले आशीर्वाद. सरिता नावाप्रमाणेच निघाली आईकडे व घराकडे तिने स्वतःहून जबाबदारी घेतली. लग्नाला सहा महिने झाल्यावर आईला अचानक एक दिवशी चक्कर आली व ती कोसळली सरिताने ताबडतोब हॉस्पिटलमध्ये दाखल केले डॉक्टरानी सरिताला जवळ बोलवले व चोवीस तर अंडर ओपसेर्व्हेशन मध्ये ठेवावे लागेल असे सांगितले. सखाराम धावत आला आईला आय सी यू मध्ये पाहिल्यावर आधीच त्याचा जीव कासावीस झाला. ती रात्र खूप भयानक होती कारण आई कायमची त्याच्यापासून दूर गेली होती. आपल्या आयुष्याचा चित्रपट त्याच्या डोळ्यासमोर सरकत होता....

वर्षानंतर सरिताला दिवस गेले. परंतु ती माहेरपंणा साठी आईकडे गेली नाही तिला सखारामला एकटे सोडायचे नव्हते आई गेल्यापासून सरिताच एकमेव व्यक्ती होती तिच्यामुळे तो आता सावरला होता न आता त्याचसाठी नवीन बातमी होती व त्यामुळे तो खूष होता एखाद्या आईप्रमाणे तिची तो सेवा करत होता. शेवटी तो दिवस आलाच  घरात छानशी राजकुमारी आली. अगदी आईसारखी  हुबेहूब आम्ही दोघांनीही लाडाने तिचं नाव “नयना” असे ठेवले. नावाप्रमाणेच ती नक्षीदार डोळ्यांची होती आम्ही दोघांनीही तळहाताच्या फोडाप्रमाणे तिला वाढवले. परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच होते अडीच महिन्यानंतर नयनाच्या  डोळ्यांमधील बुबुळात फुल पडले. बरेच उपचार केले परंतु डॉक्टरांनी सांगितले की आता नयनाला काहीही दिसणार नाही ती दृष्टिहीन  झाली आहे.

आमच्या दोघांच्याही पायाखालची जमीनच सरकली. कारण नयनाला कायम अंधत्व आले होते. नयना जशी जशी मोठी होऊ लागली तशी तशी आमच्या आधाराची गरज तिला जास्तच भासू लागली.सरिता ही न खचता तिची काळजी घेऊ लागली परंतु सखाराम दिवसेंदिवस खचून गेला. नशिबाला दोष देऊ लागला प्रत्येक देवळात जाऊन नवस करु लागला. आईची आठवण पण सारखी येत होती.तो जास्तीत जास्त वेळ आपल्या कंपनीत काढू लागला कारण त्याला पुढील उपचारासाठी पैशाची गरज होती. शिंदे सर तर त्याच्या सोबत कायम होते शिंदे सरानी त्याला पैसे देऊ केले परंतु त्याला ते मान्य नव्हते.

एक दिवशी  तो कार्यालयाच्या कामासाठी बाहेर पडला होता तेव्हा तेथील देशमुख सरांची त्यांची गाठभेट झाली तेव्हा त्यांनी थोडीशी विचारपूस केली तेव्हा त्यांने नयना बद्दल सांगितले देशमुख सरांनी त्यांना नयनाचे डोळे परत येऊ शकतात व तेही आपल्या बजेट मध्ये आहे असे सांगितले  त्यासाठी त्यांनी त्यांच्या ओळखीच्या डॉक्टरांचा नंबर दिला. सखारामला पायात बळ आल्यासारखे वाटले

त्याने लगेचच घरी गेल्यावर सारिताला हे सर्व सांगितले दोघांनी मिळून नयनाला त्या डॉक्टरांकडे नेले डॉक्टरांनी सर्व तपासण्या केल्या व सांगितले की नयनाचे डोळे परत येऊ शकतात  पण अशा शस्त्रक्रिया या 70 टक्के यशस्वी होतात सखारामला परत वाईट वाटू लागले परंतु सरिताने परत एकदा धीर दिला व सांगितले आपल्या नयनाला खरंच दिसू लागेल आपण ही शस्त्रक्रिया करूया...

सखारामला सरिताने जोरात हाक मारली अहो, अहो, ऐकलत का? डॉक्टर आपल्याला बोलवत आहेत..... लक्ष कुठे आहे तुमचे? अहो, आपल्या नयनाच्या डोळ्यावरची पट्टी काढत आहे...उठा पाहू डोळे पुसा बरं..... सखाराम हा भूतकाळातील आठवणीतून परत बाहेर आला .आणि तो धावत  ऑपरेशनच्या दरवाजाजवळ गेला. डॉक्टरांनी त्या दोघांनाही आत बोलावले नयनाच्या डोळ्यावरची पट्टी  काढू लागले.... थोड्यावेळाने नयनाने थोडे  डोळे उघडले व समोर बघता क्षणी तिने डोळे बंद केले. सखाराम परत घाबरला. नंतर डॉक्टर म्हणाले," बाळा हळूहळू डोळे उघड "तेव्हा तिने हळूहळू डोळे उघडले, व प्रथमच बाबा, आई अशी हाक मारली .आणि घट्ट मिठी मारली त्याक्षणी.... सखारामला वाटले हाच तो क्षण, हेच ते वळण व त्यांच्या पुन्हा एकदा नव्या आयुष्याची सुरुवात....

**- अवंतिका  महाडिक / रत्नागिरी**
**मो.- 9552564103**

# पाड्यावरची शाळा..!



शाळेत रानवाट तुडवत
येती पाड्यावरची पोरं
उत्साह अन आनंद पाहुनी
वाटेत स्वागत करी मोरं

हिरवी हिरवीगार झाडे
त्यांस वेलीं बिलगली
भाबळ्या मुलांस प्रश्न पडे
हि का आपल्यास घाबरली..?

बहुरंगी फुलांनी सजली
वाकडी तिकडी ती वाट
शाळेत येणाऱ्या बालकांचा
जसा हा राजेशाही थाट

गाणी कविता म्हणता
कोकिळाही देई त्यांना साथ
सुरात सूर मिळवुनी चालती
डोंगर माथ्याची पायवाट

इवले इवले पाऊल त्यांची
चिखल मातीत उमटती
दाट झाडीतून वाट काढता
मुलं शाळेला वेळेत भिडती

सुरतालात म्हणत प्रार्थना
काढत छान गोड गळा
अशी आमुच्या चिमुकल्यांची
भरते पाड्यावरची शाळा




**– रामकृष्ण पांडुरंग पाटील / विखरण**
**मो.- 9408885775**

# “नवस”



दरवर्षी प्रमाणे यंदाही पेरणी आटोपून आठ दिवस झाले तरी पावसाचा पत्ताच नव्हता. प्रत्येक माणूस अभायाकड तोंड करून बसला होता. दुबार पेरणीचं संकट येते की काय म्हणून सगळे जसे धाकी पडले होते.जमीन पावसासाठी ‘आ’ वासून बसली होती. लपून बसलेल्या चोरासारखा पाऊस मात्र बाहेर पडायला तयारच नव्हता. ढग येत होती, जातं होती. मधातच सूर्य तोंड वर काढून पाहत होता. वसंता आप्पाचा रोजचा नित्यनियम: शेतात येऊन पाहणे, धुऱ्या वरचा दगड कोणी सरकवला की काय म्हणून त्याला ह ा त लावणे , एवढ्यावर त्याचं समाधान होतं नव्हतं तर तो काहीवेळ इकडे तिकडे पाहिलं की कधी शेताच्या मधात, तर कधी धुऱ्यावर माती उकरून पाहत होता. कुठं काही कोंब दिसते काय? पण जमिनीच्या पोटात बी फक्त फुगीरल होतं. कुबेरल कुठेच नव्हतं. जमिनीत ओल किंचितही दिसत नव्हती. मस्तकावर आटया पडाव्या तशा जमिनीवर भेगा पडलेल्या दिसत होत्या.

वसंताप्पा तसाच डोक्याला शेला बांधून घराच्या रस्त्यान निघाला.विचाराचे काहूर त्याला शांत बसवत नव्हते. मनातल्या मनात एकटाच तो पुटपुटू लागला. एक एक पाऊल पुढं टाकू लागला, आपण चालता चालता कोठपर्यंत आलो हे सुद्धा त्याच्या लक्षात नव्हतं. काहीतरी तो हातवारे करून ‘असे सालमान त आपुन पुऱ्या आयुष्यात पाहिले नाही बॉ.? काय होय दोन तीन वर्षापासून तं अजिबातच पिकाचा भरोसा राह्यला नाई .अन हा निसर्गही आता पहिले सारखा तालावर दिसत नाई. हा पाऊसय येते तं धो धो येऊन पडते, होतं नव्हतं सार वाहत घेऊन जाते. नाही तं बोलवाव तरी येत नाही. त्याच्या साठी लोकांयले नवस करा लागते.काय होईन त हो देवा. तूच पाय आता.’

पाहता पाहता घर कसं आलं त्याच्या लक्षातच आलं नाही. घरी येता येताच.....

“काजी, काय म्हणते वावर? कुबेरले कायी कोंबगीम”पार्वता बुडी अंगणातुनच बाजेवर बसून विचारू लागली.

“घरात त येऊ दे मायमाऊले,हात पाय धु दे, तिथूनच विचारशीन सगळं” बुडा खकरला.हात पाय तोंड धुऊन डोक्याच्या दुपट्टयाने तोंड पुसत आपलं गाऱ्हाणं सांगू लागला.

“काही नाही , बुडापर्यंत उकरून पाहिलं जमिनीत.चांगले टवटव दाणे दिसते, त्या धुळीत काय खाक बी कुबेरनार हाय,आणखी दोन दिवस पाणी नाही आलं, की त्या बियाले घुसा फोल करते, दोन दिवसांन पुरे टकरच दिसणार हाय तासानं, पायनं तू.”

वसंताप्पा काकूळतीनं सांगू लागला. आणि विचार करु लागला.’आपले काय

राहिलेच किती दिवस? आज हाय उद्या नाही.पण आपुन जगलो आपल्याच तोऱ्यात. घरी दोनच एकर पण रेलचेल दुनियाभराची, लक्ष्मी पाणी भरत होती साक्षात. थोडंच पिके पण समाधानी होतं सगळं. दिवाळी, दसरा, सारेच सण उल्हासांन राहिलो'.

'आता त दोन एकरातच दहा एकराच पीक होते. पिकलं त बदबद पिकते, नाही तर घरात दानाय राहत नाही. घर कितीही भरलं दिसत असणं तरी घरादारात पाह्यजे तस रमेट वाटतं नाही. घरात नेहमीची हनहन कायमचीच'.वसंताप्पा पायाचे नख काढता काढता बडबडू लागला.

तेवढ्यात मिलिंदा तावातावात घरात आला अन वसंताप्पावर खेकसला, "तुम्हाले त मी पाह्यलेच म्हंटल होतं, यंदा वावर कोरं ठेवतो म्हणून, तुम्हीच ऐकलं नाही, केलं स्वतःच्या मनानं. तुम्हाला काय समजते आताची कास्तकारी. तो तुमचा जमाना थोडीच होय.सगळं शेणखतावर चालाले. आता सर्व रासायनिक आलं. तात्काळ रिझल्ट देते. त्यासाठी एखाद्या वर्षी वावराले तळणय बसली पाहिजे. तेव्हा कुठं ते बंबाट पिकते"

वसंताप्पाचा मोठा मुलगा म्हणजे मिलिंदा तसा स्वभावान शांत होता. पण त्याच्या कोणत्याही कामाच्या मधात कोणी बोललं आणि ते गणित का चुकलं त त्याचा आपल्या रागावर नियंत्रण राहत नव्हता.

जिकडे तिकडे एकच हाक होती पाऊस कधी येणार...पाऊस कधी येणार. शेवटी नवव्या, दहाव्या दिवशी पावसाचा एक शिरकाव आला. वातावरणात थोडा थंडावा निर्माण झाला. वारे बदलायला लागले. थोडं बरं वाटलं. पावसाने भूरभुरी चालू केली. आता कोणतंच पीक जमिनीच्या पोटात पचणार नाही. याची सर्वांना खात्री पटली. चार दिवसात 'बी' तासोटनार हे वसंताप्पाला माहित होतं. पण तरी मनात शंका होतीच तसाच वसंताप्पा म्हणाला, "मिलिंदा अगुदर मंदिरात जाऊन नारळ फोडून ये बरं, हे सालमान कायी ठीक नाही दिसून राहिलं."

तसा भर पाण्यातच मिलिंदा हनुमानाच्या मंदिरात गेला. एक नारळ फोडल.अन चांगल पिकल्यावर आणखी पाच नारळ वाहिन तुले म्हणून नवस करून आला.

पाऊस चालूच होता. एक दिवस, दोन दिवस, तीन दिवस सतत चालूच. थांबाच नावच नाही. "अभाय फुटलं कारे देवा " ज्याच्या त्याच्या घरातून हाक येऊ लागली. सतत आठ दिवस पाणी. घराच्या भिंती मागून पुढून ओल्यागच्च झाल्या. कौलातुन घर गळू लागलं. घरात जिकडे तिकडे ओलच ओल.भिंतीचा लोणा घसरून खाली पडू लागला. काय करावं काहीच सुचत नव्हतं. पार्वता बुडीनं देव पाण्यात ठेवले.अन एवढ्या पाण्यात अंगणात उभी राहून अभयाकड पाहून मोठयान बोलली, "तुले सांगून ठेवतो देवा, जो पर्यंत तू हा पाऊस थांबावंनार नाही तोपर्यंत तुले मी पाण्यातुन काढणार नाही."

पार्वता बुडी जगजग झाली होती, पण तिचा देवावरचा विश्वास कमी झाला नव्हता. कारण तिला माहित होतं. की आपल्याले अर्ध्या वयापर्यंत काहीच मुलंबाळ नसताना हे गुणाचं पोरग वयाच्या पन्नासीत झालं होतं. आपला नवस वाया गेला

नव्हता. अन आताही आपली इच्छा पूर्ण होणार याची तिला पूर्ण खात्री होती. म्हणून ती मिलिंदाला देवाच्या ओट्यातलं समजत होती.

पाऊस आता कुठं थोडा थोडा कमी झाला होता. पण ढग अवतीभोवती गुसमळतच होते. घरव्यातली पाखरं चारयासाठी बाहेर पडताना दिसत होती. झाडावर पावसाचे टपोरे थेंब अजूनही जसेच्या तसेच होते. हवेची एक झुडक आली की सर्व पाण्याचा सडा खाली ओसंडून पडत होता. सूर्य हलकासा ढगामधून वर येऊन परत ढगाच्या मध्ये गडप होऊन जातं होता. गावातली माणसं घराच्या बाहेर निघायला सुरवात झाली होती.

तशातच वसंताप्पा वावराच्या दिशेन करकरं निघाला. तेवढ्यात शेजारचा अंबादास मधेच टांग टाकल्या सारखा बोलला, "काहो आप्पा, कुठं निघाले. "

"घरच्या वावरातुन येतो गड्या, काय निघालं, काय नाही ते पाहून येतो जरा."

"अहो आप्पा, वावरात काय करता जाऊन, अजूनही पाय फसते म्हंटल. दोन दिवसांन जा वाटल्यास." पण अंबादासच एक न एकता बुडा करकरं निघाला.

चिखल, माती तुडवत वावरापर्यंत जाऊन पोहचला. पण वावरात अंदर पाय ठेवाले मन होतं नव्हतं.पूर्णच वावरात तणकट वाढीस लागलं होतं. ह्या कोपऱ्या पासून त्या कोपऱ्या पर्यंत हराळी, कुंदा, गाजर गवत, अघाळा, बोराटीचे लहान लहान झाडायनं चांगलीच गादि तयार केली होती. त्याच्या मधात कुठेच सोयाबीनच पीक दिसत नव्हतं.

वसंताप्पाला धक्काच बसला. तो चस्मा वर करु करु पाहू लागला.आपण पेरणी त केली होती. मग हे बियाणं गेलं कुठं.तसाच त्यानं वावरात पाय टाकला. त्याच्या पायाला एक काटा रुतून आरपार गेला. पण तरी त्याचं त्यांना एवढं वाटलं नाही. समोर समोर पाहत तो एक एक पाऊल पुढं टाकू लागला. कुठं कुठं अस्थाव्यस्त पसरल्या सारखी सोयाबीनचे लहान लहान रोपटे सगळ्या वावरभर पसरले होते. तेही तणकटाखाली लपल्या प्रमाणे दिसत होते. जणूकाही सर्व वावरावर तणकटान आपलं साम्राज्य निर्माण केलं होतं आणि हक्काची सोयाबीन मुंग गिळून उभी होती. काही सोयाबीन दडपलं होतं. जे काही पावसाच्या पाण्याने वर येऊन धारेत लागलं होतं तेवढं इकडे तिकडे पसरुन कुबेरलं होतं....

जणूकाही सर्व संपलं होतं. यंदाचं साल हातातून गेलं होतं. सर्व लावलेला पैसा पाण्यात गेला. शेवटी निसर्ग जिंकला माणूस हरला सर्व नवस सायास या मातीत दडपले होते. वसंताप्पा तसाच पायात रक्त अन डोळयांत पाणी घेऊन घराच्या दिसेनं निघाला.................

**- विशाल मोहोड / अमरावती**
**मो.- 9011578771**

# पडता पाऊसधारा



पडताच पाऊसधारा
उधाणलाय रानवारा
चिंब न्हाली ही धरा
पडती टपोऱ्या गारा

चला सख्या सयांनो
करु पावसात मजा
वीजबाई कडकल्या
मिळते शाळेला रजा

बाबा गेलेत बाहेरी
भिजूनी होऊ चिंब
साठल्या डबक्यात
पाहू ओले प्रतिबिंब

अवखळ या वाऱ्याने
उडविलेय या बटांना
हळूवार सावरते मी
भिजलेल्या जटांना

बेडकांसंगे गाऊया
आपण डराव गाणी
होड्या कागदाच्या
उडवू तुषाराचे पाणी

गडगडाट मेघांचाही
होई बघा आता सुरु
खारुताई बिळाकडे
जाऊ लागे तुरुतुरु

पक्षी पाखरे निजली
घरट्यांतून चिडीचूप
किलबिलाट करती
पाहून सृष्टीचे रुप


हिरवा शालू नेसूनी
सजली नटली धरा
खुलवितेय सौंदर्य
अवतरतो तू खरा

वेचूया मूठीत गारा
बर्फ हाती थंडगार
दातही आपटतील
थंडी वाजेल फार

ओलेत्याच अंगात
हुडहूडी लागे भरु
इवली फुलपाखरे
चिमटीमधून धरु

- सौ. भारती सावंत / मुंबई
मो.- 9653445835

# वाया गेलेला मुलगा..



विश्वातले नव्यानव पूर्णांक नव्यानव शतांश बाप वाया गेलेल्या मुलाचे वर्णन करतात, 'मुलगा कमाई करत नाही, त्याने परंपराश्रीत किंवा नवीन व्यवसाय सांभाळला नाही, घर, बंगला बांधला नाही, कार घेतली नाही, मोटार सायकल हि नाही, बँकमध्ये खाते नाही, लॉकर्समध्ये सोने-नाणे नाही म्हणून निराशेने कपाळाला हात लावणारे किंवा ऊर बडवून वाया गेलेला मुलगा म्हणून आपल्या दुर्दैवाची कहाणी सख्यासोबत्याजवळ हलक्या आवाजात सांगणारेच बाप आपणास आढळतात.

आणि जरी एखाद्या मुलाने लक्षपूर्वक अध्ययन अध्यापन करीत ब्रह्मचर्य किंवा सन्यास पत्करून लोकसेवेचे व्रत पत्करले तरी हे बाप धाय मोकलून रडतील आणि आमचा मुलगा अगदीच वाया गेला असे सांगत सुटतील.

संतश्रेष्ठ कबीर दु:खाने म्हणतो....

डूबा वंश कबीर का उपजा पूत 'कमाल'|
हरिका सुमिरन छोडीके ले आया घर 'माल'||

**भावार्थ** : अरेरे कबीराचा वंश बुडाल्यासारखाच आहे. कारण माझा वंश हरीनाम स्मरणाचा आहे ते काम सोडून हा माझा 'कमाल' नावाचा मुलगा व्यवसाय करून 'माल' जोडण्यात मग्न आहे.

संत कबीराचे जीवन अलौकीकाने नटलेले आहे. सहाशे वर्षापूर्वी त्याने एका विधवेच्या पोटी जन्म घेतला म्हणतात. तिने लोकापवादाला भिवून टाकून दिलेले हे मुल एका विणकराने करूणावाश घरी आणले व लहानाचे मोठे केले. पण त्याची जन्मजात प्रवृत्ती ही ज्ञान, वैराग्य व तप या भोवतीच घुटमळत राहिली, त्याने अशाच एका कुलशील अज्ञाद मुलीशी लग्न केले. तिच्यापासून त्याला 'कमाल' नावाचा एक मुलगा व कमाली नावाची एक मुलगी झाली.

त्यानंतर त्याने विनकराचा धंदा व प्रप्रंच गौण केला. व सद्गुरूच्या शोधात व तत्वचिंतनातच हयात वेचही. त्याने अनेक गुरु केले, सर्वधर्म-पंथ अभ्यासिले व स्वत:चे असे एक निष्कर्षरूप तत्वज्ञान हिंदी-उर्दू मिश्रित डोह्यातून प्रतिपादिले, कोणत्याही एकाधर्माची बांधिलकी त्याने पत्करली नाही. ज्यांचे जे पटले ते स्वीकारले - उपदेशिले, पण जे पटले नाही त्यावर कोणाचीही भीडमुर्वत न ठेवता सडकून टीका केली.

बनारस झाली येथे त्याचा मुक्काम अधिक राहिला. शिष्यवर्गही निर्माण झाला, आज त्यांच्या अनुयायांची भारतातील संख्या कित्येक लाख आहे, त्याने उणेपुरे एकशेवीस वर्षाचे संन्यस्त तरीही प्रापंचिक जीवन उपभोगले आणि एकशेविसाव्या

वर्षाअखेर परलोक सुधारला. आपल्या साहित्याने अजर-अमर होऊन गेला. ह्या पृथ्वीच्या पाठीवरचा असा एकच बाप असावा बहुतेक!

वस्तुतः हा ज्ञानवैराग्याधारी तपस्वीच खरा सत्पुत्र ठरतो. कारण तो जाणतो की आपला आत्मा अनादि अनंत आहे. व त्याचे ठायी अनंत ज्ञान, अनंत सुख मिळवण्याची शक्ती आहे. पण तसा प्रयत्न कधी केलाच जात नाही.

बायकामुले, आई-बाप, बंधूभगिनी गेल्या अनंत पर्यायात जोडले व त्या निमित्ताने झालेल्या रागव्देषाने कर्मबंध ओढवून घेतला. त्याचे दुःख मलाच भोगावे लागेल. ते सर्व आपापल्या संचीताप्रमाणे दूर दूर गेले. त्यांचा पत्ता नाही. शेवटी माझा आत्मा एवढी एकच वस्तू माझी म्हणून शाश्वत स्वरुप आहे. त्याचा उद्धार हे एकच कार्य या जन्मी करावयाचे आहे. त्यासाठी ह्या प्रपंच गटारात पुन्हा लोळणे नको!

हे तत्वज्ञान समजून घेऊन मुलांच्या ज्ञानवैराग्य संपन्न जीवनाबद्दल स्वत:ला धन्य-धन्य समजणारे पिता अत्यंत दुर्लक्ष! शेष सगळे मात्र प्रचंड आहेत.

अशा स्थितीत मुलगा 'माळ' जोडतो व हरीनाम विसरतो या बद्दलचे दुःख व्यक्त करणारा 'पिता' धन्य धन्य होय !



**- प्रा. प्रवीणकुमार हेमचंद्र वैद्य / जयसिंगपूर**
**मो.- 9766581353**

**(- लेखक, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०१७ च्या अतिथी संपादक आहेत.)**

# // आमराई //



ऊन्हाळ्यात बहरुन येयाचा आंबा
आम्हां पोरांची आसायची चंगळ मजा

करायचो जागल आम्ही मांडवाला
बसायचो ठाण मांडून झाडाखाली

येईल वावटोळ पडेल आंबा पाडाचा
तुटून पडायचो आम्ही भावंड पाडावर

किती आंबराई होती दाट
नांग-या शेंद-या घोटी मोठ्या गाडग्या
लाल्या आन् रायत्याआसे कितीतरी

लावायचो माच गव्हाणीत गराड्यात
सकाळची न्यारी करायचो आंब्यासोबत भावाभावांच्या भुईच्या झाल्या वाटण्या

तरी आज्यान लावलेले झाड म्हणून
आब्यांचे करायचे हिस्से
त्यात बाईल लेकीचा एक हिस्सा बलुत्तेदाराचा दुसरा हिस्सा

पण..आता आसं घडत नाही
भावाभावांत हिस्तु आडवा जात नाही
आम्ही आजोबाचे वारसदार होत
नाही किती पिढ्या जपल्या त्यांनी
गावगाड्यासोबत होती त्याची नाळ
जागातीकरणानं घातला लोखंडी फाळ
तोडली नाळ जमिनीसोबतची
झाली नात्याचीही वाटणी
आब्याच्या झांडाच्या केल्या धिपल्या आज्या पंज्यांच्या स्वप्नांची झाली राख
मी त्या झाडांची खोड अन् मुळ शोधतो
किती गेली खोल खोल जमिनीच्या गाभाऱ्यात आन् थकतो
होऊ पहतो त्यांचा वारसदार....

**- श्री. शिवा जोगदंड / सावरगाव**
**मो.- ९८४५६६१९२३**

# श्रीमंत



रस्ता तर तसा ओळखीचाच होता. आजपर्यंत अनेक वेळेस या चौकातल्या रस्त्यावर येऊन गेलो होतो. दोन पदरी रस्ता. रस्त्याच्या दोन्ही कडेला अनधिकृत ठेलेवाले होते आणि मधल्या रस्त्यात वाहने चालत असत. खाण्याचे पदार्थ, भाजी, फळ विक्रेते, सिझनेबल विक्रेते हातगाड्यावर वस्तू विकत राहायचे.

पोलिसांनी कितीही दरडावले, धमकावले तरीही दोन दिवसांनी विक्रेते पुन्हा तिथे हजर असायचे. कित्येकदा तर विक्रेते दंड भरायचे पण तिथून हटायचे नाहीत. चौकात मध्यभागी एक अप्सरा आणि तिच्या हातात कलश असा पुतळा होता. तिच्या हातातल्या कलशातून पाणी वाहत असायचे. त्याच्या आजूबाजूला गोलाकार कारंज्याचे सुशोभन चौकात होते. संध्याकाळच्या वेळी त्या पाण्यात वेगवेगळ्या रंगाचे लाईट लावलेले असत. त्यामुळे कारंजे अजून जास्त रंगीबेरंगी वाटायचे.

आतापर्यंत सगळ्यांचे ऑफीस सुटले होते. सगळी चाकर, कामगार मंडळी घराकडे निघत होती. लहान मुलांची शाळा सुटली होती. ती दप्तर घेऊन घराच्या दिशेने जात होती. भाजीवाले, फळवाले यांचा गोंधळ सुरू होता. गाड्यांचा आवाज, हॉर्नमुळे रस्ता गजबजून गेला होता. संपूर्ण शहरात हा एकच मोठा रस्ता होता. येथे कॉलेजात शिकणारी, हॉस्टेलमध्ये राहणारी मुले विरंगुळा म्हणून याचवेळी रस्त्यावर रेंगाळायची. संध्याकाळच्या वेळी बायका भाजी खरेदीसाठी बाहेर पडायच्या. ज्येष्ठ नागरिक पाय मोकळे करायला म्हणून वॉकिंगसाठी यायचे.

छोट्या - छोट्या हातगाड्यांवर खाण्याचे भरपूर सारे पदार्थ मिळायचे. भेळ, शेवपुरी, पाणीपुरी, वडापाव, दाबेली, इडली-डोसा, ऑम्लेट, भुर्जी पाव, चहा, कॉफी, ब्रेड-बटर, समोसा, कचोरी, फरसाण, रगडा पॅटीस असे एक ना अनेक... खाण्यापिण्याची हौस असलेल्या खवैय्यांसाठी ती एक छोटीशी खाऊगल्लीच होती. हातगाड्यावर तळलेल्या वड्यांचा खमंग सुगंध दरवळत होता. तेवढ्यात तरूण पोरांचा घोळका त्या गाड्याजवळ आला. टी-शर्ट, जीन्स घातलेले, हातात मोबाईल असेलेले सात - आठ मित्रमैत्रिणी होते. त्यांनी वडापावची ऑर्डर दिली. बाजूला असलेल्या लोखंडी बाकड्यावर सगळे बसले होते. धमाल मजा-मस्ती सुरू होती.

काहीजण गप्पा करत होते, तर काही मोबाईलवर गुंग होते. “भैय्या, जल्दी वडापाव लाओ. वडा गरम देना.” असे म्हणत ते वडापाव खाण्याची वाट बघत होते. प्लेटमध्ये गरमागरम वडापाव, तळलेल्या मिरच्या, चटणी, सॉस होते. त्यांनी एकेक प्लेट उचलली. पावाच्या मधोमध वडा ठेवला, त्यावर चटणी भुरभुरली आणि सॉस टाकला. पाव बंद केला आणि तोंडी लावायला तळलेली मिरची घेऊन वडापाववर यथेच्छ ताव मारायला

सुरुवात केली. तिखट लागल्यामुळे तोंड झोंबत होते, तरीही मिटक्या मारत सर्वजण वडापाव खात होते. डोळ्यातून पाणी येत होते, तरीही सर्वांनी पुन्हा एक - एक वडापावची ऑर्डर दिली. त्यांच्यासाठी वडापाव वाल्याने लगेच गरमागरम वडे तळायला घेतले.

हातगाड्यापासून काही अंतरावर या सर्वांचे निरीक्षण करत एक मुलगी उभी होती. सहा - सात वर्षांची असेल. फाटके, मळके कपडे... अस्ताव्यस्त केस, मलूल चेहरा... पायात चप्पल नव्हती. मुलगी तशी चुणचुणीत होती, पण उपाशी वाटत होती. ती तेथे आली आणि या मुलांकडून खाण्यासाठी पैसे मागू लागली. “खाने के लिए पैसे दो ना”, म्हणत प्रत्येकाकडे हात पसरवू लागली. सगळ्या मित्र-मैत्रिणींनी तिला हमारे पास छुट्टे नहीं है, म्हणून हाकलून लावले. तरीही ती परत त्यांच्याकडे जायची आणि “कुछ खाने के लिए दो ना”, म्हणत पैसे मागायची. कोणीच तिला पैसे देत नव्हते.

तेवढ्यात फाटक्या कपड्यातला एक माणूस हातात कटोरा घेऊन तिथे आला. एका पायाने अधू असल्यामुळे तो काठी टेकवून चालत होता. कितीतरी दिवसांपासून आंघोळ नाही, केस विंचरले नाहीत, डोक्याला तेल नाही असा त्याचा अवतार होता. कुणीतरी दिलेल्या जुन्या कपड्यांवर तो स्वतःची गुजराण करत होता, असे स्पष्टच दिसत होते. तो माणूस वडापावच्या गाडीजवळ आला आणि त्याने एक वडापाव खरेदी केला. जी मुलगी खाण्यासाठी पैसे मागत होती, त्या उपाशी मुलीला त्याने तो वडापाव दिला आणि तो तिथून निघून गेला. ती मुलगी अधाश्यासारखी वडापाव खाऊ लागली.

मित्रमंडळी एकमेकांकडे अत्यंत दीनवाण्या नजरेने बघत होती. त्या छोट्या मुलीने तो वडापाव खाल्ला. प्लेट कचरापेटीत टाकली आणि ती तेथून दिसेनाशी झाली. तेवढ्यात पाच-दहा पावलांवर एका बाळाच्या हसण्याचा आवाज आला. सर्व मित्र - मैत्रिणींनी आवाजाच्या दिशेने माना वळवल्या. फुगेवाल्याकडून फुगा घेऊन त्या फाटक्या कपड्यातल्या माणसाने एका छोट्या बाळाला दिला होता.

**- उमा पाटील / धुळे**
**मो.- 9422750558**

# क्षण निरोपाचा



प्रिय तुझ्या डोळ्यातील
आसवांचा महापूर
धो -धो वाहू लागला
सुकल्या कंठचा सुर..
करपून गेला ....

डोळ्यांच्या  पाणवठ्यात
चिंब भिजून गेलो होतो
गत काळाच्या आठवणीत
जीवाला धीर देत होतो..

तू दिसता दरबारात
अंगावर मुठभर
मास चढायच
काळजाच्या ठोक्यात
मन निद्रानाश शांत व्हायच...

कुजबूज मज कानी आली
हात पिवळे होणार म्हणे
चाललीस सखे सोडून
मजला धीर दे क्षणाला ...

हळद लागली सखीला
अक्षता पडल्या डोईवर
चोरुन बघतो तुजला
नजरेला नजर भिडून...

अंधारली रात काळोखी झाली
व-हाडासंगे सोबतीला
पक्षी होऊन तुझ्या भोवती
पिंगा घालावा क्षण निरोपाचा...

- श्री. शिवाजी नामपल्ले / अहमदपूर
मो.- 9623795803

# व्हेन यू लॉस्ट युवर ऑटोबायोग्राफी



पुस्तकं ही ज्ञानाची भांडार असतात. आपण पुस्तकं वाचली पाहिजेत. त्यातून सर्वकाही शिकता येते, आचरणात आणता येते, फक्त वाचण्याची इच्छा जागृत झाली पाहिजे. आपण वाचन केल्यानंतर चांगल्या विचारांची टिप्पणी केली पाहिजे. आपल्या विचारात काही दोष आहेत का की नाही ते आतुरतेने जाणून घेतले पाहिजे. पुस्तक वाचल्यानंतर आपण आपल्या चांगल्या विचारांची जडणघडण दुसऱ्या चांगल्या मित्रांसमवेत, आपल्या जिवलग व्यक्तींसोबत केली पाहिजे. "पुस्तकात ज्ञान भरलेलं असतं ते अभ्यासाने वाचनाने हस्तगत होत असते " आपण त्या विचारांचे ग्रहण केले पाहिजे. पुस्तकं तुम्हाला खर्याअर्थी आयुष्य जगायला शिकवतात. म्हणायचंच झालं तर ते तुमचं जीवनच बदलून टाकतात. जे आपल्यासाठी अनमोल आहेत त्यांची आपण पूजा केली पाहिजे. प्रत्येक संस्कृतीही आपल्याला हेच सांगते. आपण वह्या पुस्तकांची पुजा फक्त दसऱ्याच्याच दिवशी करतो पण तसं न करता आपण त्यांना साधा नमस्कार तरी करावा. ह्या सर्व खटाटोपीने आपली पुस्तकांवरची श्रद्धा-भक्ती वाढते. ते आपल्याला हवीहवीशी वाटतात. आणि तीच पुस्तकं तुम्हाला अंधारातही दिवा होऊन मदत करतात.

शिर्षक वाचताच तुमच्या मनात खळबळ चालू झाली असेल. "ऑटोबायोग्राफी" म्हणजे तुम्ही स्वतः तुमच्याबद्दल लिहिलेले चरित्र. लिहायला वयाची मर्यादा किंवा कोणतीच सीमारेखा नसते. ऑटोबायोग्राफी म्हणजे स्वतःचं स्वलिखीत आत्मचरित्र. आपण आपले अनुभव, आपले विचार, आपलं बालपण, तारुण्य आपली सुख-दुःखं, अडथळे निर्मळ मनाने लिखीत स्वरूपात रेखाटत असतो. आत्मचरित्रामध्ये आपण अनुभुवलेले प्रसंग, प्रसंगीक गोष्टी मांडत असतो. आपण जेव्हा स्वतःचं आत्मचरित्र लिहितो तेव्हा आपल्याजवळ आठवणींचा खजिना असतो, अनुभवांची डायरी असते, सुख-दुःखाचे क्षण असतात आणि डोळ्यात आनंदाश्रू.

" व्हेन यु लॉस्ट युवर ऑटोबायोग्राफी " म्हणजेच जेव्हा तुम्ही तुमचं आत्मचरित्र गहाळ करता तेव्हा. हे वाक्य जेव्हा आपण उच्चारतो तेव्हा आपल्यालाही दुःख वाटते. मेहनतीची मथुरा पाण्यात जाण्यासारखी ही पण एका लेखकासाठी ही गोष्ट आहे. असंच माझ्याही आयुष्यात झालं. माझं सध्या वय एकोणवीस आहे. काहीदिवसांपूर्वी मी एका वयस्कर व्यक्तीशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केलता. त्यांना मी आत्मचरित्र लिहीत आहे असं सांगितले पण माझ्या संभाषणाला त्यांचा नकारार्थी प्रतिसाद/ प्रतिउत्तर मिळालं. त्या व्यक्तीचं म्हणणं असं होतं की आत्मचरित्र हे उतारवयी

आयुष्यात लिहावं, थोडक्यात काय तर साठीच्या नंतर. पण माझ्या मते तसं नाही. कारण साठ-पासष्ठी मध्ये आपल्या शरीराचीही घसरण व्हायला लागते. शरीर आपल्याला साथ देत नाही. आपले जेवायचेही वांदे होऊन बसतात. आणि खरंतर माणसाचा क्षणभरायचाची विश्वास नाही. आजकाल वेगवान युगामुळे काहीजण तर पन्नाशीही गाठत नाहीत.  ते ह्या जगाचा निरोप घेतात. उतारवयी आपल्याला जास्त काही आठवत नसते. जवळपास जास्तीत जास्त आठवणींचा आपण विचारही करत नाही. म्हणून आपण दैनंदिनी रुपी का होईना, आपल्या आठवणींचा सुख-दुःखांचा खजिना आपण जपला पाहिजे.

माझं लहानपणीच म्हणजे प्राथमिक शिक्षण हे माझ्या गावातच झाले. प्राथमिक शिक्षण हे आपल्या उच्चशिक्षणाचा पाया असतो. तो जर का भक्कम नसेल तर आयुष्याची इमारतच ढासळते. माझ्या प्राथमिक शिक्षकांचा माझ्या आयुष्यात खूप मोठा मोलाचा वाटा आहे. त्यांचे ऋण हे न फिटणारे आहेत. त्यानंतर मी माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी जिल्हास्तरीय शाळेत प्रवेश मिळवला. माझी शाळा ही सैनिकी होती. जेव्हा खाकी सदरा अंगावर घालतो तेव्हा आपल्यामध्ये एक वेगळीच धमक, वेगळीच ऊर्मी असते. आपल्याला स्वतःचा अभिमान वाटायला लागतो. शाळेला बऱ्यापैकी शुल्क भरावी लागत असल्याने परिस्थिती चटके देत होती. बिकट परिस्थितीमुळे जास्त खर्च किंधा हट्ट पुरवण्याचा प्रश्नच आला नाही. कारण, जन्मल्यापासूनचा अनुभव साथीला होता.

"गरीबीत जन्माला येणं ही चूक नाही,<br>
पण,<br>
गरिबीतच शेवटचा श्वास सोडणं म्हणजे चूक आहे "



आयुष्यात खूप मोठं बनायचा आहे, नाव कमवायचं आहे. अशी जिद्द, चिकाटी, विचार घेऊन मी खेड्यातला मुलगा त्या शाळेत शिकत होतो. त्या वेळेस मला वेगवेगळे वर्गमित्र भेटले. काहींनी साथ दिली तर काहीजणांनी आपला स्वार्थ साधला. वर्गमित्रांनी दिलेला त्रास म्हणजे आपल्यासाठी वाईट गोष्ट नसती. आपण नेहमीच त्याचा सकारात्मकपणे विचार करायचा असतो. मीही तेच केलं आणि स्वतःला पोलादासारखं भक्कम बनवलं. त्या शाळेतील शिक्षक म्हणजे ज्ञानाचा खजिनाच. त्यांचा माझ्या आयुष्यात अनमोल वाटा आहे. त्यांचा मी ऋणी आहे. त्यांनी मला मूर्तीप्रमाणे घडवले. कधीकाळी मूर्तीलाही घडवताना घाव सोसावे लागतात तसेच माझ्या आयुष्यातील खूप प्रसंग आले पण जवळपास सगळेच प्रसंग माझ्या हिताचेच होते. मी शालेय शिक्षण देत असताना मला वेगवेगळ्या परीक्षांचं वेढ लागलेले. मी खूप परीक्षा दिल्या. मला त्यातून खूप अनुभव मिळाले.

मी सातवीत असताना वायुदलातील शिक्षकांनी मला दैनंदिनी लिहिण्याचा कानमंत्र दिला. आणि आजही हा कानमंत्र मी काही गरजू लोकांपर्यंत पोहोचवत आहे. हा कानमंत्र म्हणजे आपणच रेखाटलेले आपल्या आयुष्याचं अनोखं सार. मला माझ्या सुख-दुःखात त्यांनी दिलेला हा दैनंदिनीचा कानमंत्र खूप कामी आला. खऱ्याअर्थी ह्या कानमंत्राने माझं आयुष्यच बदलले.

“ परिस्थिती कितीही बिकट असो
त्या परिस्थितीशी
दोन हात करण्याची धमक
तुमच्यामध्ये पाहिजे “

त्यावेळेस मला दैनंदिनी लिहिण्यासाठी साधी वहीही नव्हती पण मी मात्र माझं काम करत होतो. काहीदिवस सातत्य आलच नाही. म्हणतात ना चांगल्या गोष्टी अस्तित्वात येण्यासाठी वेळ लागतो. अखेरीस एकदाच सातत्य आले त्यात पण सुधारणा म्हणजे मी दैनंदिनी तोडक्या-मोडक्या इंग्रजीत लिहीत असे. त्याने माझ्या आठवणीही राहिल्या आणि माझी इंग्रजी भाषाही सुधारू लागली.

मला चित्रपट पाहण्याची खूप आवड होती असंच एक चित्रपट पाहिल्यावर आपणही आपली खरी कहाणी लिहावी असं मनात आलं. “ एक गोष्ट दोन वेळा तयार होते एक म्हणजे मनात आणि दुसरी अस्तित्वात “ तसच माझ्या आयुष्यातही झालं. त्यावेळी मी आठवीत होतो मी पुस्तक लिहिण्याच्या तयारीला लागलो. सगळ्या आठवणींचा खजिना जमा करु लागलो. जसे मला सुचत गेलं तसतसं मी लिहित होतो. मान्य आहे की माझी शब्दसंपत्ती जास्त नव्हती. पण, मला एक नवीन यशाच्या दिशेची वाट सापडलेली आणि मी एक वाटसरु होतो. अनेक वेळी निराशा जेव्हा यायची तेव्हा माझं अर्धवट पुस्तकच मला प्रेरणा द्यायचं. मला लढण्यासाठी ताकद द्यायचं. मी त्या पुस्तकाला “महासंग्राम” हे नाव दिलेलं. ते माझ्यासाठी अत्यंत

जवळचे आणि प्रिय होऊन कधी गेला कळालच नाही. मी माझे विचार, सुविचार तर खऱ्याअर्थी मी माझ्या आयुष्याबद्दल लिहित असत. ह्या पुस्तकाने मला माझ्या अस्तित्वाची जाणीव करून दिली.

मी दहावीत आमच्या शाळेतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालो. आनंद गगनातही मावणारा नव्हता. दहावी झाल्यानंतर मी पुस्तकाचे पुन्हा काम सुरु केलं. कठोर परिश्रमामुळे मला विश्वप्रसिद्ध फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश मिळाला. विविध शिक्षक भेटले प्रत्येकांनी यशप्राप्तीचा कानमंत्र देऊन एक वेगळीच प्रेरणा दिली. काही मित्र-मैत्रिणींनीही दुःखात साथ दिली. काहींचे बोल तर मनाला भावले. मनात जागा करून राहिले. जसे की, " सूर्यालाही ग्रहण लागते मग आपण कोण आहोत? " प्रत्येक दिवशी एक नवीन दिशा मिळत होती. दैनंदिनी लिहिण्याचे काम तर चालूच होते. आता मात्र शब्द संपत्तीमध्ये भर पडत होती.

विश्वव्यापी कोरोना महामारीमुळे सर्व गोष्टी सोडून घराकडे परतावे लागले. मीही त्यातलाच एक होतो. वाटलं नव्हतं कोरोना इतके महिने माणसांमध्ये राहील. मीही पुन्हा लगेचच दहा-बारा दिवसात माघारी येईल असं समजून थोडंच साहित्य घेऊन घरी आलो. पण, कोरोनाचा वाढता प्रसार पाहून माघारी परतणे हे अशक्यच होते. आपले साहित्य व्यवस्थित असेल की नाही याची खात्रीही नव्हती. मुख्य म्हणजे त्या साहित्यामध्ये माझं आत्मचरित्र "महासंग्राम" हे होतं.

जवळपास आत्मचरित्र लिहून झालतं, पण प्रकाशित केलं नव्हतं. त्याचं कारण म्हणजे भक्कम असे यश आलेलं नव्हतं. खऱ्याअर्थी मी नववीत असताना माझे पुस्तक माझ्या वडिलांच्या हातून वाचण्यात गेलं. पहिल्यांदाच आम्ही दोघे पुण्याला माझी एन. एल. एस. टी. एस. इ. ( NLSTSE ) ची परीक्षा देण्यासाठी रवाना झालतो. परीक्षेच्या वेळी दप्तर बाहेर वडिलांजवळ देऊन गेलतो. अचानकच त्यांनी "महासंग्राम" वाचले. खर्याअर्थी त्याच वेळी पुस्तकाचे प्रकाशन घालते. त्यांना माझा अभिमानही वाटला. ते पुस्तक जास्त कोणाला माहित नव्हतं. सगळं काही गुप्त होतं.

कोरोना लॉकडाऊन मध्ये कशाचाही न विचार करताना मी कविता, लेख, कथा, सुविचार लिहू लागलो. जवळपास 33+ पुस्तकांचा उपलेखक म्हणून लेखन केले. एक पुस्तक प्रसिद्ध लेखकांच्या सहाय्याने संग्रहित केले. तसेच दोन इंग्रजीत आणि एक मराठीत आंतरजालावर कवितासंग्रह प्रकाशित केले. जवळपास 500+ वरती डिजिटल प्रमाणपत्रे मिळाली. कित्येक लेख, कविता, कथा; इंग्रजी, मराठी तसेच हिंदीतून लिहिल्या. खूप लेखकांशी मैत्री झाली. दोन राज्यस्तरीय पुरस्कारही मिळाले; राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार आणि राज्यस्तरीय काव्यभूषण पुरस्कार हे एका संस्थेमार्फत मिळाले. आयुष्यात सगळ्या काही गोष्टी सुरळीत चालू होत्या. वेगवेगळ्या विषयांचे ज्ञानही ग्रहण करत होतो. सगळ्यांचे मार्गदर्शनही मिळत होते. आता शब्दसंग्रहात खूप मोठी भर पडलेली.

जवळपास नऊ महिन्यानंतर विद्यालयात बारावीचे परीक्षासाठीचा प्रवेश भरण्यासाठी बोलावले होते. आनंदाला पारा नव्हता. 24 डिसेंबरला सकाळी सकाळी पुण्याला रवाना झालो. मित्रमैत्रिणींच्या भेटी झाल्या. प्रवेश भरण्यासाठी जरावेळ असल्याने मी माझ्या वस्तीगृहाकडे गेलो त्यांना आज माझं साहित्य घेऊन जाईल असे सांगितले. मी विद्यालयीन कामकाज उरकून पुन्हा वस्तीगृहाकडे साहित्य आणण्यासाठी गेलो. मी साहित्य ठेवलेल्या खोलीतकडे गेलो. आत जाताच एक अनोखे दृश्य पाहायला मिळाले. सर्वांचे साहित्य एकत्र ठेवलेलं. खोक्यांमध्ये साहित्य ठेवल्यामुळे लवकरच सापडेल अशी आशा होती पण तसं काही झालं नाही. सगळ्यांचे साहित्य विस्कटलेल्या अवस्थेत होतं. कोणाच्या पुस्तक, कपडे, दप्तर, इत्यादी सगळं हे न बघण्याच्याच परिस्थितीत दिसून येत होतं. दोन-तीन खोल्यांमध्ये शोध घेतल्यानंतर अखेरीस मला माझ्या साहित्याचा माघ लागला..मी साहित्य गोळा करत होतो पण, त्यातले खूप काही साहित्य सापडलच नाही. माझं आत्मचरित्र अदृश्यच होते. पहिल्यांदाच "महासंग्राम" न सापडल्यामुळे निराश झालो. निराशेनेच घरी माघारी परतलो.

निराशा ही कोणत्या व्यक्तीजवळ सांगावी अशी एखादा मित्र-मैत्रिणीही नव्हती. म्हणून, पुन्हा दैनंदिनीनेच साथ दिली. माझं पुस्तक गहाळ झालय हा सल आजही मनात आहे. पण, त्याच वेळी निश्चय केला की पुन्हा " महासंग्राम- एक ध्येय वेडा प्रवास " पुस्तकाची नवीन उभारणी करू.

आपल्याला निराशा, दुःख येते जेव्हा आपल्या अत्यंत प्रिय गोष्टी हरवताय. पण, आपण खचून न जाता, स्वतःलाच दिलासा देत पुन्हा उभारणी करण्याचा निश्चय केला पाहिजे. आणि आपलं जे संकल्पित आहे ते अखेरीस पूर्णत्वास घेऊन गेलं पाहिजे.

**- श्री. संग्राम संतोष सलगर**
**मो.- 7756844169**

# लावणी



वाटेवरती उभी राहुणी
सजनासी तु बघती का
नेसुनी नववार साडी तु गं
दारा मध्ये थांबलीस का........

सजनाच्या तु भेटीला गं
अतुर असी झालीस का
मीठित घेऊन सजनाला तु
लाडी गोडी लावलीस का.........

दारात कशी उभा टाकली
नाही मन तुझ थार्यावर
प्रेमात रंग भरला तुझ्या
लौकर चढलीस बोहल्यावर.......

साज शृंगार तुझा आसा हा
सजना आज ऊतरनार
चुंबनाचा वर्षाव तुझ्या
आज सांजला घेनार...........

नववारीचा साज तुझा हा
हळुच खुशीत घेनार
तुझ्या गोड त्या ओठाची गं
लाली आज पुसनार..........

सजना आज जवळी घेऊन
घाम तुझा गं काढनार
मधु चंद्राची रास लिला गं
आज तुझ्याशी करनार............



**– श्री. गोविंद संभाजी श्रीमंगल / शिरुर अनंतपाळ**
**मो.– 9130488245**

# झुंज



हौशा आणि टोण्यापुढं वैरण टाकून शंकर आण्णा नितरास पडला होता. जनावरांच्या तोंडातनं वैरण चघळल्याचा आवाज कानावर पडत होता. लिंबाच्या झाडाखाली सावलीला पोतं हाथरूण शंकरआण्णानं त्यावर अंग टाकलं होतं. बाहेर ऊन मी म्हणत होतं. ऊन्हाच्या रकामुळं माणूस बाहेर फिरणासं झालं होतं. मळ्यातल्या रानापशीच शंकरआण्णानं जनावरांचा गोटा तयार केल्याला होता. बाजूनं कूड घेऊन वर गवतानं सपार शेकारल्यालं होतं. गोठ्यात चांगली पाच-सहा जनावरं होती. त्यात दोन म्हशी आणि त्यंची दोन रेडकं तसंच हौशा आणि टोण्या हे दोन रेडं होतं. लोकं रानातल्या मेहनतीसाठी बैलं पाळायची पण शंकरआण्णानं मात्र रेडं पाळल्यालं होतं. रेडंही तसं दणकट होतं. चालायला लागलं की ते हत्तीच्या पिल्ल्यागत दिसायचं. शंकरआण्णाची जुन्या काळातली एक बैलगाडीही होती. त्या लाकडी चाकाच्या बैलगाडीलाच हे दोन रेडं जुपून शंकरआण्णा थाटानं ती गाडी घेऊन जायाचा. रानातली सगळी मेहनत या रेड्याकडनंच उरकून घ्यायचा. त्यजी गाडी चालली की हौशाच्या गळ्यातल्या घंटीचा आवाज यायचा. त्यामुळं लांबणंच त्यजी गाडी आल्याची चाहूल लागायची.

शंकरआण्णाची गावापशी गावंदरीत एक रानाची पट्टी होती. मळ्यात दोन-तीन एकर रान होतं. शंकरआण्णा कामाला लई ताट होता. त्यज्या हाताला खंड असा नसायचा. दिवसभर कायना काय चालूच असायचं. दोन वर्षापाठीमागं शंकरआण्णा गावातच राहायचा. तेवढच चार आकण्याचं दगडमातीनं बांधल्यालं त्यजं घर होतं. आज्ज्याच्या काळापास्नं त्यो ह्याच घरात राहात होता. पण आता दोन वर्षापास्नं मळ्याकडंच राह्याला आला होता. शेत जवळच असल्यामुळं मळ्यात राहणं सोईचं पडत होतं. त्यात मळ्यात राहील्यामुळं जनावरांची देखभाल करणंही सोपं पडत होतं. रानाच्या वरच्या पट्टीपशी त्यानं आपलं कौलारु दोनखोल्याचं घर बांधल्यालं होतं. घरात शंकरआण्णा त्याची बायको आणि दोन पोरं असा छोटासाच संसार होता. घरापास्नं गोटा जवळच होता. म्हंजी दोन-तीन फर्लांगाच्या अंतरावर होता. गोठ्यापशी त्याची स्वत:ची विहीर होती. उन्हाळ्यात जरा या हिरीचं पाणी कमी यायचं. तरी एकरभर बागायत जगंल एवढं पाणी त्या हिरीत खायम असायचं.

गहू काढल्यामुळं आता रानाची मधली पट्टी मोकळी झाल्याली होती. वल्ल्या वैरणीसाठी एकरभर मका लावावी असं शंकरआण्णानं येवजलं होतं. आज ऊन खाली झाल्यावर घरापसल्या रानाची मेहनत करुन घ्यायची असं मनात ठरवलं होतं. पंधराधीपास्नं रेड्यास्नीबी चांगलाच ईसावा मिळाल्याला होता. दावणीत टाकल्याली

वैरण जनावरांनी कधीच संपवली होती. टोण्या आणि हौशा चांगली रवंथ करत बसल्याली होती. तोंडातनं फेस गळायला लागला होता. ती दोघं मधीच आपलं कान हलवत होती. अंगावर बसल्याल्या माशा शेपटानं हाणत होती.

आता ऊन खाली झालं होतं. झाडाच्या सावल्या लांबायला लागल्या होत्या. ऊनाची रग कमी झाली होती. शंकरआण्णा एक डुलका काढून उठला होता. उशाचा टावेल झटकून त्यनं त्वांड पुसत शंकरआण्णा उठला. बाजूला ठेवल्याल्या बादलीतलं पाणी तोंडावर सपा..ऽऽसपा..मारून त्यनं त्वांड धुतलं. गडबडीनं पत्रयाखालच्या काठीला अडकवल्याल्या सापत्या काढल्या. बैलगाडीतली शिवाळ काढून आणली. वैरणीच्या बिंड्यामागं ठेवल्याला नांगूर दोन्ही हातानं धरुन पुढच्या चाकावर चालवत बाहेर काढला. कडूस पडायच्या आधी निम्मं-अर्ध रान नांगरुन टाकायचं असं त्यनं बेत केल्याला होता. दोन्ही रेडं आजून बसल्यालंच होतं. बादलीत उरल्यालं पाणी तसंच पडल्यालं होतं. ती बादली उचलून त्यातलं पाणी टोण्याच्या अंगावर मारलं. टोण्यानं जरा अंग थरथरल्यागत केलं आणि पुन्हा तसाच त्यो बसून रवंथ करु लागला. तशी शंकर आण्णाची कपाळाची शिर चढली. डाव्या हातातला कासरा गोळा करुन सरळ करत त्यनं टोण्या आणि हौशा दोघांच्याबी पाठीत हाणला. शेपाट झाडतच टोण्या उठला. मागोमाग हौशाबी उठून उभा राहीला. दोन्ही रेड्यास्नी कासरं लावून शंकरआण्णानं त्यंच्या गळ्यातली पेंडी फोडली. रेड्यास्नी बाहेर घेऊन त्यनं शिवाळ त्यंच्या खांद्यावर ठेवली. नांगूर जुपून दोन्ही हातानं मागनं उचलून धरत तोंडानं हाळी दिली. प्ब्वॉ ..ऽऽ प्ब्वॉ...ऽऽ करुन त्यनं औत हाकायला सुरवात केली. बांध चढून नांगूर मधल्या पट्टीत आणला. कडच्या बाजूनं तास लावत शंकरआण्णानं नांगूर हाणायला सुरवात केली.

तासभर औत चांगलंच चाललं होतं. पुन्हा जरा हौशा मागं राह्याला लागलं. मध्येच चाबकाचा फटका त्यज्या पाठीवर मारत शंकरआण्णा नांगूर पुढं रेटत होता. तसा टोण्या औताला लई ताठ होता. अंगात हत्तीसारखी ताकत होती. अंगानंबी त्यो चांगला नेटका होता. दिसायला एखादा वळू असल्यागत दिसत होता. त्यला आजून बडवल्याला नव्हता. त्यो नुकताच दुस्सा झाल्याला होता. त्यजी शिंगं गोलाकार होती. समोरनं बघीतलं की अंगावर धावून येतूय का काय असं माणसाला वाटायचं. याऊलट हौशा मात्र जरा बारीकच होता. त्यजं वय वाढल्यालं होतं. बरीच वर्ष त्यनं शंकरआण्णाच्या रानात औत वढल्यालं होतं. वाढत्या वयामुळं त्यज्या अंगातली रग कमी झाल्याली होती. त्यला पहील्यागत कामही जमेनासं झालं होतं. पण हौशा मरुस्तवर आपल्या दावणीलाच ठेवायचा असा शंकरआण्णाचा निर्धार होता. त्यामुळं टोण्याबरोबर औताला जुपून हळूहळू आपली कामं शंकरआण्णा आवरत होता. रेड्याची जात असल्यामुळं औताला जरा मंदच असायची. पण ताकतीला आरबूज असल्यालं हे रेडं वज्याला कधी कमी पडत नव्हतं. गाडी असूदे नाहीतर औत असूदे हळूहळू आपल्या चालीनं चालत ही दोघं आपलं काम संपवायची.

अंधार पडूस्तवर शंकरआण्णानं बरंच रान नांगरुन काढलं होतं. टोण्या आणि हौशा चांगलीच दमली होती. त्यंच्या तोंडातनं फुस..ऽऽ फुस...ऽऽ असा आवाज निघयला लागला होता. तोंडातनं खाली फेस गळायला लागला होता. त्या फेसानं तोंडावरची मुसकी पार भिजून गेल्याली होती. दिवस कधीच बुडला होता. कडूस पडल्याल्यामुळं शंकरआण्णानं औत एका सरीला मधीच सोडलं. रेड्यास्नी सोडून त्यांच्या खांद्यावरची शिवाळ काढून आपल्या खांद्यावर टाकली. कासरं धरुन त्यो रेड्यास्नी पुढं हाकत बांधाकडं चालू लागला. तवर शंकरआण्णाचं धाकलं पोरगं बज्या बांधावरनं पळतच येवून रानात उतरलं. शंकरआण्णापशी येवून बोललं...

" आबा द्या हिकडं कासरा..."

" आरं शाळंला गेलता का न्हाय...?" कासरं त्यज्या हातात देत शंकरआण्णा बोलला.

व्हय... जावून आलू की..."

" आन् मध्या कुठाय रं...?"

" त्यो हाय की घरात..." रेड्याच्या पाठीवर चाबूक हाणत बज्या बोललं.

" घरात काय आंडी घालतूय काय..."

" कुनान ठाव..."

असं म्हणत बज्या एका हातानं नाक पुसत हासायला लागलं. बोलत बोलत दोघं गोठ्याजवळ आली होती. दोन्ही रेडं दाव्याला गुतवून शंकरआण्णानं बाजूला ठेवल्याला वैरणीचा कवळा मारला. दोन्ही रेड्यापुढं निम्मी-निम्मी वैरण टाकली. टोण्या आणि हौशा दोघंबी त्या वैरणीवर तूटून पडली. तवर बाजूला बांधल्याली रेडकं वढ खायाला लागली. मग शंकरआण्णानं पुन्हा एक वैरणीचा कवळा मारुन बाकीच्या म्हसरांपुढं जरा-जरा वैरण इस्कटली. सगळी जनावरं एका सुरात वैरण चघळू लागली. शंकरआण्णानं जनावरांच्या मागं पडल्याल्या शेणाच्या पावट्या जरा मागं सारल्या. खांद्यावरचा टावेल सरळ केला आणि बज्याच्या खांद्यावर हात टाकून चल म्हणत घराकडची वाट धरली. तवर पुढनं त्यजी मालकीन सुला कंदील घेवून आली. हातातली धारंची भांडी वाजायला लागली होती. आयला च्या प्यावं म्हणलं तर ही बया धारंला आली. असं मनाशीच बोलत शंकरआण्णा माघारी फिरला. आता म्हशीची धार काढल्यावरच जावावं लागणार होतं.

सुलानं दहा मिनटातच म्हशीची धार काढली. चळाचळा दूध पिळून ती मोकळी झाली होती. इकडं शंकरआण्णाचं सारं अंग कामानं मोडून आलं होतं. कवा घरात जावून धरणीला अंग टाकतूय असं त्याला झालं होतं. घरात आल्याबरोबर सुलानं चहा करुन दिला. पेटल्याल्या चूलीवर भाकरीचा तवा ठेवला. लगोलग तीनं स्वयपाकाची तयारी चालू केली. बज्या आणि मध्याचा तवर कालवा चालू झाला. भाकरी आणि कालवण झाल्याबरोबर शंकरआण्णा जेवायला बसला. भूकच्या तडाख्यात त्यनं तीन-

चार भाकरीचा बुकना पाडला.

जेवण झाल्यावर टावेलानं हात पुसून शंकरआण्णा बाहेर अंगणात आला. बाहेर पांढरंधोट चांदणं पडलं होतं. जनावरास्नी वैरण टाकयला जावावं लागणार होतं. 'मध्या..! आरं त्यो कंदील आण जरा...' शंकरआण्णानं थोरल्या पोराला हाळी मारली. मध्या गडबडीनं कंदील घेऊन बाहेर आलं. कंदील हातात घेऊन शंकरआण्णा गोठ्याच्या दिशेनं चालू लागला. तसं चांदण्याच्या उजेडात बांधावरची पायवाट स्पष्ट दिसत होती. पण तरीबी वैरण टाकताना कंदीलाची गरज लागणार होती म्हणून शंकरआण्णानं कंदील बरोबर घेतल्याला होता. गोठ्याजवळ आल्याची चाहूल लागल्याबरोबर जनावरांची  हालचाल चालू झाली. टोण्या लगीच शेपाट झाडत उठून उभा राहीला. शंकरआण्णानं जवळच्या कडब्याच्या गंजीतनं पाच-सहा पेंड्या उपसल्या. वैरण तोडायची कुऱ्हाड हातात घेतली. खाली जमीनीवर तुंब्याकडच्या बाजूनं जरा आपटून दांडा जाम बसलाय का न्हाय याची खात्री केली. लाकडावर एकेक पेंडी धरून तोडायला सुरुवात केली. सगळी वैरण तोडून झाली. मग शंकरआण्णानं त्या वैरणीत जराजरा वल्ली वैरण मिसळून ती जनावरांच्या पुढं टाकली. सगळ्या जनावरांची  दावी नीट बांधल्याली हाईत का न्हाय ते तपासून बघीतलं. टोण्याच्या दाव्याची एक काडणी सुटल्याली होती. ती पुन्हा व्यवस्थीत बांधून शंकरआण्णा उठला. गोठ्यावरनं एकवार नजर मारली आणि मग घराकडं निघाला.

उकाडा असल्यामुळं बाहेर अंगणातच खाट टाकल्याली होती. शंकरआण्णा येवूपर्यंत पोरं झोपल्याली दिसत होती. सुला भांडी घासायला लागली होती. " पोरं झोपली काय गं...?" शंकरआण्णानं हळू ईचारलं.

" व्हय..."

' कट्टाळ आलाय बघ आज...'

" मग झोपा की तुमाला कुणी आडवलंय व्हय...!"

" येरवाळी उठव मला.... नांगराला जायाचं हाय..."

" कुठं दुसऱ्याच्या रानात जायाचं हाय तवा...!"

" अगं रानाची मेहनत आवरुन घेटली पाईजे..."

असं म्हणत शंकरआण्णानं खाटावरची वाकळ सरळ करुन त्यावर अंग टाकलं. आभाळ एकदम मोकळं दिसत होतं. लुकलुकनाऱ्या चांदण्याशिवाय दुसरं कांहीच दिसत नव्हतं. बाहेर वारवशी पडल्यामुळं जरा बरं वाटत होतं. मध्येच वाऱ्याची मंद झुळूक आली की मन आनंदून जायचं. चांदण्याकडं बघता-बघता शंकरआण्णाला कधी झोप लागून गेली कळालंच न्हाय. पण रातचं बारा वाजायच्या टिपणाला जनावरांच्या गोठ्याकडनं जनावरं धडपडल्याच्या आवाजानं शंकरआण्णाला अचानक जाग आली.

' सुले जागी  हायस का...?'

" काय वं...?"

"अगं तुला आवाज येतूय का...?"
" व्हय गोठ्याकडनं कसलातरी आवाज येतूय की..."
" आगं कंदील लाव पाटदिशी...म्हसबीस सुटल्या का काय कुणानठाव..."..

सुलानं लगीच खुटीवरचा कंदील काढला. गोल तार फिरवून कंदीलाची वात जरा वर केली. काडी शिलगावली आणि कंदीलाची काच वर सरकवून कंदील पेटवला. तवर शंकरआण्णानं पायात चपला अडकवल्या. एका हातात काठी आणि एका हातात कंदील घेऊन लगबगीनं त्यो गोठ्याजवळ आला. कंदीलाच्या उजेडात पुढं बघीतलं तर समोरचं दृश्य भयानक होतं. नरशेवाडी गावातला देवाला सोडलेल्या वळू रेडा गोठ्यात शिरला होता. गोठ्यात शिरुन त्यो धूडकूस घालायला लागला होता. सगळी जनावरं भेदरुन गेल्याली होती. शंकरआण्णानं ते बघून हातातली काठी सरळ धरली. कंदील बाजूला टेकवला आणि ताकतीनं काठीचा रट्टा त्या वळू रेड्याच्या पाठीत दाणऽऽदिशी हाणला. पण यावर त्या वळू रेड्यानं कुठलीच प्रतिक्रीया दिली न्हाय. त्यो समोर असलेल्या हौशाला ढुशी मारायला लागला. दूई काढण्यानं बांधल्यामुळं टोण्याला आणि हौशाला काईच हालचाल करता येत नव्हती. तोंडानं फुस-फुसल्याशिवाय कुठलाच पर्याय त्यंच्याकडं नव्हता. इकडं शंकरआण्णा पेचात पडला होता. आता कसं करावं ... असं मनाशीच म्हणत त्यनं जवळ पडल्याला लोडणा उचलला. सगळी ताकत एकवटून पुन्हा त्या वळूच्या पाठीवर एक प्रहार केला. त्याबरोबर ते जनावर मागं सरलं. भेत भेतच शंकरआण्णानं आजून एक तडाखा त्या रेड्याच्या मागच्या पायावर हाणला. तसा त्यो रेडा मागं सरुन गोठ्यातनं बाहेर पडला. बाजूच्या रानात उतरुन तसाच त्यो पुढं वढ्याकडच्या बाजूनं निघून गेला.

कंदीलाच्या उजेडात शंकरआण्णा काय नुकसान झालंय ते बघू लागला. वैरणीची गंजी एका बाजूनं पार विस्कटून टाकल्याली दिसत होती. वैरणीच्या पेंड्या इकडं तिकडं पडल्याल्या दिसत होत्या. गोठ्यात येवून बघीटलं तर सपराची एक मेढ मोडल्याली दिसत होती. हौशाच्या पाठीमागच्या बाजूला तसंच पोटावर शिंगांच मोठंच्या मोठ्ठं काकूरं उठल्यालं दिसत होतं. कांही ठिकाणी मोठ्या जखमा दिसत होत्या. त्यातनं रगात यायला लागल्यालं दिसत होतं. हे सगळं बघून शंकरआण्णाचं पोटात कालवल्यागत झालं. त्यनं लगबगीनं घराकडं जावून हळदीची पावडर आणली. येताना सुलीलाबी बोलावून आणलं. दोघांनी मिळून हौशा आणि टोण्याला झाल्याल्या जखमावर हळद लावली. जनावरास्नी झाल्याल्या जखमा बघून सुलीच्या डोळ्यात पाणी दाटून आलं... कांही न बोलता बराच वेळ दोघं तिथं बसून राहीली.

त्या दिवसापास्नं चार दिवस शंकरआण्णानं औत बंदच ठेवलं. हौशाच्या जखमा बघून त्यला औताला जुपावं असं शंकरआण्णाला वाटतच नव्हतं. ह्या वळू रेड्याचा कसा बंदोबस्त करावा अशा ईचारात शंकरआण्णा होता. गावातबी बऱ्याच लोकांच्या रानात त्या वळू रेड्यानं बरंचसं नुकसान केल्यालं होतं. कधी कुणाची मका फस्त केली

होती तर कुणाच्या पिकाची तुडवण केल्याली होती. सगळा गाव त्या वळूच्या त्रासानं कंटाळून गेल्याला होता. शंकरआण्णा तर आता जनावरांच्या गोठ्यातच झोपायला जात होता.

कांही दिवस असंच निघून गेलं. आता शंकरआण्णानं आपल्या रानात मक्याची लागण केली होती. रानातली कामं कवाच आवरुन घेतली होती. आता महीन्याभरात सुगीचं दिवस चालू होणार होतं. शंकरआण्णाही आता निवांतच होता. कधी कुणाच्या रानात मेहनतीचं काम भाड्यानं आलं तर त्यो करुन देत होता.

एक दिवस असंच दुसऱ्याच्या रानातली मेहनत उरकून त्यो वढा वलंडून येत होता. दोन्ही हातात टोण्या आणि हौशाचं कासरं धरल्यालं होतं. तवर पुढनं शिरपातात्या आल्याला दिसला. जवळ येत शिरपातात्यानं ईचारलं... “ काय रं शंकर ... आज कुणीकडं हुता..?”

“ आज गणपाच्या रानाची जरा नांगरट केली...”

“ लईच येळ केलास...”

“ व्हय... आमची जनावरं तुमाला म्हाईतच हाईत की...”

“ तुझंबी खरंच हाय म्हणा...”

दोघांचं असं बोलणं चालू हुतं तवर वढ्यातनं वरच्या बाजूनं झाडीतनं खुसफुस झाल्याचा आवाज आला. टोण्या आणि हौशा दोघंबी बावारली. कांही कळायच्या आत वळूरेडा फाऽऽस दीशी झाडीतनं बाहेर आला. टोण्याकडं बघून फुसफुसायला लागला. आता दोघांत जुपणार हे ओळखून शिरपातात्या बोलला... “आरं पुढं घे रेड्यास्नी झुज लागंल...”

पण शंकरआण्णा जागचा हालला न्हाय ... त्यनं हातातलं कासरं सैल सोडून दिलं. काय हुतय हे कळायच्या आत वळूरेडा आणि टोण्या या दोघांत झुंज लागली. दोघं एकामेकांवर तूटून पडली. शिंगाला शिंगं भिडली होती. ख..ऽऽड खड... ख.ऽऽड अशा त्यातनं आवाज निघायला लागला होता. पुऱ्या ताकतीनिशी दोघं एकमेकाला जोरजोरानं ढुशा मारु लागली. कोणीच मागं सरकत नव्हतं. खुरानं माती उकरली जात होती. धुरळा उडत होता. शंकरआण्णा आणि शिरपातात्या आ वासून झुंज बघायला लागली होती.

इकडं हौशा भेदरुन एका बाजूला उभा राहीला होता. म्हातारपणामुळं झुंज खेळायची हिम्मत त्यज्यात राहील्याली नव्हती. फक्त त्यो बावरुन बघत उभा राहीला होता. टोण्या वळूरेड्यापुढं जराही नमला नव्हता. तोडीस तोड देत त्यो झुंज देतच होता. दोघांच्या टकरीत एकदा टोण्या सरस होतूय असं वाटायचं तर कधी त्यो वळूरेडा... कधी त्यो टोण्याला मागं रेटत नेत होता तर कधी टोण्या त्यला मागं रेटत होता. दोघांच्याही अंगावर शिंगाच्या टोकामुळं जखमा व्हायला लागल्या होत्या. झुंज चांगली तासभर रंगली होती. या लढतीत कुणाचा पराभव होणार याचा अंदाज कोणालाच लावता

येत नव्हता. आता तिथं बघ्यांची संख्या वाढली होती. रस्ता त्या वढ्यातनंच जात असल्यामुळं जाणारी-येणारी माणसं आपसूकच तिथं थांबत होती. बघता-बघता आठ-दहा माणसं तिथं गोळा झाली होती.

येवढ्यात टोण्याचं शिंग वळूरेड्याच्या शिंगात अडकलं. आता काय होणार ह्याची चिंता सगळ्यास्नी लागली होती. तवर का...ऽऽ ड असा जोराचा आवाज झाला. टोण्याच्या अंगावर रक्त दिसायला लागलं. पण टोण्या एका जाग्यावरच उभा होता आणि वळूरेडा मात्र एकदम मागं सरुन झुडपाकडं पळू लागला. त्यजं एक शिंग मोडून खाली पडलं होतं. त्याच्या मोडल्याल्या शिंगातनं रक्त यायला लागलं होतं. कांही क्षणातच त्यो त्या झुडपात दिसायचा बंद झाला. टोण्या विजयी मुद्रेनं तिकडं पहात होता. त्यजा वाढल्याला श्वास अजून थांबल्याला नव्हता. जमलेल्या लोकांच्या डोळ्याचं पारणं फिटलं होतं. ज्यच्या त्यच्या तोंडात शंकरआण्णाच्या टोण्याचं नाव होतं. टोण्यानं आज वळूरेड्याची खोड चांगलीच मोडली होती. आपला बदला त्यानं पुरेपूर घेतला होता. आता त्यो वळूरेडा कधीच टोण्याच्या वाटंला जाणार नव्हता. त्यजं शिंग मोडून टोण्यानं त्यजी अर्धी ताकतच संपवली होती.

चल... आता घराकडं असं म्हणत शंकरआण्णानं टोण्याचा कासरा हातात घेतला. कासरा त्यज्या पाठीवर टाकून त्यला पुढं हाकण्याचा प्रयत्न केला. टोण्याचा आवेश बघून शंकरआण्णा तसा मनातनं दचकलाच होता. पण शंकरआण्णाच्या बोलण्यासरशी टोण्या गुमानं पुढं घराच्या रोखानं चालू लागला. जमल्याली माणसं आता पांगली होती. शंकरआण्णा न कुठं थांबता सरळ आपल्या जनावरांच्या गोठ्याजवळ आला. हौशाला आणि टोण्याला जास्तानी बांधून त्यनं सगळ्या जनावरास्नी वैरण टाकली. जरा इसावा घ्यावा म्हणून त्यो तिथंच मेढक्याला टेकून बसला. मनात ईचारांचं मोहोळ उठलं होतं...

गावची जत्रा आता जवळ आली होती. जो-तो आपापली कामं आवरुन घेण्याच्या तयारीत गुतला होता. यल्लमा देवीची यात्रा म्हंजी गावात एक वेगळंच पर्व असायचं. पावणं-पैची ह्या जत्रंत नुसती झुंबड उडायची. पुरण पोळ्याचा नैवेद्य असायचा. सकाळी नऊ वाजल्यापास्नं देवीला त्या नैवेद्याचा भोग चालू व्हायचा. बायका नैवेद्याची ताटं हातात घेऊन नटूनथटून चालल्याल्या दिसायच्या. जत्रंच्या दुसऱ्या दिवशी कुस्त्याचा फड असायचा. लांबलांबणं पैलवान यायचं. मारुतीच्या देवळापुढं चौकात लोकांची गर्दी झाल्याली असायची. सगळ्या गावाला उत्सवाचं स्वरुप यायचं.

शंकरआण्णा जनावरांच्या वैरण-पाणी आवरुन आज गावाकडं आल्याला होता. अंगावर पांढरा सदरा आणि ईजार चढवली होती. डोस्क्यावर त्याच रंगाची गांधीटोपी घातल्याली होती. पायात साधी कातडी चप्पल अडकवल्याली होती. अशा साधारण वेशातच शंकरआण्णा असायचा. तसं त्यजं माणसात जास्त बसणं-उठणंबी नसायचं. कामाकारणंच त्यो गावाकडं यायचा. आजही असंच जत्रंचा जरा अंदाज घ्यावा म्हणून

त्यो गावाकडं आल्याला. देवळाम्होरं पोहचल्याबरोबर रावसू पाटलानं हाळी मारली. 'आरं ए.. ! शंकर... !'

त्या हाळीसरशी शंकरआण्णा बावरला. आलो आलो... म्हणत देवळाची पायरी चढू लागला. वर जाताना देवाला नमस्कार करतच सरळ आत देवळात घुसला. वर हात करुन त्यनं समोर बांधल्याली मोठी घंटा ठ...ऽऽण ठ...ऽऽण करुन दोन वेळा वाजवली. खाली गुडघ्यावर बसून त्यनं पुन्हा एकदा डोळं झाकून देवापुढं हात जोडलं. थोडावेळ त्यो तसाच तिथं बसून राहीला. जवळच्या तबकातला अंगारा कपाळाला लावत तिथनं उठला. बाहेर रावसू पाटील त्यजी वाटंच बघत बसल्याला होता. पाटलापशी बुड टेकत त्यनं ईचारलं... " का...वं पाटील...! काय काम काढलं म्हणायचं गरीबाकडं...?"

" आरं परवा तुझ्या रेड्यानं वळू रेड्याला पळवून लावला म्हणं..."

" तुमाला आणि कुणी सांगीटलं...?"

" सगळ्या गावात झालंय आणि मला कळायचं ऱ्हातंय व्हय रं..."

यावर कांही न बोलता शंकरआण्णा गप्पच बसला. त्यो गप बसल्याला बघून पाटील पुन्हा बोललं...

" मग रेडा ईकायचा का ते सांग..."

" न्हाय बा...."

" आरं म्या त्यला ईकत घ्याचं म्हणतूय..."

" पाटील जातीवंत जनावर हाय ते... इकून कसं चालंल...."

" आरं तु म्हणशील ती किम्मत देतो की मी...."

" पाटील ते काय जमायचं न्हाय बघा..." असं म्हणत शंकरआण्णा तिथनं उठला. डोस्क्यावरची टोपी सरळ करत त्यो शामूपाटलाच्या दुकानाकडं चालला. रावसू पाटलाला आता कळालं होतं... शंकर काय रेडा ईकणार न्हाय... शंकरआण्णा तसा लई तुसाड गडी... कुठं कसं बोलावं हे त्यला समजायचंच न्हाय. रावसू पाटील शंकरआण्णाच्या पाठमोऱ्या आकृतीकडं उगचंच बघत राहीला.

दिवस भराभर निघून जात होतं. बघता-बघता गावची जत्रा पार पडली होती. गावात माणसांची झाल्याली रेलचेल आता जरा कमी झाली होती. पावणं-पै आता आपापल्या गावाकडं निघून गेलं होतं. शंकरआण्णा पुन्हा आपल्या रोजच्या कामात गुंग झाला होता. दुपारचं जनावरास्नी जरा पाण्यावरनं घेऊन यावं म्हणून त्यो आज तळ्याकडं निघाला होता. सगळी जनावरं गुमानं चालली होती. वरनं दुपारचं कडक ऊन अंगावर पडत होतं. अंगातनं घामाचं लोट लागत होतं. शंकरआण्णानं टोण्याच्या ईसणीला कासरा लावल्याला होता. एका हातानं त्यजा कासरा सावरत त्यो तळ्याच्या रोखानं चालत होता. भोरी म्हस वाटवरनं खाली उतरुन पलीकडच्या रानात उतरली होती. हे बघून शंकरआण्णानं उजव्या हातातला कासरा डाव्या हातात धरुन खाली

वाटंवर पडल्याला दगूड उचलला. भोऱ्या म्हशीच्या दिशेनं भिरकावून जोरानं एक शिवी हासडली. त्याबरोबर ती म्हस उदाळाली ती सरळ तळ्यापशीच जावून थांबली. तिथनं तंबून मागं वळून बघायला लागली.

ऊन्हाचा दाह बघून जनावरांच्या अंगावर जरा पाणी टाकावं असं शंकरआण्णाला वाटायला लागलं होतं. सगळी जनावरं आता पाण्यात घुसली होती. त्यातली कांही घटाघट पाणी ढोसायला लागली होती तर कांही पाण्यात आत शिरुन आपलं आंग भिजवायला लागली होती. इकडं टोण्याबी पाणी पिवून आत पाण्यात शिरायसाठी वढ खायाला लागला होता.

कासरा काढून घेऊन टोण्याला आत सोडावं तर त्यो पुना लवकर पाण्यातनं बाहीर निघणार न्हाय ... असं शंकरआण्णाला वाटत होतं. त्यामुळं कासऱ्यासकटच त्यला आत सोडून शंकरआण्णा आपली ईजार वर वडत पाण्यातनं बाहीर आला. आता तासभर तर ही जनावरं पाण्यातनं बाहेर निघणार नव्हती. शंकरआण्णाचं पाय गाळात रुतल्यामुळं चिखलानं राड झाल्यालं होतं. पाय बघतल्याबरोबर त्यो पाण्याजवळच्या एका खडकावर पाण्यात पाय सोडून बसला. एका हातानं पायाला लागल्याला चिखूल धुवून काढत त्यो बराचवेळ बसला. गार पाण्यात पाय टाकून बसल्यावर जरा बरं वाटत होतं. तेवढंच ऊन्हापास्नं सुटका झाल्यागत वाटत होतं.

बराच वेळ झाल्यावर शंकरआण्णा उठला. आता जनावरं माघारी घेऊन जावावं म्हणून त्यनं दगडं मारुन जनावरास्नी बाहेर हाकायला सुरुवात केली. दोन्ही म्हशी लगोलग बाहेर आल्या बारकी रेडकंबी लगीच काठाजवळ आली. हौशाबी शंकरआण्णानं आवाज मारल्याबरोबर बाहेर आला. पण टोण्या मात्र तळ्यात लांब आत गेल्याला दिसायला लागला. नुसतं त्यजं त्वांडच वर दिसायला लागलं होतं. शंकरआण्णानं दोन-तीन दगडं तिकडं मारली. पाण्यात डुऽऽबुक.... डुऽऽबुक असा दबका आवाज आला. पण टोण्या बाहेर निघायचं नाव घेईना. आता काय करावं या ईचारात शंकरआण्णा हुता तवर टोण्या एकदम दिसायचा बंद झाला. शंकरआण्णा जरा मनातनं दबकलाच...

आयला हे रेडं असं का करायलंय... पुन्हा थोड्यावेळानं टोण्याचं त्वांड जरा वर आल्यागत दिसलं... पण परत दिसायचं बंद झालं.. आता मात्र शंकरआण्णा घाबरुन गेला. त्यजं पाय गळाटल्यावाणी झालं. टोण्या बुडायला लागला का काय अशी शंका त्यला यायला लागली. शंकरआण्णाची शंका रास्त होती. टोण्या खरोखरंच गटकाळ्या खात होता. काय झालं असंल...? पाण्यात मगर-बिगर तर नसंल... का गाळात पाय रुतलाय कुणान ठाव....! अशा अनेक ईचारानं शंकरआण्णा हैराण झाला होता. बाकीची समदी जनावरं वर टेकाड चढून गेली होती. पण शंकरआण्णाचं तिकडं अजिबात ध्यान नव्हतं... त्यजं सगळं ध्यान आता टोण्यावर लागलं होतं. पण इतक्या लांब आपून कसं पोहचणार ...? कसं त्यला वाचवावं ...? अशा मनाच्या अवस्थेतच


"व्यक्तिमत्व विकास" संपादक - मंगेश विठ्ठल कोळी, मो. 9028713820

त्यनं पाण्यात उडी घेतली. भराभर पोवत अंतर कापत त्यो टोण्यापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न् करत होता. पण टोण्या कवाच दिसायचा बंद झाला होता. आपल्या मरणाशी चाललेली त्यजी झुंज कवाच संपली होती. कासरा पायात अडकून टोण्याचं पाय त्यात गुतलं होतं. त्यामुळं त्यला पवायला आलं नव्हतं. त्यात तळ्याच्या मधल्या पोकळीत असल्यामुळं तिथं पाणी जास्त होतं. जमनीवर पाय टेकणं कठीण होतं....

किंतीतरी वेळानं शंकरआण्णा पाण्यातनं दमून बाहेर आला होता. शंकरआण्णाचं डोळं पाण्यानं भरलं होतं. त्यज्या टोण्याला त्यो वाचवू शकला नव्हता. आपल्या आरबूज ताकतीच्या जीवावर झुंजीत वळू रेड्याला पळवून लावणारा टोण्या आता पाण्यात शांत होऊन निपचीत पडला होता.... टोण्याचं भलंमोठ्ठं शरीर गिळून तळं गपगार पडलं होतं....

**- श्री. आनंदा बरगुले / मोराळी**
**मो.- 7391875538,8483975033**

# विष्णू आश्रू काळे
# एक प्रेरणादायी चरित्र..



सुखा दुःखाला छातीशी कवटाळून
संघर्षमय वाटचाल केली की,
भोवतालात उमटते स्वतःचं
कायम प्रतिबिंब...

विष्णू आश्रू काळे...
हे असेच एक जेमतेम सत्तरच्या आसपास
वय असलेलं व्यक्तीमत्व...

परिस्थिती अंत्यत साधारण...
पत्नी, दोन मुले, सुना नातवंडे
अशा अल्प परिवाराची धुरा सांभाळत
त्यांचा भविष्याकडे
होणारा सुखकर प्रवास
पाहिला की,
त्यांच्याप्रती
माझ्या अबोल मुक्या ओठांवर
तरळतात कौतुकाचे
गोड शब्द...



जेमतेम लिहीता वाचता येण्या पुरते
शिक्षण झाले असले तरी
एखाद्या उच्च शिक्षित माणसालाही लाजवेल
निदान एवढे
व्यवहारीक ज्ञान...

कष्ट करण्याची जय्यत तयारी
हे आणखी एक विशेष...

जातीने पारंपरिक रितीरिवाज
त्यांच्यावर लादले असले तरी
जात हा संकुचित निकष
त्यांना पडत नाही लागू
कारण आदर्शवत व्यक्तिमत्वाला करता येत नाही
जातीच्या चौकटीत उभे...

हिरव्याकंच गवताच्या पात्यावरील दवबिंदूसारखा
त्यांचा साधा सरळ पारदर्शी स्वभाव
मला कायम प्रेरणादायी वाटतो
मी या माणसाला
जपतो भजतो
पुजतो...

**- श्री. सुनील दौलत खोडके / डोणगाव**
**मो.- 7057591117**

# मेरी



"काय, आजही गर्लफ्रेंडशी भांडण झालं वाटतं." राकेशचा बदललेला मूड पाहून जोसेफ हसत-हसत कॉफीचा कप त्याच्यापुढे सरकावत म्हणाला.

"घे. गरमागरम कॉफी पिलास की मूड एकदम फ्रेश होईल."

" नकोय मला. अहो अंकल, समजते कोण ही स्वतःला?"

तो पुढे काही बोलण्या आधीच जोसेफने त्याला हातानेच शांत बसण्याचा इशारा केला.

" आणि काय रे, तुला कितीदा सांगायचं? माझ्या पिकलेल्या केसांकडे पाहून मला अंकल म्हणायचं नाहीस. अरे माणूस मनाने तरुण असावा. जसा मी आहे. अजूनही यंग बॉय! नावाने बोलत जा. किती छान वाटतं! आणि तुझं सतत अंकल म्हटलेलं माझ्या मेरीला अजिबात नाही आवडणार बर का."

जोसेफ हसत बोलला.

"तुझी मेरी फार समजूतदार असेल. तशी रेवती अजिबात नाही. सतत हट्ट करत असते. मला मिटिंग असतात.

कामाचा स्ट्रेस असतो. समजूनच घेत नाही. मला वेळ देत नाही अशीच सतत तिची तक्रार!"

राकेश कुरकुरत बोलला.

"मला सांग, किती वर्ष झाले तुमच्या प्रेमाला?"

जोसेफ कॉफीचा एक घोट घेत त्याच्याजवळ सोफ्यावर रेलत बसत बोलला.

" झाले एक दीड वर्ष."

राकेशने त्याचा चेहरा त्रासिक केला.

"अरे मग चालायचच. लहान आहे अजून."

जोसेफ हसू लागला.

"काय?"

राकेश आश्चर्याने उद्गारला, " अरे कशाने लहान आहे? चांगले बीए झालंय तिचं."

" अरे मी तिच्याबद्दल नाही, तुमच्या प्रेमाबद्दल बोलतोय. लहान आहे अजून प्रेम. हट्ट तर धरणारच. मातीत लोळणाऱ्या लहान मुलाला आईने कितीही चोप देऊन सांगितलं, तिकडे जाऊ नको तरी ते ऐकतं का कधी कोणाचं? कारण हट्ट! लहान असलं की होतं असं. आमचं प्रेम तर चाळीस वर्षांचं आहे तरी अजूनही हट्ट करतं." जोसेफ कुठेतरी जुन्या आठवणीत गढून गेल्यासारखं बोलू लागला.

" गुलाबाची फुले फार आवडायची मेरीला. म्हणजे अजूनही आवडतातच. म्हणून

तर घेऊन जातो रोज तिच्यासाठी गुलाबाच्या फुलांचा ताटवा! अजूनही तशीच आहे हट्टी. नाहीतर रुसून बसते. बोलत नाही. मग मनवण्यातच बराच वेळ जातो. त्यापेक्षा आधीच हवा तेवढा वेळ देऊन मोकळा होतो मी दिवसभराच्या कामासाठी."

"तुझा विषय वेगळा आहे बाबा. तू रिटायर्ड माणूस! तू देऊ शकतो तिला हवा तेवढा वेळ. पुरवू शकतो तिचा हट्ट. तुझ्याकडे यावेळी पैसा आहे आणि वेळही. पण माझं तसं नाहीये. मी अजूनही नीट सेटल झालेलो नाही. मला काहीतरी नाव कमवायचय. असा सगळा वेळ तिला देत बसलो तर आयुष्यात हाती काय उरणार?"

" सगळा वेळ नाही रे राकेश. थोडासा. ही स्त्रीची जात आहे ना समजणं जरा कठीण असतं; पण एकदा समजली ना की आयुष्य सुंदर होऊन जातं. आणि ते वेळेत समजायला हवं. वेळ निघून गेल्यावर काय उपयोग ?"

जोसेफ त्याला समजावत होता.

"आपले विषय पूर्णपणे वेगळे आहेत. आपलं वय, आपली आयुष्य जगण्याची पद्धत भिन्न आहे." राकेश तडफडत बोलला.

"त्यातील भावना किंवा नात्याची गरज सगळ्यांची जवळजवळ सारखीच असते बेटा."

" आणि तू सतत मेरीचं कौतुक करत असतो याचा अर्थ तिच्यात तेवढ्या चांगुलपणा असेल. ती तेवढीच समजूतदार असेल. तशी माझी रेवती नाहीये."

राकेशचं चिडणं थांबत नव्हतं.

"प्रेमात तुलना नसावी इतर कुणाशी. तुला रेवती चूक वाटते आणि जगातल्या तमाम मुली तिच्यापेक्षा भिन्न आहेत हा विचार काढून टाक मनातला. कारण सुरुवातीला मी सुद्धा असंच बोलायचं मेरीला. ती दुःखी व्हायची. नाराज व्हायची;पण तेव्हा कळत नसायचं. आपलं माणूस जसं कळत जातं तसतशी वेळ हळूहळू निसटून जात असते आपल्या हातून."

रिकामा झालेला कप किचनमध्ये ठेवायला जाताना जोसेफ असंच काहीसं पुटपुटत गेला.

'माझं सोड; पण मला तुमच्या नात्याबद्दल नेहमीच एक प्रश्न पडतो. तुम्ही दोघे एकत्र का नाही राहत इथे? म्हणजे ,तुच स्वयंपाक बनवतो, तुझं घर आवरतो, माझ्यासारखा एक पेईंग गेस्ट असणारा माणूस तुझ्या सोबत राहतो. त्यापेक्षा तू तुझ्या मेरीला का नाही घेऊन येत इथे?"

राकेश त्याच्या मागोमाग जात त्याला प्रश्न विचारु लागला. तसा जोसेफ गर्रकन वळून त्याच्याकडे पाहू लागला. उदास असं काहीतरी दिसत होते राकेश ला त्याच्या डोळ्यात. "अरे वेड्या, मी सांगितलं ना हट्टी आहे ती! ती नाही येत इकडे. मला जावे लागते तिला भेटायला. आणि तेही वेळेवर! तुला पाहायचे माझ्या मेरीला? चल येतोस आज माझ्या बरोबर? भेट होईल तुझीपण."

जोसेफ उत्साहाने असं म्हणताच राकेशही तयार झाला.

" का नाही? मला आवडेल."

दोघेही निघाले. जोसेफ गाडी चालवत होता. त्याच्या शेजारी बसून राकेश जोसेफ आणि मेरी बद्दलच्या नात्याविषयी खोल विचार करत बसला होता. 'मेरी नेमकी जोसेफची पत्नी असेल का? चाळीस वर्षांचं प्रेम म्हटलं तर नक्की पत्नीच असणार; पण मग तिथे त्याच्याजवळ का नाही राहत ती? आणि त्यांना एखादं मूलबाळ नाही?' विचारांच्या तंद्रीत असतानाच एका ठिकाणी जोसेफने गाडी थांबवली.

" येथे राहते मेरी?"

राकेश ने आश्चर्याने विचारलं

"तू थांब. किती वेळ झाला पाहतो. जास्त उशीर झालेला तिला आवडत नाही." असं म्हणत जोसेफने हातातील घड्याळाकडे पाहिलं. मेरीसाठी नेहमीसारखा घेतलेला फुलांचा ताटवा हातात घेतला आणि गाडीचा दरवाजा उघडून बाहेर उतरला. रस्ता क्रॉस करु लागला. राकेश त्याच्या मागोमाग चालत होता; पण त्याला म्हणावी तशी एखादी इमारत किंवा कॉलनी असे काही दिसत नव्हते तरी तो तसाच जोसेफच्या मागे जात होता. काही अंतर पार केल्यानंतर समोर जे दृश्य पाहिलं ते पाहून त्याच्या अंगावर सरसरून काटा उभा राहीला. त्याचा त्याच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. तो आणि जोसेफ चक्क एका स्मशानात उभे होते. आणि एका समाधीवर फुलांचा ताटवा ठेवून जोसेफ गप्पा मारत होता. हा जोसेफ नावाचा म्हातारा वेडा तर नाही असं मनात बडबडत तो जोसेफजवळ गेला. "पाहिलंस? माझ्याकडे कसा हट्ट करते आणि स्वतः मात्र अशा शांत झोपा काढत असते ही मेरी. तासन्तास मला असं बोलायला लावते आणि स्वतः मात्र फक्त ऐकत असते माझ्या गप्पा. स्वतः मात्र य शब्दही बोलत नाही. हे... हे कान तरसतात रे तिचाएक मंजुळ आवाज ऐकण्यासाठी; पण तिला कुठे पाझर फुटतो? या..... या दगडात राहून दगडाच्या काळजाचा झाली ती. बदला घेतेय ना!

मी पण असाच होतो तुझ्यासारखा कधीकाळी. पैसा प्रतिष्ठा करियर! बिचारीला वेळ देता येत नसायचा. खूप खूप प्रेम करायची माझ्यावर. कधी कधी अशी तुझ्या रेवतीसारखी रुसायची,चिडायची, कधीकधी भांडायची सुद्धा खूप! पण...पण तिच्या डोळ्यात कधीच खोलवर मला पाहता आलं नाही रे. ते पाणीदार डोळे कधीही या पामराला वाचता आले नाहीत. आणि त्यामुळे तिला नेमकं काय हवंय हे मला कधी समजलंच नाही. दिवसामागून दिवस जात राहिले आणि माझी मेरी एकाकी होत चालली. अविरत बडबडणारी ती मग अधूनमधून बोलायला लागली, खोटंच हसायला लागली. पण त्या हसण्या मागील लपलेला, दबलेला विरह मला कधी ओळखताच नाही आला आणि मी मात्र जाम आनंदात होतो. यशाचे एक-एक शिखर मोठ्या दिमाखात पार करत होतो. आता ती जास्त चिडत नव्हती, रागवत नव्हती आणि हट्टही करत नव्हती पहिल्यासारखा. याचाही मला फार आनंद होता. माझी मेरी समजदार झाली होती कारण आमच्या प्रेमाचं हळूहळू वय वाढत होतं. सगळं कसं छान चाललं

होतं; पण अचानक अर्ध्यावर सोडून गेली मला!एकटं करून गेली मला एवढ्या मोठ्या जगात! नंतरही काहींनी माझ्या आयुष्यात प्रवेश करून पाहिला. कारण जोडीदाराच्या सवयीनंतर एकटं जगणं तसं अवघडच असतं; पण त्यात मला माझी मेरी कुठेच मिळणार नव्हती. तुला एक गोष्ट सांगतो राकेश, माणसाची शारीरिक गरज कुठेही भागू शकते; पण मानसिक गरज मागण्यासाठी आपलाच माणूस असावा लागतो बेटा! आपला माणूस! तो जर सोबत नसेल तर या जगात आपण कितीही मोठे असो, कितीही गर्दीत असो शेवटी आपण एकटेच असतो. आता मी त्या सगळ्या गोष्टी करतो, ज्या मेरीला आवडायच्या. पण काय उपयोग? आहे तोवरच त्याची किंमत कळायला पाहिजे. नंतर वेळ निघून गेल्यावर हाती काही लागत नाही.

जोसेफ तिच्याकडे पहात त्याच्याच तंद्रीत बोलत होता. आणि राकेशने खिशातून मोबाईल काढून एक नंबर डायल केला होता. कातर आवाजात, डबडबलेल्या डोळ्यांनी तो फोनवर बोलत होता,"उद्याचं प्लॅनिंग कर मस्त. कुठेतरी फिरायला जाऊ."

राकेशला फोनवरून येणारे हुंदके स्पष्ट ऐकू येत होते. जणू कित्येक दबलेल्या भावनांना त्या हुंदक्यांनी मोकळी वाट कटुन दिली होती.

त्याचवेळी मेरीच्या समाधीवरील फुलांच्या पाकळ्या हलक्याशा कुठल्यातरी आल्हाद वाऱ्याने चौफेर उधळल्यामुळे जोसेफच्या चेहऱ्यावर हसू फुललं होतं.

**- श्री. अश्विनी खंडागळे / पाथर्डी**
**मो.- 9689096065**

# कलाटणी



माहेराला जाताजाता फुलाफुलांनी लदबदलेली
हसतमुखाने राणी येई हाती घेई सुंदर वेली
नवमासाचे दिवस संपता चाहुल कानी आली थोडी
वैशाखाची पुनव मनाला क्षणाक्षणाला उजळत गेली

हर्ष वाटला मनामनाला धावत येई सारी नगरी
फुलाफुलांच्या बांधुन माळा दारी सेवक धावत आला
राजा दिसला केविलवाणा चिंता दिसली भवितव्याची
सिद्धार्थाचे स्वागत सुंदर रत्न लाभले संसाराला

मन रमवेना दरबारी तो कलाटणी नगराला आली
सोड पसारा मायेचा हा हाक मिळाली अवतीभवती
रुपरंगाची दुनिया येथे सत्य शोधण्या सूख त्यागले
मैत्री तरंग ओळख आता भावभावना साद घालती

बदलत जातो मानव सारा ओढ मनाची आधाराला
शिल्पकार बन तू जीवनाचा लाभे दृष्टी सिध्दार्थाला
क्षणोक्षणी तो भान हरवता शोधे उत्तर दुःख सागरा
जाते बदलत हळूहळू जग अमृतवाणी उपदेशाला

इतिहासाचा शिकविते धडा कलेकलेने चंद्र पौर्णिमा
क्रांतीज्योती बनतो प्रकाश मुक्तीचे नभ विनयात क्षमा
लेणीमधले सुंदर दर्शन मनी भावला जगी वारसा
जाणावे मन चंचल अवखळ वंदन करते बुध्द आरसा.

**- सौ. प्रज्ञा हंसराज बागुल / कसारा**
**मो.- 8080453480**

# अजून घुमे पारवा



भर माध्यान्हाची वेळ!दुपार संथपणे पुढे-पुढे सरकत असलेली. कॉलनीतील काही उंच इमारतींच्या अंगणात पडलेल्या विरळ सावल्या विषण्णपणे हसत असलेल्या. वारा उष्ण होऊन मंदपणे वाहत राहतो. एखादी वाट चुकलेली एकट चिमणी भिंतीवरच्या अनाथ खोप्याला स्वप्नघरट्याची हळवी शपथ घालत राहते आणि अशातच बाजूच्या इमारतीवरच्या अबोल छतावर पारव्याचं एक आत्ममग्न जोडपं घुमू लागतं,आपल्या तंद्रीत;एका अनाम व्याकुळ लयीत!त्यांचा गहन-गंभीर सनातन आवाज घुमत राहतो कॉलनीभर. दुपार अधीकच आळसावते विषण्णपणे!

कुठल्याशा एका सकाळी हे पारवे आलेत,वाट चुकल्याच्या आर्त दुःखानं भिरभिरलेत कॉलनीच्या तुकडाभर निरभ्र आभाळात!तसं नको होतं, त्यांना माणसांचं तकलादू सख्य.पण जगण्याच्या सुरस धडपडीत जडलाय त्यांना घरट्याचा हवासा लोभ. आणि मग एका इमारतीच्या आखीव छताच्या वळचणीला थाटलं त्यांनी आपलं सुरेख घरटं. तो सकाळच्या प्रसन्न वातावरणात घ्यायचा आभाळभरारी दूरवरच्या जंगल्याच्या दिशेनं आणि भिरभिरत्या नजरेनं शोधत राहायचा चोचीसाठी दाणा! ती हुरहुरत्या अंतःकरणानं त्याची वाट पाहत बसायची. माध्यान्हाच्या कुठल्याशा तरी वेळी तो परतायचा. ती आनंदलेली असायची. काही वेळ दोघेही घराच्या आतबाहेर हुंदडत बसायचे. भरवायचेत एकमेकांना चिमणीच्या अवीट दातानं!छतावरच्या आडोशाच्या सावलीत चालायची त्यांची आनंदी लगबग पण काही वेळेपुरतीच.कुठल्याशा अनाम दुःखाची सावळीछाया त्यांच्या डोळाभर दाटू लागते आणि पुन्हा ते आपल्या गंभीर आवाजात घुमू लागतात. आणि मग प्रत्येक दिवसाची दुपार अधिकच व्याकुळ होत जाते.

खरंतर,पारवे मुळातच खूप अबोल आणि मुलूखाचे लाजाळूही! येणार नाहीत सहजासहजी नजरेच्या टप्प्यात. कधी कुठे दिसलेच तर त्यांच्यापर्यंत जाण्याचा अवकाश की,ते उडालेच समजा आकाशाच्या अनाम दिशेनं. त्यांचा तो राखाडी रंग! भरदार छाती आणि गर्द तलम निळसर मानेचा तो विलोभनीय रंग डोळयांना वेड लावतो! शरीराचा मुलायमपणा एवढा की,नजर पुन्हा-पुन्हा भिरभिरावी. पारवा मुळातच एकांतप्रिय आणि हुरहुरत्या अंतःकरणाचा!

खेडयावरचं हळवं घर कितीतरी वर्षांपासून बंद असलेलं. सभोवारच्या काही भिंती पडलेल्या आणि एकदोन पडण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या. वाडाभर भुताटकीच्या गहन सावल्या, वेळी-अवेळी वावरत असलेल्या. कोळीष्टकांनी आपली अनोखी ओळख

घरभर दिलेली! संध्याकाळी काळोखाच्या आडोशानं परिसरातील काही दिवाभीत कवेलुंच्या वळचणीला उलटं टांगून बसलेली! एकंदरीत काय तर तथाकथीत भुतांच्या वावरानं ते घर वेळी-अवेळीच भारलेलं. खरंतर,कुठल्या पाखराला आवडलं असतं,असं वैराण घर स्वप्नंघरटं म्हणून! पण वेळी-अवेळी छतावरच्या फुटलेल्या कौलांवर मोठया आवडीनं बसून निरसपणे एकांगीत गाणाऱ्या पारव्याला पाहून अजूनही येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या काळजात चर्र होतं.

गावातच्या पुरातन महादेवाच्या मंदिरात पारव्यांची एक वस्तीच होती. मंदिर गावाच्या पूर्वेला एकांतात असलेलं. मंदिरातल्या मोठया घंटेचा आवाज भर दुपारी गावभर घुमायचा. त्यावेळी घरटयातील पारवे क्षणभर उडून हवालदिल व्हायचेत. कधीकाळी दर्शनासाठी जाणारे आताशा चुकूनही मंदिराकडे फिरकत नाहीत. कुठूनतरी आलेल्या पारव्यांच्या उनाड जोडप्यांनी मंदिर कधीचच आक्रमिलेलं. दिवसाच्या प्रहरी पारवे घुमत राहतात आपल्या

सनातन आवाजात.आणि मग अवघं मंदिर एका अनाम भयाच्या आर्वतात सापडतं पुरेपुर! संपूर्ण मंदिरभर व्यापून राहते एक अनामिक भीतीमंदिराच्या गाभाराभर घुमणारा पारव्यांचा एक संमिश्र कल्लोळ हवेच्या झोतावर गावात दूरवरपर्यंत घुमत जाणारा.

शेतावरची एक मोठी विहीर. पारव्यांचं एक सुखी जोडपं कधीचच विहीरीच्या वस्तीला असलेलं! विहीरीच्या विटांच्या मानेत होतं त्यांचं एक सुखद घरटं. पारवा आणि पारवळ वेचून घ्यायचेत आपल्या अधिर चोचीनं शिवारातील राजस पिकातून आपल्या हक्काचे मोतीयाचे दाणे! आणि भरवायचेत आपल्या पिलांना अधिर मायेनं. उभ्या रानभर घुमायचीत पारव्यांची दुःखधुंद गाणी! सारं शिवार हिंदोळायचं एका कातर लयीवर. पारव्यांची इवलाली पिलं कले-कलेनं वाढणारी' उभ्या रानाला पारव्यांची एक मत्त झिंग चढलेली. पण एक दिवस मात्र आगळंच घडलं.कुठून तरी आलेल्या एका भल्यामोठया सापानं पारव्यांची ती गोजिरी पिलं अलबत मटकावलीतआणि तेव्हापासून पारवे हरवून बसलेत जगण्याचे हिरवे संदर्भ!आताशा रात्री-बेरात्री पारवे अचानक प्राणांकित ओरडतात आणि मगसाऱ्या रानाचं काळीज एकदम बसून जातं. विहीर मात्र उभी असते कशीबशी एक मूकसाक्षीदार बनून!

दूरवरच्या एकांत टेकडीवरच्या भग्न किल्ल्यात पारव्यांनी आपले संसार मांडलेले. दशदिशांनी गोळा झालेले पारवे आपल्या विदीर्ण आवाजानं घालायचे उनाड किल्यात गतकाळाला साद!दूरदूरपर्यंत माणसांचा मागमुस नसलेला हा भग्न किल्ला मात्र पारव्यांचं हक्काचं आश्रयस्थान झालेला. संध्याकाळ दाटून आली की घुमतात पारव्यांचे भयाण घुत्कार अंधाराला चिरणारे!

एक दिवस कुठूनतरी ती दोघं आलीत त्या किल्ल्यातील भयाणतेच्या आश्रयाला! वळचणीतील खोपटात बसलेले पारवे अचंबित आणि थोडेसे साशंकीतही. पण त्या दोघांच्या चेहऱ्यावर मात्र प्रीतीच्या अनोख्या रंगाचा मदमस्त कैफ चढलेला! पारव्यांच्या

जगण्याला मानलाय त्यांनीही जीवनाचा आधार. सकाळ झाली की तोही पडायचा किल्ल्याच्या बाहेर रानावनातील कंदमुळं गोळा करण्यासाठी. आणि परतायचा पारव्यांसोबतच पाखरपरतीला! ती आपल्या देखण्या डोळयांची निरंजनं लावायची त्याच्या दूरस्थ वाटेवर. तो परतला की,फुलून यायची. पण एक दिवस तो परतलाच नाही..आणि मग तिनं मांडला काळोखआकांत,आपलं विदीर्ण काळीज सोबतीला घेऊन! पारवे हळहळलेत..व्याकुळलेत!भिरभिरत राहिलेत तिच्या निचेष्ट देहाभोवती!

नदीकाठच्या नागमोडी वाटेवर पारव्यांचा एक थवा उडून आलेला. वाटेच्या दुर्तफा असलेल्या सोनेरी गवतांच्या तुऱ्यातील देखणं बी पारवे मोठया आवडीनं टिपत राहतात. त्यांची मान हलत राहते एका संथ डौलदार लयीत! पारवे टिपून घेतात गवताचं इवलालं बी मोठ्या तन्मयतेनं. दरम्यान त्यांचे डोळेही मोठे सजग असलेले. जराही कुठे खट् की थव्यानं आभाळकल्लोळ केलेला! नदीच्या निर्मळ पात्रात तृप्ततेचं पाणी पिणारे पारवे दिसणं हा एक दुर्लभ व विलोभनीय योग! पारवे मोठया अदबीनं पिऊन येतात अमृतथेंब आणि मग क्षणभर विसावतात काठावरच्या मायाळू बाभळी! कधीकधी हळव्या फांदीच्या सोबतीनं पारवे छोडतात एकांतगीत,नदीकाठ भारावलेला! आणि मग सांजावत आलं की,पारवे घेतात हळव्या नदीकाठाचा निरोप दाटू पाहणाऱ्या काळोखाच्या सोबतीनं!

अंगणात वाळवत टाकलेल्या ज्वारीवर दोन-चार पारवे अलबत येऊन बसतात आणि मोठया सावधपणानं टिपून घेतात काही दाणे अंगणात कुणीही नसतांना. त्यांची पारखी सजग नजर शोधत राहते माणसांचा पायरव. जर आलंच कुणी अंगणात तर उडून बसतात छतावर काही क्षणांसाठी! पाखरांच्या अनाम मायेपोटी मूठभर दाणे अंगणात टाकणारी माणसं आताशा दुर्मिळ झाल्याचं कदाचित पारव्यांनाही कळत असावं आणि आता-आतातर अंगणांनीही घेतलाय सुबक घरांसमोरून काढता पाय आणि म्हणूनच आता कुठल्याशा इवल्या अंगणात वा गच्चीवरच्या वाळवणावर उतरण्याआधी पारवे घेतात सजग कानोसा माणसांच्या अर्तक्य मनाचा!

पारव्याचं घुमणं एक कातर हुरहुर हृदयाच्या काठाकाठानं उठत जाणारी! आणि कदाचित मनातल्या कोपऱ्यात साकळलेलं एक अव्यक्त दुःखही!खरंतर,पारव्याचं घुमणं म्हणजे त्याचा एक नित्यक्रम जगण्याच्या धडपडीतला. पण माणसानं जोडलंय त्याच्या घुमण्याशी काळजातल्या अनाम दुःखाचं सख्य..म्हणूनच एखादया संथ शांतशा निर्मळ दुपारी कुठूनतरी ऐकू येणाऱ्या पारव्याचं घुमणं ऐकायला काय हरकत आहे?

**- रवींद्र जवादे / मूर्तिजापूर**
**मो.- ९४२०७०८०२६**

# * ओवी *



असे बहीण भावंडं
फुल गुलाबाचे दिसं
अशी शोभा देती बाई
झेंडूमधी गुलबस

बाई बहीण भावंडं
जाई मोगऱ्याचा येल
अशी शोभा देती बाई
झेंडूमधी मखमल

बाई बहीण भावंडं
एका ग चालणीचे
सईला सई  बोलं,
बाळ कोण्या मालणीचे

बाई बहीण भावंडं
दोघाचे ग एक गाव
बोलतो ग बंधुराया
जीव मेहुण्याला लाव

अशी भावाची बहीण
झाला आनंद मनाला
बाई दिवाळी सणाला
आला बंधू ग न्यायाला

बंधू आला ग पाहुणा,
जेवण करते पुरणपोळी
अशी भावजय भोळी
देते खिशामधी चोळी

**- सौ. दयाबाई खंडागळे / चिंचपूर ईजदे**
**मो.- 9850352578**

# स्नेहबंधाचे रंगीत धागे...



स्नेहबंध...सृष्टीतील सर्व चेतनांना जागविणारा बंध! मानवी चेतना जागृत ठेवणारी संरचना!स्नेहबंधाचे रंगीत धागे मानवी जीवन व्यापून टाकते.या स्नेहबंधात अनेक स्नेही बांधलेले असतात...न सुटण्यासाठी...!

एखाद्या निवांत क्षणात...मनाला उसंत मिळाली की... हे स्नेहबंध दाटून येतात...मग आठवणी गर्दी करू लागतात. अशावेळी जगातील सर्वात श्रीमंत माणूस आपणच असतो.स्वतः चा अभिमान वाटतो.

स्नेहबंधाचे धाग्यात अजूनही काही लोक यायचे आहेत...या स्नेहबंधात शालेय जीवन...तेथील निगर्वी मित्र...काही जवळच्या बालमैत्रिणी...अजुनही आजच घडल्यासारखे...गुजगोष्टी करतात...तेव्हा मन भूतकाळात गटागंळया खाते.या सर्व अनमोल गोष्टी जीवनात सगळ्यांनाच लाभत नाही.लाभल्या तरी त्यांचे उत्सव साजरे होतीलच...हे सांगता येत नाही.हे उत्सव आपल्याला वारंवार मनाच्या जाणिवेतून... नेणिवेतून...साजरे करता आले पाहिजे. त्यासाठी कुठल्याच अनैसर्गिक दिवसाची गरज पडता कामा नये.संध्याकाळी तरल वेळेला हे स्नेहबंधाचे रंगीत धागे अजूनच गडद होत जातात...सरत्या रात्रीप्रमाणे...अशावेळी "सखी" तुझी प्रखर आठवण येते... हमखास येते...

तुझे सजणे-सवरणे
तुझे अल्लड वागणे
पुढे बघता बघता
मागे वळून पाहणे.

वरील चारोळी तुला बघता -बघता मला सुचलेली...आपण दोघांनी हृदयात कोरून ठेवलेली...नेहमीसाठी...एखाद्या अलवार क्षणाला हृदयात झाकून बघ...ही चारोळी तुला विराजमान झालेली दिसेल...!

स्नेहबंध...खरं तर मित्रांशिवाय पुर्णच होऊ शकत नाही.स्नेह...स्नेही...सोबत-सोबतच चालणारे शब्द आहे.स्नेहबंध आपोआप जुळल्या जाते.ही प्रक्रिया नैसर्गीकपणे होत असते.या प्रक्रियेत अनैसर्गिकपणा चालतच नाही.जेथे स्वभाव...मन...छंद... सवयी...जुळतात तेथेच हे बंध आपुलकीने जमतात.मग ते मनापासून कीतीही दूर असोत...ते अगदी हृदयाच्या प्रदेशात वास्तव्य करतात.स्नेहबंधाचे रंगीत धागे... यामुळेच हे उदास जीवन ...सुरेख, ताजेतवाने वाटते.जीवनात वेदना,दुःख,दारिद्र्य, भयाणपणा, विषमता आहे...पण या सगळ्या गोष्टी सुखदायक होतात...केवळ

स्नेहबंधाने...!

स्नेहाचा बंध जीवनात खूपच आवश्यक आहे.स्नेहबंधामुळे आपले मन समृद्ध होते. या स्नेहबंधाचे धागे कच्चे नसतात;ते पक्क्या विश्वासांनी अंतरंगातून जुळलेले असतात. स्नेहबंधाचा हा रंगीत पिसारा आपले जगणे समृद्ध करतो...यालाच तर खरे जीवन म्हणतात.

प्रतिबंध असल्याशिवाय स्नेहबंध उत्पन्न होत नाही.स्नेहबंध असल्याशिवाय प्रतिबंध निर्माण होत नाही.दोघेही जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू. प्रीत,स्नेह, आपुलकी या भावनेतून स्नेहबंधाचा जन्म होतो.जेथे ही स्नेहभावना असत नाही तेथे आपुलकी जन्म घेत नाही.जीवन जगतांना हा स्नेहबंधाचा पसारा आणी पिसारा नेहमी फुलवित ठेवला पाहिजे.

हे खरे जगणे प्रत्येकालाच जगते असे नाही.त्यामुळे आपण संवेदनशील असे जगण्याचे क्षण ह्रदयात साठवून ठेवले पाहिजे. पुन्हा पुन्हा त्या क्षणांना भूतकाळात जाऊन त्यांचेबरोबर मनासारखे जगून घेता येईल. नातेसंबंधात स्नेहबंधाचे सूर जुळतीलच हे सांगता येत नाही.एखाद्या अनोळखी व्यक्तीबरोबर हे स्नेहबंधाचे धागे जुळले जातात...मग हे स्नेहबंधाचे धागे काळीजबंधात केव्हा रुतून बसतात....ते आपल्यालाही कळत नाही.

स्नेहबंधाचे हे रंगीत धागे कलावंताच्या कलाकृतीसोबतही जुळलेले असतात. असेच स्नेहबंध सुप्रसिद्ध गझलगायक जगजितसिंगच्या गझलेसोबत जुळलेले आहे. गुलज़ार,निदा फाजली, इ.गझलकार यांचेशी नकळतच जुळलेले आहे.या गझला... त्यातील शैली...जीवन जगण्याचे धैर्य देतात...हे जीवन भरभरून जगण्याची आशा पल्लवित करतात.

स्नेहबंधाचे रंगीत धागे..कवितेमुळे जुळलेले जाऊ शकते...कुंचला,ब्रश...यामुळे स्नेहबंधात अडकले जाऊ शकतात...कुणी ललितलेखाच्या प्रेमात पडतात...कुणी कादंबरीच्या प्रेमात पडतात...कुणी रंगाच्या वेगवेगळ्या छटाच्या प्रेमात पडतात... कुणी चित्रपटाच्या प्रेमाचे वारसदार होतात...ते केवळ आणी केवळ स्नेहबंधामुळेच...!

एखाद्या तथागताला हे स्नेहबंध मानवी कल्याणात दिसते...!संपूर्ण आयुष्य पणाला लावून हे स्नेहबंधाचे धागे स्विकारतात...पुढील पिढीला सुपूर्द करतात.एखाद्या सम्राटाला हे स्नेहबंधाचे धागे तथागताच्या मानवी कल्याण याकडे नेऊन...पुढील मानवी कल्याण करण्यासाठी प्रतिबध्द करतात.

**– प्रशांत नामदेवराव ढोले / सावंगी**
**मो.– 9923308638**

# ॥ बरे तुझे ॥



सांग सांग रे विठोबा
काय करतो एकटा ,
तुझ्या दिशेनं येणाऱ्या
ओस पडल्या रे वाटा ।

तुझ्या अवती भवती
नित्य भक्तांचीच गर्दी ,
चंद्रभागेकाठी लाखो
कुणा झाली नाही सर्दी ।

बंद कुलूपात तुला
आज वाटते रे कसं ,
कसा काय जातो सांग
आता भक्ताविणा दिस ।

गेलं वर्ष कसं तरी
होती म्हणे महामारी
यंदा सुद्धा तेच झालं
आता स्वप्नातचं वारी ।

तुझ्यासाठी मनी भाव
सर्वांचा आहे डिअर ,
तुझ्यावर बंदी अन्
विका म्हणती बिअर ।

तुझ्यामुळे त्यांचा नाही
इथे भरत रे गल्ला ,
अर्थ व्यवस्थेत त्यांना
आहे गाठायचा पल्ला ।

सत्तेसाठी चढाओढ
अन् बाकी आहे काय ,
बरे तुझे विटेवरी
तुझ्या पंढरीत पाय ।

**- गणेश भाकरे / सावनेर**
**मो.- ९९२३८२९७१७**

# सच्चे सेवक !



पांढरे शुभ्र धोतर, गुडघ्यापर्यंत पांढरा शुभ्र शर्ट, त्यावर नीळचा प्रमाणशीर मारा, डोक्यावर पांढरी शुभ्र टोपी वर पुन्हा कडक इस्त्री! तोंडात तबाखु सुपारीचा बकणा. पाहता क्षणी कुणी ही या व्यक्तीला राजकारणी समजेल. परंतू टोपीखालील भव्य कपाळावर तसाच दांडगा गंधाचा उभा टिळा पाहून कुणी वारकरी म्हणेन कारण गळ्यात माळाही असत. परंतू ते आमचे सिंगारे गुरूजी! दचकलात? अशा राजकारणी थाटाच्या वर्णनाच्या माणसाला मी शिक्षक म्हटल म्हणून! ही वल्ली नुसती शिक्षक नव्हती. तर ते शिक्षकांच्या शिक्षकांचे शिक्षक अध्यापक महाविद्यालातील शिक्षक (प्राध्यापक) होते. या कलीयुगात काहीही शक्य आहे. जवळ विद्धत्ता, इच्छाशक्ती असली म्हणजे मानव कुठेही पोहचतो. पदवी, मान सन्मान अशा विद्वानापुढे नतमस्कत होतात. अध्यापक महाविद्यालयांचे प्राध्यापक म्हटल्यांनतर त्यांचा थाट तो काय वर्णावा! परंतु सिंगारे गुरूजींची राहणीच अगदी साधी थेट गांधी समाजजीवनाशी नातं सांगणारी. स्वातंत्र्य पूर्व काळात केलेल्या कामगिरीचा सिंगारेना फार अभिमान! योगायोगाने त्यांचा विषयही इतिहास! आठवडा-पंधरवाड्यातून सिंगारे एकदा वर्गात शिरले, की इतर प्राध्यापकाना आरामच. कारण चुकून वर्गात शिरले आणि रिकाम्या टेबलावर मांडा ठोकून बसले, की विद्यार्थ्यांना स्वराज्यकालीन वीरांची आठवण येई. वेळ आणि तास व वर्ग यांच्याशी सिंगारेंना काही सोयरसुतक नसायचे. अगोदर ते स्टाफरूम मधून उठतच नसत. उठले तेव्हा जो वर्ग रिकामा दिसे त्या वर्गावर ते शिरत. कॉलेजच्या वेळापत्रकाने शिंगारेंना कधीच अडवल नाही. वेळा पत्रकाप्रमाणे चालतो तो प्राध्यापक आणि वेळापत्रकाचा विचार न करता काम करतो तो शिक्षक. हे ब्रीद वाक्य अर्थात आमच्या सिंगारेसरांचे!

टेबलावर मांडा ठोकून, डोक्यावरची टोपी काढताच त्याखालचे भव्य रणांगण विद्यार्थ्यांना दिसताच त्यानी ओळखावं... आता स्वातंत्र्य लढ्याचा... इतिहासाचा तास! ज्या प्रमाणे त्यांना वेळापत्रकाचं बंधन नव्हतं. तद्धत त्यांना अभ्यासक्रमाचंही बंधन नव्हतं. इतिहास शिकवायचा ना, मग ठरलेलाच कशाला? पुस्तकातले मेलेले मुडदे उखडण्यापेक्षा स्वतः केलेली लढाई, पराक्रम ऐकवला तर त्यास स्वानुभवाची जोड असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गळी तो लवकर आणि जास्त उतरेल. अशा धारणेने जेव्हा ते त्यांच्या पराक्रमाची गाथा ऐकवायला सुरुवात करत. त्यावेळी ते अत्यंत आवेशात बोलत. समोरच्या विद्यार्थ्यांना ते शत्रू समजून शब्दरूपी हत्यारे चालवताना त्यांच्या तोंडातून उडणाऱ्या फवाऱ्याने अनेक विद्यार्थिनींच्या मेकअपमध्ये भर पडे. कुणी

त्यांना त्या फवाऱ्यांबद्दल डिवचल तर त्याच त्वेषात ते उत्तर देत,

"पहा देशाचे आधारस्तंभ घडविणारे तुम्ही! अरे, तुम्ही साधा फवारा सहन करु शकत नाहीत? पहा.. थोड आमच्याकडे पहा. आम्ही त्यावेळी शत्रूच्या काठया झेलल्या, गोळ्या अंगावर घेतल्या, फेकलेल्या नळकाड्यांच्या धुरातही जिवंत राहिलो. म्हणून तुम्हाला हा इतिहास ऐकायला मिळतोय आणि तुम्हाला एक फवारा..." एवढं सारं भलं मोठं वाक्य जोडण्यासाठी आम्हाला त्यांचे पाच लागत कारण बोलताना तोंडातल्या सामग्रीमुळे ते काय बोलले ते फार थोड्यांना समजायचे. त्यांच्या चेहऱ्याकडे, विशेषतः तोंडाकडे पाहत कुणी तरी विचारायचं,

"सर, तुमचे दात?"

"दात ना ? ते पडले स्वातंत्र्य लढयात. दाँत गये लेकीन जान बची!"

सिंगारे वर्गाकडे येत आहेत, म्हटल की पुढच्या बाकावरचे विद्यार्थी मागच्या बाकाकडे धाव घेत. त्यांच्यासमोर बसून त्यांच्या पिचकाऱ्या अंगावर घेण्यापेक्षा होळीचा रंग अंगावर घेणे परवडले असा आमचा प्रामाणिक समज! सर, वर्गात येईपर्यंत आम्ही आपापल्या जागा घेऊन मावळ्याप्रमाणे सज्ज! सिंगारेसर वर्गाजवळ येत हे त्यांच्या बुटावरून समजायचं. बुटाचा आवाज जसजस वर्गाजवळ येई तसतसे आम्ही चिडीचूप. येतांना त्याच्या तोंडातून, 'शिव.. शिव... राम...' हा धावा सदोदित चालू असायचा.

वर्गात आल्यानंतर एक नजर टाकून ते म्हणत, "वा! वा! सारे उपस्थित? तास कोणताही असो, वर्गात विद्यार्थी असले म्हणजे शिकवावं वाटतं, देवच देवळात नसला तर कुणी देवळात जाईल का? त्या देवळात करमेल का?" अशा स्वतः केलेल्या विनोदावर त्यांच ते सात मजली हास्य म्हणजे विद्यार्थी वर्गाला सजाच कारण त्यांच्या हसण्यातून बाहेर पडलेली सारी तंबाखू थेट शेवटच्या विद्यार्थ्यापर्यंत! एखादी इमारत कोसळताना जसं विटा, माती आजूबाजूचे क्षेत्र व्यापते आणि अनेकांना घायाळ करते. त्या प्रमाणे ती तंबाखू वर्गाच्या कोपऱ्यात न् कोपऱ्यात जाऊन विद्यार्थ्यांना आपलसं करी. तशा प्रकाराने विद्यार्थ्यांना अवधान आपल्याकडे आहे. ते पाहताच ते म्हणत,

"अरे, भ्याड्यांनो, असे पळता, कोपऱ्यात का बसता? हिंमत असेल तर पुढे बसून इतिहास शिका. मी ज्या भागात जात असे, त्या भागातल्या शत्रूच्या तलवारी म्यान होत. त्यांच्या बदुकी मला सॅल्युट मारत.."एखाद्या योद्याच्या आवेशात बोलताना स्वातंत्र्य युध्दातला एखादा प्रसंग वर्णन करून सांगत, त्यापुढे इतिहासकाराने काय लिहावे? एकदा कॉलेजला येताना सिंगारे सर्वांच्या मागे लागलेला कुत्रा अनेकांनी पाहिला. काही विद्यार्थी मौन राहिले परंतु सरांची खिल्ली उडवावी म्हणून काही व्रात्य विद्यार्थी म्हणाले,

"सर, तुम्ही एवढे मोठे योध्दे शत्रुना पळविणारे परंतु एका कुत्र्याने तुम्हाला पळविले. तुमचं सामर्थ्य ते हेच का?"

"अरे, माझं सामर्थ्य का कुत्र्यासाठी आहे? ते शत्रुसाठी आहे. अरे, सामर्थ्य

वापरायलाही समोरच्याची पात्रता लक्षात घ्यावी लागते. ती पात्रता तुमच्यातही नाही." निवृत्तीकडे झुकलेल्या, वय वर्षे अठ्ठावन्न गाठत असलेल्या प्रा. सिंगारेंना कुणी विचारलं,

"सर, तुमची निवृत्ती, पेंशन?"

"अरे, वयाचं, निवृत्तीचं सोड. मानवाच्या जीवनातले ते एक स्टेशन! अठ्ठावन्न वर्षे हा आकडा धरुन जो प्रवास करतो तो खरा प्रवासी, खरा कर्मचारी होऊच शकत नाही. शिक्षकाला तस वयच नसतं. समोर मुलं दिसली, की त्याने शिकवायला सुरु करावी. जणु का तो त्याच्या नोकरीचा पहिला दिवस आहे. खरा शिक्षक कधी थकत नाही. विद्यार्थी समोर येताच त्याच्या वृत्ती उल्हासीत होतात. वय, काळाचं भान विसरुन तो विद्यार्थ्यांमध्ये तल्लीन होतो, समरस होतो. अशानेच स्वतःला शिक्षक म्हणून घ्यावं. नाही तर पहा टोलांकडे, तासांकडे, एक तारखेकडे आणि परिक्षांकडे असा हा खरा शिक्षक होऊ शकत नाही. शिक्षक हा समाजसेवक असावा."

स्टाफरुममध्ये सिंगारे असले म्हणजे स्टाफरुममध्ये हास्याचा लाव्हा नुसता खदखदायचा. एरव्ही स्टाफरुम आणि तेही प्राध्यापकांची म्हटली, की चित्र वेगळे असते. कुणी नाकावरचा चष्मा सावरत पुस्तक शोधण्यात दंग, कुणी पुस्तक वाचताना आवश्यक त्या नोंदी हातातल्या कागदावर उतरवण्यात दंग, कुणी पेपर्स, प्रॅक्टिकल च्या वह्या शोधण्यात दंग, नि मग्न! कुणाला कुणाशी बोलायची फुरसत नाही. कुणी नवागताने अभिवादन केलं तर उत्तर देण्याच्या पध्दतीही ठरलेल्याच. कुणी हातातल पेन वर करेल, कुणी डोळ्यावरचा चष्मा नाकावर घसरवेल, कुणी मान झुकवेल तर कुणी नजर हातातल्या पुस्तकावर ठेवून अंगठा दाखवेल. सिंगारे स्टाफ रुममध्ये असले तरी त्यांच्या अपन असा पुस्तकाचा, नोंदीचा फापटपसारा नसायचा. कुणी विचारलं,

"सर, आराम दिसतो, काही नोंदी वगैरे?"

"कशाच्या नोंदी ? प्राध्यापक म्हणजे संगणक असावा. ज्या विषयात त्याने पदवी आणि शिक्षणाची पदवी प्राप्त केलेय त्या विषयावर त्याची मास्टरी असावी. चोवीस तास प्रवासानंतर प्राध्यापकाला वर्गात जाव लागल आणि त्याच्या विषयाच पुस्तक हातात पडून ते उघडल्याबरोबर जो टॉपीक पुढे येईल तो तात्काळ शिकविणारा खरा प्राध्यापक! नाही तर स्टाफरुममध्ये बसून नोंदी काढायच्या, घरी नोंदी काढायच्या... अहो, वर्गाच्या बाहेर पडलं की विसरा सारे. स्टाफरुममध्ये वेगळच चिंतन सुरु असावं, इतरांच्या सुखा दुःखात सामील व्हावं, इतराना सामील करावं. विचारांची देवाण-घेवाण व्हावी. पण हल्ली हे नोटस्च भलतच प्रस्थ माजलय. एकच एक विषय आपण वर्षानुवर्षे शिकवतो ना? मग त्यांचं वारंवार वाचन, नोंदी हव्यातच कशाला?" अशा प्रश्नांना हास्यांची कड लागली म्हणजे समोरचे गर्भगळीत होणे जात असत...

कॉलेजचे डीनपद नाकारलेल्या या वल्लीला कुणी नोकरी, वेळेचं, अभ्यासक्रमाचे बंधन घालायचं धाडस करीत नसे. अगदी महाविद्यालयाचे डीन सुध्दा! कारण शब्दांची फिरवा फिरवी करुन त्यांचे शब्दात त्यांच्यावर उलटवण्यात सिंगारेचा हातखंडा. त्यामुळे

कुणी बोलून अवलक्षण करीत नसे. पुन्हा समोर सिंगारे असले म्हणजे समोरच्याने ऐकणे आणि ऐकतच राहणे, मध्येमध्ये बोलणे न लगे! अशा वल्लीला स्टाफरुममध्ये कुणी तरी विचारलं,

"सर, तुमची स्वातंत्र्यसैनिक. मग तुम्हाला केंद्र सरकार राज्य सरकारची पेंशन..."

"अरे, इथं पेंशन हवीच कुणाला? चार पैसे मिळावे म्हणून का आम्ही जीव धोक्यात घातला? ते चार रूपये स्वीकारणे म्हणजे त्या काळी केलेल्या महान कार्याला स्वार्थाने गालबोट लावल्याप्रमाणे! अरे, आम्ही सच्चे सेवक होतो, भाडोत्री नव्हतो. ते चार पैसे घेण्यापेक्षा स्वातंत्र्यसैनिक ही अक्षरे प्रिय वाटतात. पाच वर्षांपूर्वी मला पत्र आलं होत, तुमची माहिती पाठवा. मी उत्तर दिलं, माझी माहिती पाठवून मी त्याचा बाजार मांडणार नाही. बाजार नाही तर काय हो? अहो, कुणी काय काम केलं त्याची सारी नोंद दप्तराला आहे. ती काढावी ना? परंतु आजकाल भारी कामकंटाळा. आज पाठवलेली माहिती उद्या विचारली तरी पुन्हा कागदांची जमवाजमव करतील. हा कारकुनी अभिशाप! मी नाही माहिती पाठवली. वर्षापुर्वी पुन्हा पत्र आलं. तुमची स्वातंत्र्यसैनिक म्हणून निवड झालेय. तुम्हाला सारे शासकीय लाभ... आता हसावं की रडावं? स्वातंत्र्यसैनिक म्हणून मान्यता देणारे हे शहाणे कोण? आम्ही त्यावेळी कुणाच्या आदेशाची वाट पाहिली नाही. धरती मातेला आमची गरज आहे हे लक्षात येताच आम्ही उडी मारली. शिव.. शिव.. किती हा अपमान? सच्चा सैनिकाचा!"

सरांचा ज्या दिवशी मूड नसेल त्या दिवशी वल्ली एक तर घरीच रहायची किंवा स्टाफरूममध्ये चक्क टेबलावर पाय टाकून ताणून द्यायची. अशा वेळी वर्गावर जायच काम पडलं तरी सिगारेंची समाधी कुणीही भंग करत नव्हते.

संसार, सुख -दुःखे कुणाला चुकली आहेत? ती सिगारेंनाही होती. परंतु त्यानी कधी बाहेर काढली नाही. त्याचं भांडवल केलं नाही, फारच कुणी विचारल तर म्हणत,

"अहो, काय सांगू? एक पोरग आणि एक पोरगी आहे..."

"अहो, मग तुम्हाला कमी काय आहे?"

"कमी नाही हो. पण ही आजकालची पोरे कुणाच ऐकतील तर..."

"काय झाल सर ?"

"व्हायचे काय? आमच्या चिरंजीवाला नोकरीत इंटरेस्ट नाही. व्यापार करायचाय."

"अहो, मग बिघडलं काय?"

"हेच ते! अहो, काय आहे त्या व्यापारात? नोकरीत म्हणे पगारासाठी हात पसरावा लागतो. व्यापारात तरी काय अनेकांपुढे हात पसरावाच लागतो की तो ही क्षणाक्षणाला! मग नोकरी काय वाईट आहे?"

एखाद्या दिवशी सिंगारे म्हणत, "आजकाल लग्नाचेही फार बिघडल बाबा."

"काय झालं हो?"

"अहो, काय सांगावं? पोराचा बाप झाला म्हणजे काय त्यांना ब्रम्हदेव झालं अस

वाटत की काय? काय थाट त्यांचा? काय मानपान त्यांचे? प्रत्यक्ष पंतप्रधानांची कुणी करणार नाही अशी सरबराईस करुन आठ दिवस खेटे घातल्यानंतर त्याच उतवतर ठरलेलं. काय तर म्हणे, योग नाही! आता काय डोकं फोडाव?”

तशातच बी.एड. चा एक वर्षाचा कालावधी केव्हा संपला ते समजलंच नाही. वर्ष जरी संपलं तरी सिंगारेसर मात्र मनात कायम घर करून राहिले. आम्ही त्यांचा निरोप घ्यायला त्यांच्याकडे गेलो तेव्हा ते म्हणाले,

“अरे, वर्ष संपत आलं? स्वातंत्र्य संग्रामही असाच संपला. नुकतीच कुठे स्वातंत्र्याची लढाई पूर्ण जोशात असताना अचानक गोऱ्यांनी तोंड काळ केलं. तसेच हे वर्षही संपले. अरे, परंतु आणखी इतिहासाची सुरुवात करायची राहूनच गेली रे. ठीक आहे. इतिहासाचा अभ्यास घरी करा. तुम्हीही शिक्षकच होणार ना! पुस्तकातला अभ्यासक्रम तुम्हाला काय शिकवावा! त्यावर तुम्ही एक नजर टाकली तरी खूप आहे जा. यशस्वी व्हा! खूप खूप नाव कमवा! हे क्षेत्रच असं आहे, त्यात तुम्हाला खूप काही करता येईल...”

अभ्यासक्रम राहूनच गेला. त्याला हात लागता नाही अशी स्वच्छ कबुली द्यायचं धैर्य फक्त सिंगारेंजवळ होते...

**– नागेश सू. शेवाळकर / थेरगाव**
**मो.– ९४२३१३९०७१**

# याला जीवन असे नाव



आठवणीत रमत ते असते मन
सुंदर दिसण्यासाठी धडपडते ते तण

श्वासात श्वास घेऊन जगते ते हृदय
त्यात प्रेम भरून जगतात ते सहृदय

नावलौकिक मिळाला की मागे येते कीर्ती
माणसाची महान असते ती मूर्ती

यशाची शिखरे चढण्यासाठी करावा तो संघर्ष
यश मिळवण्यासाठी करावा तो परामर्श

जीवनाच्या वाटेवर करावा लागतो प्रवास
व्यक्तिमत्व विकासाचा दरवळतो सुवास

फुकट मिळतो तो असतो सल्ला
वादातून निर्माण होतो जीवनात कल्ला

जगण्याचं बळ देते ती प्रेरणा
एखादया व्यक्तीविषयी बनते ती धारणा

जगण्यातील गरजा पूर्ण करतो तो रुपया
जगण्याची गोडी वाढवतो तो शब्द कृपया

- प्रा. वर्षा कावरे / मूर्तिजापूर
मो.- 9021673178

# सर्वश्रेष्ठ धन : विचारधन



कोणत्याही माणसाच्या आयुष्याची जडणघडण ही त्याच्या विचारावर होत असते .केवळ सुंदर वस्त्रे परिधान केल्याने किंवा लंब्याचवड्या बाता मारल्याने त्यांची छाप इतरांवर पडत नाही कारण माणसाचे व्यक्तिमत्व त्याच्या विचारातून विकास पावते. माणसांच्या मनात उत्तुंग आकांक्षा व ध्येय यांचे बीजारोपण त्यांचे विचारच करत असतात . विचारतून त्याला कार्याची प्रेरणा मिळते व विचारांच्या पाठिंब्यानेच तो मोठी कार्य करू शकतो.आपण जेव्हा अगदी मनापासून एखादी गोष्ट मिळण्याची इच्छा करतो त्यावेळी ती वस्तू निश्चित आपणास मिळते. तुम्ही ज्या गोष्टींचे ध्यान कराल त्या गोष्टीसी तुमचा संबंध नक्कीच जोडला जाईल. तुमच्या मनात जे विचार येतील त्यानुसारच तुमचे बोलणे घडेल व त्यातूनच तुम्ही मोठी कार्य करू लागाल आणि एक दिवस तुम्ही तुमचे ध्येय पूर्णत्वास न्याल.

या जगात तुम्हाला काही कार्य करावयाचे असेल आणि त्या कार्यात यश मिळवायचे असेल तर तुमचे तन, मन त्या कार्याकडे लावले पाहिजे. तुम्ही तुमचे ध्येय नक्की ठरवले पाहिजे. विचारपूर्वक योजलेले कार्य एकाग्रतेने माणसाला त्यात यश मिळाल्याशिवाय राहत नाही.

तुम्हाला आयुष्यभर आरोग्य व तारुण्य हवे आहे काय ? खरोखरच आपण तरुण व व्याधीरहित जीवन शेवटपर्यंत जगू शकता . त्यासाठी तुमचे विचार सतत सुंदर व पवित्र असले पाहिजे. ज्याच्या मनात पवित्र व सुंदर विचार असतात त्या सुंदर विचारांचे प्रतीबिंब, तेज त्याच्या चेहऱ्यावर दिसते, जो आपले आयुष्य नीती व सदाचाराने कंठतो तो कधीच म्हातारा होत नाही.चांगल्या विचारांनी माणसाचे नैतिक सामर्थ्य सतत वाढत राहते. तुमच्या समोर उच्च व आदर्श हवा ज्या माणसासमोर उच्च आदर्श असतो, त्यांचे आयुष्य सुखकर व सरळ बनते या जगात आल्यासारखे प्रत्येक माणसाने कोणते ना कोणते तरी समाज उपयोगी कार्य करणे गरजेचे आहे

त्यामुळे हे सर्व जग सुंदर दिसू लागते . ध्येयवादी माणूस आपले लहान-सहान कामही अतिशय कौशल्याने ,आनंदाने व सहजतेने करू शकतो व कोणतेही काम अर्धवट किंवा अपुरे टाकत नाही. माणसाच्या समोर कोणतातरी आदर्श ठेवल्याने मनोबल वाढते व त्यातूनच त्याच्या मनातील इच्छा पूर्ण होतात. जीवनात महान माणसांचा आदर्श ठेवल्याने व त्यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न केल्याने जीवन यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही .तुम्ही सतत आशावादी असले पाहिजे , आशावादी विचारातच फार मोठे सामर्थ्य असते, तुम्ही नेहमी माझे शुभ होणार, कल्याण होणार

असाच विचार मनात आना,शुभ विचारांचे फळ नेहमीच शुभ असते . शुभ विचारातून, सकारात्मक विचारातूनच तुमची प्रगती होईल आशावादी विचारांमुळेच तुमचे सामर्थ्य वाढेल. हळूहळू आशावादी विचार बाळगण्याची तुम्हाला सवय होऊन जाईल. प्रगतीच्या मार्गावर तुमची पाऊले पुढेच पडेल, तुमच्या मनातील सर्व इच्छा पूर्ण होतील . तुम्हाला मानव म्हणून जन्माला घालण्यात परमेश्वराचा काही हेतू असला पाहिजे तुम्ही माणसांच्या कल्याणाचे थोडेसे जरी कार्य केले तरीही परमेश्वराने तुम्हाला या जगात पाठवल्याचे सार्थक होई.ल परमेश्वराने सोपवलेली कामगिरी तुम्ही उत्तम रीतीने पार पाडावी अशीच त्या परमेश्वराची इच्छा आहे .या जगाच्या सुखात तुम्ही थोडीशी भर घालावी त्यासाठीच आपले जीवन आहे. तुम्ही तुमच्या मनात नेहमी चांगल्या विचारांना प्रवेश द्या हे उच्च विचार तुमचे हित करतील. मनात शंका व संदेह यांना जागा देऊ नका, त्यांना मनात प्रवेश दिल्यास तुमच्या प्रगतीत अडथळा येईल .

रचनात्मक नियम असा सांगतो की कुठलीही वस्तू निर्माण होण्याआधी प्रथम ती वैचारिक स्वरूपात निर्माण होते. आजवर आपण जे जे काही पाहत आला आहात त्याची निर्मिती प्रथम विचारांमध्ये झाली आणि मगच ते वास्तवात साकार झाले . जे विचार आपल्या मनात येतात त्यांना आधी भावनेचं बळ मिळतं आणि मग त्याचा परिणाम दिसतो. आपल्या मनात प्रकट होणारे विचार म्हणजे दुसरं तिसरं काही नसून वास्तविक तुमचेच आदेश आहेत .या आदेशानुसारच तुमच्या आयुष्यात घटना घडत असतात म्हणून प्रत्येक समस्येचे निराकरण व ती गोष्ट बदलण्याची शक्ती ही केवळ आपल्या अंतरंगात असणाऱ्या विचारांवर अवलंबून असते

उत्साही मनुष्य हा नेहमी इतरांपेक्षा इतरांपेक्षा अधिक कार्यक्षम असतो व त्यातूनच त्याला यश प्राप्त होते . उत्साही मनाच्या माणसाला कधीही दुःख आणि निराशा यांचे तोंड पाहावे लागत नाही .उत्साही माणूस हा आपले कार्य आनंदाने व प्रसन्न मनाने करत असतो तशी त्याला सवयच लागते व मग सतत त्याची प्रगती होते. तुमच्या यशात व सुखासमाधानात बाधा आणणारे जे शत्रू असतील त्याचा तुम्ही सहज पराभव करू शकता.अनेकांना वाटते की यश मिळवण्यासाठी भरपूर द्रव्य व मालमत्ता याची गरज लागते, तुम्हाला तसे वाटत असेल तर ती कल्पना मनातून काढून टाका . जो माणूस आपल्या उज्वल भविष्यासाठी काया, वाचा मनाने प्रयत्न करतो तो सुखी व यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही.तुम्हाला यश मिळण्यासाठी जर द्रव्याची जरुरी असेल तर ते धन तुमच्याकडे आपोआप चालत येईल .सर्व धनात विचारधन हे अतिशय श्रेष्ठ धन आहे.

**- प्रा. डॉ. नरहरी पाटील / नांदेड**
**मो.- 9823097119**

# पोरा...



चाल पोरा ताड, ताड,असली जरी काळी रात
संकटे येतिल खूप, दाव त्यांना तुझा हात
जिंकण्यासाठी गड किल्ले,असते इथे लढायचे
ध्येय असावे मोठे पोरा,आभाळाला भिडायचे !

वादळवाऱ्यात पक्ष्यांचे,घरटे किती मोडतात
पुन्हा घरटे बांधायचे, पक्षी कोठे सोडतात ?
डोंगर पुढे आले तरी, नदीने नसते अडायचे
ध्येय असावे मोठे पोरा, आभाळाला भिडायचे !

खडकामधे मुळा रोवून, पिंपळ इथे गाणे गातो
पावशा फक्त पावसाचे, सालभरात पाणी पितो
अभाव खूप असले तरी, अडकून नसते पडायचे
ध्येय असावे मोठे पोरा, आभाळाला भिडायचे !

शिवबापाशी बरच्या, भाले, याशिवाय होते काय ?
तरीसुद्धा स्वराज्याचा, पाया रचला नाही काय ?
धैर्य, जिद हरवून सारी, नसते कधीच रडायचे
ध्येय असावे मोठे पोरा, आभाळाला भिडायचे

आभाळउंची गाठली तरी, मातीवरती हवेत पाय
मनी हवी समता ममता, गोरगरिबा दयावा न्याय
एकमेकां करून सहाय्य, ऋण असते फेडायचे
ध्येय मोठे असावे पोरा आभाळाला भिडायचे!

**– मुरहारी कराड / पारकर**
**मो.– 7391957298/8767989492**

# वृध्दांचे पालकत्व



वृध्द,वृध्दाश्रम आणि वृध्दांचे पालकत्व हे सध्याचे गाजत असलेले पण वादातीत विषय... !!

"वृध्दांचे पालकत्व" हे गृपचे नावं वाचले, ह्या गृपवरचे कांही लेख ही वाचले आणि मनात सारख घोळत राहीलं खरच वृध्दांच पालकत्व कोणी मनापासून स्विकारत का? आपल्या बाल्य अवस्थेत ज्यांनी आपलं पालकत्व हसत हसत पेललेलं असत तेच आज वृध्द झाले तेंव्हा मात्र आपण त्यांचे पालक होउन त्यांच्या मना प्रमाणे कांही दिवसही नाही राहु शकत. पण हेच सत्य आहे.

माझ्या घरात माझे सासरे होते माझ्या लग्ना नंतर बरोबर 18 वर्षांनी वयाच्या 84 व्या वर्षी त्यांचा मृत्यु झाला. खूप करारी आणि तेव्हढेच हट्टी होते, पण त्याचा आम्हाला कधी त्रास नाही झाला. उलट आम्हा चौघी सूनांना त्यांचा आधारच वाटायचा. त्यांच्या मनाप्रमाणे खाण आणि त्यांना हवा त्यावेळेला हवा तेव्हढा चहा दिला की स्वारी अगदी खुश असायची. आम्ही त्यांना दादा म्हणत होतो. माझा मुलगा लहान असतांनाच माझ्या पतीच निधन झालं आणि त्या नंतर मला दादांच्या स्वभावाचा एक नवीन पैलु अनुभवाला आला. दादा जेव्हढे करारी,हट्टी, तापट पण त्यापेक्षा किती तरी पटीने जास्त प्रेमळ मायाळु होते ते अनुभवाला आलं मला.

अनुकंपे खाली मला माझ्या पतीच्या खात्यात नौकरी मिळाली. तेंव्हा मी ऑफीस मधुन घरी आले की मला पाण्याचा ग्लास आणि चहाचा कप तयार ठेवायचे.अस करत जाऊ नका म्हणाले तर म्हणायचे "ज्योती तू घरी असतेस तेंव्हा माझी सून असतेस आणि ऑफीसला जातेस तेंव्हा तू माझा जयंता असतेस ग." खरंतर ह्या वयात त्यांना सांभाळण्याची गरज होती त्यांचा करतासवरता चाळीशीच्या आतला तरूण मुलगा गेलेला होता. दादा स्वत:च दु:ख गिळून मला आधार द्यायचे. माझ्या मुलाला जपायचे. खरतर म्हातारी माणसं त्रासदायक नसतातच मुळी त्यांच्या कांही सवयी वेळा पाळल्या की हे लोक खुश होतात. दुसर म्हणजे आपल्या संसाराच्या रगाड्यात ज्या गोष्टी करायच्या राहून गेलेल्या असतात त्या प्रत्येकालाच पुर्ण कराव्याशा वाटत असतात पण आता वृध्दत्वामुळे शरीर साथ देत नाही आणि मुलं सूना नीट समजुन घेत नाहीत आणि मग म्हातारे त्रास दायक असा शिक्का मोर्तब होतो.

माझे सासरे बूधवार 8 में 2002 मधे निधन पावले. एकदा माझ्या मैत्रीणी बरोबर मी 2005 मध्ये तीच्या एका दुरच्या नातलग महिलेला भेटण्यासाठी वृध्दाश्रमात गेले होते. तिथल्या वृध्दांच्या व्यथेने खुप मन अस्वस्थ झाल माझ. मी ठरवून टाकल की दादांच स्मरण म्हणून में महिन्यातल्या आपल्या सोयीचा दिवस बघून तो दिवस सकाळ

पासून संध्याकाळ पर्यंत वृध्दाश्रमात ह्या लोकां बरोबर घालवायचा.त्या दिवसाचा संपुर्ण खर्चही आपणच करायचा. इथल्या ह्या एकएका वृध्दांच्या व्यथा आणि कथा ऐकल्यावर पोटची मुलं आई वडीलां बरोबर अशी कशी वागू शकतात हा प्रश्न पडतो. आपण सगळेजण म्हणतो की म्हातारे आणि लहान मुल सारखं असत त्यांना लहान बाळा सारखे सांभाळाव लागते. पण सगळेच अस सांभाळतात? अहो दोन वेळेस नीट खाण जेवण दीलं जात नाही तीथं लहान मुलां सारखे हट्ट कोण पुरवणार.

खरंतर ह्या वृध्दांच्या अपेक्षा तशा खूप माफक असतात पण त्यांच्या पुढची पिढी त्याचा येव्हढा बाऊ का करते तेच कळत नाही. एखाद्या महिलेला तीच्या तरूणपणात हौसमौज करता आलेली नसेल तर ती आपल्या सूनेच्या आनंदात आनंद मानत असते, तीला जे जे करायच होतं घालायच होत ते सारं ती सूनेसाठी हौसेने आणते तीला देते. पण ह्याचा अर्थ फार वेगळा लावला जातो सून तीच्या मैत्रिणी तीच्या माहेरचे आणि आजुबाजूचे ही गोष्ट समजून न घेता त्या सासूला नावे ठेवतात,बोल लावतात की आता येव्हढी म्हातारी झालीय पण ह्या गोष्टीतला “रस” कांही कमी झाला नाही. स्वत:ला घालता येत नाही म्हणून सूनेत स्वत:च रुप बघतीय म्हातारी. आणि इथूनच सून सासूत अंतर पडायला लागत. ह्या वृध्दांना लहान मुलां सारख हाताळल तर कांहीच प्रॉब्लेम होणार नाहीत. आपण गोड बोलून कधी समजाऊन सांगून तर कधी थोडस मुलांच्या मना प्रमाणे वागून आपल्याला जे पाहिजे ते साध्य करुन घेतो.अगदी तसच ह्या वृध्द लोकान बरोबर करायला पाहिजे पण तस घडत नाही. राजाराणीच्या संसारात नेहमीच ह्या लोकांची अडचण होते, ही म्हातारी लोकं अडगळ वाटतात. कायदा झाला आहे की वृध्दांना मुलाने सूनेने सांभाळले तरच इस्टेट मिळेल पण सांभाळणे आणि प्रेमाने, आपुलकीने सांभाळणे ह्यात फरक आहेच की. “वृध्दांचे पालक” बनून जर घरातली पुढची पिढी राहीली तर वृध्दाश्रमात फक्त खरच जे निराधार आहेत तेच दिसतील.

आज मी सुध्दा जवळ जवळ “वृध्दात्वाच्या” उंबरठ्याच्या जवळ येऊन पोहंचलीय मलाही माहिती नाही माझ्या बरोबर काय होणार आहे ते पण पुढच्या पिढीने “पालकत्व” म्हणजे काय ते आधी समजून घ्यायला पाहिजे तरच हे लोक “वृध्दांचे पालकत्व” सहजरीत्या हसत खेळत पेलू शकतील,पुर्णत्वास नेऊ शकतील.

**- ज्योती जयंतराव आळंदकर / लातूर**
**मो.- 9370946057**

# आई



आभाळमायेची सावली
वात्सल्याचे रूप
संस्काराचे आंदण
देवाचेच प्रतिरूप

घराची शान
मायेची खाण
निर्भया हिरकणी
प्रेमळ शिकवण

संकटाच्या सागरात
सुखरुपपणे तारणारी
कुटुंबाचे आधारवड
जीवनाला साकारणारी

चंदनापरी झिजवी
स्वतःची काया
ऊनपावसात धरे
लेकरांवर छाया

पिलांसाठी जीव
सदा टांगलेला
सुगरणीचा खोपा
जीव कासावलेला

आईच्या कुशीत
वात्सल्य मेवा
श्रावणबाळ होऊनी
करावी सेवा



**- सौ.ऋतुजा रविंद्र गवस / नवी मुंबई**
**मो.- ८६९२४३३२२३**

# विणलेले घरटे



पहाटेची गार वाऱ्याची झुळूक सुटली होती. कोंबड्यानं बाग दिली. घरातली सारीजण अजून झोपलेलीच. अगदी गाढ झोपेत. शिला उठली. हातरूणात उदास मनानं तशीच बसून राहिली. अचानकच ती दचकली.तिचं मन घाबऱ्या घुबऱ्या झालं. अंगाला दरदरून घाम फुटला. मनात भीती दाटून आली. नजर एकटक शुन्यात स्थिरावली... स्वतःच्याच विचारात स्वतःला हरवून बसली... ‘ आपलं लग्न आठ दिवसावर आलंय. नव्या आयुष्याला आपण सुरुवात करणाराय. लग्न म्हणजे प्रेमाची नुसती अडीच अक्षरं नव्हेत. ते तर सप्तपदीनी जोडले जाणारे जन्मभराचे ऋणानुबंध असतात. आयुष्याला परिपूर्णता देणारा मंगल सोहळा असतोय. दोन जिवांना जोडणारा प्रेमाचा धागा असतोय. मग असं का होतंय आपल्याला...? देवेंद्र मग असे का बोलला..? लग्नाच्या अगोदर आपल्या घरची त्यांच्याबरोबर फिरायला आपल्याला कशी पाठवणार...? घरच्यांना विचारायचे तेवढे धाडस तरी आहे का आपल्यात..? पाठवणार तर नाहीतच...लग्न झाल्यावर कुठं ही फिरत बसा म्हणणार..! त्यानं एवढं रागाला जायची गरज नाही... त्याला कळत कसं नाही...? शिकलाय तो...!आपण मैत्रिणीशी बोलतोय फोनवर... तर तो संशय का घेतोय...? वरून तर स्वभावानं छान दिसतोय. त्याचं घरदार सारं चांगलं वाटतंय. त्याचं आई-बाप चांगले आहेत. चुकलं वाकलं तर आपल्याला समजून घेतील. मग राहून राहून आपल्याला असं का वाटतंय...? जिवाची घालमेल का होतेय..? खरं तर आपण चुकलोय का..? आपला होणारा नवरा देवेंद्रची कसलीच चौकशी नाही केली आपण... त्याचा मित्र परिवार कोण कोण आहे? कसा आहे? तो जातो कुठं? बसतो, उठतो कोणत्या माणसात? त्याला कुठलं व्यसन आहे का? तो स्वभावानं वरून तर सोज्वळ वाटतोय. पण आतून कसा आहे कुणास ठाऊक? आपण त्याच्याशी बोलायला पाहिजे होतं..! आपलं राहू दे, मोहन भाऊनं तरी त्याची खरीखुरी माहिती काढायला पाहिजे होती बाहेरून. साधा,भोळा - भाबडा एकनिष्ठ आपला लाडका मानस बंधू सुदामालाही आपण काही सांगितलं नाही. सांगावं का त्याला चौकशी करायला...? तो आपल्यासाठी एवढं करेल. हो नक्की करेल... नाही तर नकोच...! त्यालातरी कशाला त्रास...? उगी गैरसमज व्हायचा साऱ्यांचा. तशी सगळेजण लग्नाच्या तयारीला लागलेत...साहित्य खरेदी केलंय... मोहन भाऊ, सुदामा लग्नाच्या तयारीला उतावीळ झालेत...अन अशात आपण बोलणं चुकीचाय...! तसं घरच्यांनी बघितलंच असेल की सारं...आपले सासरेबुवा किती गोड बोलतात. आपलेच वडील असल्यासारखं वाटतात. सासूबाईही छान वाटतात स्वभावानं.

दोघांनीही लेकीसारखंच मानलंय आपल्याला. त्यात आपल्या आज्जी, आजोबाची इच्छा..., त्यांच्या डोळ्यासमोर नातीवर अक्षदा पडलेल्या बघायच्यायत त्यांना...हात पिवळं झालेलं बघायचंयत... नातीचं सुख बघून मग निवांत आपल्या डोळ्याच्या वाती विझाव्यात. असं त्यांचंही स्वप्न आहे... ते पूर्णही होईल... आपण नको म्हटल्यावर!!! काय होईल...? शांत बसून राहिलेलं बरं...ही सारी वडीलधारी माणसं. त्यांना कळत असेलच की, चांगलं वाईट...? आधार वाटतो त्यांचा आपल्याला. पण आपणच असला वाईट विचार करतोय... त्यात आपल्या घरची असली ही गरिबी. त्यातून आपण रडत खडत एवढं शिकलो. आणखी थोडंसंच शिक्षण बाकी आहे. आणखी पुढे शिकलो असतो तर,... नोकरी मिळाली असती. हुशार आहोत आपण... पण हे काय होऊन बसलं?आलेल्या स्थळाला घरची लगेच हो म्हटली... गरिबी जळतेय ना आपल्या घरी. काय करायचं...? एकदा अक्षदा पडल्या की संपलंच सारं. आपल्या हातात काय उरणाराय..? असो. आता कसला उलट सुलटवविचार नको ना कसली

भीती नको मनात आणायला... का म्हणून भ्यायचं? मस्त मजेत असणाराय सारं. लग्न झाल्यावर आताच्यापेक्षा नक्कीच सुखी होऊ. फक्त आयुष्याच्या जोडीदारानं चांगला साथीचा हात दिला की बस्स ! संसारात तडजोड असली की सारं आयुष्य सुखी समाधानी होतं. लग्न झाल्यावर आपण पुढे आणखी शिक्षण घेऊ या. दुसऱ्या पोरी शिकतातच की..? तोंडात साखर ठेवून जोडीदाराला जिंकुया. शिकण्याची इच्छा त्याच्या जवळ बोलू... तो नकार देणार नाही. आपण पुन्हा शिकून नोकरी मिळवूया. स्वतःच्या पायावर उभं राहिलेलं बरं. माणसाचं आयुष्य किती क्षणभंगुर आहे. पण तेवढंच आयुष्य तरी सुखाचं, आनंदाचं घालवूया. संसाराचं सोनं करून दाखवू आपण... ' शिला अशा विचारात गढून गेली होती तेवढ्यात,

" शिलाss अगं ए शिलाss. उठलीस का गं? उजडलंय बघ बाहेर."

आईनं तिला न बघताच अंथरुणातून हाक दिली. तोंडावर कुणीतरी गार पाणी शिंतडावं तसं ती दचकली. विचाराच्या तंद्रीतून जागी झाली. डोळे चोळत आईला बोलली,

" हो गं आई. मी केव्हाच उठलेय."

शिला एक दीर्घ जांभई देत बोलली...

मग तिनं विस्कटलेल्या केसांचा अंबाडा बांधला. अंगावर ओढणी घेतली. वेढा घालून घट्ट आवळली. हातरुण पांघरुणाच्या घड्या घातल्या.एका कोपऱ्यात ठेवून दिल्या. अन् मग आईजवळ जाऊन टेकली.

" झाली का गं झोप पोरी?" आईनं तिच्या अंगावर मोरपीस फिरावा तसा मायेचा हात फिरवला.

"हो. झाली गं आई." शिला आईकड बघत बोलली. अन् खाली मान घातली. आईनं लगेच विचारलं ,

“ का गं अशी कुचमली? काय झालंय का? “ आईनं तिची हनुवटी हलकेच हातानं वर उचलली. बघते तर, शिलाचं डोळं गच्च भरून आलेलं...

“ का गं पोरी? असं काय झालंय डोळं भरून यायला?”

“ आई..., मला तुझ्याशी बोलायचंय... “ असं म्हणून शिलानं पुन्हा डोळं भरलं...पाण्यानं डबडबलं...तिला कंठच फुटेना. बराच वेळ ती गप्पच.

“अगं, सांग ना काय झालं ते? असं गप्प राहून मला कसं कळेल गं?”

हुंदका देत शिला बोलली,

“ आई..., रात्री मी माझ्या मैत्रिणीशी फोनवर बोलत होते. त्यात त्यांचा फोन आला. तो फोन वेटिंगला पडला. माझं लक्ष्य होतं पण मैत्रिणही महत्वाचं बोलत होती. तिनं सोलापूरला विद्यापिठात पुढे शिकायला ॲडमिशन घेतलंय म्हणत होती. त्यामुळं देवेंद्रचा फोन घ्यायला जरासा उशीर झाला बघ...”

“ मग त्यात काय एवढं मनाला लावून घेतेस.”

“ मनाला लावून घेण्यासारखंच झालं गं आई..., मी मैत्रिणीशी बोलताना पुन्हा त्यांचा फोन आला. मी मैत्रिणीचा फोन कट करून त्यांना फोन लावला तर...” असं अर्ध बोलून शिला पुन्हा ढसा ढसा रडायलाच लागली.

“गप बाई गप. आधी रडू आवर बघू.” आईनं तिला जवळ घेतलं. डोक्यावरून, पाठीवरून मायेनं धीराचा हात फिरवला. आलेले हुंदके गिळत गिळत शिला पुन्हा सांगू लागली,

“ मी त्यांना फोन केला. फोन लागताच तिकडून डायरेक्ट शिव्यांचा भडीमार,

“कोणाशी बोलत होती इतका वेळ? कोण होता तो ? माझ्याबरोबर चल म्हटलं तर फिरायला येत न्हाय...अन त्याच्याबरोबर बोलत बसतेस...?”

“ अहो, तुम्ही समजता तसं मुळीच काहीही नाहीय. मी मैत्रिणीशी बोलत होते. अन घरची कशी पाठवतील मला लग्नाच्या अगोदर तुमच्याबरोबर..? “

“आ... मैत्रिणीशी इतका वेळ बोलतात का? खरं खरं सांग...?”

“अहो, मी खरंच सांगतेय. एम.ए.ला ॲडमिशन घेतलेलं सांगत होती ती. “

“ बर...? मला चांगलं ठाऊकाय... मीही बघतोच आता...? “

असा दोघांचा झालेला वाद शिला सांगत होती. आई ऐकत होती.

“ अगं, मी कितीतरी जीव तोडून सांगितलं, मैत्रिणीचा फोन होता म्हणून. ते विश्वासच ठेवायला तयार होईनात. ‘ सांग कोण होता तो? ‘ आणि फिरायला का येत नाही माझ्याबरोबर... ?

तेच तेच प्रश्न लोणच्यागत चघळत होते...मग मलाही रागच आला... टाकला कट करून फोन... लग्नाच्या अगोदरच असलं तिखट बोलणं..? संशय..? काय हे..? आगं आमचा संसार कसा कडेला जायचा मग..? त्यांचा स्वभाव विचित्रच अन् संशयखोर आहे बघ आई... काय करावं कळेनाय मला... तूच सांग आई, मी काय करू?”

तिनं आईजवळ मन मोकळं केलं. पण, मनात घालमेल चहागत उकळत होती. आईनं दीर्घ उसासा सोडला. शिलाकडे गरीब डोळ्यानं बघितलं. तिच्या खांद्यावर आधाराचा हात ठेवला. दमा धीरानं बोलली,

" अगं पोरी, तू असला संशय मनात घेऊ नको. त्यानं तुझी चेष्टा केली असेल. तुझं मन कसं आहे बघितलं असेल. काही मुलं लग्नाअगोदर अशी थट्टा करतात गं... तुला त्याची चेष्टा समजली नसेल... कानाडोळा करायचा.समजून घ्यायचं आपल्या आपुन... तुला मोठ्ठ घर मिळालंय. नशीबवान आहेस तू. पुन्हा एवढं मोठं स्थळ मिळायचं नाही." आईचं ऐकून घेतलं शिलानं. बरं...म्हणून मान हलवली. घरातल्या कामाला जुंपून घेतलं. आई चुल पेटवायला उठली...

आठ दिवस कसं भर्रकन निघून गेलं कळालंही नाही. सासुरवाडीच्या दारात मांडव सजला. पाहुण्या रावळ्यांनी मांडव गच्च भरलेला. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वहात होता. साऱ्या मांडवभर आल्हाददायी वातावरण पसरलेलं. मंडपात हळदीची लगबग सुरू. आया बाया नवरा-नवरीला हळद लावू लागल्या. शिलाच्या अंगाला हळद लागली. तर दुसऱ्या बाजूला बाकीचे पाहुणेरावळेही एकमेकांत चेष्टेने हळद खेळू लागले. घाई, गडबड, पळापळी सारं कसं उत्साहात पार पडत होतं.मोहन भाऊची...सुदामा दादाची नुस्ती धावपळ चाललेली...बहिणीच्या लग्नात ते दमलेले... त्यातूनही लग्नाचा आनंद घेत होते...हळद लावत होते...चेष्टा करत होते...

तेवढ्यात, इकडे शिलाच्या कानावर तिखट शब्दाचा आवाज येऊन आदळला,

" ओ शिला मॅडमजी, कुणाबरोबर बोलत असता रोज फोनवर...? आठ दिवस झालं माझ्या फोनवरच्या लाईनवर नव्हतास... का उचलत नव्हता माझा फोन? कोण होता तो फोनवर..? काय चाललंय तुमचं हे? फिरायलाही आला नाही बरोबर...याला लाईफ म्हणायची का...?" असे कुचके शब्द ऐकून शिला गप्पगारच झाली.

" तोंड शिवलंय का तुमचं?बोला ना मॅडम?"

शिलानं काय आणि कसं बोलावं? तिच्या तोंडातून शब्दच फुटेना. तिच्या तोंडातल्या तोंडातच शब्द अडखळू लागले. तिला दरदरून घाम फुटला. अंग थरथरायला लागलं. अशा भरल्या मांडवात हे काय विचारतोय आपला नवरा...? खरं खोटं काहीच कळेनाय...खरं समजायचं का चेष्टा समजायची....का असंच ओल्या हळदीनं आपण मांडव सोडून पळून जावं. दूर दूर. जिथं आपलं स्वातंत्र्य असेल. नको हे लग्न. देवेंद्र आपली थट्टा करत असतील म्हणून आपण कानाडोळा केला होता. पण आज लग्ना दिवशीही असंच!' तिचे डोळे पाण्याने डबडबले. गांगरून गेली ती. त्यात डोळ्यांची भीती वेगळीच होती. दोघांच्या तणावातच हळदीचा कार्यक्रम पार पडला.भीतीच्या जागरणातच ती रात्र संपून गेली.

सकाळ झाली. लग्नाचा टाईम होत आला. शिलाला वाटलं, 'बोहल्यावर चढायलाच नको. हा बाबा आत्ताच असा संशय घेऊन छळतोय, लग्न झाल्यावर कसं व्हायचं?

त्यापेक्षा लग्नाला स्पष्ट नकार देऊन आपली वाट धरावी. पण..., आई -बापाचं काय? आपल्या घराण्याचं काय...? ' विचार करून करून शिलाचं डोकं दुखायला लागलं. बधिर झालं... अखेर तिनं मनावर दगड ठेवला. लग्नाची वेळ झाली. मंगलाष्टकं सुरु झाली. डोक्यावर अक्षदा पडू लागल्या. आणि..., पुन्हा कानावर तीन-चार शिव्यांचे तिखट जाळ शब्द. उभ्या जन्मात कधी न ऐकलेल्या शिव्या. देवेंद्रचे डोळे तर आग ओकत होते. शिलाचा पुन्हा थरकाप उडाला. ' आता सावध सावधान समयो... 'ही शेवटीची मंगलाष्टका संपली. लग्न लागलं. झालं, आता सावध राहून काय उपयोग? होमसाठी नवरा -नवरी पाटावर बसले. ब्राम्हण त्याचे मंत्र पठण करु लागला. अन् इकडे देवेंद्र शिलाला गुपचूप त्रास देऊ लागला.डोळ्यांनी...हातांनी... शिला

मनातून हादरून गेली. 'आयुष्याचा आपला हा जोडीदार असा कसा असू शकतो? इतक्या भयंकर संशयानं वागू शकतो? ' ताणतणावातच लग्न पार पडलं. मोहन दादानं, सुदामानं खूप धावपळ केली...ताई नांदायला जाणार म्हणून त्यांना हुरहूर लागली... मन गलबलून गेलं...भरल्या डोळ्यांनी आणि उदास चेहऱ्याने ताईची पाठवणी केली... ताई गेल्यावर एका कोपरयात जाऊन ते दोघं खूप वेळ रडली...त्या दिवशी ते जेवलीही नाहीत...

शिलानं उदास मनानं उदास चेहऱ्यानं सासरच्या उंबऱ्यावरचं माप ओलांडलं. घरात प्रवेश केला. घरात तसा आनंद होता. वातावरण छान होतं. घरातली माणसं तिच्याशी गोड बोलू लागली. प्रेम, माया देऊ लागली. देवेंद्र मात्र उदास आणि गंभीर होता. त्याच्या डोक्यात संशयाचंच वादळ घोंगावत होतं. त्याचं वागणं विचित्र होतं. शिलाला ते भीतीदायक वाटायला लागलं...

नवरीचे नवेपणाचे नऊ दिवस झाले. ते दिवसही शिलासाठी दुर्दैवी ठरले. देव देव सुरु झाला. वावर यात्रा निघाली. देवाला जाता जाता सुध्दा तिला बोलण्याची टोचणी खावी लागत होती. हळू आवाजात शिव्यांचा प्रसाद खावा लागत होता. देव देव झाला. आता नव्या संसाराचा श्रीगणेशा होणार. शिला मनात सुखी संसाराची मांडणी करत होती. देवेंद्रला हाता-पाया पडून रुळावर आणू असा मनात विचार करत होती तोच, देवेंद्र झोकांड्या खातच घरी आला. त्याच्या तोंडाचा दारुचा भपकारा आला. शिलाला धक्काच बसला. शिलाने दारु का प्याला म्हणून विचारणा केली...त्याची घरात मोठमोठ्यानं बडबड सुरु झाली. शिलाशी, आई -बापाशी तो भांडू लागला. भांड्यांची आदळआपट करु लागला. सासू सासरे गप्प. त्यांचा एकुलता एक मुलगा. लाडाकोडात वाढलेला. घरात जणू पैशाचा झराच होता... सारी सुखं देवेंद्रच्या पायाशी लोळण घेत होती. तशीच सारी व्यसनंही त्याची मित्र बनली होती. तो ऐशोरामात ऐश करीत होता. लग्न केल्यावर तरी पोरगं बदलून सुधारेल असं आई-बापाला वाटलं होतं. पण कशाचं काय?त्यांचं दुर्दैव... मात्र हेच दुर्दैव शिलाच्या पदरात पडलं ... तिनं रंगवलेल्या सुंदर सुखस्वप्नाची राखरांगोळी झाली. विचार करून करून तिचं डोकं

बधीर होत गेलं. डोळ्यासमोर भावी आयुष्याचा काळाकुट्ट अंधार दिसू लागला...

दीन महिन्याचा काळ उलटून गेला. घरातली भांडणं कटकटी सुरुच. सासू -सासरे गप्प गप्प. त्यांच्या तोंडावर अपराधीपणाची भावना तरळत होती. पोराला चांगलं सांगायला जावं तर तो टांगायला नेतो.कसं सांगावं त्याला? शिल्पा कसायाच्या दावणीला बांधलेली गाय होऊन बसली. देवेंद्र रोजच रात्री उशीरा घरी येऊ लागला...

एक दिवस भयानकच उगवला...रात्र खूप झालेली. सारं गाव झोपेच्या अधीन झालं.

देवेंद्रचा अजून पत्ता नव्हता. शिला रोजच्याप्रमाणं जेवायला त्याची वाट बघत बसलेली. निम्या रात्रीचं देवेंद्र आला. आला तो पिवूनच. आल्या आल्या त्याचा गोंधळ सुरु. भांडणाला क्षुल्लक कारणही त्याला पुरेसं असायचं.

" व्हय गं, इतका वेळ कुणाची वाट बघतेय? तुझा कोण येणार आहे का?

शिलाने डोक्यालाच हात लावला...बडवून घ्यावंसं वाटायला लागलं...डोळ्यात पाणी भरलं...रडतच बोलली

"अहो, मी तुमचीच वाट बघतेय. आपल्या घरी कोण येणार आहे तुमच्याशिवाय?"

" असं म्हणतेस...? मग जा की तुझ्या माहेरी. तिथं येईल तुझा तो कोण आहे तो... चल ऊठ. "

असं बोलून त्यानं दारे खिडक्या बंद केल्या.बाहेरच्या लोकांना गोंधळ नको...त्यांना समजू नये म्हणून.त्यानं शिलाचं केस धरलं. आणि तिचं डोकं धाड धाड जमिनीवर आपटू लागला. लाथा बुक्क्यानी मारायला लागला.

"मी तुमच्या पाया पडते होss. मला मारु नकाss सोडा मलाss. " शिलाचा रडण्याचा आवाज ऐकून हळू आवाजात ओरडायचा...

"आवाज करु नको... लोकांना तमाशा नको...नाहीतर लईच मार खाशील.."

शिला मार सहन करायची... रडावं..ओरडावं...तर जास्त मार... शिला अन्याय सहन करायची...तिथून पुढे तर मग हा रोजचाच त्रास चालू झाला. उशिरपर्यंत चालायचा... हळूहळू सामसूम व्हायची. रात्र गडद व्हायची. देवेंद्र यायचा.घरी आल्यावर फुल्ल प्यायचा... आणि शिल्पाला बेदम मारहाण करायचा. शारिरीक, मानसिक त्रास द्यायचा. शिल्पा मुकाटपणे त्याच्या जाचाला सामोरं जायची.

काळ पुढे सरकत होता. घरात रोजचा गोंधळ चालूच. पण कधी कधी तो खूप गोड बोलायचा...संसाराच्या गप्पा करायचा...आठ दिवस चांगले जायचे...शिलाला भारी वाटायचे...देवेंद्रमध्ये बदल बघून आनंद वाटायचा...

एकदा देवेंद्र शिलाला गोडीनं बोलला,

"शिला, माहेरी जाऊन ये... दमले असशील तू...आराम कर जरा... मी येतो न्यायला चार दिवसाने... जा."

शिलाला खूपच आनंद झाला. देवेंद्रात बदल होतो म्हणताना तिला खूप खूप बरं

वाटलं. ती आनंदानं माहेरी गेली. माहेरच्यांनाही आनंद झाला. चार दिवस निघून गेले. आठ दिवस झाले. पंधरा दिवस झाले. माहिना झाला. तरी तिला न्यायला सासरचा मुराळी येईना. तिनं देवेंद्रला कित्तेक फोन केले. कधी उचलायचा...कधी उचलायचा नाही.कधी गोड बोलायचा... येतो म्हणायचा...शिला उरकून बसायची..यायचाच नाही...तर कधी येतच नाही म्हणायचा. आता माघारी येऊच नको म्हणायचा. ऐकून तिला धक्काच बसायचा. तिला धास्ती लागून राहिली. कसा का असेना, हजारो माणसांच्या साक्षीनं त्याच्या गळ्यात हार घातलाय. माहेरच्या ज्या माणसांना ती आल्याचा आनंद झाला होता तीच माणसं आता काळ्या चष्म्यातून तिच्याकडे बघायला लागली. शेजार पाजारची लोकं कुजबूज करायला लागली. उलटसुलट चर्चेचं गुऱ्हाळ गाळू लागली. वाईट नजरेने बघू लागली. शिला मात्र तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करीत राहिली...नाविलाजाने!

शिलाच्या जिवाशी देवेंद्रचा खेळ सुरूच होता. सतत मारझोड करायचा. माहेरी हाकलून लावायचा.माहेरी येऊन वाद करायचा... तिच्या सासर- माहेरच्या वाऱ्या चालूच होत्या. कधी गोड बोलायचा... पुन्हा वाईट कृती करायचा...ती पार दमून गेली होती त्या स्वभावाला. दिवसामागून दिवस निघून जात होते.

संध्याकाळी शिला देवेंद्र येण्याची वाट बघत बसली होती...नऊ- दहा वाजून गेल्या होत्या. उशीराने देवेंद्र आला... आल्या आल्या बोलला...जेवण वाढ...शिलाने जेवण वाढले...एक घास खालला...तसं ताट उचलले...आणि भिंतीवर फेकून दिले... आमटीची भिंतीवर नक्षी उमटली... शिलाच्या अंगाचा थरकाप उडाला.वातावरण गंभीर झाले...तशातच एक तास निघून गेला.

तासाने देवेंद्र गोडीत आला.म्हटला,

"जाऊ दे शिला..टेन्शन घेऊ नको. तुझं आवर...बॅग भर...मला कंत्राट काम मिळालंय... मोठं काम आहे...उद्या सकाळी आपण निघणार आहे...सहा महिने तिकडेच राहायचं आहे...लागणारं सगळं साहित्य घे...आवराआवर कर...सकाळी टेम्पो येईल..."

शिलाने नुसतीच मान हालवली...कामाला लागली...

सकाळ झाली. टेम्पो आला.साहित्य भरले.कामाच्या ठिकाणाच्या जवळच एक छानशी खोली होती...शिला तिथे रमली.दिवस पुढे सरकत राहिले...देवेंद्रच्या हाताखाली बरेच कामगार काम करत होते.शिलाचा स्वभाव फ्रेंडली...साऱ्यांशी हसून- खेळून राहत होती...कामगारांना ताई-दादा म्हणत होती...तेही मॅडम मॅडम आदरानं बोलायची...

एकदा एका कामगाराचं लहान बाळ खूपच रडत होतं. त्यांच्या जवळ बाळाला खायला द्यायला काहीच नव्हतं...घरही लांब...जवळ दुकानही नव्हतं...शिलाला बाळाची दया आली.तिने लगेच बाळाला चहा बिस्कीट दिले...बाळाने आनंदाने

खाल्ले...त्या कामगाराला आप्रुप वाटले शिलाचे... मॅडमनी आपल्या लेकराला खायला दिले याचे...तेव्हापासून तो कामगार...त्याची बायको शिलाशी आदराने... आपुलकीने बोलायची...त्यांना आनंद व्हायचा...मोठी लोकं आपल्याशी बोलतात म्हणून.

सोमवारचा दिवस होता...कामाला सुट्टी.कामगारांचा बाजाराचा दिवस. त्या कामगाराने पिशवी भरून मंडई आणली.त्याला आणि त्याच्या बायकोला वाटले... शिला मॅडमांना भाजी द्यावी. तो कामगार प्रेमापोटी...शिला मॅडमच्या घरी भाजी घेवून गेला.देवेंद्र घरीच होता...त्यानं बाहेरूनच हाक मारली,

"शिला मॅडम..मी आलोय...भाजी घेऊन...?"

आवाजाने देवेंद्र बाहेर आला. समोर त्याला कामगार दिसला.त्यानं का भाजी घेऊन यावं आपल्या बायकोला द्यायला...? देवेंद्रच्या कपाळाच्या आठ्या ताणल्या गेल्या...आंग रागाने गरम झाले...हात सळसळले... धावतच घरात गेला...कमरेचा बेल्ट घेऊन बाहेर आला...कोणताच विचार- पाचार न करता हातातल्या बेल्टने त्या कामगाराला बडवायला सुरुवात केली...बडवत असतानाच तोंड चालू केले,

" ये ये भडव्या...तुझा काय संबंध माझ्या बायकोला भाजी द्यायचा...मला भीक लागलेय काय...? मी हाय ना नवरा...मी देतोय ना आणून..."

लोकांची पळापळ झाली...शिला पळत आली... तिने ओठातले शब्द ओठातच ठेवले...नाहीतर आणखी वाढले असते...पण तिला देवेंद्र चे कृत्य पटलं नाही... बिचारा कामगार दोष नसताना मार खाऊन गेला...धुसफूस,भांडण,वाद,शिव्या, अबोला...व्यसन यातच सहा महिने निघून गेले...काम संपले...पुन्हा घर गाठले...

देवेंद्रमध्ये काडीचाही फरक पडत नव्हता. शिला मनालाच प्रश्न विचारीत होती. मनालाच उत्तरं देत होती, ' नवऱ्याशी कसं वागावं बरं...? त्याला काय अन् कसं बोलावं...? तो ऐकूनच घेत नाही... त्याला आपण किती समजून घेतोय. त्यानं मात्र आपली अघोरी थट्टा लावलीय. त्याचा किती जाच सहन करतोय आपण... असं करायचं होतं तर त्यानं लग्न तरी का केलं आपल्याशी..? त्याच्या या साऱ्या जाचातून आपण मोकळं व्हावं का...? आपलाही कुणालाच त्रास नको... ना सासरच्यांना... ना माहेरच्यांना... बस्स !आता एकच विचार... शिल्पा आता मनात शेवटच्या भयानक टोकाचा विचार घोळू लागली... परत तिला वाटायचं, ' का..., एकदा शेवटचं सांगून बघावं भाऊला...? पण, कसं सांगावं त्याला तरी... का, सुदामाला सांगावं...? तो पण आपल्या जिवाभावाचा. त्यानेच आपल्या शिक्षणाचा भार उचलला.मानसिक भावनिक आधार दिला. त्याच्यामुळं तर आपण एवढं शिकलो...लग्नात त्यानंच किती धावपळ केली, मग त्याला अजून किती त्रास द्यायचा...? पण, एकदा सांगून तर बघुया... तो नक्कीच समजावून सांगेल देवेंद्रला... त्याच्यात थोडा तरी बदल झाला तरी पुरे... नाहीतर नकोच ! हा चुकीच्या वृत्तीचा... त्याचं ऐकणार नाही.

भाऊचा,सुदामाचा अपमान करेल. त्यांना नाही सहन होणार. त्यांचा अपमान झाला तर आपल्याला तरी सहन होईल का...? माहेरी तर किती वेळा जायचं? आई- बाबाची गरिबी. कमवणारा भाऊ एकटा. खाणारी तोंडं सतरा. त्याचीच शिंगं त्यांना जड झालीयत. माहेरी राहिलं तर शेजारपाजाऱ्यांच्या नजराही वाकड्या होतात...जावं तरी कुठं? ' असा पॉझिटिव्ह - निगेटिव्ह विचार करत करतच आलेला दिवस शिला पाठीशी टाकत होती.ती अबोल झाली होती. मनात टेंन्शनचे डोंगर वाढत होते. रोजचा दिवस टेन्शन घेऊन उगवायचा... टेन्शन देऊनच मावळायचा. पण, त्याबरोबरच एक गोड घटनाही घडत होती. तिला ती आनंद देत होती. आता तिच्या पोटात बाळ वाढत होतं...

रात्रीच्या अकरा वाजलेल्या. सासू -सासरे त्यांच्या खोलीत झोपलेले. शिलाला डोळ्यात झोप मावत नव्हती. नवऱ्याच्या अगोदर झोपायचं नाही. जेवायचं नाही. ही बंधनं उराशी घेऊन ती रात्र जागवत देवेंद्रची वाट बघत बसलेली. तिनं जेवणाची दोन ताटं करून झाकून ठेवलेली. डोळे पेंगत होते. जाग येताच नजर दाराकडे जायची. देवेंद्र कधी अचानक दारावर थाप टाकेल सांगता येत नव्हतं. घड्याळाचा काटा बाराच्या घराकडे सरकत होता. पावणेबारा वाजल्या... तेवढ्यात, दारावरची बेल वाजली. त्याला उठेपर्यंतही दम नव्हता. तो मोठ्यानं ओरडला,

" ओय शिलाss. शिलाss मॅडम दार उघडा."

शिला लगबगीनं ऊठली. भीत भीत दार उघडलं. भक्कदिशी दारूचा भपकारा आला. देवेंद्र भेलकांडतच आत आला. त्याचा तोल जात होता. नशेत तोतरं बोलत म्हणाला,

"व्हयss, कुणाशी गुलूगुलू करत होतीस फोनवर..? सांग नाss."

"अहो मी कुठं फोन केलाय कुणाला. तुमचीच वाट बघत बसलेय."

" तूss तूss माझी वाट बघते? मी बोळ्यानं दूध पित न्हाय...म्हायती हाय मला, तू कुणाची वाट बघते ती... तुला माहेरला जा म्हणलं तव्हा जात नाही... ये म्हणलं तव्हा येत नाही. महिना महिना राहते तिकडं. तू कशापाय जाते? काय नेमकं चाललंय तुझं..?बोल ना... तोंड शिवलं का तुझं...? का दातखिळ बसली...?"

त्याच्या तोंडाचा पट्टा चालूच. शिलाच्या डोळ्यातून टपा टपा पाण्याच्या धारा लागलेल्या. ते बघून देवेंद्रला आणखीच राग आला. त्यानं

खाडदिशी शिलाच्या कानफडात लगावली. कारण तर काहीच नव्हतं. फक्त संशयाचं भूत. तो तिला लाथाबुक्क्या घालू लागला. ती गयावया करत होती. त्यांचा कालवा ऐकून त्याचं आई - बाप धावत आले. इतक्या दिवसातून बापानं तोंड उघडलं,

" ए भडव्या, लेकराला मारून टाकतो काय? हीचं काय चुकतंय रे? लाज जरा स्वतःला लाज. तू चुकतोय भडव्या. व्यसनांच्या आहारी जाऊन तू हे नखरे करतो. तुझ्या कळत्यापणापासून तुला बघत आलोय. तुला लाडात कोडात वाढवलं. हेच आमचं चुकलं."

बापानंतर आईनंही तोंड चालू केलं,

" आरं, तुझ्या लहानपणापासून ते आजपर्यंत चुका पोटात घेतल्या. तेच आमचं चुकलं रंss. आता सहन होईना आम्हाला...? "

" ये...तुम्ही दोघांनी मूग गिळून शांत बसायचं... आम्हा नवरा बायकोच्या भांडणात ढवळाढवळ नाही करायची... मी तुमच्या वादात पडतो का कधी?"

" तसं नाही बाबाss... "

" नाही ना, मग चुप्प बसायचं. तोंड उघडायचं नाही पुन्हा आमच्या भांडणात. समजलं?"

देवेंद्रनं आई - बापाला पुढे बोलू न देता गप्प केलं. त्याच्या बोलण्याने दोघेही गप्प गप्प झाले. त्यानं पुन्हा शिलाकडे तोंड फिरवलं,

" ओ बाईसाहेब, माझ्यासंग साजुकपणाची का नाटकं करताय उगीच? माझ्या जवळ नाही चालणार तुमची नाटकं. तिकडं माहेरी...त्यांच्याच्याजवळ करा नाटकं..."?

शिलालाही राग आला. नवऱ्यानं तिच्यावर केलेले आरोप आता तिलाही सहन होईना झाले होते... तिनं पहिल्यांदाच हिंमतीनं तोंड उघडलं,

"मी नाटकं करतेय का तुम्ही करताय..? मला माहेरी जवा जायचं तवा जाऊ देत नाही.पण नको असेल तवा गोड बोलून माहेरी पाठवता. संशय घेऊन भांडण काढता. फोन करून तुझ्यासाठी घराची दारं बंद आहेत म्हणता. तिकडेच रहा म्हणता. काय चाललंय नेमकं तुमचं...? लग्नाच्या अगोदरपासून तुम्ही माझा छळ लावलाय. किती सहन करायचं मी? असं कुठं असतं का? तुमच्या बरोबर फिरायला आले नाही म्हणून हा राग आहे का? पण तसं कसं लग्नाआधी पाठवतील घरचे लोक...? मी गप्प बसते म्हणून तुमचीच नाटकं चाललीत सारी. तुमचंच काय चाललंय ते मला कळू द्या...?कशापायी हा तमाशा करताय?"

" बस्स ! एक शब्दही बोलू नको. तुझं नाही माझंच चुकलं. मीच झक मारली तुझ्याशी लग्न करून."

" काय बोलताय? तुम्हाला शोभतं का हे बोलणं? शिकले सवरलेले आहात तुम्ही... अहो, तुम्ही स्वतःला बदला. अजूनही वेळ गेलेली नाही. आपण राजा- राणी सारखा संसार करूया... माझ्या पोटात आपलं बाळ वाढतंय. किती आनंद व्हायला पाहिजे तुम्हाला."

" ए ..., बोलली एवढं बोलली. तुझ्या पोटातलं बाळ माझं नाही. पुन्हा माझं नाव घेऊ नको. आणि संसार कुणाशी कसा करायचा हे तू मला नको शिकवू... माझ्या आई-बापाला अक्कल नाही. तू मला पसंत नसताना माझ्या गळ्यात बांधलंय तुला."

'हां, म्हणजे असं आहे काय? मग कशाला उगीच संशयाचं तरी नाटक करावं. पसंत नव्हते तर बोहल्यावर चढायचंच कशाला या माणसानं? यानं का वाटोळं करावं माझं? किती विचित्र स्वभावाची माणसं असतात. आपण लग्नाच्या अगोदर पाहिलेल्या

सुखाच्या स्वप्नाचं काय? माझं स्वप्न उधळून लावण्याचा याला काय अधिकार? ' शिला मनातल्या मनात विचार करायला

लागली. ती पार भेदरुन गेली. डोळ्यांना पुन्हा टपा टपा धारा लागल्या. टेन्शनमध्येच रात्र गडद होत गेली. रात्रभर ती डोळे ओलावत राहिली...

सकाळ उदासपणाचं पांघरुण घेऊन उगवली. शिलानं हातरुण धरलं होतं. रडून रडून तिचा चेहरा सुजला होता. डोक्याचे केस विस्कटलेले. अंगावर साडी अस्ताव्यस्त झालेली. रोजच्या सरावाने देवेंद्र महाशय उशीराच उठले. दोघात मुकी भिंत उभी होती. स्वतःचं आवरुन देवेंद्र घराबाहेर पडला. गेला तो संध्याकाळीच उगवणार. कोणत्या अवस्थेत कधी येणार हे आता साऱ्यांनाच पाठ झालं होतं. शिलाचं कशातच मन लागत नव्हतं. तिचं हसतं खेळतं फुलासारखं आयुष्य अंध: कारमय झालं होतं. यापुढं ताटात आणखी काय वाढून येईल कुणास ठाऊक?

सकाळच्या साडे अकरा -बारा वाजल्या. सासूबाई घरात काहीतरी काम करीत होत्या. सासरेबुवा बाहेर गेलेले. शिला रागात उठली. केसाचा बुचडा बांधला. साडी नीट केली. तिच्या मनात भयंकर विचाराचं वादळ घोंगावू लागलं. ' आता काय राहिलंय आपल्या आयुष्यात...?कसलं हे लाचारीचं जगणं... नवरा असून अडचण नसून खोळंबा... त्याची तर काय चूक? आई-बापानंच बळं घोड्यावर बसवला. सारी सुखे ऐशारामात भोगतोय. पण प्रापंचीक सुख त्याला का नको आहे कोण जाणे? आपल्याला मात्र दुःखाच्या खाईत लोटलं त्यानं. कसलं हे आपलं जगणं...?बस्स झालं! आता नवऱ्याला आपलं ओझंच नको. सासू -सासऱ्याला त्रास नको ना माहेरच्यांना त्रास द्यायचा नाही. ती निर्धाराने उठली. आतल्या घरात गेली. परत आली...जोरात दरवाजा आदळला... सासूनं ते बघितलं. शिलानं आतून दार लावून घेतलं. सासू धावत आली.तशी ती मोठमोठ्यानं ओरडू लागली. एवढ्यात बाहेरुन सासरे आले. दोघांनी मिळून दारावर धक्के दिले. दार उघडलं गेलं. सासरे धावले.. जोरात ओरडले,

“अगं पोरीss काय करतेस हे? आमची शपथ आहे तुला.” शिला जागच्या जागी थबकली... तिला हुंदक्या मागून हुंदके फुटू लागलं,

“ मी काय करु मामंजी तुम्हीच सांगा...? माझं काय चुकलं...?काय पाप केलंय मी? म्हणून माझ्या वाट्याला असलं लाचारीचं जगणं आलं... तुम्हीच माझं वाटोळं केलं... देवेंद्रला मी पसंत नव्हते हे तुम्हाला माहीत होतं ना? मग जाणूनबुजून माझं का वाटोळं केलं...? सांगा मामंजी? सासूबाई तुम्ही तरी सांगा? का असं केलं तुम्ही?” शिला धाय मोकलून रडू लागली. सासू -सासऱ्याचे हातपाय थरथर कापत होते. दोघं भेदरुन गेली होती. सासरा हात जोडून शिलाला गयावया करु लागला,

“ खरंय तुझं पोरीss. फुलासारख्या लेकराचं आमच्या हातून वाटोळं झालं गंss वाटोळं झालं. “ सासरेही गहिवरले.

सासूबाई मध्ये बोलली,

" अगं पोरी, बिघडलेलं पोरगं लग्न झाल्यावर तरी वळणावर येईल वाटलं. पण तो काही वठणीवर येईना... अगं तू स्वतःला संपवायला निघालीस. आणि तुझ्या पोटात अंकुर वाढतोय पोरी. जन्माच्या आगोदरच त्यालाही का खुडायला निघालीस?बाईचं आईपण लोकराविना अधुरं असतंय पोरी. "

पुन्हा सासरा बोलला,

" हो पोरी. नको करू हे पाप. हा मनुष्य जन्म पुन्हा पुन्हा नाही. तू शिकली सवरलेली आहेस. शहाणी आहेस. हुशार आहेस. शोषिक आहेस. संयमी आहेस. तू खूप खूप सोसलं गं. जगण्याचा प्रत्येक डाव हिंमतीनं खेळत आलीस. आता आणखी एक अखेरचा डाव खेळ. तू जिंकशील. हो नक्की जिंकशील. विणलेलं घरटं मोडू नकोस गं...आम्हाला माफ कर गं पोरी.आम्ही खूप खूप चुकलो. "

शिला रडत रडत बोलली

" मी तुम्हाला माफ करते. पण तुम्ही म्हणता, बाईचं आईपण लेकराविना अधुरं असतंय, मला कबूलाय... पण बाईचं बाईपण नवऱ्याविना अधुरंच राहत असतंय. ते तुम्ही भरुन कसं काढणार?"

शिलाच्या या प्रश्नावर  दोघांकडेही उत्तर नव्हतं. मात्र दोघांच्याही डोळ्यांना टपा टपा धारा लागल्या होत्या...

देवेंद्रला त्याची चूक आज ना उद्या लक्ष्यात येईल. त्याच्या मनाला पटेल, समजेल. स्वतःला बदलून घेईल. तो नक्की सुधरेल. या भोळ्या आशेवर शिला एक एक दिवस मागे टाकत राहिली. पोटातला अंकुर वाढत होता. त्याबरोबरच देवेंद्रचा त्रासही वाढतच होता. संशयाचं भूत मोठं मोठं होत होतं. देवेंद्र रोजच मारझोड करू लागला. तिला उपवास घडू लागले. दिवस दिवस पाण्यावर राहू लागली. कायम माहेरी जावं तर तिथं गरिबी पाचवीला पुजलेली. जावं तरी कुठं?इकडं आड तिकडं विहिर अशी तिची गत झाली होती. शेवटची मात्रा म्हणून एकदा तिनं मोहन भाऊ आणि सुदामाला बोलावून घेतलं. घडत असलेलं सारं महापुराण त्यांना सांगून टाकलं. एकदाचं मन मोकळं केलं. ते महापुराण ऐकून दोघांना धक्काच बसला. तेवढ्यात देवेंद्र आला. सुदामानं त्याच्या पायावर डोकं ठेवलं आणि बहिणीसाठी भीक मागिल्यागत गयावया करू लागला,

"दाजी, आमची बहीण पदरात घ्या. तिचं काही चुकत असेल तर सांगा, आम्ही माफी मागतो. पण दीदीला त्रास देऊ नका."

मोहन मध्ये बोलला,

" व्हय, दाजी आम्ही तुमच्याकडे बघून तुमच्या पदरात घातलीय तिला. तुम्ही चांगल्या स्वभावाचे आहात म्हणून. तिचं आयुष्य असं उध्वस्त करू नका. तुमच्या पुढं हात पसरतो."

देवेंद्रला दयेचा थोडासाही घाम फुटला नाही. चकार शब्दही काढला नाही त्यानं.

मुक्यानेच तो घराबाहेर निघून गेला. एवढे हात टेकूनही पालथ्या घागरीवर पाणीच पडले. मोहन भाऊ , सुदामा उदास उदास झाले. दोघं जायला निघाले. जाता जाता भाऊनं शिलाकडं दीन नजरेनं बघितलं. तिचं डोळं गच्च भरून आलं होतं. भाऊ म्हणाला,

" दीदी, दाजी गुपचूप निघून गेलं खरं... पण, बघ एक डाव फरक पडला तर. नाहीतर तुझ्यासाठी आपल्या घराची दारं कायम उघडी आहेत. तू कधीही ये. आपण पुन्हा आयुष्याचा डाव खेळूया. पण तू हरु नको.मरण्यापेक्षा आणि टेन्शन घेण्यापेक्षा पुन्हा नवीन घरटं वीण "

सुदामानं दुजोरा दिला,

"खरंच दीदी. तू हरु नको. तू लढ. त्यानं नाहीच जुळवून घेतलं तर तू तिकडं ये. आम्ही आहोत सदैव तुझ्या पाठीशी, काळजी करु नको. उकिरंड्याचा पांग फिटतो आपण तर माणसं आहोत. जातील हेही दिवस. कायम घर करून रहात नसतात... स्वतःला जप... बरं येतो."

रात्रीच्या दहा वाजल्या होत्या. शिला अजून जेवली नव्हती. ती देवेंद्रची वाट बघत बसली होती. खूप उशीरानं तो आला. रोजचा परिपाठ गिरवत. नशेत झिंगत बडबडत. घरात आल्या आल्या शिल्पावर घसरला,

"व्हय व्ह् मॅडम, आज कोण कोण आणली होती ओ मला मारायला..? ये ...मार,मला मार... अगं असले छपन्न आण... माझं कोण वाकडं करत न्हाय... माझ्या पाया पडतात साले... मी काय देव आहे व्हय? कोण माणसं होती ती...? सांग ना?"

शिला त्याच्या तोंडाला लागली नाही. पिणाराच्या तोंडाला लागून काय उपयोग? ती विचारात गढून गेली,

'मोहन भाऊ, सुदामा यांना ओळखत नाही का हा ? ती आपली माणसं.पाहुणी माणसं. आपली माणसं ह्याला मारणार? देव माणसं आहेत ती. भाऊ आपल्या पाठीशी आहे. सुदामा भावासारखाच आहे. त्यानंच आधार दिलाय. आपलं शिक्षण केलं. लग्नालाही तोच पुढं होता. अशा भावांवर यानं आरोप करावेत?'

रात्र झाली. शिलाची झोप विचारांनीच खाऊन टाकली. रात्रभर तिला कसला डोळाच लागला नाही. देवेंद्र मात्र डारडुर करत मस्त घोरत पडला होता. शिलाचं स्वतःचं मन तिला बोलत होतं, ' शिला, कबूल आहे, तुझं नशीब फुटकं आहे. पण नशीब समज, तुझा पुनर्जन्म झालाय. तू स्वतःला संपवायला निघाली होतीस. पण, आत्महत्येनं ते बदलणार नाही, ना तुझा नवरा बदलणार नाही. आता बदलायचंय ते तुलाच. तुझं उध्वस्त झालेलं आयुष्य उभं करण्यासाठी आणखी एक अखेरचा डाव खेळ... पुन्हा घरटं वीण...त्यासाठी तुला स्वतःच्या पायावर उभं राहिलं पाहिजे. दुसऱ्याच्या कुबड्यावर चालू नको. त्या तात्पुरत्या असतात...अगं तुझ्या सारख्या कित्येक पोरी उध्वस्त झाल्यात. अजून होत आहेत...पण त्यांना तू आधार द्यायचाय.

तू निर्धार कर. तू पुन्हा पुढचं शिक्षण घे. नोकरी मिळव. तुझं स्वप्न आहे, गोरगरिबांना आधार द्यायचाय. त्यांच्या मुलांना शिकवायचं. त्यांच्यात रमायचंय. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवायचंय. तुझ्या होणाऱ्या बाळाला घडवायचंय... ऊठ ! आता रडायचं नाही, लढायचं. पुन्हा लढायला सज्ज हो... त्या राक्षसाला शेवटचं ठणकावून विचार.' शिलाच्या मनाने आता उचल खाल्ली. तिच्या अंगात ऊर्जा संचारली...

सकाळ झाली. चांगलं उजाडलं. शिला ऊठली. देवेंद्र अजून घोरतच पडलेला. शिलानं स्वतःचं आवरलं. तोवर देवेंद्र आळोखं पिळोखं देत ऊठला. रात्रीची नशा अजून त्याच्या तोंडावर रुळत होती. डोळं सुजलेलं. लालभडक झालेलं. समोर शिला दिसताच त्यानं काही कारण नसताना तोंडाचा पट्टा चालू केला,

"ए , तुला शेवटचं सांगतोय..."

शिलानं रागानं देवेंद्रकडे हात करत त्याचं बोलणं तोडत बोलली,

"बस्स करा तुम्ही ! आज मीच तुम्हाला शेवटचं विचारतेय,... तुम्ही स्वतःला बदलणार आहात का...? नीटवानी संसार करायचाय की नाही...? मी तुमच्या वागण्याला कंटाळून गेलेय. खूप सहन केलंय मी. आता नाही सहन करणार. आजपर्यंत तुम्हाला खूप समजून घेत आले. पण तुम्ही मला समजून घेतलं नाही... आज मला शेवटचं सांगा, तुम्ही सुधारणार आहात की नाही? नसेल तर,... "

"नसेल तर काय..? ए ए, मला धमकी देतेस काय?"

"ही धमकी नाही. नीट सांगतेय. तुम्ही जर स्वतःला बदलणार नसाल तर मी निघून जाते माहेरला. कायमची... एकदा घराबाहेर पाऊल टाकलं, की पुन्हा माघारी वळणार नाही...दोन-तीन दिवस विचार करा... बघा विचार करा."

"ए ए... जा जा. तुला बारा वाटा मोकळ्या आहेत. तुला जायचं तर दरवाजा उघडाच आहे. माहेरी जायचं का मसणात जायचं तुझा तू निर्णय घे. तू असली काय नसली काय, मला काहीही फरक पडत नाही... मी असाच आहे अन असाच राहणार... जा तू. क्षणभरही थांबू नको इथं."

"बघा, पुन्हा नीट विचार करा... आपल्याला सुखाचा संसार करायचाय. मामंजी आणि सासूबाई तुम्हीही विचार करा...माझ्या पोटात या घराचा वंश वाढतोय... तुमच्या मुलाचा संसार नीटवानी बसवायचा का उध्वस्त करायचा...? नसेल तर मी या घरातून निघून जातेय."

"ए , लय पाणी लावत बसू नको. कुणाला धमक्या देतेस? मला तुझ्याशी संसार करायचाच नाही. चल,. आत्ताच निघ इथून." देवेंद्रचं शेपूट नळीत घातलं तरी वाकडं ते वाकडंच.

आता शिलानं तिचे शब्द ओठातच दाबून धरले. सासू -सासरेही गप्पच. ते बिचारे या राक्षसापुढे काय बोलणार? तेही रोजच्या भांडणाला, गोंधळाला किकून गेलेले. शिलानं आवराआवरीला सुरुवात केली. स्वतःची कपडे सुटकेसमध्ये भरली. सुटकेस

हातात घेतली. देवेंद्रवर शेवटची एक जळजळीत नजर फेकली. आणि ज्या घरात ती उंबऱ्यावरचे माप ओलांडून आत आली होती, आज त्याच घराचा उंबरा ओलांडून तिनं बाहेर पाय टाकला... पुन्हा कधीच माघारी न येण्यासाठी...

काळ सरकत राहिला. दिवसामागून दिवस पळत गेले. शिलाला मोहन भाऊनं, महादेवी वहिनीनं चांगला आधार दिला. सुदामानं मानसिक आधार दिला. अन् आई-वडिलांच्याच्या आशीर्वादानं तिला लढण्याचं बळ मिळालं. तिनं पुन्हा शिक्षणाची कास धरली. शिक्षण पूर्ण केलं. आई वडिलांची सेवा केली...आशीर्वाद घेतला आणि तिच्या कष्टाच्या झाडाला दोन फळे आली. एक फळ नोकरी मिळाली. अन् दुसरे फळ सुंदर, गोंडस आणि सुर्यासारखा तेजस्वी मुलगा तिच्या कुशीत जन्माला आला. तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. सारं माहेर आनंदात न्हाऊन निघालं. शिला शाळेत प्रामाणिकपणे मुलांना मन लावून शिकवू लागली. लहान होऊन त्यांच्यात रमू लागली. नडल्या आडल्या गोरगरिबांच्या मुलांना सुदामाच्या मदतीनं वह्या, पुस्तकं, दप्तर आणि गणवेश मदत करु लागली. समाजसेवेचं व्रत तिनं घेतलं. कित्तेक तरूणींचे संसार नव्याने उभे करण्यात हातभार लावू लागली.

बघता बघता दहा वर्षे झाली. तिला आदर्श कर्तृत्वान महिला म्हणून पुरस्कार जाहीर झाला....पेपरातून बातम्या झळकल्या..पुढे सामाजिक कार्याचेही अनेक पुरस्कार मिळाले...

तिनं बघितलेल्या स्वप्नाची पूर्ती झाली. ती धन्य धन्य झाली. डोळं गच्च भरुन आलं ते आनंदाच्या अश्रुनं. कष्ट, जिद्द आणि चिकाटीने ती स्वतःच्या हिमतीने लढली. तिने केलेल्या कार्याचा अनेक सामाजिक संस्थांनी पुरस्कार देऊन सन्मानाने गौरव केला.

आज शिलाला त्या पुरस्काराकडे बघत बघत तिला मागचा काळ डोळ्यापुढं आठवू लागला... त्यावर ती थोडसं थबकली आणि क्षणात तिनं तो काळ पुसून टाकला. तो काळ तिच्यावर एक एक पराभवाचे डाव टाकत होता. पण तिने त्या काळावर मात केली. आणि, अखेरचा डाव तिनं जिंकला...! आणि पुन्हा घरटं तिनं विणलं!!!

**- अंकुश गाजरे / शेळवे, पंढरपूर**
**मो.- ९७६३३२६६५५**

● **'व्यक्तिमत्व विकास'** हे नियतकालिक मुद्रक, मालक, संपादक आणि प्रकाशक मंगेश विठ्ठल कोळी यांनी कवितासागर प्रिंटींग सर्व्हिसेस, जयसिंगपूर येथे छापून 'व्यक्तिमत्व विकास' कार्यालय, सुदर्शन, प्लॉट १६, पद्मावती सोसायटी, बायपास रोड, नांदणी नाक्याजवळ, जयसिंगपूर - ४१६१०१, तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत येथून प्रसिद्ध केले.

● फोन - ०२३२२ - २२५५०० भ्रमणध्वनी - ०९०२८७१३८२०

● ईमेल - mangeshvkoli@gmail.com

● संपादक - श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

● कार्यकारी संपादक - डॉ. सुनिल दादा पाटील

● वादविवाद जयसिंगपूर न्यायालयाच्या कक्षेत.

● या अंकामध्ये प्रकाशित झालेल्या मजकुराशी मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

● पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी मंगेश विठ्ठल कोळी यांच्यावर आहे.

● व्यक्तिमत्व विकास या नियतकालिका मधून प्रसिद्ध झालेल्या कथा, कविता, लेख व अन्य साहित्यांचे सर्व हक्क राखून ठेवलेले आहेत.

● **वार्षिक वर्गणी** - ४९९/-

● प्रकाशनाचा वार - प्रत्येक आठवड्याचा शनिवार

● वितरणाचा वार - प्रत्येक महिन्याचा शेवटचा शनिवार

# आभाळ गेलं फाटून

आम्हा कुणब्याला निसर्ग मारतो बोळीमध्ये गाठून
जीणं आमचं लुटून खातात सगळे वाटून वाटून
तुम्हीच सांगा जगायचं कसं आभाळ गेलं फाटून ॥ धृ॥

जगताच्या पोशिंद्याला कुणीच नाही वाली
घासातला घास देणारा त्याचीच दैना झाली.
सुखा दुकाचं दमा धीराचं त्याचं बांध गेलं फुटून
तुम्हीच सांगा जगायचं कसं आभाळ गेलं फाटून ॥

आत्महत्या कहाणी होऊन फक्त चर्चेमध्ये भिजते
सय धन्याची उषाला घेऊन बायको उपाशी नीजते
चिल्या पिल्याच्या भरारीचं पंखच गेलं तुटून
तुम्हीच सांगा जगायचं कसं आभाळ गेलं फाटून ॥

सरकार म्हणतं आम्ही आहे शेतकऱ्याच्या पाठी



जाणून बुजून पाठीत हाणतं आश्वासनांची काठी
यालाच म्हणतात खोटं बोल पण बोल रेटून रेटून
तुम्हीच सांगा जगायचं कसं आभाळ गेलं फाटून ॥

शेती म्हणजे झाली आता आळवावरचं पाणी
शेतकऱ्याला धत्तुरा अन् दलाल खातो लोणी
माल आमचा भाव त्यांचा ही रीत आली कोठून
तुम्हीच सांगा जगायचं कसं आभाळ गेलं फाटून ॥

कृषि प्रधान देशामध्ये कुणब्याची झाली माती
जगणं झालं महाग आमचं मराण आलं हाती
आमच्यासाठी तुमचं काळीज असं का गेलं गोठून?
तुम्हीच सांगा जगायचं कसं आभाळ गेलं फाटून ॥

– हरिश्चंद्र पाटील / टेंभुर्णी
मो.– ९८६०८८३६१०

# संस्काराची शिदोरी



शाळा सुटली होती.सूर्य पश्चिमेला आकाशातून खाली उतरत होता. अजूनही उष्ण प्रखर किरणे फेकत असल्याने उघड्या डोळ्याने त्याच्याकडे पाहणे शक्य नव्हते.त्यामुळे खाली मान घालून पाठीवरचे दप्तराचे ओझे आवरत सागर घराकडे चालला होता. वडिलांचे छत्र हरवलेला आईचा लाडका!समोर त्याचं घर आणि अंगणात लाडक्याची वाट पाहत बसलेली त्याची आई त्याला दिसत होती. रस्त्यातले दगड गोटे पायाने उडवत तो कसातरी रखडत रखडत चालला होता. तेवढ्यात त्याला एक पाच रुपयाचे नाणे समोर दिसले.ते त्याने पटकन उचलून घेतले. मूठ आवळली.पुन्हा उघडून बघितले. होय, पाच रुपयाचे नाणे!एकच आहे की आणखी काही नाणी पडलेली आहेत, याचा शोध घेत त्याने घर गाठले.आईसमोर मूठ आवळून धरून त्याने विचारले,

" आये,माझ्या हातात काय आहे,ओळख."

आईने थोडा विचार केल्यासारखे केले,म्हणाली,

"गोटी असेल. दुसरं काय असायचं!"

"नाहीच !पुन्हा सांग!"

पोराच्या मुठीत काय असावं हे तिला सुचेना.तेव्हा त्याने मूठ उघडली.

" हे बघ. पाच रुपये!"

" कुठलं रे?"

"त्या तिथं सापडले!"

"चल बरं. कुठं सापडलं ते दाखव."

'कोणाचे तरी हरवले असावेत. कोणी शोधत आले तर ज्याचे त्याला देऊन टाकू' असे म्हणत दोघेही मायलेकरं रस्त्याने निघाले.

तर समोरून यांच्या घरापाठीमागील गल्लीत राहणारी धुरपा आज्जी डाव्या काखेत नातुला घेऊन काहीतरी हुडकत येत असलेली दिसली. खाली वाकून काहीतरी उचलायची आणि पुन्हा चालायची.तिची शोध मोहीम सुरू होती.

" काय हरवलय कायवं आक्का?"

"व्हय तर काय ?नशीब माझं! या बाळाच्या हातातलं पाच रुपये कुठं पडलं बघा. हेची आई गेलीय कामाला .ती येतीय सांच्याला.त्याला दिवसभर मीच संभाळतेय.हे लागले रडायला. भूक लागली की रडतय.नाहीतर खेळतोय खुशाल.घरात खायला द्यायलाबी काय न्हाय.म्हणलं बिस्कीटचा पुडा आणावा. हेच्या हातात पैसे दिलं. दुकानापातुर गेली तर कुठे हायत पैसे?ह्येनं कुठं टाकलं काय माहित. लागलीय हुडकायला!"

एवढं ऐकून घेतल्यावर सागरनं हात पुढे केला आणि मूठ उघडली.

" आज्जी हे तुझे पाच रुपये!"

"आरं माझ्या सोन्या.तुला घावलं व्हय?"

धुरपा आज्जीनं सागरच्या डोक्यावरून,तोंडावरुन मायेने हात फिरवला.'माझा आशीर्वाद लागल तुला'.पैसे मिळाल्यामुळे तिला आनंद झाला.

घराकडे परत येताना आई सागरला म्हणाली,

"सागर फुकटचं कोणाचं काही मिळालं तर ते घेऊ नये.पचत नसतं.कष्ट करावं आणि कष्टाचं खावं.चोरी लबाडी तर मुळीच करु नये.आज्जीला किती आनंद झाला बघ.नाही तर ती तळमळली असती.बाळाला खाऊ द्यायला तिच्याकडे काहीच नव्हतं. बाळ रडल असतं.तिला फार दुःख झालं असतं.असे सापडलेले पैसे किंवा धन ज्याचे त्याला परत करावे.नाही तर त्यांचा तळतळाट लागतो."

आई नेहमीच बरच काही सांगत असते.शब्दन शब्द सागरच्या चांगले लक्षात राहायचे.

सागरच्या शाळेत 'हरवले- सापडले'हा उपक्रमही राबवला जायचा.एखाद्याची वस्तू हरवली तर ज्याला सापडेल त्याने ती वर्गशिक्षक किंवा मुख्याध्यापकांकडे जमा करायची. प्रार्थनेच्या वेळी ज्याची हरवली असेल त्याला ती परत करायची आणि वस्तू आणून देणाऱ्याचे त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल शाबासकी देऊन अभिनंदन केले जायचे. योग्य प्रकारचे बक्षीसही दिले जायचे.

एकदा सागरला शाळेतून घरी जाताना एक कंपास पेटी सापडली.त्याने ती उघडून पाहिली.दोन बॉल पेन, पेन्सिल, रबर आणि कंपास पेटीतील इतर साहित्य होते. त्याने ती आईला दाखवली.तर आई म्हणाली,

"उद्या प्रार्थनेच्या वेळी तुझ्या शिक्षकाकडे देऊन टाक. सापडलेली वस्तू ठेवून घेऊ नये. ज्याची त्याला मिळायला हवी.

दुसऱ्या दिवशी प्रार्थने अगोदर सागरने कंपास पेटी शिक्षकाकडे दिली.ती सातवीत शिकणाऱ्या मुलीची होती. बबली तिचं नाव होतं. शिक्षकाने तिला ती परत केली.'बबलू वस्तू अशा हरवत जाऊ नकोस. नीट सांभाळून ठेवत जा.'अशा सूचनाही केल्या.

बबली झोपडीत राहणारी गरीबा घरची मुलगी. आईने जुन्या कापडाची शिवून केलेल्या पिशवीतून ती वह्या-पुस्तके कंपास घेऊन शाळेत यायची. तिला चांगले दप्तर नव्हते आणि अंगावर चांगला गणवेशही नसायचा. घरी जाताना पिशवी फाटून कंपास कधी कुठे पडले ते तिला समजलेच नाही.

सागरला पुढे बोलावून त्याचे कौतुक केले.

"शाब्बास सागर! तू फार प्रामाणिक आहेस!तू फार चांगला मुलगा आहेस!सर्व विद्यार्थी आणि शाळेमार्फत तुझे अभिनंदन!"

विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवल्या. मुख्याध्यापकांनी केलेल्या कौतुकामुळे त्याला खूप आनंद झाला. आईनेही त्याचे कौतुक केले.

एकेदिवशी बबलीला घरचे काम आटोपून शाळेत यायला उशीर झाला होता. प्रार्थना संपून सर्व वर्गात गेले होते.प्रार्थनेच्या मैदानावरुन जाताना तिच्यापुढे काहीतरी चमकले. तिने ते उचलले. पाहते तर मुलीच्या कानातील रिंग!कसली असेल बरे! खरी सोन्याची का नकली? कसली का असेना! तिने ती रिंग मधल्या सुट्टीत वर्गशिक्षकाकडे दिली. दुसऱ्या दिवशी पीटी शिक्षकाने माईकवरुन विचारणा केली.

“कोणाचे काही हरवले असल्यास त्याने पुढे यावे.”

नववीत शिकणारी सायली पुढं आली.आपल्या कानातील सोन्याची रिंग काल कोठेतरी हरवल्याचे तिने सांगितले.कान पुढे करून दुसरी रिंग असल्याचे दाखवले. बबलीला पुढे बोलावून सर्वांसमोर उभा राहण्यास सांगितले.

“या बबलूने तिला सापडलेली सुमारे चार ते पाच हजार रुपये किमतीची सोन्याची रिंग प्रामाणिकपणे आणून दिली. त्याबद्दल तिचे सर्व विद्यार्थी व विद्यालयामार्फत अभिनंदन! तिच्या प्रामाणिकपणाबद्दल माननीय मुख्याध्यापक यांचेमार्फत शंभर रुपयाचे बक्षीस देण्यात येत आहे.सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्याने टाळ्या वाजवल्या.टाळ्या वाजवून बबलीचे अभिनंदन केले गेले.

सायलीला तिची रिंग मिळाली. तिने बबलूचे मनापासून आभार मानले. संध्याकाळी रिंग मिळाल्याचे आईवडिलांना सांगितले.तेव्हा बबलू विषयी चर्चा झाली.सायलीची आर्थिक परिस्थिती चांगली होती.दुसऱ्या दिवशी सायलीचे वडील प्रार्थनेच्या वेळी शाळेत आले. बबलूला समोर बोलावून सर्व विद्यार्थी व शिक्षकांच्या समोर शाळेचा गणवेश देऊन आणि हार घालून त्यांनी बबलीचा सत्कार केला.पुढील शिक्षणासाठी मदत करण्याची तयारी दर्शवून तोंड भरुन कौतुक केले.बबलीच्या मनी ध्यानी नसतांना अनपेक्षितपणे हे सारे घडून आले होते.

त्या दिवसापासून सायली आणि बबली एकमेकींच्या चांगल्या मैत्रिणी झाल्या. त्या एकत्र डबा खायच्या. एकत्र खेळायच्या.एकमेकींना मदत करायच्या. एकमेकींच्या घरी यायच्या जायच्या.

कळत-नकळतपणे शाळा अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या वर संस्कार करत होती.दरवर्षी शेकडो विद्यार्थी शाळेतून बाहेर पडत होते.शाळेने केलेले संस्कार आचरणात आणून समाजात महत्त्वाचा घटक म्हणून वावरत होते.

सागर आता मोठा झाला होता. दोन लेकरांचा बाप!रिक्षा चालवायचा! सकाळी लवकर शहरात जायचा आणि रात्री उशीरा घरी यायचा! खूप कष्ट करायचा! गावातील वयोवृद्ध, आजारी,अवघडलेली महिला अशा नडलेल्यासाठी त्याची रिक्षा सदैव तयार असायची.अडचणीत मदतीला धावणारा विश्वासू आणि प्रामाणिक माणूस म्हणून त्याची ख्याती झाली होती.

एके दिवशी सकाळी रिक्षा पुसत असताना त्याला रिक्षात सीटच्या पाठीमागे एक कापडी पिशवी दिसून आली. कोणाची विसरली असेल बरे!असा विचार करत हात घालून तपासली. एक छोटा मोबाईल आणि एक बटवा हाती लागला. बटवा उघडून बघितला तर त्यात एक सोन्याची बोरमाळ,दीडशे रुपयांच्या नोटा आणि थोडी चिल्लर होती. तो घरात आला. कोणाचे असावे असा विचार करत असताना त्याचे लक्ष आईच्या फोटो कडे गेले.

"कोणाची का असेना ज्याचे त्याला देऊन टाक!फुकटचे कोणाचे काही घेऊ नये. कष्टाने कमवत जा!"

जणू त्याची आई सांगत असल्याचा त्याला भास झाला.

काल रात्री एका आज्जीला आपण गणेश नगरच्या शेवटच्या स्टॉपवर सोडले होते.ही त्यांचीच पिशवी असली पाहिजे.पण त्यांना शोधायचे कसे?त्याने त्यातल्या मोबाईलवरचा पहिला नंबर डायल केला.

"हॅलोss"

" हॅलोssआई तुझ्या मोबाईल वरून फोन आलाय."

सागर आणि पलीकडच्या

व्यक्तीचे बोलणे झाले.सागरने त्यांचे नाव व पत्ता विचारून घेतला आणि थोड्याच वेळात रिक्षा घेऊन त्यांच्या घरी पोहोचला.

"ही घ्या तुमची पिशवी! रिक्षात विसरला होता ना!"आपली बोरमाळ आणि पैसे जसेच्या तसे परत मिळाल्यामुळे रात्रभर हळहळ करत तळमळणाऱ्या आजींचा चेहरा आनंदाने फुलला. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. कोणत्या शब्दात आभार मानावेत हेही त्यांना कळेना.

" अरे बेटा,माझ्या ह्यांनी काबाड कष्ट करून पैसा पैसा साठवून ही बोरमाळ केली होती.त्यांची तेवढीच एक आठवण म्हणून मी वापरते आहे.काल माझ्या मैत्रिणीच्या नातीच्या वाढदिवसाला गेले होते. बसमध्ये चढताना उतरताना चोऱ्या होतात. अलीकडे बायकांच्या गळ्यातले दागिने खेचून चोर पळून जातात. म्हणून मी बोरमाळ काढून पिशवीत ठेवली होती.पण तेवढी पिशवीच कुठे विसरले ते कळाले नाही.अजून माणुसकी जिवंत आहे तर!तुझ्या रुपाने देव पावला. तू भला माणूस---

खरा प्रामाणिक,इमानदार---म्हणून सापडलेल्या वस्तू घरी आणून दिल्यास---

धन्य तुझे आई वडील--

माझे आशीर्वाद आहेत तुला---"

आजी डोळे पुसत बोलत होत्या आणि त्यांचा मुलगा शांतपणे ऐकत होता.पाहत होता.तो म्हणाला,

"अहो ही दोन तोळ्याची म्हणजे साधारण पन्नास हजाराची बोरमाळ तुम्ही आणून दिली. तुमचे आभार कसे मानावेत आणि तुम्हाला काय बक्षीस द्यावे? हे दोन हजार

रुपये घ्या आईतर्फे बक्षीस म्हणून---"

दोन हजाराच्या नोटा त्याने सागरच्या पुढे धरल्या.

" आभार माझे मानू नका. त्या परमेश्वराचे माना. मला हे बक्षीस आणि पैसे नकोत.मी फुकटचे कोणाचे काहीही घेत नाही.ही माझ्या आईची ताकीद आहे."

"कुठं आहेत तुमच्या आई?घरी आहेत?"

"नाही.ती हयात नाही"

सागराचे डोळे पाणावले.दुःखद भाव त्याच्या चेहऱ्यावर पसरले.

अशी माणसेही आहेतसमाजात याचे आज्जी व  मुलाला नवल वाटले.त्याने मोबाईलमध्ये सागरचा फोटो घेतला.नाव,पत्ता व कुटुंबाची माहिती घेतली. चहापाणी झाल्यावर सागरने त्यांना हात जोडून नमस्कार केला व त्यांचा निरोप घेतला.

आजीचा मुलगा पत्रकार होता. दुसऱ्या दिवशीच्या सर्व वर्तमानपत्रांमध्ये सागरचा फोटो आणि त्याने रिक्षात विसरलेली पिशवी, बोरमाळ, पैसे प्रामाणिकपणे कशी घरी आणून दिली.'रिक्षा चालकाचा प्रामाणिकपणा' या हेडिंगखाली सविस्तर बातमी छापून आली. सर्व रिक्षाचालकांनी सागरचा हार शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. शेजारीपाजारी,मित्रमंडळी आणि गाववाल्यांनी त्याचे अभिनंदन केले. रात्री घरी आल्यावर हार शाल-श्रीफळ आणि वर्तमानपत्र त्याने आईच्या फोटो समोर ठेवले आणि हात जोडले.

"आई ही तुझी किमया आहे. शाळेची देण आहे. संस्कार आहेत. नाहीतर माझा फोटो पेपरात कशाला कोणी छापला असता!कष्ट करावेत,चोरी करू नये, नेहमी खरे बोलावे, दुसऱ्याचे वाईट चिंतू नये, वाईट करू नये- ही तुझी शिकवण!हे तुझे बक्षीस आहे! हे घे!"असे पुटपुटत त्याने फोटोला नमस्कार केला.

त्याची दोन्ही बालके त्याच्या पायाला मिठी मारत होती आणि पत्नी अभिमानाने पाहत होती. सागरची प्रतिष्ठा अधिकच वाढली. सारे त्याला एक भला माणूस,देव माणूस म्हणून मानू लागले.आई-वडील आणि शाळेची संस्काराची शिदोरी माणसाला आयुष्यभर 'चांगला माणूस' म्हणून जगण्यास उपयोगी पडते हे मात्र खरी गोष्ट आहे.

**- भास्कर बंगाळे / पंढरपूर**
**मो.- 9850377481**

# डिजिटल शाळा उपयोगी?



कोरोना महामारी आरोग्य संकटात समाजव्यवस्थेत मोठे बदल पहायला मिळत आहेत. खरंतर संपूर्ण जगातच जगण्याच्या पद्धतीत मोठे बदल झाले. दैनंदिन गोष्टीतही मोठे बदल पहायला मिळत आहेत. तर शिक्षण क्षेत्रात कोरोना मुळे खूप बदल घडले डिजिटल म्हणजेच ऑनलाईन शाळा हा त्यापैकीच एक.

शाळा म्हटलं की, युनिफॉर्म घालून, बसची वाट पाहत, शाळेची प्रार्थना तसेच दुपारची सुट्टी पेटीच्या तासाची मस्ती करताना मुले किंचित कंटाळलेल्या चेहऱ्यांनी जाणारे लहान मुलं दिसत तीच मुलं आता लॅपटॉप, आयपॅड किंवा स्मार्टफोनसमोर बसलेले दिसत.

त्याचे फोटो सोशल मीडियावर गेल्या अनेक दिवसांपासून फिरत आहेत. विद्यार्थ्यांबरोबर पालकांनाही ही व्यवस्था नवीन आहे. पण याची खरंच गरज आहे का? किती दिवस हे चालणार? त्यामुळे शिक्षणाचं डिजिटायजेशन व्हायला मदत होईल का? मुख्यत: शाळेचं काम हे झूम या ॲपवरुन चालतं. त्याच्या सोबतीला व्हॉट्स ॲप, इमेल, विविध ॲप या पहिली ते बारावी असलेली ही शाळा सध्या डिजिटल स्वरुपात गेली आहे. नववी आणि दहावीचे वर्ग झूमवर सुरु असतात. होण्याचं आवाहन केलं. त्यामुळे नोट्स लिहायला मदक्षक- विद्यार्थी यांच्यातला थेट संवादही तितकाच महत्त्वाचा आहे. लॉकडाऊनच्या काळात डिजिटल शाळेची एक नवी पद्धत समाजाने अंगीकारी आहे.पाटी ते डिजिटल पाटी शिक्षणाचा प्रवास चालू आहे त्यात अनेक मोठे बदल झाले शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये दुरावा निर्माण झाला शिक्षकांबरोबर पालकांनीही आपल्या विद्यार्थ्यांकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे विद्यार्थ्यांकडून डोळ्याचा व्यायाम सांगायला हवा.

ऑनलाईनची खरंतर गरजच नाही. फक्त नीटला बसणाऱ्यांचा हा प्रश्न आहे. मुलांना स्क्रीन मोठी पाहिजे. मुलं बोलत नाही. व्हीडिओ ऑफ करतात. बोला म्हटलं तरी बोलत नाही. सारखं त्यांना आवाज येतो का हे विचारण्यात वेळ जातो. शिक्षक- विद्यार्थी यांच्यातला थेट संवादही तितकाच महत्त्वाचा आहे. लॉकडाऊनच्या काळात डिजिटल शाळेची एक नवी पद्धत समाजाने अंगीकारली खरी. पण ती प्रत्यक्ष शाळेला पर्याय ठरेल का या प्रश्नाचं उत्तर येणारा काळच ठरवेल. सध्याच्या काळात डिजिटल, ऑनलाईन प्लेटफॉर्म्सला विरोध करणे योग्य होणार नाही. त्याची एक मर्यादा असली तरी ज्यांच्याकडे ग्याझेट्स आहेत त्यांच्यासाठी उपयुक्तता मोठी आहे. कोणकोणत्या गोष्टी ऑफलाइन करता येतील याचाही अत्यंत गंभीरपणे विचार करायला हवा.स्क्रीन टाइम जितका वाढेल तितके मुलांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम संभवतात .

**- अंजली पाटील / विटा**
**मो.- 9527897213**

# देवमाणूस



आयुष्यात  जिथे तिथे, वळणावर-आडवळणावर, अनोळखी - ओळखीचे खूप माणसं दिसतात. मला माणसं वाचायला आवडतं. विदेशात तर ठिकठिकाणी बेंचेंस असतात .एका ठिकाणी बेंचवर आरामात बसावं अन् तऱ्हेतऱ्हेची चित्र विचित्र माणसं वाचावी. ती कशी मनाला स्पर्शून जातात.

जीवनात तऱ्हेतऱ्हेची  माणसं भेटतात.विविध अनुभव येतात. मनाला कधी दुखविणारे कधी सुखविणारे असतात .खूप वेळा देव माणसं भेटतात.म्हणूनच सत्यं शिवं सुंदरम् वर विश्वास आहे.

....अजूनही आठवतं.आम्ही आठव्या वर्गात होतो.त्या दिवशी शाळा लवकर सुटली.आमच्या रेल्वे स्टेशनच्या पलिकडे राहणाऱ्या आमच्या वर्गमैत्रिणीकडे आम्ही संक्रांतीच्या हळदी कुंकवाला शाळेतूनच परस्परच गेलो. तिच घर दूर होत. जातांना रिक्षातून गेलो. तिच्या घरी हळदी कुंकु, हलवा, तिळगूळ देणं, वाण देणं, बोरं खाणं मजा आली. तिच्या घराजवळ घसरगुंडी पाळणा होता. घसरगुंडीवरुन घसरलो. पाळण्यावर मस्त झुललो. खूप खेळलो, खूप हसलो, खूप मजा केली येतांना प्लॅटफॉर्मवरुन रुळावरुन जायचं होतं.

कारण तिच्या घरुन रिक्षा मिळत नव्हती. तेंव्हा रेल्वेचा पूल ही नव्हता. ती म्हणाली " मी येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या बघते. मी सांगितल्याशिवाय कुणीही खाली उतरायचे नाही."ती गाड्या बघतच होती.

पण तेवढ्यात कशी काय एक वर्ग मैत्रिण  रेल्वे ट्रॅकवर उतरली. तेवढ्यात झुकझुक आवाज करत आगगाडी आली. ती रुळांवरुन समोर समोर पळत होती, तिच्या मागे आगगाडी येत होती. अंतर कमी कमी होत होतं. प्लॅटफॉर्मवर उभे असलेले लोक घाबरलेले, धडधडत्या ह्दयाने बघत होते ! कुणाला काही सुचत नव्हते.

तेवढ्यात लाल शर्ट घातलेला एक हमाल धावत आला. "आओ बिटीयॉ " जोऱ्यात म्हणत त्याने  आपले दोन्ही हात समोर पसरले. ती झट वळली. तिला त्याने वर उचलून घेतले. एका मिनिटात गाडी निघून गेली. त्याच्यातल्या माणुसकीचे साऱ्यांना दर्शन झाले.

त्या दिवशीसगळ्यांना तो हमाल देवासारखा वाटला. तिला तर देव भासला. आमचे सगळ्यांचे ह्दय धडधडत होते. तिच्या डोळ्यातून अश्रू पाझरत होते. आम्ही सगळ्याच अश्रुभरल्या डोळ्यांनी समजावत होतो. एकमेकींशी बोलत होतो.

ते अश्रु सुखद होते.

शेवटी तिच्या भावाने दोन रिक्षे आणले आणि आम्ही सगळ्या रिक्षानेच घरी आलो.

....माझी मैत्रिण आणि मी आम्ही म्हैशाहून सकाळच्या आठच्या बसने  हैद्राबादला

चाललो होतो. निजामबादच्या बसस्टँडवर बस थांबली. आम्ही कंडक्टरला सांगून खाली उतरलो.येऊन बघतो.. तो बस नाही ! आम्हाला घाबरल्यागत झालं. बसमध्ये सुटकेस होती.

विचार केला दुसऱ्या बसने जावं का? पण हैद्राबादला जाणारी दुसरी बस स्टँडवर लागलेली नव्हती. आम्ही विचार करत होतो. काय कराव? तेवढ्यात तिच आमची बस परत आली. कंडक्टर खाली उतरला. आणि म्हणाला "मॅडम बसमध्ये बसा"

आम्हाला आश्चर्य वाटलं!

कंडक्टर म्हणाला "थोड दूर गेल्यावर तुम्हाला सोडून गेल्याचं लक्षात आलं. बाईमाणूस... तुम्ही काय कराल ? म्हणून ड्रायव्हरला पुन्हा बस वळवायला सांगितली."

पॅसेंजर म्हणाले "अशा कोणत्या मोठ्या आहेत त्या? तुम्ही बस वापस आणली?"

"त्या महिला आहेत, त्या स्त्री आहेत, दोघीच बाया आहेत हिच गोष्ट मोठी आहे. आमच्यावर त्यांची जबाबदारी आहे. प्रत्येक प्रवासी व्यक्तीची आमच्यावर जबाबदारी असते."

खरंच आज त्याच्यामधली माणुसकी आमच्या काळजाला स्पर्शून गेली. मनापासून आभार मानले.

....एक महिला ॲटोमध्ये बसल्यावर तिचं अचानक पोट दुखायला लागलं. बहुधा या माऊलीची बाळंतपणाची वेळ आली असावी हे ॲटोवाल्याच्या लक्षात आले. ॲटोवाल्यानी तिला विचारून सरळ दवाखान्यात नेलं.तिने घरी फोन केला. तिला बाळंतकळा सुरु झाल्या होत्या. डॉक्टरांनी तिला ॲडमिट करुन घेतलं.

ॲटोवाला बाळाचा जन्म होईपर्यंत थांबला होता. तिच्या घरच्यांनी त्याचे मनापासून आभार मानले.

त्याच्यातल्या माणुसकीला खरोखर सलाम!तिने त्याच्यातील माणुसकीला नमस्कार केला. असे देवमाणसं विश्वात असतात. आपल्या भेटत असतात.

...आम्ही लंडनला स्विस ॲम्बसिला चाललो होतो. सव्वा दहाची अपॉइंटमेंट होती. दूर असल्यामुळे लवकरच निघालो. साडे नऊला पोहचलो. स्विस ॲम्बसिची बिल्डिंग समोर दिसली. पण रस्ता सापडेना! टॉमटॉम मध्येही रस्ता दिसत नव्हता! शेवटी कार थांबवून तिथल्या लोकांना रस्ता विचारायला सुरुवात केली.मी एका गोऱ्या वयस्क व्यक्तीला विचारले. त्यांनी विचारले "तुम्ही कशाने आल्या ? "

मी सांगितले "टॅक्सीने."

"चला मी तुमच्याबरोबर येतो. कारण रस्ता थोडा कंफ्युज आहे." पाच मिनिटात आम्ही ॲम्बसीला पोहचलो.

खूप खूप धन्यवाद दिले. त्यांना कॉफी घ्या म्हटले, पोहचवून देतो म्हटलं. विनयपूर्वक सगळं नाही म्हटले आणि तो माणूस चालला गेला.

परदेशात एक अनोळखी माणूस माणुसकीला जागून मदतीला आला. देवासारखा

भासला .

असं वाटलं आज हा माणूस देवरुपात भेटला.

अशी देवमाणसं जगभर असतात.

....तुम्हाला आठवत असेल...मदर इंडियातले शेवटचे दृष्य...सभोवती आग लागलेली असते...त्यात नर्गिस अटकते !...पण वास्तवात खरंच आग लागली, आग भडकली. तोवर सारं पॅकअप केलेलं होतं.! परंतू बिचारी नर्गिस त्या आगीत खरोखर अटकली होती. तिला बाहेर निघायला कुठे रस्ताच नव्हता. तिला आत जाऊन सोडवून आणायची कुणाची हिंमत होत नव्हती. शेवटी सुनिल दत्त स्वतः गेला. नर्गिसला तशा भयानक बिकट परिस्थितीतून, त्या आगीतून त्याने तिला सुखरुप बाहेर आणले. नर्गिसचा जीव वाचला. तिला त्यावेळी तो देव वाटला.

त्याच्यातली माणुसकी जागली. एका असहाय स्त्रीला वाचवणं या कर्तव्य भावनेतून, माणुसकीतून त्याने जीवावर उदार होऊन तिला वाचवलं. आपल्याला जीवन देणाऱ्याशी तिने लग्न केले.

मुंबईच्या धुव्वाधार पावसात, गुडघाभर पाण्यात किती तरी लोकांना, तरूण तरुणींना बायकांना, लहान मुलांना, म्हाताऱ्यांना लोकांनी वाचविलं. लहान मुलांना कडेवर घेऊन रस्तापार करून दिला. पुरातूनही माणसांनी माणसांना वाचवलं. माणसातला “माणूस” यावेळी दिसला. माणसातल्या माणुसकीचे दर्शन झाले. हीच माणसाची ओळख आहे. या वेळी त्याचे देवरूप कळले.

कचऱ्यातून मुलांना वाचविणारी, बोअरवेलच्या खड्ड्यातून मुलाला वर सुखरुप काढणारी, रक्तदान करुन दुसऱ्याचा जीव वाचविणारी, किती तरी देव माणसं जगात आहेत. माणुसकी जगणारे माणुसकी जपणारे आहेत. गरीब मुलांच्या शिक्षणाला मदत करणारी, एखाद्या गरीबाला मदत करून त्याच्या घरचे लग्न संपन्न करुन देणारी, औषधोपचाकरिता सढळ हाताने मदत करणारी देव माणसं आहेत.

माणुसकीने वागतांना जात पात धर्म, गाव, ठाव ठिकाणा, ओळख पाळख, स्त्री पुरुष, सुशिक्षित अशिक्षित, गरीब श्रीमंत असं काहीच नसतं.! ही सगळी माणुसकी असलेली, माणुसपण कळलेली, माणुसकीने वागणारी देवमाणसं आहेत.

कृष्णाने द्रोपदीच्या चीरहणाच्या वेळी तिला आपला शेला पांघरुन सभेतून सुरक्षित तिच्या प्रासादात पाठविले! नरकासूराच्या कैदेतून डांबून ठेवलेल्या सोळा हजार स्त्रीयांची सुटका करुन त्यांना आपले पालकत्व दिले .

तेंव्हापासून कृष्ण देव झाला .

छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला मातेसमान मान देऊन तिची सन्मानाने पाठवणी केली! “परस्त्री मातेसमान “ ही त्यांनी राज्याला शिकवण दिली. हा महाराजांनी जनतेला आदर्श दिला. छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे देवासारखे वाटायचे!

प्रत्येकाच्या मनात दैवी- असुरी, सकारात्मक- नकारात्मक प्रवृत्ती असतात. यातील कुठली प्रवृत्ती जागवायची हे त्या व्यक्तीवर अवलंबून असते. सकारात्मक प्रवृत्ती जागते तो माणुसकीने जगतो. माणुसकीची जाण हवी .

माणुसकी प्रत्येकाने पाळायला हवी. दया, प्रेम, लिनता, करूणा हे गुणधर्म जोपासून कर्तव्याशी ईमान राखणारा माणूस असतो. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे. माणुसकीने वागण्याने मिळणारा आनंद चिरकाल टिकणारा असतो.

गरजेच्या वेळी गरज ओळखून जो धावून येतो त्याक्षणी तो देवमाणूस भासतो. त्यावेळी त्याच्यातली माणुसकी जागलेली असते आणि तो माणुसकीला जागतो.ही माणुसकी माणसाला देवाप्रत पोहचवते. प्रत्येक माणसाच्या मनांत, अंतरात देवमाणूस असतो.

ही प्रवृत्ती असते. ती जागवायला आणि जगायला हवी. ती जागृत ठेवायला हवी. अशा देवमाणसांमुळे जग खूप सुंदर बनेल, जीवन सुंदर बनेल.

**- मीना खोंड / हैद्राबाद**
**मो.- 9703942425**

# परतीचा पाऊस



वर्षभर शेतावरी
सेवा मातीची करून
केली मृगाला पेरणी
धान आले तरारून

आल आभाळ दाटून
काळकुट्ट पावसानं
मनी झाला गलबला
गेल सार आवसानं

परतीच्या पावसानं
सोयाबीन हे भिजले
पीक सारे गेले माझे
सारे  रानात कुजले

उभे डोलणारे पीक
पीक झोपलं रानात
झाली पीकाची नासाडी
 काय देवाच्या मनात

फाटलेल्या आभाळाला
कसं लावू मी ठिगळं
पाहू मी स्वप्न कसले
गेलं वाहून सगळं

आला दिवाळी सण
काय सांगू लेकरानां
सुगी गेलीय वाहून
कसं सांगू पाखरानां



**- दत्ता वालेकर / घाटनांदूर**
**मो.- 9421440922**

# अशीही एक ईद...



असीम आणि अमोल हे दोघे चांगले मित्र होते, दोघही एकाच वर्गात शिकत होते ,एकाच शाळेत जात होते, फरक इतकाच होता अमोल आई,बाबा ,आजी, आजोबा यांच्या समवेत राहत होता, तर असिम त्याच्या चाचा चाचीकडे राहत होता. रोज अभ्यास करण्यासाठी तो अमोल कडे यायचा,अमोलचीआई त्याचं कोड कौतुक करायची, आपलेपणाने त्याला जेवायला वाढायची,सणासुदीला त्याला कपडे आणायची, पण का कुणास ठाऊक? असिमला मात्र अमोलची आई फार आवडायची. कधी कधी चिडून त्याची चाची म्हणत असे,

" तू अमोल कडे जाऊन राहा ना!सकाळ, दुपार,संध्याकाळ तिकडेच असतोस, सुट्टीच्या दिवशी पण तिकडेच असतोस"

तेव्हा चाच्या म्हणायचे,

"जाऊदे गं लहान आहे तो, अमोल त्याच्या बरोबरचा आहे, बरं वाटत असेल, इतकी का रागवतेस?"

असे म्हणत ते वेळ मारून न्यायचे.

असाच एके दिवशी खेळताना अमोल आणि असीम बोलत होते, असीम बोलताना सहज बोलला,

" तुझी आई मला खूप आवडते, कधी कधी वाटतं तिला घट्ट बिलगावं आणि खूप खूप खूप रडावं, आठवण येते रे मला माझ्या आईची."

"अरे मग त्यात काय एवढं? कडकडून भेट माझ्या आईला, ती काही रागवणार नाही... जगात एक नंबर आहे माझी आई, आई-बाबांची आठवण येतेय ना?"

"हो ना अमोल.... कधीकधी खूप एकटं वाटतं येथे, त्यांची आठवण येते रे, इतके नाही आठवत ते मला....पण आईची मिठी मात्र मला सारखी सारखी आठवते."

त्या दोघांचं हे बोलणं अमोल चे बाबा ऐकत होते, थोड्या वेळात पोरं बाहेर खेळायला गेली आणि अमोल च्या बाबांना एकेक गोष्ट आठवू लागली. खरेतर पाच-सहा वर्षांपूर्वीची घटना असेल अमोल तेव्हा पाच वर्षाचा होता. नुकताच त्याचा पाचवा वाढदिवस धुमधडाक्यात साजरा केलेला होता आणि एक दिवशी संध्याकाळी दोघेही त्याला फिरायला बागेत घेऊन जात होते. नेमके याच वेळेला भरधाव येणाऱ्या गाडीने त्यांच्या बाइकला धडक दिली.. तशी अमोलची आई उडून रस्त्यावर पडली. अमोल ही पडला होता. छोट्या अमोलला लागू नये म्हणून तिने जीवाचं रान केलं पण तिला मात्र जबरदस्त मार लागला होता, तिला दवाखान्यात हलवण्यात आलं. ज्या गाडीने धडक दिली होती ती गाडी इतक्या वेगात होती की मोटर सायकलला धडक देवून ती

गाडी समोरच्या झाडावर जाऊन आदळली आणि गाडीतले दोघेजण जागीच गेले,दोघे अत्यवस्थ होते. किती भयंकर घटना? एका क्षणात सगळं घडून गेलं होतं ....अमोलच्या बाबांची अवस्था तर विचार करण्याच्या पलीकडे झाली होती. सिटी हॉस्पिटलमध्ये अमोलच्या आईला ऍडमिट करण्यात आले, सर्व चाचण्या केल्यानंतर एक गोष्ट लक्षात आली की डोक्याला जबरदस्त जखम झाली होती आणि त्याहीपेक्षा त्यांच्या हृदयाला मार लागला होता आणि घाबरून तडे गेले होते. खरंतर अशी घटना दुर्मिळ असते पण घाबरून त्यांच्या बाबतीत घडली होती. आयसीयूमध्ये ऍडमिट केल्यानंतर डॉक्टरांच्या ही गोष्ट पटकन आणि प्रकर्षाने लक्षात आली आणि त्या गोष्टीचं गांभीर्य समजावून सांगत डॉक्टरांनी ताबडतोब हार्ट सर्जरी चा सल्ला दिला.

"कोणत्याही परिस्थितीत शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे त्यासाठी दुसरे हृदय उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे कारण पेशंटची अवस्था फारच वाईट आहे"

डॉक्टरांनी परिस्थिती समजावून सांगीतली.

" डॉक्टर काहीही करा.. पण माझ्या पत्नीला वाचवा"

"नक्कीच आम्ही आमच्यापरीने प्रयत्न करणार, ते आमचं कर्तव्यच आहे.... पण.."

"डॉक्टर इथे पण बिन काही नाही"

"हो हो शांत व्हा, प्रामाणिकपणे माझं काम करणार,आम्ही आमच्या परीने सर्वतोपरी प्रयत्न करणार ....फक्त हृदय मिळालं पाहिजे नाहीतर तो पर्यंत त्यांना वेंटीलेटरवर ठेवावे लागेल. "

"डॉक्टर प्लीज.....

"हो तुम्ही शांत राहा..हा तुमचा मुलगा आहे ना..त्याच्याकडे लक्ष द्या..किती गांगरुन गेलाय तो..."

नेमकं याच वेळी...त्या गाडीतील जखमी ही याच हॉस्पिटल मध्ये ऐडमिट होते त्यातील एकाचा मेंदू मृत झाला होता ..डॉक्टरांनी त्यांना विनंती करुन..परिस्थीती सांगीतली..

"तुमच्याच गाडीच्या धक्याने समोरचा पेशंट अत्यवस्थ आहे......त्यांना काय झाले तर तुम्ही स्वत:ला माफ करु शकणार का? मनुष्यवधाचा मोठा गुन्हा होईल...डॉ म्हणून एक योग्य सल्ला देतोय."

"बोला डॉक्टर.."

" तुमच्या मैडम तर या अपघातातल गेलेत....तुम्हाला आम्ही वाचवणारच...पण मन घट्ट करुन इकडे लक्ष द्या....समोरच्या व्यक्तीला हृदयाची गरज आहे आणि इथे हृदय ही उपलब्ध आहे...."

" मग काळजी कसली करताय....करा ना ओपरेशन सगळा खर्च देतो मी नाहीतर अल्ला मला माफ करणार नाही...."

" विषय पैशाचा नाही..तर...."

"मग"

"तुमच्या मैडमचे हृदय जर मिळाले तर त्यांचा जीव वाचेल....इतकचं...तुमची इच्छा..असेल तरच...."

"पण डॉक्टर...."

" तुम्ही ठरवा..तेही लवकरात लवकर....वेळ खूप कमी आहे..नियती कोणताही दोष कधीच स्वत:वर घेत नसते....आणि कोणाच्या तरी माया ममतेचे धागे बनून तुम्ही कायम कोणाला तरी आनंद देवू शकाल...तुम्ही ठरवा आनंदाचे धनी व्हायचे की पापाचे..."

"डॉक्टर..मला पण छोटा मुलगा आहे हो...."

" तेच म्हणतोय तुमच्या मुलाची आई आता या जगात नाही..पण दुस-या कोणा मुलाची आई म्हणून ही हृदयातील माया जपली जाईल..तुम्ही ठरवा.....काय करायचे ते..मी निरोपची वाट पाहतोय...."

अमोलच्या आईचे ऑपरेशन यशस्वी होवून ती सुखरुपपणे घरी आली...फार मोठ्या दिव्यातून ती बाहेर पडली होती....शरीराचा एखादा भाग असा बदलता येतो..हे खरे. तंत्रज्ञान..किती प्रगत झाले असले तरी विधिलिखित टाळता येत नाही....रक्ताच्या नात्या पलिकडेही असे ऋणानुबंध असतात....अमोलच्या बाबानी त्या कुटुंबाचे आभार मानले.विशेष म्हणजे सलीम भाई चे...दिवस सरत होते...काही दिवसानी अमोलचे बाबा त्यांना भेटायले गेले...कागल सारख्या ठिकाणी त्यांचे स्वत:चे अलिशान घर होते...

" या साहेब....."

" काय झाले तब्येतीला...असे अचानक?"

" त्या दिवशी माझ्यामुळे अपघातात दोघे भाऊ गेले..बायको गेली हे दु:ख सहन होत नाहीय.... मला..माझं ..लेकरू पण बिचारं वाटतयं हो आईविना...मी ही जगायची आशा सोडून दिलिय..फक्त लेकराची चिंता..आहे बघा"

"होईल सारे ठिक....मी यासाठी आलोय...तुमचे उपकार कधी विसरणार नाही.. हॉस्पिटल मध्ये तुम्ही काहिच बोलू दिले नाही....पण हा कोरा चेक....?"

"काय बोलताय राव....उलट मी तुमचा गुन्हेगार आहे......तुम्हीच मला क्षमा करा...."

"घडणा-या घटना घडून गेलेत..दुख उगाळून वाढतच जाणार ..."

" म्हणूनच म्हणतोय....एक मित्र म्हणून सांगतोय...तुम्ही तक्रार नाही केलीत की मला दोष नाही दिलात...माणूसपण जपलयं"

"तुम्ही तर देवदूत बनलात..थोडे तरी उपकार फेडण्याची संधी द्या."

" मी कोण...सारी त्याची करणी....."म्हणत सलीम भाई नी चेक स्विकारला नाही....................

त्या दिवशी सलीम भाई नी चेक नाही घेतला..खर तर ह्दयाची किंमत अनमोल होती...त्यानंतर सलिमभाई काय त्या धक्क्यातून न सावरता अल्लाला प्यारे झाले.......आणि चाचा

चाचीने असिम ना इकडे आणले...हाच तो असिम....त्याला त्याच्या आईचं ह्दय बोलावत असेल का? आईच्या ओढीने तो इकडे येत असेल का?........ही अंतरीची ओढ असेल का...? अमोलच्या बाबांच्या मनात शेकडो प्रश्न पिंगा घालत होते. नक्कीच ....आणि त्यांनी मनाशी एक निश्चय केला....अमोलच्या आईला विश्वासात घेवून एक निर्णय घेतला....चाचा चाची ही आता थकले होते त्यांचीही समजूत घातली... सर्व सोपस्कार कागदोपत्री पुर्ण केले...आणि तो रमजान महिन्याचा शेवटचा पवित्र दिवस म्हणजे ईद....त्या दिवशी असिमच्या घरी अमोलला घेवून ते ईद साजरा करायला गेले....असिमला, चाचा चाचीला नवे कपडे...मिठाई घेतली....गप्पा गोष्टी झाल्या आणि.....जो क्षण त्यांना साजरा करायचा होता तो समोर उभा होता

" चाचा चाची खूप धन्यवाद ...तुमच्यामुळे ही संधी लाभली आहे....संधी कधीही बुरखा पांघरुन किंवा पंख लावून येत नाही तर ती अशी सोनपावलांनी येते..आणि ती स्विकारायची आम्ही ठरवली आहे...तेवढीच उपकारांची परतफेड"

असे म्हणत त्यांनी असिम ला जवळ बोलावले....

"बेटा तुला आमच्याकडे यायला आवडते ना"

"हो"

"मग राहायला आवडेल"

"खरचं आवडेल....काकी मला खूप आवडतात "

"नक्की"

"हो"

"ये मग भेट,काकीला..तुला भेटावेसे वाटते ना..कडकडून....."

तसा असिम धावत आला आणि अमोलच्या आईच्या मिठीत शिरला...जणू या ह्दयीचे त्या ह्दयी कळले...अंतरीची ओढ उफाळून आली....अमोल ही खूप खूष झाला कारण असिम आता कायमचा त्यांच्याकडे राहणार होता....

अमोलच्या बाबांना उपकारांची परतफेड केल्याचे समाधान लाभले.

असिमच्या चेह-यावर असीम समाधान होते....खरचं रक्तांच्या नात्यां 0पलिकडे काही नाती असतात...सगळेच अगदी सगळेच भेद भेदून....आणि ह्दयाची भाषा ह्दयाला कळतेच...ती ओढच आपणाला ओढून आणत असते..एका वेगळ्याच उर्मीने......राम काय रहिम काय त्याचीच रुपे ...फक्त आपल्याला ती जपता आली पाहिजेत...इतकेच....मग अशीही एक ईद साजरी करता येते.....

**- डॉ शीतल शिवराज मालूसरे / महाड**
**मो.- 9850963181**

# वाटा वळण



जर....
तुमचा ज्ञानसाठा
समृद्ध झाला तर
तुम्हाला ज्ञानमार्ग
नक्की सापडतो.
ह्याच....
मार्गाने तुम्हाला
ईश्वराकडे सहज जाता येते.
आणि....
तुम्ही जर भक्तिमार्ग
स्वीकारला तर
ईश्वर तुमच्याकडे चालून येतो.
म्हणून....
ज्ञानमार्ग आणि
भक्तिमार्ग हे
ईश्वर प्राप्तीची
वाटा वळण ठरतात



- पद्माकर कळसकर / अकोला
मो.- 9923962740

# सबला स्त्री



सध्याच्या धकाधकीच्या जीवनात खचून न जाता सर्व निराशाजनक परीस्थितींना बाजूला सारून येणाऱ्या दुःखांना हसतखेळत सामोरे जाण्यासाठी एकविसाव्या शतकातील महिला सक्षम होत आहेत. लोकसंख्येच्या जवळपास निम्म्या संख्येने असणारा स्त्रीवर्ग हा देशाच्या विकासाचा कणा म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

गतकाळातील आपल्या आदर्श असणाऱ्या स्त्रीयांची नुसता महती गाऊन चालणार नाही तर त्यासाठी आजच्या स्त्रीवर्गाच्या विकासासाठी सर्वांनीच ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. बऱ्याच वेळा सरकारी अनेक योजना येतात नी जातात पण ग्रामीण भागातील स्त्रियांच्या पर्यंत त्या कीती पोहचतात? हा प्रश्नच आहे? ग्रामीण भागातील महिलांच्या अनेक समस्या आजही पूर्णपणे संपुष्टात आल्या नाहीत. त्यांना मिळत असलेल्या सुखसुविधांचा, शिक्षणाचा अभाव, शिक्षणाबद्दलची अनास्था व सध्याचे असुरक्षित वातावरण, बदललेली सामाजिक परिस्थिती, समाजातील स्त्रियांच्या कडे बघण्याची बदलती हिंसक व पाशवी मानसिकता यामुळे खेड्यातील सातवी पर्यंतच्या शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी बाहेरगावी पाठवण्याची मानसिकता पालकांच्या मनात जोर धरू लागली आहे. हे जेव्हा पटसंख्येसाठी आजूबाजूच्या खेडेगावात आम्ही फीरतो तेव्हा हे विदारक चित्र डोळ्यासमोर येते. पालकांना खूप समजावून सांगावे लागते. तेव्हा दहावी पर्यंत शिक्षण कसेबसे पूर्ण केले जाते व पुढे लग्न लावून दिले जाते. कारण त्यांच्या प्रश्नांना आमच्याकडे समाधानकारक व धीर देण्यासारखे उत्तर नाही. स्त्रियाआजवर जे पहात आलेल्या आहेत तेच पुढे आपल्याला सोसावेच लागणार आहे अशा विचारामुळे त्या स्वतःला होणारा त्रास सोसत आलेल्या आहेत. त्यामुळे स्वविकास व आरोग्य याकडे त्या दुर्लक्ष करताना दिसतात.

सर्वात महत्त्वाचा प्रश्न येतो तो तिच्या आरोग्याचा कर्ता पुरुष सकाळी लवकर उठून शेतावर, नोकरीसाठी कींवा इतर व्यवसायासाठी बाहेर जातो, तेव्हा जर तिला काही समस्या निर्माण झाल्या तर ती स्वतः दवाखान्यात न जाता ती नवऱ्याची किंवा जेष्ठ व्यक्तींची घरी येईपर्यंत वाट पहावी लागते. त्रास सोसावा लागतो. तोपर्यंत कुणीतरी सांगीतलेले घरगुती उपचार केले जातात. पण काहीवेळा हे उपाय जीवावरही बेतू शकतात. यासाठी शासनाने ग्रामीण भागात खास महिलांच्या साठी आरोग्य केंद्र उभारण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे. आरोग्यसेविकांची नेमणूक करून गावातील महिलांना वरचेवर भेटी देऊन प्रत्येक महिलेची आरोग्याची माहिती घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. प्रत्येक महिलेच्या आरोग्यासंबंधीची माहिती जर नोंदवली

गेली तर शासकीय स्तरावरून त्याचे निराकरण करणे सोपे जाईल. घराघरामध्ये संडास असलेच पाहिजेत याची सक्ती करायला हवी. बऱ्याचवेळा संडास बाथरूम नसल्यामुळे महिलांना सकाळी लवकर उठून किंवा संध्याकाळी अंधार पडल्यावर बाहेर जावे लागते. तोपर्यंत तिला त्रास करावा लागल्यामुळे पोटदुखी कींवा पोटासंबधी आजारांना तोंड द्यावे लागते.

हल्ली शासकीय योजनांच्या मुळे ब-याच प्रमाणात संडास बांधलेले आहेत पण शंभर टक्के यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. मासिक पाळी संदर्भात सुद्धा अनेक गैरसमज ग्रामीण भागात आहेत. त्यासाठी शासकीय स्तरावर महिलांच्या सुरक्षेसाठी व आरोग्यासाठी महिला कर्मचारी नेमण्यात आले पाहिजेत व मासिक पाळीसंदर्भातील शास्त्रीय माहिती देऊन जागृती निर्माण केली पाहिजे. व असलेले गैरसमज दूर केले पाहिजेत. कारण या काळात विश्रांतीची गरज असते पण ग्रामीण महिलांना शारीरिक कष्टाची कामे करावी लागतात. याबद्दलही जागरूकता निर्माण करायला हवी. कारण तिच्यावर सर्व कुटुंबाची जबाबदारी असते. ती जर तंदुरुस्त असेल तर ती आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांकडे , मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देऊन भावी नागरिक सक्षम बनवू शकेल. परिणामी भारत देश सशक्त बनेल व योग्य पिढीद्वारे विकास करु शकेल.

विविध सरकारी योजनांची माहिती देऊन त्यांना कोणत्या प्रकारचे मार्गदर्शन हवं आहे हे पाहून त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी स्थानिक पातळीवर बचत गट व महिला मंडळे स्थापन केलेली आहेत त्यांना योग्य मार्गदर्शनासाठी सतत प्रयत्नशील राहून



पाठपुरावा करणे गरजेचे आहे,त्यात सातत्य हे गरजेचे आहे. महिला काहीही करु शकते गरज आहे ती फक्त तिला जागृत करण्याची, प्रेरणा देण्याची, जबाबदारी सोपविण्याची. आज आपण पाहतो सर्वच क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत.

लोखंडावर योग्य वेळी योग्य घाव घातला तरच उपयुक्त हत्यार तयार होते. तसेच स्त्रीला लहानपणापासून योग्य संस्कार व मार्गदर्शन केले. तर ती अशक्य कामसुद्धा आनंदाने करते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिला सर्वांनी आदर देण्याची. आदर द्या,आदर घ्या. हेच सूत्र योग्य आहे. आज अनेक स्त्रियांना बदनामी ला सामोरे जावे लागते. तिची बदनामी करणे म्हणजे तिचे खच्चीकरण करणेच आहे. हे बंद झाले पाहिजे. अनेक स्त्रिया हातवर हात ठेवून निवांत टिव्ही पुढे वेळ घालवतात. त्यांनी स्व चा विचार करायला हवा. आज आपण काही तडफदार महिला पाहतो ज्या पती निधनानंतर, किंवा घरातील कर्ता पुरुष नाकर्ता असेल तर स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पेलत आहेत. अशा प्रेरणादायी महिलांचे जीवन सर्वांच्यासमोर आणले पाहिजे. त्यांचे कौतुक सोहळे आयोजित केले पाहिजेत. आजची स्त्री पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करण्यास सक्षम आहे हे दाखवून देत आहे.

**मी नारी,आई दुर्गाच माझी प्रेरणा**
**करुन सोने संधीचे साधला विकास**
**सन्माची माफक अपेक्षा माझी**
**घडवेन भविष्य माझे झकास**

**- श्रीमती माणिक क. नागावे / कुरुंदवाड**
**मो.- ९८८१८६२५३०**

**(- लेखिका, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०२० च्या अतिथी संपादक आहेत.)**

# तिरंगा



भारत महान देशा
बंधुत्वाचा बंध,
वेगळा आमुचा
त्रिवेणी गंध //१//

बलिदान देऊनी
लिहली स्वातंत्र्याची गाथा
गाऊन गुणगान,
ठेवते चरणी माथा //२//

तीन रंगाच्या
प्रवेश द्वारा समोर,
सडारांगोळी टाकून
अपमान नको राष्ट्र ध्वजाचा //३//

मास्क लावून हारवू
या कोरोनाला,
मदतीचा हात
देऊया पूरग्रस्ताला //४//

थूंकू नका
इकडे तिकडे,
स्वच्छ करू देशाला
झाडे लावा चहूकडे //५//

अनेकांनी आपले
प्राण त्यागिले,
सैनिक आमचे
देशास शहीद झाले //६//



**- श्रुती चौधरी / उस्मानाबाद**
**मो.- ९०११७९४४६९**

# डेनिस डिडरोट इफेक्ट

*रशियात डेनिस डिडरोट* नावाचा एक अभ्यासू वाचक होता. *इ.स. 1765 मध्ये त्याचे वय जवळ पास 52 वर्ष* होते. त्याने खूप ग्रंथ वाचले होते. *त्याचे स्वत:चे मोठे ग्रंथालय* होते. त्याचे संपूर्ण आयुष्य वाचनात; पण गरिबीत गेले. मुलीच्या लग्नासाठी सुद्धा त्याच्याकडे पैसे नव्हते. इतका तो गरीब होता. त्या वेळी *रशियाची राणी कॅथरीनला डेनिस डिडरोटच्या* गरीबीबद्दल कळले. तिने *डिडरोटला* त्याच्याकडील *लायब्ररी विकत घेण्यासाठी 1000 GBP, म्हणजेच 50 हजार डॉलर्स म्हणजे; आजचे जवळपास साडेतीन कोटी रुपये डिडरोटला* देऊ केले. *डेनिस डिडरोटने मान्य केले व त्याने आपले ग्रंथालय विकून टाकले*.

*डेनिस डिडरोट एका दिवसांत खूप श्रीमंत झाला*. त्याने त्या पैशातून लगेच *'स्कार्लेट रॉब'*; म्हणजे एक उच्च प्रतीचा व महाग असा पोषाख खरेदी केला. हा सदरा वापरत असतांना त्याला वाटले की; *आपण उच्च प्रतीचा पोषाख घालतोय; पण आपल्या घरात मात्र तशा उच्चप्रतीच्या वस्तू नाहीत. मग त्याने हळूहळू घरातल्या वस्तू बदलल्या. किचन रूममधल्या वस्तू बदलल्या. फर्निचर बदलले. सगळं काही नवं नवं. आता त्याचं संपूर्ण घर आणि पोषाख दोन्ही ही शोभून दिसत होते. परंतु हे सगळं केल्याने तो पुन्हा कंगाल झाला आणि कर्ज ही वाढत गेले. मोठ्या दु:खाने डेनिस डिडरोटने हे सहन केले आणि मग त्याने हे सगळे अनुभव आपल्या एका निबंधांत लिहून ठेवले. यालाच *मानस शास्त्रातील 'डिडरोट इफेक्ट' (Diderot Effect)* म्हणतात.

*मोठे उद्योजक, व्यापारी, ट्रेडर्स, डेव्हलपर्स पुढारी सुद्धा; या 'इफेक्ट'चा* छुप्या पद्धतीने, अनावधानाने अवलंब करतात. *याचे निरीक्षण आपण करून पहाण्यास हरकत नाही. कसे?*

समजा आपण *महागडी गाडी घेतली; मग आपण गाडीला शोभेसे ड्रेस घेतो, त्याला मॅचिंग घड्याळ, पेन, बूट, गागल .... इ. घेणार*.

घरात *मोठा टी.व्ही*. आणला की *चांगला टेबल, फर्निचर, HD वाहिन्या सुरु करणार*. घराला *नवा रंग लावला की त्याला मॅचिंग पडदे लावून सजावट करणार*.

*समजा आपण पन्नास हजार /एक लाखाचा मोबाईल घेतला; तरी आपल्याला आणखी काहीतरी कमी आहे असे वाटते. मग अजून मोबाईलला महागडा गोरील्ला ग्लास लावणार. 500 रुपयांचे जूने कव्हर बदलणार. शंभर रुपयांचा हेडफोन चालला असता; पण अडीच तीन हजाराचा हेडफोन घेणार. कारण या मोबाईलला स्वस्त वस्तू शोभून दिसत नाही. हे सर्व कशासाठी? इतरांवर इंप्रेशन मारण्यासाठी. यालाच म्हणतात *'डिडरोट इफेक्ट'*

थोडक्यात सांगायचे तर; *एक नवीन वस्तू विकत घेतली की; तिच्यामुळे दुसऱ्या वस्तूंचा दर्जा आपोआपच कमी होतो; आणि तो वाढविण्यासाठी आपण आणखी जास्त खर्च करीत जातो.*

*आपण एक वस्तू घ्यायला गेलो की; दुसऱ्या वस्तू आपोआपच घेतो; गरज नसली तरी*. *अशा पद्धतीने आपण एक एक वस्तू घेऊन अनेक अनावश्यक किंवा फारशा महत्वाच्या नसणाऱ्या वस्तू घेत असतो; आणि ते आपणास कळत सुद्धा नाही. यालाच *'spiraling consumption'* म्हणतात.

म्हणजे; *एका वस्तूमुळे दुसऱ्या वस्तूची गरज वाटणे आणि ती विकत घेणे. हाच तो 'डिडरोट इफेक्ट'* (Diderot Effect) होय. ही सामान्य *मानवी प्रवृत्ती* (human tendency) आहे.

*या प्रवृत्तीचे परिणाम भयानक होत असतात; पण ते उघड्या डोळ्यांनी दिसत नाहीत. आपण नकळतपणे अनावश्यक खर्च करत जातो* काही लोकांच्या हे लक्षात येतं; तर काहींच्या लक्षात खूप उशिरा लक्षात येतं पण *अनेकांच्या हे लक्षातच येत नाही. म्हणून ते खूप खर्च करीत असतात*

माणसाला *खर्च करताना भीती वाटत नाही*; पण नंतर *हिशोब लागत नाही ; तेव्हा त्याचा त्रास होतो* म्हणून कोणतीही वस्तू खरेदी करताना; *या वस्तूची मला कितपत गरज आहे?* असा स्वतःच स्वतःला प्रश्न विचारावा. विचार करून त्याचं *उत्तर जर होय आलं तरच ती वस्तू खरेदी करण्याचा निर्णय घ्यावा*. असा निर्णय घेतल्यावर त्या *वस्तूचा दर्जा आणि किंमत वाजवी आहे कां*? याचा विचार करून मिळेल त्या किंमतीत न घेता ती वाजवी किंमतीत घेण्याचा प्रयत्न करावा.

*दुकानदार एक वस्तू समोर ठेवतो; लगेच तो दुसरी वस्तू दाखवून संभ्रम निर्माण करतो. तेव्हा एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की; ती वस्तू कितीही चांगली असली; तरी तिचा आपल्या उपयोगितेशी व आनंदाशी काही संबंध नसतो. तो आनंद क्षणिक असतो. कालांतराने तो आनंद ही संपतो आणि पैसे ही जातात. म्हणून या प्रवृत्तीला आळा घालण्याची गरज आहे. पण त्यासाठी स्वतःच प्रयत्न करावा लागतो.*

**संदर्भ :**
***'डिडरोट इफेक्ट'* (संग्रहित)**

# आपण सारेच "वाल्या कोळी.."

त्यांच्या साठी कपडे लत्ते
तिच्या साठी साडी चोळी
कुटुंबाच्या भल्यासाठी
झटत होता वाल्याकोळी !

कुटुंबाचा करता होता
वाल्याला खूप मान होता
वाल्याकोळी कुटुंबाची
दिलो जिगर जान होता !

त्यांच्यासाठी फक्त त्यांच्यासाठी
वाल्याकोळी जगत होता
भली बुरी सारीच काम
वाल्याकोळी करत होता !

सकाळी खांद्यावर
बरची घेऊन निघत असे
नाक्यावर उभा राहून
सावज आपले हेरत असे !

खून चोरी डाका दरोडा
त्याला कसलंच भान नव्हतं
पाप शब्द नाही असं
आयुष्यात एक पान नव्हतं !

एकदा त्याला नारद भेटले
म्हणले वाल्या काय करतोस
का असा जाणून बुजून
नरकाची तू वाट धरतोस !

जा एकदा कुटुंबाला
शांतपणे भेटून ये
पापात वाटा घेता का
असे त्यांना पुसून ये !

वाल्या उठला बरची घेतली
घराकडे चालू लागला
नारदाची जिरणार म्हणून
हळूच शीळ घालू लागला !

वाल्या घरी आला तेव्हां
तिनी सांझ झाली होती
ताई माई अक्का सारी
घराकडे आली होती !

वाल्याने हात धुतले
पाटावरती बसता झाला
पहिला घास घेता घेता
सवाल आपला पुसता झाला !

अग बाई, बाळांनो
जरा सारे इकडे या
मी काय सांगतो
त्या कडे लक्ष्य द्या !

मी तुमच रोज ऐकतो
आज माझं ऐकणार का
डोंगरा एवढ्या पापां मधला
थोडा वाटा घेणार का !

सवाल ऐकताच कुटुंबात
एकच हाहाकार झाला
त्या दिवशी वाल्याला
नवा साक्षात्कार झाला !

किलबिल थांबली हसू थांबले
सारे एकजागी जमले
आणि मग सारे जण
अगदी एका सूरात म्हणले !

अरे वाल्या नीट ऐक
तुझ्याशिवाय अडत नाही
पापामध्ये वाटेकरी ?
असे कधीच घडत नाही !

खर खोट पाप पुण्य
तुझ काय ते तूच ठरव
आम्हा फक्त एकच ठाव
आमच्या तोंडात घास भरव !

ह्या साऱ्या भाकड कथा
आम्हाला तू सांगू नकोस
हिशेब पाप पुण्याचा
आमच्या पुढे मांडू नकोस !

आमच पालन पोषण करण
हाच तुझा धर्म आहे
आमच्या साठी जगण
हेच तुझ कर्म आहे !

फार पूर्वी बालपणी
अशी कथा वाचली होती
पण कधी कधी उगाच वाटत
ती त्याची नव्हे आपली होती !

जीवन मिथ्या हे कळत
पण पटत नाही
पैसा पैसा जमविण्याचा
मोह काही सुटत नाही !

पैसा पैसा जमविताना
आपण पार झिजून जातो
आपल्या देखील नकळत
एके दिवशी विझून जातो !

तसबिरीत गेलो की
आठवण कुणी ठेवत नाही
तेरा दिवस संपले
कि दिवा देखील तेवत नाही !

वाल्याला हे कळल
मला कधी कळेल का
वाल्या सारखा मोक्ष देवा
मला देखील मिळेल का !

कुणा हाती असते झोळी
कुणा माथी असते मोळी
पण सत्य शेवटी एकच
आपण सारेच वाल्याकोळी !

# ती कोण होती?



'निशा... निशा... अगं एकदा माझं ऐकून घेशील? प्लीज निशा तुला ईशाबद्दल, तुझ्या बहिणीबद्दल महत्त्वाचं काहीतरी सांगायचंय...'गेल्या सात-आठ दिवसांपासून रोहित काकुळतीला येऊन निशाला विनवत होता.

'आता सगळंच तर संपलंय नं रोहित... आधीच तू माझा खूप गैरफायदा घेतलायस. त्यानंतर तुझं आणि ईशाचं असं पळून जाणं... तुम्हां दोघांना कल्पना तरी आहे का, तुमच्या पळून जाण्यामुळे आमच्या आयुष्यात किती उलथापालथ झालीय...?' निशा

'हो, मला ठाऊक आहे की आमच्या पळून जाण्यामुळे तुम्हाला किती त्रास सहन करावा लागलाय. काकांचं त्या धक्क्यानंतर अकल्पित निधन, समाजात झालेली छि-थू , काकूंचं आजारपण मला सगळं सगळं ठाऊक आहे. पण सगळं संपलंय असं नको नं गं म्हणू, वठलेल्या झाडाला नवी पालवी फुटावी , कोमेजल्या फांदीला कळ्यांनी लगडावे अशा काही घटना माणसाच्या आयुष्यात घडतात, आणि त्याने आयुष्याला एक नवं वळण मिळतं. तसंच काहीसं घडलंय आमच्या बाबतीत...' रोहित शून्यात नजर हरवून बोलत होता.

'म्हणजे?' रोहितच्या अश्या बोलण्याने निशा गोंधळात पडली.

'सांगतो, सगळं सांगतो... तू फक्त एकदा माझ्यासोबत माझ्या घरी चल. माझ्या घराची अवस्था पाहूनच तुला सगळं समजून जाईल...'

'ठीक आहे. मी येईन, पण आज नाही, उद्या. आणि मी जास्तवेळ थांबणार नाही. कारण मला एकाचवेळी घर, आफिस आणि आईचा दवाखाना सगळं सांभाळावं लागतं' निशा कठोरतेने म्हणाली

'मला कल्पना आहे त्याची... काकांच्या अकल्पित जाण्याने, आणि काकूंच्या आजारपणाने तुझ्यावर फार मोठं जबाबदारीचं ओझं येऊन पडलंय नं...शिवाय काकांचा बिझनेसही हल्ली तूच सांभाळतेस नं?' रोहित

'जबाबदाऱ्या आहेत, पण मी त्यांना ओझं नाही माझं कर्तव्य समजते 'निशा

त्यानंतर पाच मिनीटं शांततेत गेली.

'बरं निशा, उद्या संध्याकाळी मी तुला न्यायला येईन... तयार रहा' रोहित

'नेमकं काय सांगायचं असेल रोहितला? वठलेल्या झाडाला नवी पालवी काय, कोमेजल्या फांदीला कळ्यांनी लगडणे काय...' दवाखान्यात जायच्या वाटेवर कारमध्ये बसल्या-बसल्या निशा विचार करु लागली,

ईशा आणि निशा शशिकांत आणि सुप्रिया या दाम्पत्याच्या जुळ्या कन्यका. शशिकांतरावांचा नागपूरात टेक्सटाईल्सचा मोठा बिझनेस होता. दिसायला अगदी

हुबेहूब, परंतु स्वभावात मात्र जमिनअस्मानाचा फरक! ईशा चंचल तर निशा शांत, ईशा अभ्यासात कमकुवत तर निशा जात्याच हुशार, ईशाला नटण्या मुरडण्यात, ऐशोआरामात जगण्याची आवड तर निशाला पुस्तकांची, साध्या जगण्याची आवड... त्यामुळे साहजिकच शशिकांतरावांचा आणि सुप्रियाताईंचा निशावर जास्त जीव, तिच्यावर जास्त विश्वास. आणि ईशाला लहानपणापासून आईबाबांचा ओरडा खावा लागे. हो, पण त्यांनी कधीही दोघींवरच्या प्रेमात कुठेही कमी ठेवली नाही बरं !

रोहित हा त्यांचा लहानपणीपासूनचा शेजारी, समवयस्क असल्याने तिघांत चांगली मैत्री होती... परंतु जसजसे तिघे तरूण होत गेले, तसतसे रोहितला ईशाबद्दल मैत्रीहुन अधिक आकर्षण जाणवू लागले. ईशाचं नटणं-मुरडणं, मादक हसणं कोणत्याही मुलाला भुरळ घालण्यासारखंच होतं. त्याचवेळी निशा मात्र अभ्यासात, पुस्तकांत, किंवा वडिलांना आफिसमधील कामांत मदत करण्यात मग्न असे.

'या रोहितने एकेकाळी आपल्याही मनाला भुरळ घातली होती. त्याचं गोड-गोड बोलणं, तारीफ करणं, गुलाब, चॉकलेट्स गिफ्टस् देणं यासगळ्याला एकेकाळी आपणही भुललो होतो... पण रोहितनी? रोहितनी मात्र आपल्या भोळेपणाचा गैरफायदा घेतला... गोड-गोड बोलून आपल्याकडून नोट्स लिहून घेणे, जर्नल्स पूर्ण करून घेणे यासाठी त्याने आपल्याशी प्रेमाचे नाटक केले. आणि आपणही त्याच्या नाटकांत गुंतत गेलो... त्याला खरंतर सुरवातीपासून ईशाच आवडत होती. हे आपल्या कधी लक्षातच आलं नाही. बरं रोहित तरी परका होता. पण ईशा! ती तर माझी सख्खी बहिण होती नं? तिने असं वागावं आपल्याशी?... नाहीतरी तिचा रागच होता आपल्यावर... आईबाबा तिच्यापेक्षा जास्त आपल्यावर प्रेम करतात असं वाटायचं तिला नेहमी... वेडी! जगातले कोणतेच आईवडील आपल्या दोन लेकरांत भेदभाव करत नसतात. मुलांच्या चांगल्या-वाईट प्रगतीवरून वागणुकीत बदल होत असेल कदाचित, पण प्रेमात कधीच कमीअधिकपणा नसतो...' अशा सगळ्या विचारात असतानाच ड्रायव्हरच्या बोलण्याने निशा भानावर आली.

ड्रायव्हरला गाडी पार्क करायला सांगून सिटी हॉस्पिटलच्या भल्या मोठ्या गेटमधून आंत शिरली. आणि तडक अल्झायमर्स वॉर्डमध्ये गेली. तिची नजर शून्यात नजर लावून बसलेल्या आपल्या आईकडे गेली आणि तिच्या डोळ्यांत टचकन पाणी तरळलं. स्वतःला सावरत ती आईजवळ गेली.

'आई, बघितलंस का आज तुझ्यासाठी काय आणलंय? तुझ्या आवडती द्राक्षं आणलीयेत. डॉक्टर नकोनकोच म्हणत होते. डायबेटिस नाही का तुला? पण मीच हट्ट धरला, म्हटलं खाऊ द्या हो कधीतरी, फार आवडतात नं तुला...' पिशवीतून द्राक्षं काढत-काढत तिने आईकडे बघितले आणि ती दचकलीच. आईचे डोळे रागाने लाल-लाल झाले होते.

'ईशा, का आलीस तू इथे? आपल्या बाबांचा जीव घेऊन मन नाही भरलं तुझं कारटे?

चालती हो इथून...' थरथरत्या आवाजात सुप्रियाताई ओरडत होत्या. निशाला कळून चुकलं, आई आपल्याला ईशा समजतेय...

'आई, आई शांत हो. मी ईशा नाही निशा आहे. नीट बघ बरं माझ्याकडे...' आईचा चेहरा हाताने स्वतःकडे वळवत निशा उत्तरली.

'निशा बाळा, तू आहेस होय... मला वाटलं ती अवलक्षणी...' परत शून्यात नजर फिरवत सुप्रियाताई

'हो हो, काही हरकत नाही. होतं असं कधीकधी... तू आधी शांत हो बरं...' असं म्हणत निशाने आईचं डोकं आपल्या छातीवर दाबलं आणि बराच वेळ तिच्या पाठीवरून हात फिरवत राहिली. आईसोबतच चार घास पोटात ढकलून निशा घरी परतली.

रात्री बराचवेळ निशा भुतकाळातील आठवणींनी अस्वस्थ होती. ईशाचं फायनल इयरला असताना अचानक रोहितसोबत पळून जाणं, त्या धक्क्याने वडिलांचा हार्टअटक आणि मृत्यू, आईचं मानसिक संतुलन बिघडणं... शिवाय उद्या रोहित आपल्याला कोणते सत्य सांगणार, याची हुरहूर या सगळ्या संमिश्र भावनांनी रात्री केव्हातरी तिचा डोळा लागला.

-----------------------------------------------

रोहित बरोबर आफिस सुटायच्या वेळी दारात हजर होता. आधीपासूनच तिथे येऊन थांबला असावा बहुतेक...

आज कितीतरी वर्षांनी निशा रोहितच्या मागे बाईकवर बसली होती. परंतु आज वाटेत कुणीच कुणाशी बोलत नव्हतं. एका जुन्या धाटणीच्या घरासमोर रोहितने बाईक थांबवली. घराच्या एका कोपऱ्यातल्या छोट्याश्या खोलीसमोर रोहित गेला. खुणेनेच तिला घरात बोलावले. घरात पाऊल टाकताच निशा स्तब्ध झाली. ती एक लहानशीच बैठकीची खोली होती. आणि समोरच्याच भिंतीवर ईशाचा हार घातलेला फोटो लावलेला होता. त्या फोटोकडे बघताच निशाला क्षणभर पायाखालची जमिन सरकल्यासारखी वाटली. तिने रोहितकडे बघितले, तर त्यानेही मान खाली घातली. निशाला तर काही क्षण काहीच कळेना. ती मटकन खालीच बसली आणि तिला रडू कोसळले. रोहितनेही तिला मनसोक्त रडू दिलं.

तेवढयात आंतून एक पन्नाशीची बाई पाण्याचे ग्लास भरून घेऊन आली. एकूण देहबोलीवरून आणि पेहरावावरून ती कामवाली बाई दिसत होती. पाणी पिल्यावर निशाला जरा शांत वाटलं. मग जरावेळानी रोहितने त्या बाईंना खुणेने काहीतरी सुचवले. तसे त्या बाई आंत जाऊन दोन्ही हातात काहीतरी घेऊन आल्या. आणि ते रोहितच्या हातात सुपूर्द केले.

'वठलेल्या झाडाची नवी पालवी, माझं आणि ईशाचं बाळ... आमचा ईशान'

बाळाला निशाकडे सोपवत रोहित ओक्साबोक्शी रडू लागला. निशाने क्षणभर बाळाकडे बघितलं आणि तिला भरून आलं... तिने बाळाला घट्ट छातीशी कवटाळलं.

काय बोलावं? काय करावं? निशाला काहीच सुचत नव्हतं. मग रोहितनेच बोलायला सुरवात केली,

'इथून पळून आम्ही तडक मुंबई गाठली. काही दिवस हॉटेलात राहिलो. बरोबर घेतलेले पैसे चार दिवस पुरले. मग नोकरी-धंदा शोधणं भाग होतं. शिवाय हॉटेलमध्ये किती दिवस राहणार? मग मी दिवसभर नोकरीच्या शोधात बाहेर पडायचो आणि ईशा घराच्या शोधात... हातात डिग्री होती, त्यामुळे नोकरी मिळायला फार वेळ नाही लागला. पण घर काही मिळेना... अविवाहित तरूण जोडप्याला कोण घर देणार? मग एक दिवस देवळात जाऊन लग्न केलं. एक वन रुम किचनचं घर घेतलं भाड्यानी. आणि आमचा संसार सुरु झाला. वाटलं होतं, लग्न झालंय म्हटल्यावर दोघांचेही आईवडील जवळ करतील... पण इथे नागपूरला सगळंच बिघडलं होतं. माझ्या आईबाबांनी माझं नावच टाकलं होतं. तुमच्याकडे, काकांचा असा दुर्दैवी मृत्यू, काकूंचं हे असं... ईशाला सारखं वाटत रहायचं, माझ्यामुळे बाबांचा मृत्यू झाला, आई वेडसर झाली. ती दिवसरात्र स्वतःला कोसत रहायची. मला तिच्या डोळ्यांतले अश्रू बघवायचे नाहीत. मी तिला जास्तीत जास्त आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करत होतो. अशातच ईशाला दिवस गेले. दिवस गेल्याचं कळल्यापासून ईशा स्वतःला फार जपायला लागली होती... मला म्हणायची, 'माझी आई, तुझे आईबाबा आपल्यावर चिडले आहेत नं ? थांब जरा... आपल्याला बाळ झालं ना, की आपण त्याला घेऊन नागपूरला जाऊया. आपल्या बाळाला बघितल्यावर तुझ्या आईबाबांचा राग नक्कीच निवळेल, आणि माझ्या आईचा वेडसरपणाही कमी होईल...' त्याच आशेवर आम्ही जगत होतो. आमच्या घरमालकीणबाई चांगल्या होत्या. त्यांनी ईशाचं बाळंतपणाचं सगळं व्यवस्थित केलं. बाळाचं बारसं केलं. आता आम्हांला ओढ लागली होती नागपूरला यायची... आम्ही मुंबईहून निघण्यापूर्वी आईबाबांना, तुला खूपवेळा फोन लावून पाहिले. पण आईबाबा फोन उचलेनात आणि तुझा आमच्याकडे असलेला नंबर बंद होता...'

'ईशाला आणि बाळाला त्रास नको म्हणून आम्ही एका प्रायव्हेट गाडीने पंधरा दिवसांपूर्वीच इकडे यायला निघालो... आणि ... वाटलं होतं, चिमुकल्या बाळाला बघितल्यावर तुम्हा सगळ्यांचा राग कुठल्याकुठे पळून जाईल, आम्हाला आमच्या घरच्यांचे आणि आमच्या बाळाला आजी-आजोबांचे प्रेम मिळेल... पण नियतीला काही वेगळेच अपेक्षित होते...नाशिकजवळ आमच्या गाडीला एका टेम्पोने धडक दिली... आणि सगळं होत्याचं नव्हतं झालं...नेमकी ईशा ज्या बाजूने बसली होती, त्याचबाजूने जबरदस्त धक्का बसला, आणि ईशाचा जागच्या जागी झोपेतच मृत्यू झाला. सुदैवाने बाळ तेव्हा माझ्या मांडीवर होतं. त्यामुळे मी आणि बाळ बचावलो. ड्रायव्हरलाही जबरदस्त मार लागला होता. त्याला नाशिकच्या इस्पितळात दाखल करून नाशिकलाच ईशाचा अंत्यसंस्कार उरकून, बाळाला घेऊन मी इथे आलो. आधी घरी गेलो, तर घराला कुलूप दिसलं. शेजाऱ्यांकडे चौकशी केल्यावर समजलं की, आईबाबा

कायमचे दादाकडे अमेरिकेला गेले आहेत. शेजाऱ्यांच्याच ओळखीने हे घर मिळालेय. या उमामावशी, दिवसभर बाळाला सांभाळतात. आणि स्वयंपाकपाणीही करतात. आता तसेही मुंबईला परत जाऊन काही उपयोग नाही. मी माझी बदली नागपूरच्या आफिसमध्ये करून घेत आहे. तिकडच्या घरातील सामानही काही दिवसात इकडे घेऊन येईन. बाकी सगळं व्यवस्थित होईल गं निशा... पण बाळाचं काय? तश्या या मावशी बाळाला अगदी प्रेमाने सांभाळतात गं, पण त्याला अजून आईची गरज आहे नं गं? ती मी कशी पूर्ण करणार?...' रोहित आशाळभूत नजरेने निशाकडे बघू लागला. तिच्याही मनात कालवाकालव झाली.

'माय मरो पण मावशी जगो' असं लोक म्हणतात. आईचं प्रेम तर नाही माझ्या बाळाच्या नशीबात... निदान मावशीचं प्रेम तरी लाभू देशील त्याला?...' रोहित हात जोडून विनवणी करत होता.

'प्रश्नच नाही रोहित! निसर्गानं आम्हां दोघी बहिणींचं रूप एकसारखं बनवलंय, ते काही उगीच नाही... आजपासून ईशान माझा मुलगा आहे...' एवढं बोलून निशानं बाळाचे पटापट मुके घ्यायला सुरवात केली. तिच्यातलं ते मातृत्व पाहून उमामावशींच्याही डोळ्यात पाणी आलं.

---------------------------------------------

निशाची एक जबाबदारी आता वाढली होती, त्यामुळे खरंतर तिची अधिकच ओढाताण होत होती. पण बाळाच्या ओढीने ती सर्व सहन करत होती. रोज सकाळी घरातून लवकर तयार होऊन आधी रोहितकडे जाणे, तिकडे बाळाची तयारी करून आफिस गाठणे, संध्याकाळी आईला हॉस्पिटलमध्ये जाऊन तिची विचारपूस, औषधपाणी करून परत बाळाला भेटायला रोहितच्या घरी जाऊन बाळाला भेटून रात्री उशीरा घरी परतणे असे तिचे रुटीन बनले होते. त्यात बऱ्याचदा तिचे रात्रीचे जेवण रोहितकडेच होई.

'निशा, तुला राग येणार नसेल तर एक विचारू?' रोहितने एके दिवशी जेवता-जेवता विचारले

'बोल ना...' निशा

'तू अजून लग्न का नाही केलंस?' रोहितच्या या प्रश्नाने निशा क्षणभर दचकलीच...

'लग्न? त्याविषयी विचार करायला वेळंच मिळाला नाही कधी... म्हणजे असं काही नाहिये की मला लग्नच करायचं नाहिये... फक्त आयुष्याच्या प्रायोरिटीज बदलून गेल्या आहेत आता...' निशा म्हणाली.

दोघांचं बोलणं सुरूच होतं की बाळाने रडायला सुरवात केली. त्यामुळे जेवण उरकतं घेत निशाने बाळाकडे धाव घेतली.

---------------------------------------------

निशा रोज रोहितकडे येत होती ती बाळाच्याच ओढीने मात्र, त्यानिमित्ताने रोहितशीदेखील तिची मैत्री वाढू लागली. रोहितही तिची, आईची आपुलकीनी चौकशी

करत होता. निशाच्या मनात तिच्याच नकळत रोहित हळूहळू आपलं स्थान निर्माण करू लागला होता. अशातच एकदिवस रोहितने तिच्यासमोर विवाहप्रस्ताव ठेवला...

निशाने उत्तरासाठी रोहितकडे थोडा वेळ मागितला खरा... पण त्याच्या विवाहप्रस्तावामुळे तिच्या मनात प्रचंड खळबळ माजली होती. गेल्या दोन वर्षांपासून ऑफिस, घर आणि आजारी आई यांना सांभाळण्यात तिची नाही म्हटलं तरी खूप दमछाक होत होती. आयुष्याच्या या वळणावर तिलादेखील एका भक्कम आधाराची गरज होतीच. 'परंतु रोहित? याच रोहीतने एकेकाळी आपल्याला धोका दिला होता... हो दिला असेल... पण ती एक अल्लड वयातली चूक होती... आणि आयुष्यात एवढे चढउतार सोसल्यावर माणसं बदलतात, शहाणी होतात ... आणि ईशान? तो तर आपलाच आहे नं, त्यालाही आईच्या प्रेमाची गरज आहे...' तिच्या मनात विचारांचं द्वंद्व सुरू होतं. सर्व विचाराअंती तिने रोहितला होकार द्यायचे ठरवले...

फार कुठेही गाजावाजा न करता कोर्टात जाऊन त्यांनी लग्न केले.

निशा खूप आनंदात होती. 'निशा, दोन वर्षांपूर्वी पळून जाऊन लग्न करणे हा आमचा वेडेपणाच झाला. त्यावेळी ना आम्हाला घरच्यांची पर्वा होती ना परंपरांची जाण, कदाचित त्यामुळेच हे असे अघटीत घडले. यावेळी मात्र मला ती चूक घडू द्यायची नाहिये. आपण उद्याच डोंगरगांवला आपल्या कुलदेवीच्या दर्शनाला जाऊया' लग्नाच्या पहिल्याच रात्री रोहितने आपल्या मनातली ईच्छा बोलून दाखवली. निशानेही त्याला आनंदाने होकार दिला.

ठरल्याप्रमाणे दोघे लहानग्या ईशानला घेऊन भल्या पहाटेच गाडीने डोंगरगांवला जायला निघाले. निशा ड्रायव्हर काकांना सोबत घेऊ म्हणाली होती, पण रोहित म्हणाला की आज त्याचा ड्राईव्हींग करण्याचा मूड आहे. अवघ्या अडीच-तीन तासांचा रस्ता होता. अजून फारसे उजाडलेही नव्हते, अर्धा - एक तास ड्राईव्ह करून झाले असेल... अचानक गाडी बंद पडली. एकाएकी गाडीला काय झाले हे पाहण्यासाठी रोहित गाडीखाली उतरला, तर गाडीचे मागचे टायर पंक्चर झाल्याचे लक्षात आले. गाडीच्या डिक्कीत बघितले तर स्टेपनीही नव्हती. स्टेपनी नाही याचे खरंतर निशाला खूप आश्चर्य वाटले, कारण तिच्या ड्राईव्हर काकांना गाडी अपटूडेट ठेवायची सवय होती. मग स्टेपनी टायर गेला कुठे?

'कसल्या विचारात हरवलात मॅडम? काळजी करू नका. आपण काही शहरापासून फार लांब आलेलो नाही. मी जवळपास कुठे गराज किंवा मेकॅनिक मिळतो का ते पहातो.' असं म्हणून रोहित निघून गेला. ईशान झोपला होता. निशा कारच्या खिडकीतून आजूबाजूचा नजारा बघत होती. तिची गाडी उभी होती तो एक नदीवरचा पुल होता. नुकतंच तांबडं फुटलं होतं. रस्ता अजूनही निर्मनुष्य होता. ती गाडीच्या बाहेर आली. पुलाच्या कडावर उभं राहून ती नदीचं सौंदर्य न्याहाळत होती. तोच तिला पाठीमागे कुणी उभे असल्याची चाहुल लागली. तिने मागे वळून पाहिले, आणि ती किंचाळणार इतक्यात

तिचे तोंड त्या व्यक्तीने दाबून धरले...

----------------------------------------------------

‘काम फत्ते!’ ती हर्षोल्हासात समोरून येणाऱ्या रोहितला म्हणाली.

‘य्येस!’ म्हणत रोहितने तिला टाळी दिली. दोघेही गाडीत बसले, आणि गाडी सुसाट पळाली.

‘ईशा, माय डार्लिंग! खरंच तुझी बहीण किती बावळट होती गं... मी जे-जे सांगत गेलो त्यावर तिने आंधळ्यासारखा विश्वास ठेवला, आणि कहर म्हणजे एकदा फसवल्या गेल्यावरसुद्धा परत माझ्या प्रेमात पडली? हा...हा...हा...!’ - रोहित

‘शूsss! आजपासून मला ईशा नाही म्हणायचं... निशा म्हणायचं, निशा.....हा...हा...हा...’ ती हसत सुटली.

‘हो... तुझ्या त्या बापानं त्याची सगळी इस्टेट तुझ्या बहिणीच्या नावे करून टाकली. आणि आपल्याला फुटकी कवडीही नाही? हं...’ रोहित

‘पण आपणही काही कमी नाही. ते म्हणतात नं, घी अगर सीधी उंगलीसे ना निकले तो उंगली टेढी करनी पडती है...’ ती मानेला झटके देत बोलली.

‘ईशा, इथून नागपूरला परत गेल्यानंतर काही दिवस शांतच रहावं लागेल. खासकरून तुला खूपच सांभाळून रहावं लागेल...’ रोहित

‘आय नो, आय नो! त्या निशाचे आजीबाई टाईप कपडे घालावे लागतील आणि आईशीही प्रेमाने वागावं लागेल...’ ती त्रासिक चेहरा करून म्हणाली.

‘अफकोर्स डार्लिंग! ए पण ती निशा आपल्या बाळाचं सगळं इतकं मायेनं करत होती... प्रेम उतूच चाललं होतं म्हण नं...’ रोहित कुत्सितपणे बोलला, त्यावर दोघेही खळखळून हसले. इतक्यात ईशान उठून रडू लागला, तिने  जवळ घेतलं.

काही दिवस शांततेत गेल्यावर रोहित प्रॉपर्टीचे पेपर्स दोघांच्याही नावावर करावे म्हणून तिच्या मागे लागला. ती मात्र ‘इतक्यात घाई काय आहे? तू आणि मी काही वेगळे आहोत का? जे माझं ते तुझं आणि जे तुझं ते माझं आहेच की...’ असं उत्तर देऊन टाळत असे.  तेव्हापासून रोहितच्या वागण्यात तिला फरक जाणवू लागला.

आणि एक दिवस रोहितने तिच्या गळ्याभोवती चाकू ठेवून प्रॉपर्टीचे पेपर्स तिच्या पुढ्यात टाकले, ‘लवकरात लवकर या पेपर्सवर साईन कर आणि ही प्रॉपर्टी माझ्या नावावर कर...’ तो म्हणाला.

ते ऐकून ती जोरजोरात हसायला लागली. ‘आणि मी या पेपर्सवर साईन केले नाही तर?’ तिने त्याच्या डोळ्यांत डोळे घालून विचारले.

‘तर मी तुला मारून टाकेन!’ रोहित चवताळून म्हणाला.

‘अरेच्चा! पण मला तर तू आधीच मारलंय...’ ती

तिच्या उत्तराने तो पार गोंधळून गेला. ‘म्हणजे?’

‘म्हणजे मी तुला समजावते रोहित डार्लिंग!’ पडद्याच्या मागून बाहेर येत ती म्हणाली.

दोघी बहिणींना आमोरासमोर बघून अवाक झालेला रोहित आळीपाळीने दोघींकडे बघू लागतो. त्या गडबडीत चाकू त्याच्या हातून गळून पडतो.

'असं काय करतो रोहित डार्लिंग? मला ओळखलं नाहीस? मी तुझी ईशा...' रोहित जवळ येत ती म्हणाली. ते ऐकताच रोहित घाबरत-घाबरत बाजूला बघतो.

'भूत बघितल्यासारखा घाबरतोस काय रोहित? मी निशा, आणि मी जिवंत आहे!' एकमेकींना टाळ्या देत दोघी जोरजोरात हसायला लागतात. त्यामुळे रोहितचे डोके गरगरायला लागते.

'थांब थांब रोहित डार्लिंग, मी नीट समजावून सांगते,' रोहितला हात देऊन ईशा बोलू लागली, 'त्या दिवशी तुम्ही दोघे डोंगरगांवला जायला निघालात. आणि आपल्या प्लॅनप्रमाणे त्या नदीच्या किना-यावर गाडी पंक्चर झाली, झाली नव्हे मीच केली. मग रोहित तू मेकॅनिक शोधायला बाहेर पडलास...म्हणजे तसे नाटक केले. सगळ्या गोष्टी आपल्या प्लॅननुसार घडत होत्या. मी तिथेच एका झाडामागे दबा धरून उभी होती. रोहित दूर जाताच निशा, तू गाडीखाली उतरलीस. आणि मी तुला मारायला तुझ्या समोर आली...'

'आता पुढची गोष्ट मी सांगते ईशा...' ईशाला थांबवत निशा बोलू लागली, 'प्लॅन तर फार जबरदस्त होता तुझा रोहित, तुम्ही दोघं पळून गेलात म्हणून बाबांनी संतापून ईशाला प्रॉपर्टीतून बेदखल केलं. आणि तीच प्रॉपर्टी हडपण्यासाठी तुम्ही हा नीच प्लॅन बनवला? ईशाचा हार घातलेला फोटो बघून मी तुझ्यावर विश्वास ठेवला. वर त्या लहानग्या जीवाला बघितल्यानंतर माझं काळीज विरघळलं... पण तुम्ही दोघांनी यावेळीही माझा विश्वासघात केलात, माझ्या भावनांशी खेळलात... त्या दिवशी नदीच्या पुलावर ईशाला बघून मी खरं काय ते समजली. खरंतर ईशा, त्यावेळी मला तुझाही खूप राग आला होता. या नालायक माणसावर विश्वास ठेवून तू माझ्या, स्वता:च्या बहिणीच्या जीवावर उठलीस! तरीही माझी सक्खी बहिण या नात्यानी मी तुला समजावले, अगं जो माणूस जन्मदात्या आईवडिलांचा नाही होऊ शकला तो तुझा काय होईल?... सुदैवानं यावेळी तरी ईशाला माझं म्हणणं पटलं. रोहित, तुझं खरं रूप जगासमोर यावं म्हणून आम्हीही एक नाटक करायचं ठरवलं. तुझा खेळ तुझ्यावरच उलटवायचं ठरवलं...'

'हो रोहित, त्यादिवशी निशाच तुझ्यासमोर माझं रूप घेऊन आली. आणि इतके दिवस तिनेच माझं नाटक वाठवलं!' ईशा


'ज्या प्रॉपर्टीच्या लालसेपायी मी तुझ्यावर विश्वास ठेवून माझ्याच बहिणीच्या जीवावर उठले, तीच प्रॉपर्टी हडपण्यासाठी तू माझ्या जीवावर उठलास रोहित? तुझ्या प्रेमासाठी मी माझ्या आईवडिलांच्या इज्जतीची पर्वा ना करता पळून गेले. त्या धक्क्याने माझे बाबा देवाघरी गेले. आई भ्रमिष्ट झाली. निशा, तुला आठवतो आपला कॉमन फ्रेंड अक्षय? त्याच्याकडून मला नागपूरच्या सगळ्या खबरा मिळत होत्या. राहून-राहून मला केल्या कृत्याचा पश्चात्ताप होत होता. आणि बाबांनी मला प्रॉपर्टीमधून बेदखल केल्याची बातमी

ऐकल्यापासून रोहितचं बदललेलं वागणं मला खटकत होतंच. पण परत माघारी कोणत्या तोंडाने यावं हे कळत नव्हतं. त्यातच मला दिवस गेल्यानंतर परतीचे सगळे मार्गच बंद झाल्यासारखे वाटत होते. कदाचित याच पापाची शिक्षा देव मला आज भोगायला लावतोय. एवढं सगळं करून मी आज काय मिळवलं? तुझ्या खोट्या प्रेमापायी मी आज माझं अस्तित्वही गमावून बसले रोहित... कायद्याच्या दृष्टीने मी केव्हाच मृत झाले!...' शून्यात नजर हरवत ईशा बोलली.

'फार बडबड केलीत तुम्हा दोघींनी! ईशा, तू तर कायद्याच्या दृष्टीने मेलीच आहेस, आता तुझ्या या बहिणीलाही संपवून टाकतो...' रोहित चवताळून म्हणाला

'थांब रोहित, एक पाऊलही पुढे टाकू नको. तुला काय वाटलं रे, प्लॅनिंग काय फक्त तुलाच करता येतं? मला मारलंस तर तू अजूनच अडकशील. या घरात सगळीकडे सीसीटिव्ही कॅमेरे बसवले आहेत. आणि माझ्या विनंतीवरून इंस्पेक्टर जोशी तुझ्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवून आहेत. आणि तसंही मला मारून तुला काहीही फायदा होणार नाही. कारण मी ही सगळी  प्रॉपर्टी माझ्या मरणोत्तर एका सेवाभावी संस्थेला दान केली आहे.' एवढे बोलून निशाने इंस्पेक्टर जोशींना रोहितला घेऊन जायला फोन लावला. ईशालाही रोहितला मदत केल्यामुळे काही दिवसांसाठी शिक्षा होणार होती. जेलमध्ये जाण्यापूर्वी तिने आईला भेटून तिची माफी मागण्याची ईच्छा बोलून दाखवली, जी निशाने आनंदाने मान्य केली.

जाता-जाता तिचे लक्ष बाळाकडे गेले. तिने प्रश्नार्थक नजरेने निशाकडे पाहिले. 'काळजी करू नको. इथून पुढे ईशान माझा मुलगा आहे.' निशा बाळाला छातीशी धरत म्हणाली. ईशा पाणावल्या डोळ्यांनी पोलिसांच्या जीपमध्ये चढली...




**- सौ. अमृता श्रीरंग देशपांडे / नागपूर**
**मो.- 8412898783.**

# तुझ्या आठवणीत



तुझ्या आठवणीत रे
मन माझ ते रमाव
तुझ्या मनात माझ्या
दुसर कोनीच नसाव

आपल्या प्रेमाच सुख
आनंदीत ते दिसाव
माझ्या सहवासावरी
तुझ नाव रे आसाव

तु समोर दिसताना
मन माझ भरूराव
जीव माझाला बेचैन
प्रेम तुझच मिळाव

जन्मो जन्मी तुझीच
सात मला रे मीळव
प्रेम करते तुझ्या वरी
तुच जवळ आसाव

**- सरोजा मनोहर गायकवाड / शिरूर अनंतपाळ**
**मो.-7218115426**

# कारण मी दगड आहे...

होय मी दगडच आहे !
आणि सारे जण मला दगडच
म्हणतात....
पण मी दगड जरी असलो तरी
प्रत्येकाच्या जीवनात,
कुठे ना कुठे कामी येतच असतो
मला घराच्या पायाभरणीसाठी,
भिंती उभारण्यासाठी आणि उंबरठा
म्हणून वापरतात.
घरात खलबत्ता,उखळ नि
जात्याची पाळू म्हणून वापरतात...
बाहेर तर कधी माझ्या छिन्नविछिन्न
झालेल्या तुकड्यांना एकत्र करुन
पार बनवून त्यावर निवांत
बसून गप्पा मारतात,
कधी उशाला घेऊन विश्रांती घेतात.
कधी मला मंदिराची पायरी बनवून
माझ्या अंगावरुन तुडवत जातात
तर कधी मला देवतेचे रुप मानून
मंदिराच्या गाभाऱ्यात बसवतात.
कधी काळी राजेमहाराजांनी
गडाला मजबूत करण्यासाठी
तट म्हणून माझा वापर केला
तर कधी कलाकाराचे छन्नी हातोड्याचे
कमी-अधिक घाव सहन करत
वेरुळ - अजिंठा सारख्या
लेण्यांमध्ये कलात्मक रुप दिले....
शेवटी एखाद्याची समाधी
बांधण्यासाठीसुद्धा माझाच
वापर केला



आणि तोही दगड
म्हणूनच...!
एवढे असूनही
मला सगळ्यांनी
'दगड' नावाची
उपाधी देऊन
मोकळे झाले.
तरीही मला त्याचे काहीच वाटत नाही.
मला वाईट वाटण्याचेही कारण नाही.
मी दगड जरी असलो तरी
सगळ्यांच्या उपयोगासाठी
कुठे ना कुठे कामी आलो याचे
समाधान आहे.
तुम्हा सर्वांसाठी एक मैलाचा दगड
ठरु शकलो...
या जगात मानसन्मान सगळेच
आदराने स्वीकारतात
अपमान मात्र कोणीही
स्वीकारत नाहीत.
मी दगड आहे हे माझ्यासाठी
भाग्य समजतो कारण
सगळ्यांच्याच जीवनात
सहभागी होऊन कोणत्या ना
कोणत्या कारणाने तुमच्या
ओठांवर येतो
कारण मी दगड आहे ....!!!

- व्यंकटेश काटकर / नांदेड
मो.- ९४२१८३९५९०/८०८७९१७०६३.

# केविन फायगी



गेल्या काही वर्षांमध्ये बऱ्याचशा पालकांना जी गोष्ट साधता आली नाही, ती गोष्ट एका सिनेमाने साध्य केली. ती गोष्ट म्हणजे, मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवणे. आणि तो सिनेमा म्हणजे, अवेंजर्स एन्डगेम. मार्व्हल्स सिनेमॅटिक युनिव्हर्सअंतर्गत गेल्या दहा वर्षांपासून जे सिनेमे प्रदर्शित झाले त्या सिनेमांचा हा शेवटचा सिनेमा होता. प्रेक्षकांमध्ये त्या सिनेमाबाबत उत्कंठा शिगेला पोहोचली होती. सिनेमा प्रदर्शित होण्याआधी बऱ्याचशा चाहत्यांनी आपापल्या पद्धतीने फॅन थेअरी जाहीर केली होती. म्हणजे सिनेमामध्ये पुढे कदाचित असं घडू शकेल अथवा तसं घडू शकेल, किंवा सिनेमांमध्ये सुपरहिरो अशा पद्धतीने योजना तयार करतील आणि सिनेमाचा शेवट असा होईल वगैरे वगैरे. सिनेमा प्रदर्शनाची तारीख जवळ आली आणि सिनेमाचे ट्रेलर आणि इतर व्हिडियो सर्व प्रसारमाध्यमांवर प्रदर्शित होऊ लागले, त्यांना चांगली प्रसिद्धी मिळत होती आणि चाहते सिनेमाची तिकिटे मिळवण्यासाठी धडपडत होते. आपल्या भारतामध्ये देखील मध्यरात्री, पहाटे करत २४ तास सिनेमागृहांमध्ये शो चालवून सर्वच्या सर्व शो हाऊसफुल्ल करणारा हा पहिला सिनेमा ठरला.

सिनेमामध्ये नक्की काय घडतं, अवेंजर्स कसे एकत्र येतात, त्यांचा शेवट कसा होतो अशा प्रत्येक प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना थिएटरमध्ये जाऊनच बघायची होती. यासाठी आपल्याला कोणताही स्पोईलर मिळू नये म्हणून मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग सोशल मीडियापासून दूर होता. हे या सिनेमाचं खरं यश. पण तुम्हाला माहित आहे, हे सर्व एका माणसामुळे शक्य झालं. तो म्हणजे केविन फायगी.

आपला एखादा सिनेमा सुपरहिट झाला कि बरेचसे निर्माते, दिग्दर्शक त्याचा सिक्वेल काढण्याचा विचार करतात. पण केविन फायगी यांनी मार्व्हल्स सिनेमॅटिक युनिव्हर्सची सूत्रे आपल्या हाती घेतल्यावर सुपरहिरो सिनेमांची मालिका करायचे ठरवले, ज्यापैकी पहिला सिनेमा होता, आयर्न मॅन. पहिल्या सिनेमापासूनच प्रेक्षकांनी हे नवे युनिव्हर्स डोक्यावर घेतले.

केविन फायगी यांनी लोकांचा सुपरहिरोकडे बघण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलून टाकला. त्यांच्या आधी कोणत्याही निर्मात्याने अथवा स्टुडीओने आपले पैसे एवढ्या मोठ्या प्रमाणावर कोणत्याही सुपरहिरो सिनेमावर खर्च केले नव्हते.

मार्व्हलस सिनेमॅटिक युनिव्हर्सचे सर्व सिनेमे हे केविन फायगी यांच्या नियंत्रणाखाली आहेत. आपल्या पुढील सिनेमासाठी कोणता दिग्दर्शक घ्यायचा, कोणते कलाकार घ्यायचे, कोणत्या लेखकाने सिनेमासाठी लिखाण काम करावं हे सर्व केविन फायगी ठरवतात. त्यातच, जो दिग्दर्शक त्यांचे म्हणणे ऐकत नाही, त्यांना ते आपल्या

प्रोजेक्टमधून काढून टाकतात. भले त्या दिग्दर्शकाने त्यांना सुपरहिट सिनेमा दिला असो. उदाहरणार्थ, एग्वर्ड रॉड, पेटी जेनकिन्स, एग्वर्ड राईट.

मार्व्हलस सिनेमॅटिक युनिव्हर्सच्या आधी हॉलीवूडमध्ये सर्वात मोठा स्टुडियो म्हणून 'पिक्सार स्टुडियो' ओळखला जात होता. त्यांचा प्रत्येक सिनेमा सुपरहिट होता. जसे, टॉय स्टोरी, कार्स, अप, मॉन्सटर्स, फाइन्डींग निमो. अशा अव्वल स्टुडियोला मागे सोडत मार्व्हलस सिनेमॅटिक युनिव्हर्स अशा उंचीवर पोहोचले, जिथे आजवर कोणतीही सिनेमा कंपनी पोहोचू शकली नाही. एकीकडे ते आपले सिनेमे बनवत होते, तर दुसरीकडे सोनी कंपनी स्पायडर मॅनचा युनिव्हर्स बनवण्याचा प्रयत्न करत होती. पण प्रत्येक वेळी त्यांच्या पदरी अपयश पडत होते. स्पायडर मॅनचा एक सिनेमा सुपरहिट झाला कि पुढील सिनेमा दणकून आपटायचा किंवा त्याला म्हणावे तसे यश मिळत नव्हते. डीसी सिनेमाच्या बाबतीतही असंच काही घडत होतं. पण स्टार वॉर्स आणि लिगो आपापले युनिव्हर्स चांगल्या पद्धतीने बनवत आहेत. ट्रान्सफॉर्मर्स सुद्धा पुन्हा नव्याने सिनेमे घेऊन येत आहेत. म्हणजे हॉलीवूडमध्ये प्रत्येक सिनेमा कंपनी आपापले सिनेमॅटिक युनिव्हर्स बनवत आहेत, पण हे सर्व आताच घडत आहे, असे नाही. आधी सुद्धा बऱ्याच कंपन्यांनी सिनेमॅटिक युनिव्हर्स बनवायचे प्रयत्न केले होते, आणि नंतर ते इतिहासजमा झाले. आता केविन फायगी यांनी हा ट्रेंड त्यांच्या पद्धतीने कोणतीही तडजोड न करता पुन्हा एकदा सुरु केला, आणि त्यात ते यशस्वी देखील झाले आहेत.

मार्व्हल्स सिनेमॅटिक युनिव्हर्सच्या आधी केविन फायगी 'दि डोनर्स' कंपनीमध्ये लॉरेन्स रॉनरसोबत काम करत होते. ज्या आता फॉक्स स्टुडियोसाठी काम करतात. केविन यांनी त्यांच्यासोबत 'यु गॉट मेल' आणि 'वोल्कॅनो' सिनेमांसाठी काम केलं. नंतर लॉरेन्स यांनी 'एक्स मेन' सिनेमांची फ्रॅन्चायझी घेतली. त्यावेळी त्यांनी केविन यांना देखील सोबतीला घेतलं. याच अनुभवाच्या वेळी केविन यांना मार्व्हल्स स्टुडियोमध्ये काम करावेसे वाटले. त्यावेळी मार्व्हल्स स्टुडियोचे प्रमुख अविया रेड होते, ज्यांनी मार्व्हल्सच्या ९० च्या दशकातील टीव्ही मालिकांची निर्मिती केली होती. केविन लवकरच मार्व्हल्सचे सह-निर्माते झाले. तेव्हा त्यांनी 'डेअरडेव्हिल्स' आणि 'हल्क' या दोन सिनेमांची निर्मिती केली. पण दोन्ही सिनेमे दुसऱ्या एखाद्या स्टुडियोसोबत बनवले होते. मार्व्हल्सचे २००६ सालचे तत्कालीन अध्यक्ष डेव्हिड नेशल यांना मार्व्हल्सचे सिनेमॅटिक युनिव्हर्स असावे असे वाटत होते. पण अविया रेड यांना ते मान्य नव्हते. त्यांना वाटत होते, आपण आपल्या सुपरहिरोंचे हक्क इतर कंपन्यांना विकायचे आणि नफा कमवायचा. त्यांच्या मताशी तत्कालीन सीईओ आयझ्याक झेक सहमत होते. त्यामुळे डेव्हिड नेशल यांना काही करता आले नाही. नंतर अविया रेड यांची ओळख केविन यांच्याशी झाली. केविन यांच्याकडे नवनवीन कल्पना होत्या. त्या कल्पना अविया रेड आणि सीईओ आयझ्याक झेक या दोघांनाही आवडल्या. तेव्हा या सर्वांनी एकत्र येऊन सिनेमॅटिक युनिव्हर्ससाठी काम करायचं ठरवलं.

केविन यांनी कर्ज घेऊन २००८ साली ‘आयर्न मॅन’ आणि ‘द इन्क्रेडिबल हल्क’ या दोन सिनेमांची निर्मिती केली. पैकी ‘द इन्क्रेडिबल हल्क’ सिनेमाचे हक्क युनिव्हर्सल स्टुडियोकडे असल्याने त्या दोन्ही कंपन्यांना एकत्र काम करावं लागलं. दरम्यान सिनेमाचा नायक एग्वर्ड रॉड आणि केविन यांच्यात वाद झाला. एग्वर्ड यांना तो सिनेमा त्यांच्या पद्धतीने बनवायचा होता. केविन यांना ते मान्य नव्हतं. शेवटी केविन यांनी एग्वर्ड यांना पुढील सिनेमांमधून काढून टाकले. सिनेमाला देखील चांगला व्यवसाय करता आला नाही. यानंतर केविन यांनी त्यांच्या कल्पकतेने काम केले. त्यांनी जॉन फेवेन्यू आणि रॉबर्ट द्वानी ज्युनियरला सोबत घेऊन एका अशा सुपरहिरो सिनेमाची निर्मिती केली, ज्याच्याबाबत बऱ्याच जणांना जास्त काही माहित नव्हते. केविन आणि मार्व्हल्सने मोठ्या हिमतीने हे धाडसी पाऊल उचलले होते. आणि तो सिनेमा होता ‘आयर्न मॅन’. आणि हा सिनेमा मार्व्हल्सचा पहिला सुपरहिट सिनेमा ठरला. हा सिनेमाला प्रेक्षक पसंत करतील कि नाही, याचा विचार न करता त्यांनी पुढील सिनेमांवर आधीच काम करणे सुरु केले होते. म्हणजेच आयर्न मॅनचे शुटींग होत असताना केविन फायगी ‘थॉर’, ‘कॅप्टन अमेरिका - द फर्स्ट अव्हेंजर’ आणि ‘द अव्हेंजर्स’ सिनेमांच्या स्टोरीलाईनवर काम करत होते. नुसते काम करत नव्हते, तर त्यांनी या सिनेमांची घोषणा २००६ च्या कॉमिकॉन समारंभात केली होती.

पुढे जाऊन मार्व्हल्स स्टुडियोला डिझ्नेने ४ अब्ज डॉलरमध्ये खरेदी केले. त्या दरम्यान डेव्हिड नेशल यांनी सेवानिवृत्ती घेतल्यावर मार्व्हल्सची सर्व सूत्रे केविन फायगी यांच्या हाती आली. ते मार्व्हल्स स्टुडियोचे अध्यक्ष झाले. केविन यांना हेच हवे होते. त्यांनी आपल्या सिनेमॅटिक युनिव्हर्सलच्या पहिल्या टप्प्यात तब्बल सहा सिनेमांची निर्मिती केली. यामध्ये ‘आयर्न मॅन’, ‘द इनक्रेडिबल हल्क’, ‘आयर्न मॅन २’, ‘थॉर’, ‘कॅप्टन अमेरिका - द फर्स्ट अव्हेंजर’ आणि ‘द अव्हेंजर्स’ या सिनेमांचा समावेश होतो. मोठ्या प्रमाणात सुपरहिरो एकत्र आणून त्यांना न्याय देत ‘द अवेंजर्स’ हा सर्वोत्कृष्ट सिनेमा ठरला. त्या सिनेमाने अनेक विक्रम नोंदवले.

आपल्याला मिळालेल्या या यशाने होळपळून न जाता केविन यांनी पुढील टप्प्याची घोषणा केली. ज्यामध्ये त्यांनी ‘आयर्न मॅन ३’, ‘थॉर - द डार्क वर्ल्ड’, ‘कॅप्टन अमेरिका - द विंटर सोल्जर’, ‘गार्डियन ऑफ द गॅलेक्सि’, ‘अव्हेंजर्स - एज ऑफ अल्ट्रॉन’ आणि ‘अँट मॅन’ अशा एकापाठोपाठ एक सहा सिनेमांची निर्मिती केली. दरम्यात ‘थॉर - द डार्क वर्ल्ड’ सिनेमामध्ये थोडा गोंधळ झाला. त्यामुळे त्यांनी सिनेमाच्या दिग्दर्शिका पेटी जेनकिन्स यांना सिनेमा सोडायला सांगितलं, तो सिनेमा मग अॅलन टेलर यांनी दिग्दर्शित केला. दिग्दर्शक इग्वार्ड यांच्या जागी पॅटॉन रिड यांनी ‘अँट मॅन’ सिनेमा दिग्दर्शित केला. ‘आयर्न मॅन’ दिग्दर्शित करण्यासाठी जॉन फेवेन्यू यांनी नकार दिला. तो सिनेमा शेन ब्लॅक यांनी दिग्दर्शित केला. केविन यांची इच्छा होती, ‘अव्हेंजर्स - एज ऑफ अल्ट्रॉन’ हा सिनेमा जॉन फेवेन्यू यांनी दिग्दर्शित करावा. पण काही कारणांमुळे

ते शक्य नाही झाले. मग तो सिनेमा जॉश विडेन यांनी दिग्दर्शित केला. पण त्या सिनेमाला 'द अव्हेंजर्स' प्रमाणे यश मिळाले नाही. यामुळे आयझ्याक यांना चिंता वाटू लागली. त्यांनी पुढील सिनेमांसाठी जास्त पैसे न गुंतवण्याचा विचार केला. पण त्यानंतरचा 'आयर्न मॅन ४' हा केविन फायगी यांचा महत्वाकांक्षी सिनेमा होता. कोणत्याही परिस्थितीत त्यांना तो बनवायचाच होता. सिनेमाच्या बजेटचा विचार करून आयझ्याक यांनी त्या सिनेमामधून रॉबर्ट ढ्ढानी ज्युनियरला काढण्याचे सुचवले. त्यावर केविन फायगी इतके भडकले, कि त्यांनी मार्व्हल स्टुडियो सोडण्याचा निर्णय घेतला. बऱ्याचशा वर्तमानपत्रांमध्ये ही बातमी बरेच दिवस ब्रेकिंग न्यूज म्हणून होती. पण डिझ्ने स्टुडियोचे सी.इ.ओ. बॉब आयगर यांनी ॲलन हॉन यांच्यासोबत पुढाकार घेतला आणि केविन यांना हवा तसा सिनेमा बनवण्यासाठी सहाय्य्य केलं. नंतर रुसो भावंडांच्या दिग्दर्शनाखाली त्या सिनेमाचे नाव 'कॅप्टन अमेरिका - सिव्हिल वॉर' असे निश्चित झाले. आणि त्या सिनेमाने काय कमाल करून दाखवले हे आपल्या सर्वांना माहितच आहे. याच सिनेमाने सोनी स्टुडियोच्या स्पायडरमॅनला मार्व्हल कुटुंबात आणले.

केविन यांच्या डोक्यात मग वेगळी कल्पना आली, त्यांनी नवनवीन दिग्दर्शकांना संधी द्यायचे ठरवले. मग 'थॉर – रॅग्नारॉक' टायको भटीडी यांनी, आणि 'ब्लॅक पँथर' इयान वोग्लर यांनी दिग्दर्शित केले. या दिग्दर्शकांनी आपल्या दिग्दर्शनातून ते करून दाखवले जे गेल्या कित्येक वर्षांचा अनुभव गाठीशी असलेल्या दिग्दर्शकांना करता आले नाही. पण या सर्व घडामोडींचे सर्व श्रेय अर्थातच केविन फायगी यांनाच जाते. त्यांनी नंतर 'अव्हेंजर्स - इन्फिनिटी वॉर' आणि 'अव्हेंजर्स – एन्डगेम' असे दोन्हीही मोठे सिनेमे रूसो भावंडांना दिग्दर्शित करण्यासाठी दिले. कारण 'कॅप्टन अमेरिका - सिव्हिल वॉर' सिनेमामध्ये त्यांनी मोठ्या प्रमाणात सुपरहिरो सोबत घेऊन प्रत्येक सुपरहिरोला न्याय दिला होता.

'अवेंजर्स एन्डगेम'ने जगाला वेड लावले आहे. नुकतेच या सिनेमाने आणि 'अवतार' या सिनेमांच्या कमाईचे विक्रम मोडत जगभरात सर्वाधिक कमाई करण्याचा विक्रम केला आहे. पण तुम्हाला माहित आहे का? केविन यांनी त्यांच्या पुढील सिनेमांची लिस्ट आधीच करून ठेवली आहे. त्याविषयी लवकरच बोलू.

**(लेखक साय-फाय विषयाचे अभ्यासक आणि ई-पुस्तक प्रकाशक आहेत.)**

**- श्री. अभिषेक ठमके / मुंबई**
**मो.- 9768650098**

# हायकू



१) कोरडी माती
पावसात ओलेती
अंकुरलेली

२) कोकीळगान
मंद स्वरात छान
झाडांमधून

३) गोंदन ठसे
हाती फुलपाखरू
उडून गेले

४) वसंत ऋतु
निसर्गात बहर
गुलमोहर

५) पेरले बीज
आभाळाकडे डोळे
आशाळभूत

६) जत्रेत फुगे
खूप खातात भाव
रंगीत राव

७) कांचनमृग
धावले अरण्यात
सीता जाळ्यात

**- प्रकाश पोळ / ठाणे (प.)**
**मो.- ९१६७४५०६६०**

# माझे कुटुंब, माझी जबाबदारी (कोरोना जनजागृती)



(कट्टा त्यावर बसलेले चार लोक,मोबाइल मध्ये बातमी... नवी मोहिम 'माझे कुटुंब माझी जबाबदारी'!)

**पहिला अंक...**

* गावची चौपाटी *

पहिला व्यक्ती- हे बघा आज अजून एक मोहिम लागु केली या सरकारने..!

दुसरा व्यक्ती- अरे काय झाल? कसली मोहीम सुचली अजुन त्या सरकारला...?

तिसरा व्यक्ती- सुचल असेल काही काम तर काय हाय दुसर त्यांना हेच करणार ते लोक.

चौथा व्यक्ती- अजुन कायतर! ईथ हामाला पोटा पाण्याच पडलय एकतर निसर्ग साथ देना अन् याच दुसरच. जीव लै वैतागलाय राव, कायबी होत नाय चिंता कशाची करायची नशीबात जे हाय तेच होईल.

पहिला.व्यक्ती- बरोबर बोलला बघ तु, ते मास्क जनावराच्या मुंगसागत आणि सेनिटाइजर लावून काय नाय अन काय करून काय नाय.

तिसरा.व्यक्ती- नाहितर काय येड्या, कंटाळून गेलाय जीव हे सगळे नियम पाळता,पाळता! चला जे व्हायचय ते होत राहील.

सुर्या(धावत-धावत येवून)- अरे! अरे! ऐकलात का रे, त्या गण्याला कोरोना झालाय म्हणून घेवून गेले. त्याच्या घरचे बसल्यात रडत...चला लगा जरा!

दुसरा व्यक्ती- अरे देवा आता तो घरी परतल्यागतच हाय.., चला बघु चला...!

**दुसरा अंक**

* ग्रामपंचायत कार्यालय *

(ग्रामसेवक, सरपंच, नगरसेविका, आशाताई बैठक)

ग्रामसेवक- गावात कोरोना रूग्णांची संख्या वाढत आहे. याची काळजी घेत सरकारची 'माझे कुटुंब माझी जबाबदारी'

ही मोहीम तात्काळ हाती घेतली पाहीजे!

सरपंच- हो अगदी बरोबर!

आशाताई- हो आपणाला या कामाची तात्काळ सुरूवात केली पाहिजे.

नगरसेविका- आम्ही यात नक्की चांगली भुमिका निभावू!

ग्रामसेवक- पुलिस निरीक्षक डॉ., नर्स सर्व जन आपापली योग्य भुमिका निभावतच आहेत. आपणही उद्यापासून कार्याला लागु या.

सर्व मंडळी - हो!

## तिसरा अंक

(पोलिस रस्त्यावर पहाणी करताना)

पोलिस- मास्क आहे का?, हात सेनिटाइज मगच कार्ड दाखवा...

सुर्या व प.व्यक्ती- ( बाजारातून घरी परत येत असताना..)

सुर्या- अरे बाबो, पोलिस हाय तिथ मास्क लाव बिगीन(लवकर) तोंडाला. लाव लाव..!

पहिला व्यक्ती- हा खिशातच आहे लावतो तुबी लाव बिगीण!

पोलिस कॉर्नर पास केल्यानंतर...

सुर्या- काड लगा आता ते मास्क!

प.व्यक्ती - हा रे! लय दम गोठत होता, कुठ कोरोणा होत आहे की कायबी होतनी!

दुसरा व्यक्ती- काय लगा,कुठ गेलता की?

सुर्या - बाजारात!

चौथा व्यक्ती - बर!

तिसरा व्यक्ती- चला गड्या टपरीवर १- १ कप चहा मारु ( एकमेकांच्या गळ्यात हात घालुन)

## * चौथा अंक *

( ग्रामसेवक, नगरसेविका, आशाताई घरोघर पहाणी करताना)

राजे निवास

आशाताई - कोणी आहे का घरात?

तात्या- आलो आलो!

आशाताई- आम्ही तुमची कोरोनाची तपासणी करायला आलो आहोत!

तात्या- ते कसली आता?

ग्रामसेवक- सरकारी आदेश आहे कृपया प्रतिसाद द्या आणि कुटूंबाची काळजी घ्या.

राम-हे काय आहे तात्या?

तात्या- तपासाया आल्यात म्हण रं पोरा!

राम- बर, बर!

शाम- मी ही आलो घ्या तपासा आता!

आशाताई (सर्वांचे नाव यादीत नोंदवत)- सुर्या दादा नाही दिसत, आहे कुठे तो?

तात्या- सुर्या ते...ते...(अडखळत) ते जरा कामागणीस भाइर गेलाया आला की पाठवितो त्याला तुमच्याकड लिहा त्याचबी नाव यादीत.

ग्रामसेवक-पण...

नगरसेविका-बर! आल्यावर पाठवा आमच्याकडे.

(सुर्या घरातच असतो पण त्याला लपवतात,पण का..?)

* काही दिवसानंतर *

(पहिला, दुसरा, तिसरा, चौथा व्यक्ती कुजबुजत)

आशाताई- काय झाले आहे दादा?

दु. व्यक्ती- काय, त्या सुर्याला लै बर वाटत नाही श्वासबी घेता येणा.

आशाताई- पण त्यो तर गावात नाही ना?

प. व्यक्ती- त्यो कुठे नाय गेला इथच हाय!

(ग्रामसेवक, आशाताई, नगरसेविका ॲमबुलन्स घेऊन सुर्याच्या घरी)

सुर्या कोरोणा positive

काहीदिवसाच्या सुर्या वरच्या उपचारानंतर सुर्या बरा झाला.

चौथा व्यक्ती- सुर्या बरा झाला रे... SS

(सुर्या हसत घरी परतला)

सुर्या- मला माफ करा मी घरात असताना नाही म्हणून खोट बोललो कारण, मला दमा होता तुम्ही मला न्हयाल म्हणून परंतु मला ती चुक भारी पडली अन कोरोनाचीच लागण झाली!

जनतेला सुर्या संदेश देताना-

सुर्या- कृपया मंडळी तुम्ही तसे करु नका वेळेवर तपासणी करुन घ्या. मास्कचा नियमीत वापर करा नाकी फक्त पोलिस किंवा अन्य सरकारी कर्मचाऱ्यांपुढेच. हात व सार्वजनिक संपर्कातील वस्तु वेळोवेळी सॅनिटाइजर करा व सामाजिक दुरी राखा.

चला तर मग सुरुवात स्वत: च्या कुटूंबा पासुनच करुया!

म्हणून-

माझे कुटुंब, माझी जबाबदारी ही मोहिम हाती घेवूया!

**- कु. मयुरी मल्लिनाथ जायाप्पा / बालकुंदा**
**मो.- ७४९८२१९८८६**

# मन उधाण वाऱ्याचे



आसमंती व्हावे स्वार
असे सदा वाटायचे
मुक्तपणे विहारावे
मन उधाण वाऱ्याचे

नको पाश कशाचेही
बळ पंखी भरायचे
निरसंकोच मी स्वच्छंदी
मन उधाण वाऱ्याचे

सानुलीशी झुळूक मी
हवेसंगे उडायचे
आता इथे,पुन्हा तिथे
मन उधाण वाऱ्याचे




प्रश्न असंख्य पुढती
उत्तरही शोधायचे
खंबीरता वसे अंगी
मन उधाण वाऱ्याचे

लेखणीला सखी मानू
मुक्तपणे लिहायचे
आनंदाशी पक्के नाते
मन उधाण वाऱ्याचे

**- संध्याराणी जयहिंद कोल्हे / कळंब**
**मो.- 8788591371**

# वाटोळं...



" का व ऽ उसने पासने त्त...पा ऽ हो... पोर्ग्याले का आसं जयू देत्ता का... चार रोज पासून पोर्ग नुस्त कंन्हून राहयल...." आशा पोराच्या तोंडावरून हात फिरवत बोलली.

" काय करु मी... कुकळून आनु पयसे...." मनीष लाचार होत बोलला.

" तुमच्या एच ओ ळी कळून मांगुन आनां न्ह..."

" तेंचे मांगचेस बाकी हाये... कस मांगू...?"

" तुमच्या ऽ त्या सरले भेटल न पयसे..."त्याच्या डोक्यात लख्खन वीज चमकली. तो तूरुंतुर आपल्या मित्राकडे धकला.आशा संतापा संतापात बडबडत होती. तिचे आंगार जाळ शब्द त्याच्या कानावर पडत होते.

" ज्या ऽ मेल्यान... सी यस बी काहाळ्ली आसिन...त्या मेल्याचा सत्यानास नास व्हईन.... आसे आसे दोमदोम करतीन ते....मोत मांगतीन त्त...मोतबी देनार नि देव तेनले... कुत्र्यावनी घयघय करतीन....बारझवने....तेच्या घरा दाराले कुपाटी लागीन... हामाले जसा दान्या दन्यासाटी तरसून राहयलेन..तेबी तरसतीन..." आशा कोणाच्या तरी नावानं कडकड हाताची बोटं मोडत शिव्याशॉप, बददुवा देत होती.

पायी पायी चालत तो त्याच्या मित्राच्या घरापुढे येवून उभा राहिला.बाहेर वट्यावर त्याची थकलेली मायबाप आपल्याच विवंचनेत बसलेली होती. बापाच्या आंगावरची बांडीस डाव्या खांद्यावर फाटली होती.पोरगा नवे कपडे घेऊन देईल या आशेनं ते जणू तिष्ठत होते. पिकल्या

दाढीच्या केसात त्यांचा चेहरा खूप उदास आणि ओसाड वाटत होता.माय ही आपल्याच नाराजीच्या सुरात बसलेली होती. त्यांच्या निस्तब्दतेवरून घरात काहीतरी कुरबुर झाल्याचं जाणवतं होत.

जवळ येऊन त्यान हळूच म्हटल.

" नमस्कार ऽ काका.... सर ऽ हाये का...."

" कोन ....?"

"काका मी ऽ मनीष...." त्यानं त्याची ओळख करुन दिली.

" महया लेक सर हाये ऽ मले कसं ठाऊक नि गव्या....."

काकान अशी फिरकी घेतली. त्याचे सातपाच गेले. पुढे काय बोलावं क्षणभर त्याला सुचलं नाही.पण काका असं का म्हणताहेत त्याच्या मागे काय कारण आहे.हे जाणून घेतलच पाहिजे.असा विचार करुन.

" काव्हून काका...काय झालं...."

" आरे ऽ . महया लेक सर आस्ता त मह्या आंगावर हे आसं गदगद मास चढल

आस्त... बंगाईत बसलो आस्तोमी...हया म्हथारीले....नये लुगळे घ्येतले आस्ते मिन्ह.... पाहय...तिचं लुगळ कस...चदरी पत्रावानी व्हयेल हाये गळ्या....दोन वर्षापासून यक नयी चिंदी... तिच्या धुंगनाले माहीत नि बाप्पा.... नादारी हामून बी पायली पन आसि नि बाप्पा.... हिजळा झवाळे न पदरून खवाळे आस नि केलं..... बकऱ्या वयल्या... पन उष्ट पास्ट नि खाल्ल कोनाच......तू ऽ खूस्याल सर म्हनून राहयला तेले...अरे तेच्या पेक्षात ....ढोर वयनारे पोरं चांगले...

निदान बापाले.... मटन मासोई तरी चार्ता... बापाची खुस्याली तरी इच्चार्ता.... येले सिकाळून मिन्ह म्हया पायावर कुऱ्हाळ मारली भो... महया लेकान बकऱ्या वयल्या आस्त्यात बर झालं असतं.... आसे झूरु झूरु नि मरलो आस्तो हामू... काय त्त ऽ म्हने... नेट्ट ऽ सेट्ट हाये.."

" बस करा व माय ... काव्हून... म्हईस समजून हेल्याले कुथाळू राहयले..." काकून ही हळूच टोला हाणला.

मनीष पांढरफट्ट पडला.खाली मान घालून तो निघालाच होता की श्रेयस घरातून बाहेर आला.

पैसे मागावे की नाही.मनीषच मन खच खाऊ लागल. सर कसे काय आले. कदाचित पैसे वगैरे....असा प्रश्न श्रेयसला ही पडला. आपसात काहीच न बोलता. थोड्या अंतरावर येऊन दोघे उभे राहिले.

" सर ऽ काय काम काढलं..." श्रेयस सरांनी विचारलं

" मुलगा खूप आजारी हाये..."

" किती ऽ लागतीन..."

"सर... थोळा फार किराना बी...."

" तेला तुपाचे भावबी... मन मन तसे वाढोले..."

" आपल्या आयुष्यच... वाटोळं केलं सर...फक्त मातीत गाळ्याच ठुल...."

" मातीतस गाळल...."

दोघंही सी. एच. बी वर काम करत होते. सी.एच.बी. चा पगार वर्ष वर्षभर मिळत नव्हता. त्यामुळे जीवन जगण्याचे वांदे झाले होते. दोघंही सी.एच बी चे रट्ठे खाऊन खाऊन धोड झाले होते.उच्च विद्याविभूषित असून देखील आपल्या कुटुंबाची जबाबदारी पेलण्यास असमर्थ होते.बराच वेळ दोघे चर्चा करत राहिले. पैसै कसे मिळवता येतील.याचा विचार करु लागले. दोघ एका निर्णयावर ठाम झाले....

आज दोघींना पंधरा दिवस झाले होते. एकाच शहरात फिरून कंटाळा आला होता.जळगाव , भुसावळ ला जी कमाई झाली .ती या शहरात नाही. मिनाक्षीला कॉटवर पडल्या पडल्या हाच विचार डिवचत होता.ती कॉटवर केवळ पडून होती.डोळे बंद होते.परंतु मन जागी होत.सकाळच्या चार वाजल्यापसून ती कॉटवर

केवळ लोळत पडली होती. कुठल्याशा विद्रूप, कुरूप स्वप्नांन ती खडबडून जागी झाली होती.तेंव्हापासून तिला झोपच लागली नाही.स्वप्न तिला आठवत नव्हत.ती परत परत आठवण्याचा प्रयत्न करत होती.परंतु स्वप्नच ते आठवत नव्हत.दीर्घ जांभोई देत,दोन्ही हात उंचावत, छाती जरा बाहेर काढत तिन आळस झटकण्याचा प्रयत्न केला.परंतु आळस गेला नाही.उलट सार शरीर थकून गेलय. असं तिला वाटू लागलं. झोप अपुरी झाल्यामुळ डोळेही जळजळ करत होते.

तिन आपल्या मैत्रिणीकडे पाहिलं.तिची मैत्रीण श्रेया गाढ झोपली होती.तिला उठवू नये.अशीच झोपू द्यावी.ती हळूच कॉटवरुन उतरली. वाशरुमला जाऊन आली. किती वाजले. पाहण्यासाठी तिने मोबाईल उचलून हातात घेतला.

मोबाईल मध्ये सकाळचे आट वाजले होते. आता लवकर आवरलं पाहिजे.म्हणून ती सारे विधी उरकू लागली.आंघोळ करुन ती आली.तरी श्रेया झोपलेलीच होती.

" उट वऽ उट... जायच नही का...आज कामावर..." तिच्या या लाडीक आणि मंजुळ शब्दानं. ती खसकन उठून बसली.

" का ऽ व झालबी का तुहय..."

" हावन... तुबी उरकोई घ्येंन बयना.... आट वाजी गेले नऽव...."

" तुऽ नट्टा फट्टा त्त कर तदलोग ....मी आवरते..." तीन ब्रश तोंडात टाकला. खरखर दातावर घासतच ती टॉयलेटमध्ये जाऊन बसली.

मीनाक्षीन सार अंग पॉड्स पावडर मध्ये बुडवून घेतल.

लिपस्टिक, टीकली टाकली लावत ती नवरीवाणी सजू लागली.तिच्या अंगातून फुलासारखा सुगंधित वास घमघमाटू लागला. रुममध्ये असलेल्या आरशात ती आपल लावण्य आणि सौंदर्य घडी घडी न्याहाळू लागली.आणि स्वतःच हसू लागली. तिचं चाळिशीतल वय, सुडोल बांधा, गोरा भोर रंग,भरीव अंगकाठी, टच्च छाती, अंगा अंगातून पाझरणारा मधुकण चांगल्या चांगल्या हिरोईनला भ्रमित करेल असं तारुण्य तिला निसर्गानं बहाल केलं होत.ती आपल्या ओटांचा मजेशीर चंबू करत आरशातील प्रतिमेचा मुका घेत स्वतःच्या सौंदर्य,लावण्याचं कौतुक करत होती.

तिची आपली पूर्ण तयारी झाली होती.

श्रेयाही आंघोळ करुन आली.भरभर झंपर,घागरा नेसू लागली.

" तू ऽ उर्कोय...तदलोगऽ मी च्या पियुन येत्ती...."

" थांम नं ऽ लग्गे... आस्सी काय करत्ती वं ..हागली हागली..., मुतली मुतली...," ती जीव काढत बोलली.

" आट वाजले नऽ व ऽआज आपल्याले खामगावले जान्न हेऽतीटी लगनबी हायेन....."

" झालं न मय ऽ आहया ऽ आसा कितलाग टाईम लागतो मले......" श्रेया

कमरेला साडी गुंडाळत बोलली.

" तू s उर्कोन ..."

" हाव न तोंडाले पावडर पुवडर चोपडली की झालं मंग..तू s तदलोग आपलाs झोला भरुन घ्येंन s मोब्बाईल मंदी का व्हून बोटं घालती...."

मीनाक्षीन झोला भरला.मोबाईल चार्जर वगैरे थोड बहुत साहित्य.तिला झोल्यात टाकायला उशीर लागला नाही.

सजून धजून दोघी काउंटरवर आल्या. काऊंटवर बसलेला मॅनेजर त्यांच्याकडे क्षणभर पाहतच राहिला.त्या आल्या तेंव्हा तो ड्युटीवर नव्हता.त्या दोंघींच अलवार रूप बघून त्याच्या तोंडाला घळघळ पाणी सुटलं.त्याच्या मनात विकृत वासना जागृत झाली.त्याची हावरट नजर दोघींच्या ही लक्षात आली.परंतु त्या नजरेचा सन्मान करत मिनाक्षी हळूच बोलली.

" नऊ नंबर राजा .. हं s... ज्यादा नको काळजो..."

" मॅडम s तुमचे आटसे राहेल हे .." मिनाक्षीच्या निळ्याभोर डोळ्यात खोल पाहत तो बोलला.तसा तिन त्याला एक डोळा मारला.

" आजच्ची रात s थांबल्या आस्त्या मॅळम....."

" लगन हायेभो.. खामगाई s पाहू s कालदी गिलदी.. युव आमी..."

" खरस कां..हे s महय कार्ड घ्या...."

मिनाक्षीन मनेजरच्या गालावरून हळुवार आपल्या हातांची बोट फिरवली तसा त्याला भलताच चेव आला. शिकार हातातून चालली अस त्याला वाटू लागलं. शंभर रुपये परत देत तो मोठ्या आशेनं म्हणाला

" व s मॅळम... हे राहू द्यान बाप्पा... महयाकळून सपरेम भेट s आसं समजा हे तुमचस होटल हाये..." मिनाक्षी न ते पैसे त्याच्या समोर आपल्या ब्लाऊजमध्ये ठेवले. तसा तो अजून चेकळला.

" ये s त्ते s मी s हं ..." पैंजणचां मधुर आवाज आणि कंबर नागमोडी वाकवत त्या दोघीही हॉटेलच्या बाहेर पडल्या.

बाहेर कडक ऊन तापलं होतं. उन्हामुळे आणि रस्त्यावरील फुफाट्यान मेकअप खराब होऊ नये, म्हणून मिनाक्षीन रिक्षाला हात दिला.परंतु रिक्षावाल्यान त्यांना दुरून च ओळखलं.अन् रिक्षा भरधाव सोडली.रिक्षाची एकाकी गती वाढल्यानं रस्त्यावरील बारीक फुफाट्यात धुरही मिसळून गेल्यान,तो फुफाटा त्यांच्या बरोबर तोंडावर च आला. श्रेया न साडीच्या पदराने आपल तोंड झाकून घेतलं.पुढं पुढं पळणाऱ्या रिक्षाला मिनाक्षी जोरजोराने शिव्या घालू लागली.त्याच्या वंशाचा उद्धार करु लागली. संतापलेल्या मिनाक्षीकडे पाहून तिला हसू येत होत. परंतु ती हसली नाही.

" जाऊ दे बयना नहीं थांबली त्त नहीं..काय हे s तेच्यात आवळ लगे... आस्सबी आपल जीवन.... रस्त्यावरच्या पाला पाचोयावानी... घळीक डांबर रोळ त्त s

घळीक... गाळ रस्ता फुफाटयातला...काव्हून आवळ जिवाले लावून घ्येत्ती.." तिला श्रेयाच म्हणन पटलं. रिक्षावाल्याचा राग मनातून काढत. तीन समोर पाहिलं.तर समोरून एक खाकी गणवेशातला पोलीस मोटासायकलवर येत होता. तसा तिचा जीव पाणी पाणी झाला. तिन आपल तोंड झाकून घेतल. पोलीस सरळ निघून गेला. तिचा कोमेजलेला चेहरा श्रेयाच्या नजरेतून सुटला नाही. तिन काळजीनं विचारलंच

" काय झालं व s पोलीसाले पाहून s तुहया तोंडावर माश्या काव्हून बसल्या.. आतासत s तू गुदुगुदु हासत व्हती.. ..."

" व s मले रात्ती सपन पडलं व्हतं... सपनात आपल्याले हातबेड्या टाकून पोलीसायन नेलं...." मिनाक्षीला रात्री पडलेलं स्वप्न आठवल.

" व s खरस का व माय..."

" घाबरती कस्याले... तिटी तरी पोटभर भाकर भेटीन.. आस्सि बी त्त आपल्या जीवाची उलंगवाडी होयेलस हाये..काय हाये झाक्या झुक्याले... सगडचत्त भोंगये हाये आपलं..."

भोंगये या शब्दावरून श्रेयाला त्या रात्रीचा प्रसंग आठवला.ती एकटीच आपली गदगद हासू लागली.

" काव्हून हास्ती व s तू...मले बी सांगन व...."

श्रेयान तिला त्या माणसाची गोष्ट सांगितली तशी ती ही खळखळून हसू लागली. अन् हसता हसताच बोलू लागली.

" कसा म्हने व तो... यक महय आंग चोइन..अन् दुसरी तेल मालीस....."

" मंग कसा पहयाला .... ढुंगनाले पाय लावून...."

दोघी ही एकेक जुन्या आठवणी आपल्या अनुभवाच्या गाठोड्यातून काढत हसत मासत बस स्टँड जवळ आल्या. रस्त्यावरून मोटरसायकली ,रिक्षा , बस धावत होत्या. रस्त्याच्या आजूबाजूला असलेल्या पानटपऱ्या जवळ उभी असलेली माणस आणि हात गाडीवर फळ विकणारे, विक्रेते त्यांच्या कडे टुकमुकू पाहू लागले. यांनी आपली बवणी करावी, आपल्या जवळ यावे असे बऱ्याच जाणत्या विक्रेत्यांना वाटत होत.त्यातल्या एकाने हाताचा इशारा करत जोरान आवाज दिला

" मॅळम... इथी या.. इथी व sमॅळम..."

" व sमॅळम..."

" इदर आंव इदर..."

त्याला पाहून दुसऱ्या, तिसऱ्या चौथ्या हातगाडीवाल्याने लागोपाठ हाका मारल्या.

" हांजी s कयसे दिये सेब..." मिनाक्षी न पहिल्या माणसाला विचारलं.तसा तो बेंबीच्या देठापासून खूष होत बोलला.

" काय मॅळम...मी त्त तुमचा फ्यान हायेन बप्पा... महि काहून मज्जा घ्येता... तुमाले लॉगिन ते घ्यान बप्पा... पयसे बी घ्यां न...."

फळ विक्रेते मन खोलून दोघींच स्वागत करत होते . गोड गोड बोलत होते. त्याही कोणाला दुखवत नव्हत्या.केवळ आपल्याच हिस्याचा वाटा उचलत होत्या.लोक आपली कदर करतात,आपल्यावर प्रेम करतात,हेच त्यांच्यासाठी मोठ होत.भरपेट फळ खाऊन त्या बसस्टँड मधी आल्या.

बस स्टँड लाल भडक उन्हानं तापलं होत. प्रवाशांच्या जीवाची काहीली होत होती. डोक्यावरचं पंखे निरानाम गरम हवा सोळत होते. बसस्टॅण्डमध्ये बस येत होत्या. जात होत्या.त्यांचे कर्कश आवाज कानावर आदळत होते. गतीनं फिरणाऱ्या गाड्या बारीक सारीक कागद कुगद, वेफरच्या प्लॅस्टिक पिशव्या,फुफाटा हवेत उडवित होत्या.डेपो मॅनेजर माईक मधून गाड्यांची नावे अलाऊंस करत होता.त्याचा कर्णभेदी आवाज स्पीकर मधून फाटत होता. प्रवास्यांची कचकच बचबच वाढलेली होती.लहान लेकर चिरकत होते. कोणाला ही बस स्थानकात क्षणभर बसाव असं वाटतं नव्हत.नवीन प्रवासी स्थानकात येऊन हुद्दुहुल्ला करत होते. बस स्थानकातली गर्दी काही ओसरत नव्हती. एक सारखी वाढत होती.त्यात वरून उकळ नाऱ्या उन्हानं साऱ्यांच्या जीवांची तगमग होत होती. चिल्ली पिल्ली पोरं थंडगार हिरव्या उसाचा गारगार रसाचे ग्लास हातात घेऊन फिरत होते.कोणी शेंग दाणे , मुंग फल्ली, तर कोणी केळी, बटाट्याचे चिप्स, आवळा,चिक्की, मुरमुरे, वडे,कचोरी, राजगिर्यांचे,लाडू, पारले, टायगर, मॉरी गोल्ड,क्रीम, पतंजली, खारे गोड, नमकिन भिस्कुट विकण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते.तर काही शाळकरी पोर हातात बिस्लरीच्या बाटल्या घेऊन प्रवश्यामध्ये फिरत होते. मळक्या फाटक्या कपड्यातील वाघरी, वडरांची,आणि काही भिकऱ्यांची पोर भिक मागत होती.काही मानस त्यांच्यावर डाफरत होती. काही चिडत होती.तर काही मानस संतापान त्यांच्या अंगावर जाऊन वसकत होती. बारीकसा का होईना सगळ्यांचा दमछाक होत होता.

माणसांनी फुल्ल भरलेल्या ,गजबजलेल्या बस स्थानकात या दोघी जणी येऊन उभ्या राहिल्या, तशा चांगल्या वाईट नजर त्यांच्या देहावर भिरभिरू लागल्या.

क्षणभर एकच शांतता पूर्ण बसस्टँडमध्ये पसरली.

एक दोन खेडूत बाया त्याच्याकडे पाहून आपसात कुजबुजू लागल्या.

“ हिरोईनी हाय वाट्ट....”

“ हीरोइनीच हायेन...”

“कसा थंडगार फुलाचा वास सुटला व .... आनमान धपक्या... तहात्त निरानाम पादरा पुदरा वास येत व्हता...”

तेवढ्यात दोन चार चेवले माणस,तरुण पोरं त्यांच्या अंगाशी घसट करण्याचा प्रयत्न करू लागले. तेवढ्यात एक महिला पोलिस धावली.त्या पोरांवर,माणसांवर आपले काळे निळे डोळे गरगर काढत पोलिसी आवजात खडसावले.

“ माय बयनी नि s काय बे तुमच्या घरात... सेली ब्रेटी हाये त्या....” तिन खिशातून

दहाच्या दोन नोटा

काढल्या.दोघींच्या हातात एकेक ठेवल्या. पैशांचा पाऊस त्या दोंघीवर पडू लागला.

खामगाव बस लागल्याचं डेपो मॅनेजर न माईक मधून अलॉऊन्स करताच त्या खामगाव बस कडे वळल्या.तरुण पोरे आणि मानस त्याच्याकडे एकटक पाहत झुरु लागले.एक दोघं तर गाणं ही म्हणू लागले.

“ हिची चाल तुरतुरु.. उलती केस भुरु....डाव्या गालावर बट ढळली...” त्याला पाहून दुसरा ही त्याला तोडीस तोड अस गाणं म्हणू लागला.

“ ये ऽ आखे ऽ ये ऽ जुल्पे... कयामात.... कयामत...”

“ काय चिकन्या चोपड्या व्हत्या साल्या... बस आस्सीच बायको करीन मी... नहीं त लगिनस करनार नि ...”

“ गेल्या रे गेल्या....त्या....”

बस स्थानकातील कर्मचारी, प्रवाशी , पाणी विकणारे पोरं पारे, घडीभर त्यांच्या पाटमोऱ्या आकृतीकडे पाहतच होते. चार सहा जण त्यांच्या मागेमागे लपून छपून चालत होते.

डोळ्यावर पदर घेऊन,चेहरा झाकून त्या बसमध्ये चडल्या. बसमध्ये एवढी गर्दी नव्हती. कंडक्टरन दरवाजा लावला. बेल मारली.गाडी धकली. त्या निवांत एका सीटवर बसल्या.

श्रेयाच मन अगदी मोरावाणी थुई थुई नाचत होत. तिच्या बाजूच्या सीटवर एक तीसीतली बाई आपल्या दोन लहान लेकरांना घेऊन बसली होती.परंतु तीच सार ध्यान श्रेयाकडेच होत.श्रेया ही तिच्याकडे अधून मधून पाहत होती.तिला श्रेयाशी बोलावस वाटत होत.तिचा चेहरा ओळखीचा वाटत होता.पण कोणाची कोण ? तिला ओळख पटली.तीन आपल तोंड खिडकी कडे फिरवून घेतल.

‘ तिकीट...तिकीट...तिकीट...” मध्येच कंडक्टर येवून उभा राहिला.तिने आपली दोन तिकीट घेतली.अन् निवांत अंग सोडून बसली.मोकळी चोकळी.

मिनाक्षी खिडकीजवळ बसून बुलडाणा शहारातील एकेक दुकान पाहत होती.डोंगर झाडं अस एसटीतून पाहण तिला फारच आवडत असे.आणि ती पाहता पाहताच झोपी जात असे. आता ही तिचे डोळे फकाफक लागत होते. सिटला डोकं टेकवून ती झोपून गेली. श्रेयाला ही जांभोळ्या येवू लागल्या.

बस दोघींना उतरवून निघून गेली. इच्छित स्थळी त्या पोहोचल्या.नवरदेव आणि नवरिला आशीर्वाद दिला.जेवण न करताच त्या निघाल्या. खामगांव शहर पायी तुडवू लागल्या....

चोरांच्या शोधात असलेली टोळी बऱ्याच दिवसापासून त्यांच्या मागावर होती.अनेक जिल्हे त्यांनी पालथी घातली होती परंतु ते काही सापडत नव्हते. भर चौकात उजळ माथ्या न फिरणाऱ्या त्या दोघींना कोणीतरी पाहिलं.पाहता पाहताच

लालबुंद झालेल्या टोळीनं त्यांनी गराडा घातला.

" यें s.. कंहा की हयरे s.. तू...तेरा गुरु कों न हय रे..."

मय s मय sक्या कर री...ये s देकना मेरी तरफ... कोन हय तू...." मिनाक्षीच्या नाका तोंडासमोर हात नेऊन तिला बळजबरीन धक्का देऊन, जोरजोरान टाळ्या वाजवत तिला खोदू खोदू विचारु लागली.

" मय s मय... मेरा... गुरु....गुरु...डॉ सपकाळे सर.. हायेन....." मीनाक्षी ची जीभ च नाही तर सार शरीर थरथरु लागलं.

" या धंद्याचे गुरु कोनहे ...पी एच डी चे गाईड नही... " "आंच s कां य s व s म इ रां s नी.. चंल s ना तू...

बंताना...तू किस्की चेली हय." श्रद्धाचा गालगुच्चा करत जोरान चिमटी घेत.एक जण पुढे आला.

तशा दोघी ही फाफळल्या. थर थर करु लागल्या.

" येंह... शितल... इंस का सांमान देक...." मिनिक्षीच्या जांघेत सरासर हात सिरले.

" गुरु s इं न के कपळे उं तारो ना.... मुंजे भी देखने s दो s ना.. आंदर क्यां हय .." सतांप्त तापा त्यांच्या इज्जतेशी खेळू लागला. त्यांच्या सन्मानाच्या ठिक्र्या ठिकऱ्या उडवू लागला. रस्त्यावरची, आजूबाजूची, फळ विक्रेते, हात गाडीवाले,दुकानातील दुकानदार,रिक्षात बसलेले, एस टी त बसलेले प्रवाशी, मोटर सायकल वरुन चालले माणस,रिकामी गर्दी एकाकी उडालेल्या गोंधळाला डोळे डोळे फाडू फाडू पाहत होते .त्या दोघी निमूट सार सहन करत होत्या.देवाला भजत होत्या. नियती न येथे ही त्यांना भोंगळं केलं होत. लाथा बुक्क्यांनी मारत टोळी त्यांना भर चौकातून पोलिस स्टेशनकडे नेत होती.रस्त्यावर चे लोक त्या गोंधळला पाहून काना डोळा करत निघून जात होते.

मारत मुरत त्यांना पोलीस स्टेशन समोर आणलं. पोलीस स्टेशनात.एकच्य धांदल उडाली.त्या तुफान गर्दीला रोखण्यासाठी दोन तीन पोलिस ऑफिसातून बाहेर आले. पाटील हवलदार त्यांना रोकत म्हणाला.

" ये s रुको s रुको ... अंदर नहीं जाना...."

" सायेब.... इन लोगोकी वजह से..."

" एकेक बोलो रे..." सूर्यवंशी हवलादर कावत बोलला.तसे सगळे शांत झाले.

" क्या s हुवा...."

" काय s लफड हाये रे....

टोळीचा मोरक्या पुढं आला.त्यानं पोलिसांना वास्तवाची जाणीव करुन दिली.

त्या दोघांना ऑफिसमध्ये आणून त्यांची कसून चौकशी केली. दोघी पाळीव पोपटावणी मिटू मिटू बोलू लागल्या.

"सायेब आमु सी. एच.बी वर हाये...."

" हा ऽ काय प्रकार हाये..." पी आय न विचारलं.
" प्राध्याकांची... हालकी जात..."
" म्हणजे शिक्षकच न...अस्या किती जाती हाये..."
" हजोरो जातीचे हाये..."
" साहेब यांचं पून्याला आंदोलन चालू व्हतं..." एका पोलिसाने पी. आय ला माहिती पुरवली
" काय ऽ शिक्षण काय तुमच्या दोघांचं...."
" एम. ए. बी.एड. एम.फिल.पी.एच.डी. नेट सेट..."
" उच्च विद्या विभूषित.. असून ही...लाज नि वाटत असे धंदे करायला...."
" साहेब... आमाले हाऊस थोळी हाये... आसे धंगडे कऱ्याले....काय ऽ करा.. व्यवस्थेन आमाले... हिजडा केला...." मनीष चे हुंकार ऐकून सगळ्यांचे डोळे पाणावले.

टोळीचा म्होरक्या ही गडबडला.त्याने आपल्या, माणसांनी हिसकावलेले पैसे परत देत.त्यांना हसी खुशी बसमध्ये बसवून दिलं.

.............................

**– युवराज मेघराज पवार / कापूसवाडी**
**मो.– ७५५९३२२८७६**

# ॥ चिमुकली मूठ ॥



सुख असो दु:ख चिरंजीव दोन्ही
समर्थ न कोणी रोखावया

कधी काट्यामधी कधी फुलामधी
धावतेच नदी अव्याहत

मेघमंडलाची जागोजाग नक्षी
आकाशात पक्षी बिथरती

काळ आपसूक प्रवाहात नेई
फुले डोंगराई खडकात

सावडणे सदा प्रकाशित तारे
नेईलही वारे दर्यापार

थेंब थेंब गळे उरे शून्य हाती
सांभाळली नाती काळजात

चिमूकली मूठ इवलेसे घेणे
ओंजळीचे देणे सरेचना



- तुकाराम पुंडलिक खिल्लारे / परभणी
मो.- ८८३०५९९६७५

# सायकल



आमची चोपनवाडी तशी छोटेशी, चौथी पर्यंतचे माझे शिक्षण गावातच झाले. पाचवी पासुन पुढील शिक्षणासाठी घाटनांदूरला जावे लागले. दोन आडीच कि. मी. दररोज पायपिट ये-जा करावी लागायची ,गावाला आत्तासारखा डांबरी रस्ता नव्हता. पावसाळ्यात गुडघाभर चिखल तर उन्हाळ्यात उट्या-आवट्या ! त्यातुनही बर्या घरची मुले सायकलवर शाळेत यायची. पण... आमची घरची परिस्थिती बेताची असल्याने मला सायकल नसल्याने, पायीच यावे लागायचे. दप्तराचे ओझे काखेत अन् हातात मायीनं दुपारी खायला दिलेला डबा असायचा . दोन्ही हात गुंतलेले असायचे . असे हे ओझे अन् पायी चालण्याने खूपच थकवा यायचा ! असेच एकदा शाळेला जात असताना रेल्वेच्या स्टेशन जवळ गावातील एका व्यक्तिची सायकल येताना पाहिली . पाहुन मी हात वर केला. अन् म्हणालो ," दादा मला न्या ना घाटनांदूरला". सायकलवर नेहणे तर बाजूलाच ! या उपर तो व्यक्ती म्हणाला ," सायकल घ्यावी लागते अन् त्यावर जावे लागते " ! ऐकूण माझ्या बाल-मनाला खूपच वाईट वाटले. पण विलाजच नव्हता कारण आमची तशी ऐपतही नव्हती !

बर्या घरची सायकलवाली मुले तर आमच्या अंगावर वाराही पडू द्यायची नसंत. उलट ज्यांला सायकल नाही त्यांना पाहून ते हिनवत अन् म्हणत," सायकलवाला ऐटीत बघा चालला" !

आम्ही फक्त ऐकत अन् बघतच असायचो !

पुढं सहावीच्या वर्गात गेल्यास कांही मुलं घरातुन खर्चायला पैसे आणीत, मौज मजा करत. पुढे कांहीना चक्क शाळा बुडवून सायकल शिकायचा नादच लागला होता . त्यावेळी घाटनांदूरमध्ये पाराप्पा मामाचे सायकलीचे एकमेव; एकुलते एक दुकान असायचे. तेही गावाच्यामध्ये बाजार चौकाशेजारी ! आमच्या गावच्या मुलांनी त्यातच किरायाची सायकल घेऊन सायकल शिकायची कोल्हे-कुई काढली. शाळा बुडवायची ठरली. "शुभष्य शिघ्रम" म्हणतात तसे त्या पैकी तीन मुलांनी चक्क एक छोटी (कमी उंचीची) सायकल किरायाने घेतली अन् गावाच्या पूर्वेला आनंदवाडी-नागदरा या जुन्या पायवाटेने मोंढा भागात चिरक्यावर निघाले सुध्दा ! "गाडी बरोबर नळ्याची जत्रा" म्हणतात तसे आम्हीही तीन फुकटे मुले बळेचच त्यांच्या मागे मागे गेलो. सायकलचे पैसेवाले मुले हक्कदार असल्याने, ते सायकल हातात धरुन ऐटीत ढकलीत चालत होते. आम्ही तिघे, मात्र त्यांच्या मागे मागे "बिन बुलाये मेहमान" प्रमाणे चालत होतो. अखेर एकदाचे ते माळरान (चिरके) ठिकाण आले.

चिरके म्हणजे खडकाळ, पडीक, ओसाड जमिन असल्याने त्यावर मेंढरांना

खाण्याजोगे बारीक-बारीक गवत अन् गाटेगोटे या शिवाय कांहीच नसायचे. कांही ठिकाणी तर खडक उघडा पडल्याने, अशा या नापिक ओसाड माळरानावर आमची सायकलीची कसरत एकदाची सुरुही झाली, ज्यांनी सायकल किरायाने घेतली होती ती मुलं आळी-पाळीने सायकलवर बसायचे अन् आम्ही तिघं मात्र त्यांची सायकल ढकलायचे काम करायचे. त्यांचे खूप खेळून झाल्यावर त्यांनी बदल्यात शेवटी- शेवटी आम्हा तिघांना सौजन्य म्हणून सायकल शिकायचा चान्स दिला. त्यावेळी अहमदपूर- अंबाजोगाई रोडवर नुकतीच खडी अंथरुन चोपली होती. पुरता डांबरही नव्हता !

आम्हा तिघांपैकी सर्वात शेवटी माझा नंबर लागला. आयुष्यात पहिलाच अनुभव तो ! मला बरेही वाटत होते. अन् भितीही वाटत होती. कसेतरी सार्यांनी मला सायकलीवर बसविले अन् आताच्या नवीन बस स्टड समोरच्या उताराला आम्ही धरतो, आम्ही धरतो, म्हणून ढकलले एकदाचे ! 'बोलाला अन् फुलाला गाठ पडावी' तसे अहमदपूरकडून भ्वां भ्वां हार्न वाजवीत भरधाव वेगाने एस. टी. आली. पाठीमागून माझ्या कानावर आवाज पडताच मी आनखीनच बावचळलो अन् आताच्या अहिल्याबाई होळकर चौकात धाडकन् खाली कोसळलो . "मी खाली अन् सायकल उरी" अशी आवस्था झाली. तेवढ्यात ड्रायव्हरने प्रसंगावधान राखीत एस, टीला ब्रेक जोरात मारला. जोराचा आवाज झाला अन् अवघ्या दीड मिटरवर त्यानी गाडी ब्रेक केली. हे बघुन सारे मुले धुम्म पळुन लांब गेली. या प्रसंगाने ड्रायव्हरचा अधिकच पारा चढला. त्याने मला गावंढळ शब्दात बरेच हासडले, बरीच कान उघडणी केली. मी मात्र थरथर कापत होतो. काय करावे ते मला कांहीच सुचत नव्हते. एवढ्यात गाडीतले प्रवाशी सर सर खाली उतरले. मी जीवंत आसल्याचे पाहून त्यांनी मला सायकल सहीत उचलून बाजुला केले. वेळ होत असल्याने बस निघुन गेली. तसे मोठ-मोठ्याने हसत मुले जवळ आले. अन् माझी मजाक उडवू लागले,

मला त्या प्रसंगाने कायम भेपान लागले. आजही त्या प्रसंगाची आठवण झाली कि माझ्या अंगावर काटे उभे राहतात ! तोपर्यंत आमच्या घरी कुण्यातरी मुलाने अगोदरच सांगितल्याने घरच्यांना वार्ता समजली होती. मग काय? आमच्या भावाचा पारा चढला , रागाच्या भरात," शाळा बुडवून हे धंदे करतोस का ? मेला असतास तर ... म्हणत मला खूप झोडपिले. चांगले त्यानी माझ्या पाठीचे दिरडेच केले.

पुढे दहावी पर्यंत मी कधीच मग सायकलीचा विचार केला नाही. दहावी नंतर लागलीच डी. एडला शासकीय अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई येथे प्रथम वर्षाला नंबर लागला. तेथे प्रा. एस. एन, जोशी सरांनी मला "मद्राशीने केला मराठी भ्रतार" या नाटकात कलाकार म्हणून घेतले. सरावा दरम्यान जो कोणी कलाकार आला नसेल त्याला बोलावत असत. सायकलवाले कलाकार धावत जायचे अन् बोलावून आणायचे . एके दिवशी सरांनी एक लेडीज कलाकारास उशीर होत असल्याने मला त्या मुलीस आणावयास सांगितले. तेव्हा मी म्हणालो," सर, मला सायकल येत नाही

! असे म्हणताच सारेच कलाकार हसु लागले. ते पाहून मनाला खूपच वाईट वाटले.

*सायकल-२*

त्या रात्री मला झोपच आली नाही. मला कलाकार मुलीस बोलावण्यासाठी जाता आले नाही. त्याचे कारण केवळ आणि केवळ सायकल येत नसल्यामुळे कलाकार मुलीला आणता आले नाही. माझा घोर अपमान झाला होता. माझे मन मला सारखे खात होते. तेव्हांच मी निर्धार केला की, कांहीही करुन आता सायकल शिकायची म्हणजे शिकायची ! निर्धार केला अन् दुसर्याच दिवशी कालेज सुटल्यानंतर लागलीच गावात म्हणजे अंबाजोगाईच्या गुरुवार पेठमध्ये मी व माझे मित्र दत्ता कागणे दोघे गेलो . आणि तेथील सायकल मार्ट वरुन एक कमी उंचीची सायकल किरायाने घेतली. गुरुवारपेठच्या पश्चिमेस असलेल्या गवळीपुरा शेजारील सरकारी मैदानावर सायकलीचा सराव सुरु केला. पण “नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न म्हणतात” तसे अगदी पायंडल मारण्यापासुन, हडल धरण्यापासुन सुरुवात करावी लागली. सुरुवातीला कैक वेळा मी पडलो , तसाच उठलो , अन् सावरलोही ! अंगाशी जागोजागी ओरखडेही लागले तरी हाल सोडले नाहीत, अन् अर्ध्यावर सायकल शिकणे मी सोडले नाही. असे दररोज तिथे आम्ही दोघे नित्य नियमाने सायकल शिकायला जात असु. असा सराव करता-करता , जवळ-पास दहा पंधरा दिवसात जिद्दीने अखेर सायकलच शिकलो ! अखेर, सायकल शिकलो ती कायमची !!

**- नागनाथ पाटलोबा बडे / घाटनांदूर**
**मो.- ९७६७२७३२६८**

# रहस्य



पर्वा नाही,
नाही कुण्या समस्येची
सवय आहे लढण्याची.

सवयीत आली,
दगदग सोसण्याची.
तिढा सोडवण्याची,
सरळ करण्याची.

पावलो पावली
चपळ गतीने,
हसत खेळत
जाता येता
'रहस्य' रमले.

सरसावल्या वेळा,
दगदगल्या वेळा.
तिन्ही प्रहारी,
समरसल्या वेळा.



- डी.एन.मोरे / खैरकेकर
मो.- 9923842025, 9130730567

# "टपाल"



9 ऑक्टोबर जागतिक टपाल दिन त्यानिमित्ताने लिहावेसे वाटले - साधं पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्र, पाकीट (लखोटा) असे पत्राचे अनेक प्रकार मला वाटतं काळानुरूप टपाल हा शब्द हळूहळू इतिहासजमा होऊ लागला आहे, नव्हे जवळजवळ झालाच आहे. पत्रावरती प्रति, प्रेक्षक, प्रिय, तीर्थरूप, विनंती विशेष (वि.वि) आपला आपली हे सुरुवात व शेवट मला वाटतं कालांतराने शाळांमधून विद्यार्थ्यांना शिकवावे लागेल. मोठ्यांना सोशल मिडियाद्वारा माहिती मिळू शकेल पण आमच्यासारख्या साठ वर्षांच्या वरच्या ज्येष्ठ भगिनी व बंधूंनी तो काळ अनुभवलाय, त्यांना विचारा टपालाचे महत्त्व ! आता टपाल येत पण वेगळ्या विषयाच्या अनुषंगाने, पूर्वी आपण आपल्या भावाला, आई-वडिलांना मैत्रिणींना, पतीदेवांना दूर असणाऱ्या सर्वच नातेवाईकांना खुशाली साठी पत्र लिहित असू. एकदा पत्र लिहिलं की त्याच्या उत्तरासाठी पंधरा दिवस, एक महिना, कधी दोन महिने अतंरानुसार उत्तरासाठी प्रति टपालाची वाट पहावी लागे.

ज्यावेळी एखादी माहेरवाशीण माहेरच्या पत्राची वाट पाहत असे, तेव्हा तिचं सारं लक्ष पोस्टमनकडे असे. पोस्टमन कधी एकदा गेट उघडून येतो व पत्र देतो याकडे तिचे लक्ष लागलेले असायच. पोस्टमन तसाच पुढे निघून गेला तर थोडीशी निराशा व उद्याची आशा आणि जर तो आत आला व पत्र देऊन गेला तर काय आकाश ठेंगणे, तिच्या आनंदाला पारावार नाही, केव्हा पत्र फोडून वाचते असे तिला होत असे तेव्हाच ती समाधान पावत असे. केवळ माहेरवासीनच नव्हे तर सैन्यामध्ये असलेला आपला मुलगा किंवा पती त्याच्या टपालाची वाट पाहणारी आई किंवा पत्नी किंवा वडील, लांबच्या मैत्रिणीबरोबर पत्रातून मारलेल्या गप्पा, मुलीबरोबर बोललेले आई-वडील अशी अनेक नाती या टपालानं घट्ट व मजबूत बनवलेली आहेत. असं म्हटलं जातं वाट पाहण्यात खूप मजा आहे एक प्रकारची हुरहुर आहे, समाधान आहे, हे सर्व आमच्या पिढीने अनुभवलेले आहे आणि असा हा आनंदाचा खजिना (टपाल) जर आपण जतन करुन ठेवला असेल तर काढा पुन्हा एकदा बाहेर आणि वाचा पुन्हा पुन्हा बघा भुतकाळ डोळ्यासमोरुन सरकतोय ते आणि त्या गोड सुखद ह्दयात साठवलेल्या आठवणीत भर पडते ते.


घरोघरी पत्र घेऊन येणारा पोस्टमन काका खरोखरच त्याला देवदूतच म्हंटले पाहिजे. चांगल्या व वाईट दोन्ही बातम्या पोहोचवण्याचे काम तो करतो, चांगली खुशखबर देताच चेहऱ्यावर दिसणारा आनंद वेगळाच अनुभवता येतो, तर पूर्वी मयताचा सांगावा अर्धे पत्र लिहून दिला जायचा, अर्धे पत्र रिकामे व अर्धे पत्र लिहिलेले असले की कोणीतरी नीर्वतल्याची बातमी आहे हे ओळखले जायचे. पत्र हातात घेऊन वाचेपर्यंत

अंगाचा थरकाप उडत असे, आणि एखाद्या सुखद बातमीचे पत्र येणार असेल तर, ते फोडून वाचेपर्यंतचा वेळ खूप मोठा वाटे. दोन्ही अनुभव आमच्या पिढीने अनुभवले आहेत आम्ही अनुभवलेला वाट पाहिलेला पोस्टमन काका कधीच आमच्या मनातुन हलणार नाही. पत्र देऊन तो पाठमोरा झाला की विचार चक्र सुरु व्हायचे, माणूस किती चांगले काम करतोय त्याला दररोज किती पायपीट करावी लागते, त्याला कंटाळा येत नसेल, पण खरंच या माणसाला कंटाळा तो कधीच नाही. उलट चेहऱ्यावर आनंदच घेऊन दररोज उत्साहाने तो काम करत असतो. आता मात्र इंटरनेटच्या जमान्यात आता मात्र इंटरनेटच्या जमाण्यात त्याचा कामाचा ताण खूपच हलका झालाय.

आज इंटरनेटच्या जमाण्यात पत्र मागे पडले. पत्र एक अतिशय जिव्हाळ्याचा, प्रेमाचा, मायेचा विषय. एकवेळ सोशल मिडीयावर टाकलेले मेसेजेस डिलीट होती पण लिहिलेलं पत्र कधीच डिलीट होत नाही, उलट त्यातील गोडवा अधिक अनुभवता येईल. आमच्याही पूर्वी म्हणजे बर्याच वर्षापूर्वी असे निरोप/पत्र प्राण्याकरवी पोचवले जायचे असे ऐकण्यात आहे. कवि तर कल्पनेच्या माध्यमातून सासुरवासीन मुलीचा निरोप आई-वडिलांना देताना ऐकले आहे. वारा हा निरोप देण्याचे काम करत असायचा.

“ घाल घाल वाऱ्या पिंगा माझ्या परसात,
माहेरच्या सुवासाची कर बरसात,
सुखी आहे पोर सांग आईच्या कानात.

कवी आपल्या कवितेत विविध कल्पना वापरुन निरोप, सांगावा देण्याचे काम



करतो तो भाग वेगळा.

जागतिक टपाल दिनाच्या निमित्ताने एवढेच सांगावेसे वाटते ते म्हणजे ऊन-वारा, पाऊस-पाणी कशाचीही तमा न बाळगता वाडी-वस्तीवर, शहरात, ग्रामीण भागात, माडीवर उंच इमारतीमध्ये पत्र /टपाल पोहोचविण्याचे काम पोस्टमन काकाने केले आहे खरंच त्यांचे आभार व त्यांना मनोमन सलाम.

मला तर असे वाटते आपल्याला आलेली नातेवाईकांची पत्रे हा एक अनमोल ठेवा आहे, आणि तो जर तुम्ही जतन केला असेल तर पुन्हा पुन्हा काढा व वाचा, बघा एक सुखद भूतकाळ डोळ्यासमोरून तरळून जातो आणि आपण ताजेतवाने होतो. त्यावेळची स्वस्ताई, त्यावेळचे साधे राहणीमान आणि आपल्यावर नितांत व पारदर्शी प्रेम करणारे नातेवाईक सर्वच बाबतीत आमचा काळ चांगला आणि आमचे जीवन अतिशय सुंदर असेच म्हणावेसे वाटते, यातून आत्ताचे जीवन वाईट असे मात्र मुळीच म्हणता येणार नाही. आताही बदल, जनरेशन गॅप, बदलणाऱ्या गोष्टी, बदलत्या प्रवाहाबरोबर आपणही पोहायला शिकणेच योग्य असे मला वाटते. आम्ही मात्र हा ठेवा जतन करून ठेवलाय, नोकरीच्या निमित्ताने बाहेर असणाऱ्या पतीदेवांची पत्रे व मला बरोबर नेल्यानंतर सासरच्या मंडळींची म्हणजे सासरे व दीर यांची आलेली पत्रे आम्ही आजही काढून वाचतो व आम्हा उभयतांना ती वाचताना खूप आनंद होतो. असे हे आनंदाचे क्षण वेचताना आम्हा ज्येष्ठ नागरिकांना जगायला बळ मिळते तो भाग वेगळाच.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते- आत्ताची पिढी टपाल या खजिन्यास मुकणार हे मात्र निश्चित.

**- सौ. सुमन ज्ञानदेव जाधव / किर्लोस्करवाडी**
**मो.- ९९७०३३३२३६**

# पंख पसरुनी वाटे !



आकाश कवेत घ्यावे
नियतीला शरण का जावे

कष्टांने सारे सुलभ करावे
धैर्याने इप्सित साध्यं करावे

अनेक सरसावतील
पंख कापतील
खच्चीकरण करतील

पंखांना बळकटी देऊनी
मनोबल वाढवूनी

ऊंच उड्डाण करावे
मन सैरभैर का व्हावे

पंख पसरुनी वाटे
उरी कारुण्यं का दाटे

विचारांना का फुटती फाटे
निपटून काढावे वाटेतले काटे
सुशोभित करावे ऊबदार घरटे!




- स्नेहा साळुंके / ठाणे
मो.- 9323654576

# कलामहर्षी बाबूराव पेंटर



कलाविश्वात बाबूराव पेंटर या नावाने प्रसिद्ध झालेले बाबूराव कृष्णराव मेस्त्री यांचा जन्म ३ जून १८९० या दिवशी कोल्हापूर येथे झाला. त्यांनी चित्रकला व शिल्पकला यांचे धडे त्यांच्या वडिलांकडून गिरवले. त्यांच्या वडिलांचा सुतारकाम व लोहारकामाचा व्यवसाय होता. त्यामुळे त्यांना घरूनच शिल्पकला, चित्रकला या कलांचे ज्ञान मिळत गेले. सुरुवातीला ते तैलचित्रे काढत. गंधर्व नाटक कंपनीच्या रंगवलेल्या पडद्यांमुळे बाबूराव पेंटर यांची कलाक्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण झाली. १९३० च्या सुमारास त्यांनी तयार केलेली सिनेमाची पोस्टर्स पाहून जे. जे. स्कूलचे तत्कालीन संचालक सालोमन यांनी त्यांचा सत्कार केला.

चित्रकलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण न घेताही त्यांना रंगांच्या शुद्धतेविषयी व मिश्रणाविषयी बरीच माहिती होती. चित्रकलेतील त्यांचे तंत्रकौशल्य म्हणजे जराही ढासळू न देणारे रंगछटांचे वजन. त्यातूनच ते एक कल्पनारम्य, उत्कृष्ट अशी प्रतिमा निर्माण करत. त्यांनी तयार केलेल्या महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा फुले यांच्या शिल्पकृती आजही कोल्हापूरमध्ये बघायला मिळतात.



चित्रकलेच्या कामात त्यांना आनंदराव पेंटर या त्यांच्या आतेभावाची सोबत मिळाली. चित्रकला, शिल्पकला, चित्रपट अशा तीनही कलांमध्ये दोघेही बंधू आपले कौशल्य सिद्ध करू लागले. शिल्पकलेच्या कामासाठी त्यांनी स्वतःची फॅक्टरी देखील सुरु केली. शिल्पकलेतील मातीचे किंवा धातूचे ओतकाम असो, बाबुराव स्वतः ही कामे करत.

आनंदराव व बाबुराव पेंटर हे अतिशय अष्टपैलू कलाकार होते. आनंदरावांच्या मृत्यूनंतर बाबूराव पेंटर यांनी जिद्द व परिश्रमाने स्वतः प्रोजेक्टर व स्वदेशी कॅमेरा तयार केला. त्याचबरोबर छपाई यंत्र, डेव्हलपिंग स्पिडोमीटरही तयार केले. १ डिसेंबर १९१८ साली त्यांनी महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना केली. कंपनीतर्फे त्यांनी स्त्रीपात्रे

असलेला 'सैरंध्री' नावाचा पहिला चित्रपट निर्माण केला, पुण्यातील 'आर्यन' थिएटरमधे तो ७ फेब्रुवारी, १९२० रोजी दाखविला गेला. या चित्रपटातील भीम व कीचक यांच्या द्वंद्वयुद्धाचे दृश्य पाहून प्रेक्षक बेशुद्ध पडले होते, इतके ते दृश्य-कोणतेही ट्रिक सीन्स न वापरताही सजीव चित्रित झाले होते.

या अनुभवावरूनच ब्रिटिश सरकारने सेन्सॉर पद्धत सुरू केली, जी आजही कायम आहे. महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या माध्यमातून बाबूराव पेंटर यांनी फ्लॅशबॅक पद्धत प्रथमच वापरून १९२५ साली 'सावकारी पाश' हा सामाजिक मूकपट तयार केला. परदेशातील चित्रपट प्रदर्शनात पाठविलेला हा पहिला भारतीय चित्रपट ठरला. चित्रपटाचे तंत्र, मंत्र व मर्म जाणणारे बाबुराव पेंटर हे एकमेवाद्वितीय दिग्दर्शक होते. त्यांच्या कंपनीमधून मद्रासचे एच. एम. रेड्डी, नागी रेड्डी व महाराष्ट्रातील व्ही. शांताराम, दामले, फत्तेलाल, धायबर, बाबुराव पेंढारकर, मा. विनायक, नानासाहेब सरपोतदार यांसारखे कलाकार तयार झाले.

मूकपटांतून रुबी मायर्स, मा. विठ्ठल, पृथ्वीराज कपूर, झेबुन्निसा, ललिता पवार असे कलावंत उदयास आले. बाबूरावांनी चित्रपटसृष्टीस कल्पकता, कलात्मकता, वास्तववाद आणि सामाजिक प्रबोधन ही गुणवैशिष्ट्य दिलीत. त्यांनी १९२० ते १९२८ या कालावधीत १७ मूकपट निर्माण केले. सिंहगड हा त्यांचा चित्रपट अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरला. त्यातील रात्रीच्या लढाईचे चित्रीकरण त्याकाळी त्यांनी प्रज्योत दिव्याच्या (आर्क लॅम्प) प्रकाशझोतात केले. विजेच्या प्रकाशात चित्रीकरण केलेला हा पहिला भारतीय चित्रपट होय.



पन्हाळा किल्ल्याच्या परिसरात केलेल्या चित्रीकरणामुळे तो बाह्यचित्रीकरणाच्या दृष्टीनेही पहिलाच चित्रपट ठरतो. याच चित्रपटाच्या वेळी मुंबईला प्रेक्षकांची अलोट गर्दी लोटल्यामुळे तिचे नियंत्रण सरकारला करावे लागले. तेव्हापासून सरकारचे लक्ष चित्रपटाकडे वेधले गेले व या

चित्रपटापासूनच करमणूक कर बसविण्यात आला. याच चित्रपटाच्या जाहिरातीसाठी बाबूरावांनी शिलामुद्रण केलेली ३.४८ x ६.९६ मीटर (१० x २० फूट) लांबी-रुंदीची भित्तिपत्रके तयार केली होती. जी अत्यंत प्रभावी ठरली. म्हणूनच चित्रपटांच्या भित्तिपत्रकांचे जनकत्वही बाबूरावांकडेच जाते.

त्याकाळी महाराष्ट्र फिल्म कंपनी ही एक अग्रगण्य चित्रपटसंस्था मानली जाई. चित्रपटातील कथानकाच्या दृष्टीने कालोचित ठरणारी वेशभूषा व वातावरण निर्माण करण्याची बाबूरावांची हातोटी अनन्यसाधारण होती. तरीही त्यांचा मुख्य भर बाह्य नेपथ्यापेक्षा अभिनयावर अधिक असे. भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया दादासाहेब फाळके यांनी घातला असला, तरी बाबूरावांनी त्याला कलात्मक शिस्त व सौंदर्य प्राप्त करून दिले. त्यांच्याच तालमीत तयार झालेले व्ही. शांताराम, एस्. फत्तेलाल, विष्णुपंत दामले व केशवराव धायबर यांनी तो वारसा पुढे चालविला.

बाबूरांवांच्या चित्रकलेवर वॅट्स, रॉझेटी, बर्न्स व लॅडशियर इ. पाश्चिमात्य चित्रकारांची छाप दिसून येते. त्रिंदाद, आगासकर, नागेशकर, पत्रावळे व हळदणकर या नावाजलेल्या भारतीय चित्रकारांनी हाताळलेली तंत्रे ते अभ्यासत व आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत. शिल्पकलेत मृद्-शिल्पांपासून ते ब्रॉझच्या ओतकामापर्यंतची सर्व कामे ते स्वतःच करीत. नंतर त्यांनी त्यासाठी स्वतःची ओतशाळाही उभारली होती. त्यांच्या कलाक्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना भारत सरकारने 'कलामहर्षी' या पदवीने गौरविले. असामान्य प्रतिभेचा धनी असलेल्या या मनस्वी कलाकाराने १९५४ मध्ये जगाचा निरोप घेतला.

त्यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार सई परांजपे आणि श्याम बेनेगल यांना लाभला आहे.

**- जयश्री दाणी**
**मो.- 8275488114**

# भाकर



स्वप्नांची दुनियादारी भाकर येथे करपून जाते
भाकर परतवण्या ऐवजी
येथे शरीर परतवली जातात
सोनियाच्या स्वप्नदारी
बासरीचे निर्वस्त्र बेसूर शब्द उमटतात

भाकर तुकडा फेकून
भाकरी जिंकण्याची स्पर्धा
येथे लावली जाते
विजेता हरलेला असतो
हरणाराही हरलेला असतो
जागोजागी, देशोदेशी
क्षणोक्षणी, पदोपदी
असते स्पर्धेची रेलचेल
तुकड्यावर जगणाऱ्यांना
होत नाही घालमेल
इतभर पोटासाठी
मरेपर्यंत लढाई
अन जगण्याची चालढकल...



**- डॉ. सतीशकुमार पाटील / जयसिंगपूर**
**मो.- ९९६०२९९६९९**

**(- कवी, व्यक्तिमत्व विकास दिवाळी अंक २०१८ च्या अतिथी संपादक आहेत.)**

# निसर्गधून...



निसर्ग ! मन उल्हासित करणारा एक वैभवी नजराणा ! अवघ्या चराचराला चैतन्याने नाऊ घालणारा... जगण्याला भरजरी स्वप्नांच दान भरभरून देणारा... माणसाच्या सबंध जीवनात कुठल्याशा एखाद्या वळणावर फुलणारा... नाऊमेद होऊ पाहणाऱ्या मनाला विलोभनीय स्वप्नांची गवसणी घालणारा... “देणाऱ्याने देत जावे” या निस्वार्थ भावनेने सृजन करता होऊन आपल्या परडीत असलेले सर्व काही मुक्तहस्तपणे उधळून देणारा जादूगर...! ऋतुचक्राचे विहंगम रूप जशाप्रकारे बदलत जाते तसा प्रत्येक सजीवांच्या जीवनातही रंग बदलत जाणारा... आणि ह्या बदलत्या रंग, रूपाचे अनोखे दर्शन म्हणजेच निसर्गधून...!

निसर्ग सखा अन् जगण्याला मिळालेला श्वास...! निसर्ग काळोखाची कातळछाया संपून उजेडाचा विश्वास...! निसर्ग घेऊन आलेला आपल्या अल्लड वाटेवर गुलछबू ऋतूंचं देखणं लावण्य... त्याच्या सानिध्यात असतेयं सूर्य, चंद्र, तारे, नदी, समुद्र, झाडे, पशु, पक्षी यांनी समृद्ध केलेलं शुभसूचक आकर्षण, कुतूहल व नाविन्य...!

निसर्ग म्हणजे एक उत्सव ! प्रत्येक ऋतूत बदलत जाऊन आपल्या सौंदर्याने आकर्षित करणारा... त्याच्या सानिध्यात अहंकाराचा लवलेश नाही... आपल्याजवळ असलेले सर्व काही उधळून देणारा दानशूर... सुख आणि दुःखाच्या पलीकडचा कृपाळू जीवनदाता... खरंतर हा अनोखा निसर्गच देतो ऋतूपरत्वे येणाऱ्या हंगामाची जाणीव आणि नेणिवसुद्धा...!

निसर्गधून अविरतपणे फिरत राहते आपल्या सभोवती कळत-नकळत ! मग क्रमाक्रमाने निसर्ग परिवर्तनाच्या हिरवळीचा बाज घेऊन येतो वैभवशालीन ‘पावसाळा’...! आकाश कृष्ण मेघांनी झाकोळून यायला लागलेलं... आपल्या मदमस्त तंद्रीत ढगांची रेलचेल सुरू झालेली... नकोशा उकाड्याने हैराण झालेल्या जीवांना मंद-मंद गारव्याने थोडीशी राहत दिलेली... आकाशात विजेच्या रोषनाईत जलकुंभांनी भरलेले मेघ पडघम वाजवू लागलेले... धरतीशी जुळलेले आपल्या मंगल नात्याच्या ओढीने अमृतधारांचा शिडकावा करीत पाऊस आलेला... सोनवर्खी उन्हासह सरीवर सरी जमिनीवर उतरल्या की, सगळीकडे मृदगंध पसरलेला... रानावनात मोर काम विव्हळ झालेले... आपला स्वर्गीय पिसारा फुलवून ते थुईथुई नृत्य करू लागले... शृंगार रसात चिंब चिंब होऊन लांडोऱ्यांना साद घालू लागले...


“व्यक्तिमत्व विकास” संपादक - मंगेश विठ्ठल कोळी, मो. 9028713820

मन भावन पावसाच्या आगमनाने पेर्ते व्हा...ss पेर्ते व्हा...ss पावश्याने संदेश दिलेला... हिरव्या मखमलीने सर्व आनंदाने डोलू लागलेले...

चैतन्याने रिमझिमत मोत्यांच्या नक्षीदार सरीने पाऊस हलकेच उतरलेला... गवताच्या पात्यावर नाचणाऱ्या पागोळीत... फांदी फांदीवर ओले पंख फडफडवित, किलबिलनाऱ्या पाखरं चोचीत... भिरार वाऱ्यावर रानफुलांच्या मोहरत्या गंधात... दुथडी ओसंडून वाहत जाणाऱ्या नदीच्या प्रवाहात... पानांत, फुलांत, शेत, शिवारात असा रिमझिमा पाऊस सबंध सृष्टीचे जीवन गाणे झालेला...

पावसाच्या अनोख्या आशीर्वादाने धरणी हिरवा साज लेवून देखणी झालेली... शिवार फुलून आलेलं... गाव समृद्ध झालेला... पाऊस निघता-निघता निघून गेलेला... निसर्गाच्या अनोख्या किमयेने स्वप्नांचं दान निर्व्याजपणे पदरात टाकून...

पाऊस काळ संपलेला... राना-वनात उत्सव सुरु झालेला... शेत-शिवारात डोलणारी, नाचणारी पिके, माणसे अन् संबंध सृष्टीच मंगल वातावरणात निरामय झालेली... असा गुलछबू मधुमास हळवी पावले टाकीत अलवारपणे मनभावन 'हिवाळा' ऋतू घेऊन आलेला... तलम हिरवळीच्या दुधाळ सुगंधाबरोबर शेत-शिवार आनंदून गेलेलं...

हिरव्या नवलाईने पिकांना समृद्ध केलेलं... निसर्गधून जादुई रंग लेवून शिवारभर घुमू लागलेली... पिके दळदार झालेली... टपोर दाण्यांनी लदबदलेल्या पिकावर पाखरे घिरट्या घालू लागलेली... एव्हाना सांज मावळतीला गेलेली... गुलाबी थंडीचा बोचरेपणा जाणवू लागलेला... हिरव्यालुस्सं गव्हाच्या शेतात पाटाच पाणी झिरपू लागलेलं... थंडीने ओलसर झालेल्या हरभऱ्यावरची 'आंब' अधिकच खोडसर झालेली...

गाव रस्त्यावर डेरेदार कडुलिंब, बाभूळ, आणि आंब्याच्या चार-पाच झाडाजवळून नदी कलकलतं वाहत राहणारी... पावसाळ्यात धुंद-फुंद गढुळलेल्या पाण्याचा प्रवाह आता नितळपणाचा बाज घेवून शालीन झालेला... निरभ्र आकाशातील लखलखत चांदणं आणि हिरवी अवकळा घेवून निसर्गधून झालेला राजस हिवाळा हिंदोळत असलेला मन डाळीवर...!

रान-शिवारातला निसर्ग डोळ्याआड होत नाही, तोच हिरवा रंग शुष्क होऊन करडा झालेला... सोनपिवळे हळदुले ऊन तापदग्ध अन् दाहक झालेलं... हवालदिल

झालेल्या रान-शिवारात रणरणत्या वैशाख वणव्यासह वसंताचा देखना सोहळा घेऊन 'उन्हाळा' डेरेदाखल झालेला... एकीकडे फाल्गुनात तापलेल्या, उलंगून तडा गेलेल्या धरणीला उन्हाचा अभिशाप ! तर दुसरीकडे ओसाड माळरानांत रक्तवर्णी फुलांनी डवरून आलेला पळस ! त्याच्या सोबतीने पांगारा, काटेसावर अन् गुलमोहराने आपले लक्ष वेधून घेतलेले...

आंब्याच्या फांदी-फांदीवर इवलाल्या कैऱ्यांचे घोस लगडलेले... रानपाखरे, पोपटांचे थवेच्या थवे कैऱ्यांसाठी आंब्यावर किलबिलाट करू लागलेले... कैऱ्या निबर होऊ लागलेल्या... माकडांचे कळप हौदौस घालू लागले...

खरंतर, निसर्गाची मालकंस धून आपण ऐकली पाहिजे, काळीज कप्प्यात जपून ठेवली पाहिजे... नाहीतर, आपल्या जगण्याला भरजरी सृजन बहर देणारा निसर्ग हरवत जाईल... तेव्हा मात्र आपल्या हातात वांझोट्यासारखे जगण्याखेरीज काहीच उरणार नाही... याची नोंद सर्वांना घ्यावीच लागेल.

**- सतिश कोंडू खरात / वाशिम**
**मो.- ९४०४३७८८६९**

# वादळ झालो मी



गावकुसाबाहेरचे जीणं आठवते अजूनही
तुझ्या परीसस्पर्शाने पावन झालो मी

अर्थच नव्हता पुर्वी माझ्या जगण्याला
तुझ्याच मुळे भिमा वादळ झालो मी

मला कसलीच नव्हती येथे मुभा
जोहार मायबाप म्हणत रहायचो उभा

गळ्यात मडकं पाठीमागं झाडू
दगडाच्या देवाजवळही नव्हती जागा

तुझ्या संविधानानं केली क्रांती
आता माणूस म्हणून जगतोय मी

आली फिरायला मोटर गाडी
अन् रहायला दोन मजली माडी

पोर शिकतात इंग्रजी शाळा
बायको नेसते पैठणी साडी

दमतीला माझ्या चार चार नोकर
मोठा साहेब म्हणवतोय मी

- जयराम मोरे / सोनगीर
मो.- 7709565957

# साहित्य चोरी आणि नैतिकता



साधारणतः एक दशकापूर्वी भारतात सोशल मीडियाचा अविष्कार झाला. सोशल मीडियाच्या अविष्काराने दूर असलेल्या अनेक मित्रांना, नातेवाईकांना परत एकदा एकमेकांच्या संपर्कात आणण्यास मदत केली. गेल्या काही वर्षात या माध्यमाद्वारे व्यक्त होणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. आपण व्यक्त केलेले मत जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचू शकते याची प्रचिती सोशल मीडियाने अनेकांना दिली आहे. या माध्यमातील लाईक, कॉमेंट, शेअर सारखे पर्याय आपल्याला प्रसिद्धी मिळवून देऊ शकतात असे लक्षात आल्यावर अनेक जणामधील निद्रिस्त प्रतिभा जागी होऊ लागली. समान प्रतिभा असणाऱ्या अनेकांचे सोशल मीडियावर संघटन देखील निर्माण होऊ लागले. सोशल मीडियावरील या संघटनांमधून प्रतिभा दाखवण्याच्या स्पर्धा सुरु झाल्या. हजारो-लाखो सदस्य असणाऱ्या अशा संघटनांमधून (ग्रुप मधून) प्रतिभावंतांना अनेकांकडून मनमुराद दाद मिळू लागली. अशा प्रतिभावंतांना परत परत प्रतिभा दाखवण्याचा अनेकां कडून आग्रह देखील होऊ लागला. नियमितपणे प्रतिभा सादर करणाऱ्या कलाकारांचे, साहित्यिकांचे फॅन आणि फॉलोवर्स तयार होऊ लागले.

या गोष्टी जेवढ्या सुखावणाऱ्या आहेत तेवढ्याच अनेकांमध्ये व्यसनाधीनता वाढवणाऱ्या देखील आहेत. या सोशल मीडियाने जसे कलाकार, प्रतिभावंत, साहित्यिक यांना कला सादर करण्यास प्रोत्साहन दिले तसेच साहित्य चोर देखील निर्माण होऊ लागले. आपण सादर केलेल्या कलेला प्रसिद्धी मिळाल्यावर ती प्रसिद्धी पुढे देखील कशी टिकवून ठेवता येईल या विचाराचे अनेकांच्या मनात व्यसन जडू लागले. जेव्हा कोणत्याही गोष्टीचे व्यसन जडू लागते तेव्हा चुकीच्या मार्गावर पावले पडण्याची देखील दाट शक्यता देखील निर्माण होऊ लागते. आपण कसे उत्कृष्ट कलाकार, साहित्यिक आहोत असे दाखवण्यासाठी अनेक वेळेस इतरांचे साहित्य चोरून त्याची मोडतोड करून परत सादर करत प्रसिद्धी मिळवण्याचे प्रकार काही साहित्य चोरांकडून सर्रास घडत आहेत. आपली चोरी कधीच कोणाकडून पकडल्या जाणार नाही असा अति आत्मविश्वास नेमका कोठून निर्माण होतो हे त्या साहित्य चोरांनाच माहित. यदा-कदाचित अशी चोरी पकडल्या गेल्यावर आपणच मूळ साहित्यिक असून समोरच्या व्यक्तीनेच आपले साहित्य चोरले अशा चोराच्या उलट्या बोंबा देखील होऊ लागतात.

आज सोशल मीडियावर साहित्यिकांचे, कलाकारांचे हजारो ग्रुप आहेत. एका एका ग्रुपचे हजारो-लाखो सदस्य देखील आहेत. अशावेळी आपली मूळ कला, साहित्य कोणी चोरी करणार नाही यावर इंटरनेटच्या जगात नियंत्रण ठेवणे खरेच खूप कठीण आहे. आपल्या साहित्याला फक्त ©® चे चिन्ह टाकल्यावर साहित्य चोरी होत नाही

अशी भाभडी भावना देखील एक अंधश्रद्धाच ठरली आहे सोशल मीडियावर. दुसऱ्यांची कला बघून, लिखाण वाचून प्रेरणा भेटत असेल तर त्यात चुकीचे काहीच नाही. मोठ्या व्यक्तीमत्वा सारखे स्वतः बनण्याचा प्रयत्न करणे देखील चुकीचे नाहीये. पण इतरांकडून कलेची प्रेरणा घेणे, त्यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न करणे आणि इतरांचे साहित्य चोरणे यात खूप मोठा फरक आहे. हा महत्त्वाचा फरक असतो तो नैतिकतेचा. ज्यांच्यामध्ये नैतिकता असते त्यांच्यासाठी इतरांच्या कलेची प्रेरणा ही बेंच मार्क (Benchmark) असते. आणि ज्यांना नैतिकतेशी काही घेणे देणे नसते आणि फक्त प्रसिद्धी हवी असते तेव्हा त्यांच्यासाठी इतरांच्या कलेची प्रेरणा ही कॉपी-पेस्ट (Copy-Paste) असते. ज्यांना हा मूलभूत फरक कळतो ते साहित्य निर्मिती करतात आणि ज्यांना कळत नाही ते साहित्य चोरी.

दुसऱ्याची प्रतिभा चोरून आपल्याला क्षणिक समाधान किंवा प्रसिद्धी मिळू देखील शकते. आपली चोरी पकडल्या गेली तर समोरची व्यक्ती कदाचित कायदेशीर कारवाई करेलच किंवा करणारही नाही. मात्र प्रश्न हा निर्माण होतो की मूळ नैतिकतेचे काय? ज्या कलाकाराची कला चोरी होते, साहित्यिकाचे लिखाण चोरी होते ही त्यांच्यासाठी कळत नकळत नक्कीच अभिमानाची गोष्ट असते. कारण चोरी त्याच गोष्टीची होते ज्या गोष्टीला किंमत आहे. मात्र साहित्य चोराने अशी चोरी करताना मूळ साहित्यिकाच्या कष्टाचा देखील विचार करावा. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे की : Raise your own bar. म्हणजेच स्वतःची किंमत स्वतः निर्माण करा, स्वतःहून स्वतःला सिद्ध करा. एखादी कला शिकताना, अवगत करताना स्वतःचे प्रभुत्व निर्माण करण्यासाठी नक्कीच वेळ लागू शकतो. कळत नकळत काही चुकाही होऊ शकतात मात्र ठरवून चूक करणे अवश्य टाळावे.

फक्त प्रसिद्धी मिळवण्यासाठी किंवा एखादी स्पर्धा जिंकण्यासाठी दुसऱ्याचे साहित्य चोरणे हे विकृत मनोवृत्तीचे प्रदर्शन करते. अशा काही ठराविक महाभागांमुळे आज साहित्य क्षेत्र देखील बदनाम होत आहे. अशा मनोवृत्ति मुळे नवोदित साहित्यिका पुढे देखील चुकीचे उदाहरण ठेवले जाते. एखादी कला आवड म्हणून जपताना नैतिकता ठेवून त्या कलेचा आदर केला पाहिजे. अशा काही ठराविक साहित्य चोरांना स्वतःहून साहित्य निर्मितीची सद्बुद्धी मिळाली तर ठीकच अन्यथा त्यांना सद्बुद्धी मिळत नसेल तर तुकाराम महाराजांचे बोल आठवतात : नाठाळाचे माथी हाणू काठी.

**- राहुल बोर्डे / पुणे**
**मो.- 9822966525**

# आठवणी



माझ्या मुलाच्या गोष्टीच्या स्पर्धेसाठी मला तक्ता करायचा होता. गोष्ट होती तहानलेल्या कावळ्याची. म्हणून मग इंटरनेटवर चित्रं पाहिली. पण मला ती तितकीशी आवडली नाहीत.माझ्या मनात चित्रं होतं ते मी शिकलेल्या कावळ्याच्या गोष्टीतलं.

अगदी तसचं चित्रं मला मिळत नव्हतं. मी कॉम्पुटर बंद केला आणि भूतकाळात गेले. आजपर्यंत हाताळलेली पुस्तके, त्या पुस्तकातील धडे, धड्यांचे लेखक, कविता, कवी, कवयित्री, शास्त्रज्ञ, त्यांचे सिद्धांत, संत, समाजसुधारक, चंद्र, तारे , पिग्मी लोक, टुंड्रा प्रदेश, इग्लू हे सगळं एखाद्या चित्रफितीसारखं डोळ्यासमोर आलं.

सगळ्या मैत्रिणी, त्यांच्याबरोबर खेळलेले खेळ, स्नेहसंमेलन, दुपारच्या सुट्टीत खाल्लेली अंडाकुल्फी, मैत्रिण आजारातून बरी व्हावी म्हणून दत्ताला फोडलेला नारळ, वेगवेगळ्या विषयांचे शिक्षक, त्यांची शिकवण्याची ढब, त्यांनी दिलेली समर्पक उदाहरणे, गोष्टी, स्पर्धांमध्ये मिळवलेले पहिले, दुसरे बक्षीस सगळं काही जसेच्या तसे आठवले.

दरवर्षी पाठ्यपुस्तकातील ओळींवर हळूवार बोट ठेवून वाचलेले आणि शक्य तेवढं डोक्यात ठेवलेलं ज्ञान. वर्षभर छान वापरलेली पुस्तके, पुढे दुसऱ्याला निम्म्या किंमतीत दिलेली पुस्तके, रद्दीत टाकलेल्या वह्या, नवीन वर्षाच्या नवीन वह्या, नवीन पुस्तके, हे सारं जणू कालच घडल्यासारखे वाटत होते.

गृहपाठ नाही केला म्हणून शिक्षकांचा खाल्लेला मार, उत्तर सांगितले म्हणून शिक्षकांनी केलेले कौतुक, मैत्रिणी, त्यांच्याशी क्षुल्लक गोष्टींसाठी धरलेला अबोला, हे सगळं आठवताना डोळे पाणावले होते.

आता मुलाची पुस्तके वाचतांना असं वाटतं की ह्या पुस्तकात माझे रिसायकल झालेलं पुस्तक तर नसेल ना? त्याच्या वह्या पाहिल्या की वाटतं, मी छान गणितं सोडवलेली वही तर ह्यात नसेल ना ?

अक्षरशः डोळयांतील अश्रू गालावर ओघळले.

लहानपण देगा देवा, हा विचार माझ्या मनात येत होता.

परत मला ती वह्या पुस्तके मिळाली तर...

ह्या आणि अशा प्रकारच्या नाना आठवणी आपण कधीच न पाहिलेल्या मनाच्या कोपऱ्यात साठवत असतो.

हो ना?

**- सौ. प्रिती दबडे / पुणे**
**मो.- ९३२६८२२९९८**

# सकारात्मक स्व-संवाद..



लोक आपल्याविषयी काय बोलतात या पेक्षा आपण स्वतः विषयी काय बोलतो हे जास्त महत्वाचे ठरते. आपली स्वतः ची प्रतिमा आपल्या मनात कशी आहे, ती सकारात्मक आहे का नकारात्मक या वरून आपले व्यक्तिमत्व बनत असते . यावरूनच आपली आयुष्याची वाटचाल सुलभ किंवा कठीण होते. ‘ माझे नशीबच खोटे आहे’ , ‘मी दिसायला कुरुप आहे’, ‘मला सतत अपयशच येते’, ‘माझी परिस्थिति वाईट आहे ‘,’ हे जग चांगले नाही ‘ , ‘ माझ्या हातून काहीही होणार नाही’, या आणि या सारखे इतर नकारात्मक संवाद आपण स्वतःशी करत असूत तर आयुष्यात चांगले काही घडण्याची आपण अपेक्षाच कशी ठेवू शकतो?. आपली सर्व शक्ती आपण नकारात्मक विचारात, संवादात खर्च करत असूत तर आपल्या हातून नवंनिर्मिती होणार कशी? आपण आपली प्रगती कशी साधणार?. शारीरिक व्यंगावर एखाद्यावेळेस मात करता येऊ शकेल पण मनाच्या व्यंगाचे काय?. या वरून सकारात्मक स्व-संवादाचे महत्व अधोरेखीत करणे गरजेचे आहे.

‘मी सर्व शक्तिमान अशा परमेश्वराची एक निर्मिती आहे, एक अंश आहे’. ‘मी कोणतेही काम माझ्यात असलेल्या अंगभूत शक्तीमुळे, आत्मसात केलेल्या ज्ञानाच्या बळावर पूर्ण करू शकतो’. ‘माझ्यासाठी कोणतीही गोष्ट अशक्य नाही’. ‘मी कोणत्याही आलेल्या संकटावर मात करू शकतो’. ‘ मी माझी सध्याची वाईट परिस्थिति बदलू शकत्तो ‘ मी काही नवीन गोष्टी शिकण्यासाठी माझ्या मधली ऊर्जा वापरेन ‘. ‘हे जग सुंदर आहे ते अजून सुंदर करण्याचा मी जाणीवपूर्वक प्रयत्न करेन’ , ‘ चांगलं दिसणं माझ्या हातात नाही, पण चांगलं बनणं माझ्या हातात आहे ‘ या सारखे सकारात्मक स्व-संवाद नक्कीच फायदेशीर ठरू शकतील. असे संवाद जर आपण साधत नसूत तर ते जाणीवपूर्वक साधणे गरजेचे आहे.

नकारात्मक स्व-संवाद साधणारा व्यक्ती हा इतरांशी देखील नकारात्मकच बोलत असतो. त्याचा स्वभाव सतत किरकिरा बनतो. नवीन कोणत्याही गोष्टी मध्ये त्याला रस नसतो. त्याच्यासाठी आयुष्य हे सुंदर नसून कंटाळवाणे बनते. त्याची प्रगती खुंटते. तो अपयशाच्या खोल दरीत ढकलला जातो. अशा व्यक्ती जर आपल्या आजूबाजूला असतील तर अशा व्यक्ती पासून दूर राहणे हे आपल्या हिताचे ठरते.

या उलट सकारात्मक स्व-संवाद साधणारा व्यक्ती इतरांशी देखील सकारात्मकच बोलतो. त्याच्या अंगात एक उत्साह असतो. काहीतरी नवीन करण्याची त्याच्यात उर्मी असते. आपल्यातील ऊर्जा तो इतरांना देखील देतो. तो इतरांना आपल्याकडे आकर्षित करतो. आपसूकच त्याचा प्रगतीचा वेग वाढतो. तो सगळ्यांना हवाहवासा वाटतो.

अश्या व्यक्तीशी जवळीक साधणे , मैत्री करणे हे आपल्या हिताचे ठरते.

नकारात्मक स्व-संवाद हा नकारात्मक जीवनशैली चा परिणाम असतो की ज्यात खालील काही घटक समाविष्ट होतात

१. व्यसनाधीनता
२. वाईट संगत
३. आळशी वृत्ती
४. सतत कामाचा ताण
५. विस्कळीत कौटूंबिक नातेसंबंध

सकारात्मक स्व-संवाद साधायचा असेल तर सकारात्मक जीवनशैली देखील अंगीकारणे गरजेचे असते की ज्यात खालील काही गोष्टी समाविष्ट होतात.

१. नियमित व्यायाम
२. चांगली संगत
३. कामाचे योग्य नियोजन
४. सुदृढ नातेसंबंध
५. एखादा छंद

आपल्या विचारांना सकारात्मकतेची धार लावण्याचे कसब आपल्या अंगी येणे खूप गरजेचे आहे. प्रत्येक गोष्टी घडण्यामागचा सकारात्मकच विचार पहिल्यांदा आपल्या मनात डोकायला पाहिजे. विचार बदलायला जरी बराच अवधी लागला तरी हळू हळू हे आपल्या अंगवळणी निश्चितच पडेल.

जगणं हे सुदर बनवायचं का कंटाळवाणं हे सर्वस्वी आपल्या हातात आहे, आपल्या विचारात आहे. नकारात्मक विचाराकडून सकारत्मकतेकडे जाणे कधीही हिताचे ठरते. नकारात्मक स्व-संवाद जेव्हा आपण साधतो तेव्हा हि सृष्टी 'तथास्तू' म्हणते व सकारात्मक स्व-संवाद साधतांना देखील. परंतु पहिला तथास्तू आपल्यासाठी शाप बनतो तर दुसरा वरदान . असा शाप घ्याववयास कोणाला आवडेल, नाही का ?

**- महेश भा. रायखेलकर / सोलापूर**
**मो.- ९३२६६१२४३६**

# जळकोट ते अमेरिका....!



जळकोट ते वाशिंग्टन प्रवास अद्भुत झाला तेथे गेल्यानंतर त्यांचे रस्ते,झाडे,परंपरा आणि पोशाख खूपच भावस्पर्शी होता. अमेरिकेत गेल्यानंतर मला खूपच मनस्वी आनंद झाला.युवकचआपल्या देशाचे आधारस्तंभ आहेत.याची मला जाणीव झाली.आजकाल प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या स्वार्थासाठी युवापिढीचा वापर करीत असताना दिसतआहे.इथे मात्र असं अजिबात होत नाही. कारण अशा वेळ खाऊ नेत्याकडे किंवा कामाकडे लक्ष देत नाहीत. परदेशात राहणाऱ्या अनेक भारतीयांनी परदेशातील राजकारणात सक्रिय सहभाग नोंदवला आहे.कोकणचे सुपुत्र लिओ वराडकर हे आयर्लंडच्या पंतप्रधान पदी विराजमान आहेत. यामुळेच भारतीयांचा दबदबा वाढलेला दिसून येत आहे भारतीय लोकांची मानसिकता प्रथमता बचतीकडे आहे भारतात सामाजिक सुरक्षा योजना इतर देशांप्रमाणे का नाहीत हा मूळ प्रश्न मला सतावत आहे.

अमेरिका जगावर राज्य करीत आहे आपला भारत देश कधी करेल याची चिंता मला वाटत आहे.जर जगावर भारत देश राज्य केलं तर भारत देशा सारखं दुसरा कोणीही नाही. सुप्रसिद्ध भारत वंशीय न्यायाधीश श्रीनिवासन यांची अमेरिकेतील अधिकार संपन्न फेडरल सर्किट न्यायालयात वर्णी लागली आहे.५२ वर्षीय न्यायमूर्ती श्रीनिवासन यांनी डीसी सर्किट साठी अमेरिकन कोर्ट ऑफ अपिल्सचे मुख्य न्यायमूर्ती पदाचा कार्यभार सांभाळून इतिहास रचला आहे. अशा व्यक्तीचा मला खूप अभिमान वाटतो आहे.

तिथल्या इमारती खूप सुंदर आणि आकर्षक आहेत, डोळ्याचं पारण फिटेल अस म्हणाला काही हरकत नाही. पहावं आणि पाहतच राहावं असं वाटू लागलं. व्हाइट हाउस पाहायला गेल्यानंतर तिथल्या सर्व हालचाली आणि ठेवन मी माझ्या डोळ्याच्या कॅमेऱ्यात कैद केलं आहे. तिथली स्वच्छता आणि योग्य विल्हेवाट जर बघितलं तर खूप वर आश्चर्य वाटेल. आजच्या काळात आर्थिक महासत्ता देशानं आपल्या संस्कृतीचा कसून अभ्यास करत आहेत. ही बाब येणाऱ्या काळाला सुद्धा न पुसता येण्यासारखी आहे. त्या देशातली शास्त्रज्ञ ३५% भारताचे आहेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

इथे प्रत्येकाला संघर्ष करूनच गोष्टी पदरात पाडून घ्याव्या लागतात. कुणीही दान टाकत पदरात टाकत नाही. परंतु तुमच्या संघर्षाला कालांतराने मान मिळतो. केलेले श्रम वाया जात नाहीत. हे नक्की हा आशावाद प्रत्येकाला त्याचे अमेरिकेतील ड्रीम चेस करायला भाग पाडतो हेही नवलच आहे. अमेरिकेत आल्यानंतर मला कोपऱ्या-कोपऱ्यावर बटाटे वड्याची दुकानात दिसली नाहीत. लांबरुंद पण देशाची श्रीमंत

ठायीठायी दिसली. लांब रुंद रस्ते स्वच्छता सौंदर्यदृष्टी चकाकत्या, वेगवान गाड्या, कपड्याने भरलेले भव्य दुकान अशा अनेक गोष्टीतून देशाची समृद्धी धोधो वाहताना दिसते. ते सर्व सुरुवातीला विस्मयकारक वाटते.

इतिहास झकपक कपड्यातला हसतमुख आणि गाडीतून येणारा पोस्टमन पाहुन हा एवढा श्रीमंत तर देश किती श्रीमंत हा आ वासणारा म्हणून अवास्तव उद्गार काढल्याचे लक्षात येईल. अमेरिका समजण्याच्या प्रक्रियेत चक्रावून टाकणारे विरोधात अनेक दिसतात. तसे बोलतात सुद्धा...! अमेरिकन शेजारी जेवायला नाही बोलवणार.पण मदतिला मात्र चटकन धावून येतो.एवढ्या प्रगत देशात बंदूकधारी लोक आणि त्यांचा रानटी हिंसाचार चालू शकतो. बंदूक ठेवण्याचा आमचा हक्क आहे.असे म्हणण्याची बंदूक फळी भक्कम आहे.इथला वर्ण द्वेषाचा सुप्त ज्वालामुखी सारखा खदखदत आहे. याची धग आपल्याला माहीतच नसते.मग आपण थोडेसे मागे राहत आहोत.

आजपासून जर आपण सुज्ञ नागरिक म्हणून प्रत्येक क्षेत्रात केलेली वाटचाल येणाऱ्या हजार वर्षाला प्रेरणादायी ठरेल,आणि आज पासून जर आपण सुरुवात नाही केली, तर हजार वर्ष मागे जाणार आहोत. विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवून अमेरिका देशाची आपण बरोबरी करु शकतो पण त्यासाठी गाडा अभ्यास आणि विकास या दोन गोष्टी ची सांगड घातल्याशिवाय हे काम करता येणार नाही.जोपर्यंत या देशातला भ्रष्टाचार थांबत नाही तोपर्यंत भारत देशातच प्रतिनिधित्व अंधारातच राहणार आहे. याला जबाबदार आपण आहोत देशासाठी केलेले कार्य केव्हाही क्रांती होऊनच अजरामर ठरत असतं.

अमेरिकेच्या तंत्रज्ञानाचा वापर होतो,तोच वापर करुन भारत देश एक हरितक्रांती ,धवलक्रांती,नवक्रांती होताना नक्की दिसेल. त्यासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीचा पुरवठा कमी पडता कामा नये. तिथली न्यायव्यवस्था आणि आपल्या जातीव्यवस्थेचा विचार केला,तर खूपच फरक जाणवतो याठिकाणी आपण एक बदल करावा कारण की, न्यायाधीशा जवळ जे संगणक,मोबाईल सोबत घेऊन यायला बंदी घालावी, व तसा कायदा मंजूर करावा. मग लागणारा वेळ आणि खर्च लागतो तू खूप कमी कालावधीमध्ये आणि जलद गतीने कार्यास प्रारंभ होईल. असं माझं वैयक्तिक मत आहे.आधी आपलं जळकोट गाव,तालुका, जिल्हा आणि देश नक्कीच अमेरिकेसारख होईल यात शंका नाही.

**- सुरज रामचंद्र अंगुले / जळकोट**
**मो.- ७७१९८७६३१३**

# आठवणीतला 'मनुबाबा'



"फारच वाईट झालं हो मनुबाबा! देव तरी एखाद्याची केवढी परीक्षा घेतो ? फार वाईट वाटतं हो असे कसे नेववले पैसे तरी. तुम्ही तरी मनुबाबा सारखे किती तरी विचार करीत राहता हो ?कधी देवादिकाकडे जात नाहीत... चार गोष्टी लोकांशी बोलत नाहीत ...सारखं ते अक्षयी काम आणि फक्त काम. देवळात जावं ... आरत्या, अभंग म्हणावेत... तुम्हाला येतात का? • म्हण रे रामु बाळा तुझा तो आवडता अभंग, तुकोबारायाचा ... "नका पुढे ठेवू हेका हाचि उपदेश। आपुलाले चित्त शुद्ध करु". रामुने त्या पाच वर्षाच्या गुणी बाळाने गोड

आवाजात तो अभंग म्हटला आणि वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी म्हातारा दिसणाऱ्या मनुबाबाच्या डोळ्यातून आज कितीतरी वर्षानंतर करुणा प्रकटली... मनुबाबांच्या घराशेजारीच राहणाऱ्या साळूबाईच्या त्या प्रेमळ पण आस्थेच्या शब्दांनी आज किततरी दिवसानंतर मनुबाबाच्या आयुष्यात पहिल्यांदा प्रकाशाचा, मायेचा, करूणेचा प्रवेश झालेला... त्याला कारणही तसंच... गेल्या पंधरा वर्षांपासून मोठया कष्टाने कमावलेल्या त्या 'मोहरा' म्हणजे जणू काही 'मुनबाबांचं' अपत्यच झाल्या होत्या ... कधी 'गाडी-घोडा' न ल्यायलेल्या, गोडा-तुपाची 'चव' ही न माहिती असलेल्या मनुबाबांची रोज रात्री कोरडी, कढत-भाकर पाण्याबरोबर खाण्याची सवय ... आणि उभ्या आयुष्यात कधी कोणाशीही कसल्याही प्रकारचा वाद, भांडण न झालेल्या मनु विणकराची ती दौलत आज त्या चोराने म्हणजेच 'ठकसेन' ने पळवलेली ... सारा गाव समजवायला, सांत्वनाला आलेला... पण साध्या विचारांची मोलमजुरी करणारी ती 'साळुबाई' आणि तिच्या ५ वर्ष वयाच्या मुलाची म्हणजेच रामुची ती गोड वाणी ऐकताच म्हातारा विणकर आज थरथरु लागलेला ....

असं म्हणतात की लेखकाची खरी ओळख तेव्हा पटते, किंबहुना त्याचं साहित्य हे तेव्हाच आत्मसात होतं जेव्हा वाचतांना तो प्रसंग हुबेहुब प्रत्यक्ष समोर घडत असल्याचा भास होतो... याबाबतीत आपले सर्वांचे लाडके 'साने गुरुजी' हे कायम सर्वश्रेष्ठच राहिलेले ... "करी मनोरंजन जो मुलांचे । जडेल नाते प्रभुशी तयाचे"... साने गुरुजी कायम या उक्तीनुसारच राहिलेले... आणि म्हणूनच त्यांनी लिहीलेलं बाल-साहित्य, कुमारवयीन मुलांसाठी असलेले कथा संग्रह आज १०० वर्षानंतरही तेवढेच ताजे वटणारे ... खरं तर या गोष्टी १९२०-२५ पासून तर स्वातंत्र्य चळवळीच्या काळामध्ये गुरुजींनी लिहीलेल्या ... पण आजही त्याची लोकप्रियता तसूभरही कमी झालेली निश्चितच नाही... आपल्या मातीतील लोकांच्या मनाला पटेल, रुचेल

याचा गुरुजींनी कायमच अट्टाहास ठेवलेला. त्यामुळेच की काय, त्यांच्या गोष्टींचे अक्षरशः १० भाग 'केशव भिकाजी ढवळे' यांनी बाल वाचकांसाठी आणले. "साने गुरुजींच्या गोड गोष्टी' या रुपातून ... त्या १० भागपैकीच एक गोष्ट "मनुबाबांची".

सायगावपासून तर रायगावा पर्यंत सुरु झालेली ही 'मनु' नावाच्या विणकराची कहाणी ... अतिशय हृदयद्रावक पण तेवढची खिळवून ठेवणारी सुद्धा.... जी काही प्रसंगात डोळ्यातून पाणी आणते तर काही ठिकाणी नात्यांची खरी किंमत काय याचेही धडे देते ... खरं तर १९९१ मध्ये मी ही मनुबाबांची गोष्ट पहिल्यांदा वाचलेली ...गोड गोष्टींच्या संग्रहाचे १० ही भाग आज देखील आहेत माझ्याजवळ ... त्या १० भागातल्या सर्वच गोष्टी अतिशय हृदयाच्या जवळच्याच ... पण 'मनुबाबा' भावतातच ...

कधी काळी ज्यांच्या मैत्रीचे गोडवे गायले जायचे त्या मनु आणि विनुची ही गोष्ट ... पण विनुच्या मनात पाप येतं आणि पैशाच्या हव्यासापोटी त्यांच्या गावात पाहुणे म्हणून आलेल्या साहेबाचा तो खुन करतो ... पाप पचवायचं कसं म्हणून रक्ताने भरलेला तो "लाल-लाल'सुरा विनु मनुच्या घरी त्याच्या उशीखाली आणून ठेवतो ...गयावया करणाऱ्या मनुला सारा गाव 'हाच तो अपराधी' या नजरेने बघतो .... मित्र मित्राला ओळखही देत नाही आणि मनु विणकराला आपली जन्मभूमी सोडावी लागते ती कायमचीच ... जन्मभूमी सोडून जातांना 'बहुळा' नदीला मनुबाबा जणू काही शेवटचं प्रणाम करतात पण पुढे निघायच्या आधी त्या बहुळेचं ओंजळाभरुन पाणी पितात ...

____ कथा पुढे सरकत जाते तसच मनुबाबांच्या आयुष्यतही बरंच काही पुढे गेलेलं राहतं ... गेल्या १५ वर्षापासून मनु विणकर 'रायगावात' राहतो ... ज्याची गावाच्या वेशीवर लहानशी झोपडी आहे ... ज्या झोपडीत एक मिणमिणता दिवा आहे. हातमागाचे ठाण आहे ... मातीचं मडकं आणि लहानशी चुल आहे ... ही झोपडी म्हणजेच मनुबाबांचं आयुष्य आहे ... गावात चांगला विणकर म्हणून त्यांची ख्याती आहे.

मोठमोठ्या श्रीमंतांकडून तर कधी गरीबांकडूनही मनुबाबांना काम मिळतं... पण मनुबाबा ... मनुबाबा मात्र दिवसभर त्यांच्या कामात गुंग असतात ... रात्र झाली की मिणमिण दिवा लावतात... कोरडी-भाकर खातात ... घडा भरुन पाणी आणतात ... तेव्हा त्या घड्यालाही प्रेमाने गोंजारतात ... मनुबाबांच्या प्रेमळ हातांनी जणू काही तो घडाही त्यांच्याशी बोलतो आणि निर्मळ गंगा त्यांना प्रदान करतो आणि रात्री सरतेशेवटी जी नाणी त्यांनी जमवली आहेत मनुबाबा ती घोळवत घोळवत बसतात ... हातमागाच्या यंत्रासारखंच त्यांचही आयुष्य ... तलम कापड विणण्याची कला मनु विणकराकडे आहे ... पण आयुष्य मात्र ... यंत्रासारखं निर्जीव झालेलं.

त्याच गावातल्या जहागिरदारांची दोन मुले ... दोन टोकाची ... पण काय कोण

जाणे बदमाश ठकसेनच्या पोटात आपल्या मोठ्या भावाचं एक गुपित असतं त्याच्या जोरावर तो मोठ्या भावावर नेहमी दम धरतो ... त्यांचे पैसे उकळतो ... भावाच्या घोड्यावरुन आयती रपेट मारतांना त्याला 'मनुबाबांची' झोपडी दिसते ... उद्यापासून नवीन कापड विणायला घ्यायचं म्हणून नवीन दोरा विकत आणण्यासाठी मनुबाबा त्यांच्या झोपडी बाहेर पडतात ... काळोखी रात्र ... सर्वदूर पाऊस ... मनुबाबांना जरा काय उशीर झालेला. तो ठकसेन काळाचा घाव घालतो आणि भुसभुशीत मातीत जपून ठेवलेली ती नाण्यांची छोटी घोंगडी लंपास करतो ... भिजत भिजत म्हातारा मनु झोपडीत येतो ... उब यावी म्हणून शेकोटीजवळ जातो तेव्हा त्याला उकरलेली जमीन दिसते ... हातभर खणून पाहतो मनुबाबा पण हाती काहीच लागत नाही ... म्हातारा मनुबाबा मटकन खालनी बसतो ... 'माझं सोनं हरवलं' म्हणून जहागीरदाराकडे येतो ... तक्रार करतो ... सारा गाव गोळा होतो. कोणी चोराचा शोध घेतं ... कोणी त्यांना सांत्वना देतं ... कारण एक गोष्ट सऱ्यांना ठाऊक की फारसे कोणाशी बोलत जरी नसले तरी मनुबाबा हे कायमच साऱ्या गावासाठी निरुपद्रवीच रहिलेले ...

अशा या दुःखाने, कष्टने भरलेल्या मनुबाबांच्या रुपात लहानग्या 'सोनी' च्या रुपाने क्रांती घडते ... दिवाळीच्या दिवशी सारा गाव जेथे आनंदात असतो तेथे साळुबाईच्या सांगण्यावरुन मोठ्या आशेने कधी नव्हे ते मनुबाबा चार दिवे घरी लावतात ... असं म्हणतात की आनंदाच्या ठिकाणी एखादं दुःख घडलं तर त्याची किंमत ही आनंदापेक्षाही जास्त असते ... लक्ष्मीपुजनाचा उत्सव घरोघरी साजरा होत असतो ... पण कोणाच्या तरी घरची 'ही' लक्ष्मी स्वतःचं अस्तित्व शोधण्यासाठी आपल्या लहान लेकराला घेऊन घराबाहेर पडली असते ... कारण या 'लक्ष्मीला' तिच्या 'नारायणाने' स्विकालेलं नसतं ... कितीतरी कोसावरुन चालत आलेली ती स्त्री शेवटच्या घटका मोजायच्या आधी आपल्या बाळाला शेवटचं एकदा पाजते आणि नंतर विष घेते ... आणि हळूहळू त्या बाळाभोवती आवळलेले ते घट्ट हात सैल होतात ... आपली आई आपल्याला का घेत नाही म्हणून 'मा ... मां ... ' करणारे ते बाळ रडत रडत, रांगत रांगत, मनुबाळाच्या झोपडीतून येणाऱ्या प्रकाशाच्या दिशेने येतं ... माझ सोनं आता परत येईल ... मग परत येईल या आस्थेने थंडीत कुडकुडत राहिलले मनुबाबा त्या लहानग्या बाळाच्या रडण्याने भानावर येतात ... त्या बाळाला उचलतात त्याचे पाय चेपतात ... रडणारं बाळ बाहेर जाण्यासाठी का आग्रह करत आहे म्हणून मनुबाबाही जातात ... सारा गाव तेथे जमा होतो ... जहागीरदार, त्यांचा मुलगा संपतराय सुद्धा ... ती निपचीत मरुन पडलेली आई लहानग्या बाळाला ओ देत नाही ... मनुबाबा मोठ्या प्रेमाने जेव्हा बाळाला जवळ घेतात ते बाळ सुद्धा विश्वासाने त्यांच्याजवळ जातं ... जहागीरदारांचा दिलदार मुलगा म्हणजेच संपतराय स्वतःहून त्या स्त्री चं क्रियाकर्म करायची जबाबदारी घेतात. एवढेच नाही तर त्या

अनाथ बाळाच्या संगोपनाचीही तयारी असते त्यांची ... सारं गाव संपतरायाला दुवा देतं ... पण ती लहानगी चिमुकली मात्र स्वतःचं आयुष्य झोपडीत घालवते ...

ती चिमुकली म्हणजेच मनुबाबांची 'सोनी' ... लहानग्या सोनीचं मनुबाबा सारं काही प्रेमाने करतात ... अंघोळ घालून देण्यापासून तर वेणी घालून देण्यापर्यंत ... सोनीच्या निमित्ताने मनुबाबांना त्यांनी कधी काळी गायलेले अभंग, ओव्या सारं काही आठवायला लागतं ... धूळपाटीवर मनुबाबा सोनीला लिहा-वाचायला शिकवतात तेव्हा त्यांचीही हरविलेली विद्या त्यांना परत मिळते ... लहानग्या सोनीच्या वाढीबरोबरच कथा पुढे सरकु लागते ... तसतसं मनुबाबांचं आयुष्यही वार्धक्याकडे झूकू लागतं ... असं म्हणतात सत्य कधी लपत नाही ... म्हणूनच जेव्हा सोनीच्या लग्नाच्या वाटाघाटीची वेळ येते तेव्हा परमेश्वर मनुबाबाच्या मदतीला धाऊन येतो ... घरापासूनच जवळ असलेल्या जागेवर लहानशी बाग करायची म्हणून मनुबाबांच्या सांगण्यावरुन संपतराय स्वतः पुढाकार घेतात आणि ती जागा स्वच्छ करावयास सांगतात. खोदकामात तसेच जवळच असलेला खळगा भरण्याचे काम सुरु असतांना ठकसेनने चोरलेल्या त्या पिशव्या ज्यामध्ये मनुबाबांनी प्रेमाने, कष्टाने जमवलेल्या मोहरा आहेत ते सापडतं ... ठकसेनच्या नावाचा चाबुकही सापडतो ... संपतराय स्वतःहून मनुबाबांची माफी मागतात ... सोनीच्या लग्नासाठी सोनं आलं म्हणून कौतुक करतो सारा गांव ... पण म्हाताऱ्या मनुबाबांना आता त्याचं महत्वही तेवढं वाटत नाही ... कारण सोनी त्यांची मुलगी जरी नसली तरीही जणू काही नवसंजीवनी म्हणून त्यांच्या आयुष्यात आलेली दैवी देणगी असते ... आणि म्हणूनच सरतेशेवटी जेव्हा तिच्या प्रेमाची परीक्षा होते तेव्हा स्वतःच्या सख्ख्या वडिलांना ती विनम्रपूर्वक सांगते की माझं कन्यादान मनुबाबाच करतील ... संपतराय आणि त्यांची पत्नी इंदुमती जेव्हा स्वतःहून सारं सत्य सोनीसमोर आणि मनुबाबांसमोर सांगायला येतात तेव्हा काहीशी क्रोधीत, खट्टू झालेली सोनी त्यांची चूक त्यांच्या निदर्शनास आणून देते की जन्मदात्यापेक्षाही या पालनकर्त्यांचा माझ्यावर अधिकार जास्त आहे ... आणि मी जर तुमची मुलगी म्हणून तुमच्याकडे आले तर खरंच रामू बरोबर संसार करावयास मी योग्य होईल का? आम्ही मोलमजुरी करु पण आमच्या मनुबाबाला आता उतार वयात आम्ही अंतर देणार नाही.

संपतराय साऱ्या गावासमोर स्वतःची चूक कबूल करतात ... सोनी आणि रामुच लग्न लाऊन देतात ... आता ती सारी जण एकत्रच असतात ... रामु, सोनी, मनुबाबा, रामुचे आई वडील म्हणजेच साळूबाई आणि शंकरराव ... आयुष्याची दोरी निसटून जाण्याच्या आधी एकदा शेवटच आपल्या जन्मगावी भेटाव म्हणून मनुबाबा सायगावात येतात ... पण त्यांना पूर्वीसारख काहीच दिसत नाही ... यंत्रवत झालेल्या त्या गावात कोणीही त्यांना ओळखत नाही ... ना विनु ना कोणी शेजारी. साऱ्या गावाची घाण 'बहुळा' वाहून नेत असते. त्यामुळे बहुळाकाठी दगडावर

बसल्यावर त्यांना सार काही उपरेच वाटत राहते ... रायगावाला परत आल्यावर जेव्हा रामु-सोनी विचारतात की तुम्ही काय आणल तुमच्या जन्मभूमीवरुन, तेव्हा म्हातारा मनुबाबा थरथरत्या हाताने दोघांना आशिर्वाद देतो आणि म्हणतो, 'ते बघ दूर दिवे चमकत आहेत' ...

__या शब्दातील गुढ रहस्य नेमक काय त्याचा अर्थ कालांतराने उलगडायला लागलेला ... मात्र बालवयापासूनच किंबहुना किशोर वयापासूनच विचारांच्या कक्षा केवढया मोठया प्रमाणात विस्तारल्या जाव्या हा कायम आग्रह साने गुरुजींचा. त्यामुळे पुस्तकाच्या शेवटच्या पानावर असलेल्या 'त्या' वाक्याला पाहून नाही डोळे पाणावले तर नवलच म्हणावे ...

खर सांगायच तर १९९१ मध्ये ही मनुबाबांची कथा सर्वात पहिल्यांदा वाचनात आली. आजतागायत ३० वर्षे उलटून गेलीत ... गोष्टीतला मनुबाबा वार्धक्याकडे झुकला. मात्र वैचारिक संकल्पनेतून जिवंत राहिलेला मनुबाबा आजही तेवढाच तरुण ... साने गुरुजींनी मनुबाबांची कथा ज्यावेळी पूर्ण केली ती तारीख म्हणजे ६/११/१९४० ... त्या अनुषंगाने बघायला गेलो तर मनुबाबांचे वय ८० वर्षाचे जणू काही आजच्या घडीला ... मात्र पुस्तकाची पान चाळतांना या गोष्टीचा उलगडा होतो की मनुबाबांची ... त्या पात्राच्या जन्माची पार्श्वभूमी ही त्याच्याही कितीतरी अगोदरची. पण ते म्हणतात ना की, 'गंगा माई' ला भगीरथांनी पृथ्वीतलावर आणले. अगदी तसेच महाराष्ट्रातील वाचकांच्या हाती मनुबाबांची गोष्ट सुपूर्त करण्याच्या बाबतीत 'साने गुरुजी' हे मुख्य स्त्रोत ठरलेले ...

मेरी अन ईव्हान्स या इंग्रज लेखिकेने 'जॉर्ज इलियट' या टोपणनावाने अनेक कादंबऱ्या लिहील्या लेखिकेने १८६१ मध्ये 'सिलास मार्नर' ही अप्रतिम कादंबरी लिहीली ... याच कादंबरीतील गोष्ट साने गुरुजींनी 'मनुबाबा' या नावाने संक्षेपाने दिली. या कादंबरीत व्यक्तीमत्वाचा विकास कसा होतो हे सुंदर रितीने दाखविण्यात आले आहे. अस म्हणतात की मनुष्याचा विकास हा स्वत:च्या पलीकडे जाण्यात आहे. ज्या वेळेस जीवनाचा उपयोग एखाद्या ध्येयासाठी होऊ लागतो, तेव्हाच जीवनाचा विकास होऊ लागतो ... स्वार्थ सुटला, संकुचितपणा सुटला की जीवनाला अर्थ प्राप्त होवू लागतो. या कादंबरीत किंबहुना मनुबाबांच्या गोष्टीत उत्कृष्टपणे रेखाटलेले आहे की मानव्याची पूजा करण्यातच जीवनाला पूर्णता आहे.

पुस्तक असो की कादंबरी, ग्रंथ असो की आणखी काहीही ... ते समाजाचा आरसा आहे असे संबोधले जाते ... जे आपण बघतो, जे आपल्या आजुबाजुला घडते, त्याच्याशीच मिळत्याजुळत्या गोष्टी, कथा असतात. आणखी दुसरे काय ? सांगायचा मुद्दा असा की साने गुरुजींनी ही गोष्ट ८० वर्षापूर्वी लिहीली असली तरीही पात्रांमध्ये असलेला जीवंतपणा आजही तेवढाच ठळकपणे जाणवतो. आजही असे किती तरी 'विनु' आहेत जे स्वत:च पाप 'मनु' सारख्या निष्पाप लोकांच्या माथी

मारुन स्वतः पळ काढतात ... आजही असे कितीतरी ठकसेन आहेत जे स्वत:च्या स्वार्थासाठी गरीबाजवळची पुंजी चोरायलाही मागेपुढे पाहत नाही ... पण म्हणतात ना की जेथे दुःख असत तेथे सुखाची कुंकर घालणारेही असतात ... म्हणूनच साळूबाईसारखी मोठया मनाची दु:खांवर मायेने कुंकर घालून कोणाच्या तरी दुःखी आत्म्याच्या बंद हृदयाचे दरवाजे उघडून प्रकाश टाकणारी माणसेही इथेच भेटतात ... उशीरा का होईना पण सत्य बोलून झालेल्या चुकीची चार चौघांदेखत कबुली देणारे संपतरायही पहायला मिळतात गोष्ट मनुबाबांची असली तरी त्यातील पात्रे ही स्वत:च महत्व, अस्तित्व वारंवार पटवून देतात ...

आणि म्हणूनच की काय, जेव्हा साळुबाई म्हणते की, आपण गरीब असलो म्हणून काय झाल, दिवाळी हा सण तर सर्वांसाठीच असतो ना, मग आपण खूप काही नाही पण चार दिवे तर लावू शकतो ना? मोलमजुरी करणारी ती अडाणी बाई, जीवनाच सार सांगून जाते ... आपल्या भावाच्या चुकीच्या कृत्याची माफी स्वतः साऱ्या गावासमोर संपतराय मागतात तेव्हा आपसुकच त्यांचा अभिमान वाटतो ... आणि मनुबाबांकडे वाढत असलेली 'सोनी' आपल्या पतीची

म्हणजेच संपतरायाची मुलगी आहे हे माहित पडल्यावरही इंदुमती मोठया मनाने माफ करते ... __ ही सारी पात्रे मनुबाबांच्या अवतीभोवती फिरणारी असतात ... पण कुठेही मनुबाबांच महत्व

तसूभरही कमी होऊ देत नाहीत ... आता राहीला प्रश्न 'सोनी' चा तर त्या बिचारीबद्दल काय बोलाव ... सबंध गोष्टी मध्ये सर्वात शेवटी दाखल होणार पात्र म्हणजे 'सोनी' मात्र उशीरा येऊन सुध्दा लहानगी सोनी पहिला क्रमांक कशी पटकावते ते कळतही नाही ... २-४ महिन्याच्या बाळापासून तर एका सुंदर तरुणीत रुपांतरण होईपर्यंत सोनीच पात्र गोष्टीत आहे ... मात्र या सबंध कालावधीत लहानग्या 'सोनी' ने मनुबाबांची साथ कधीही सोडली नाही ... काय काय करत नाही मनुबाबा सोनीसाठी ... तिला कपडे करण्यासाठी नवीन कापड विणतात ... तिला न्हाऊ-माखु घालतात. तिच्या बरोबर खेळ खेळतात ... एवढेच नाही तर सोनीला शिकवत असतांना त्यांची गेलेली विद्या जणू काही परत येते ... विस्मृतीत गेलेल्या ओव्या अभंग त्यांना परत आठवतात ... त्या अनाथ मुलीचे मनुबाबा वडील होतात ... 'सोनी'च्या रुपाने मनुबाबांना जीवन जगण्याची कला अवगत होते ... कष्टाने मिळवलेल्या नाण्यांना घोळवत बसवून त्यांच्यावर प्रेम करण्यात काही गैर नव्हत. पण अनाथ मुलीचा बाबा झाल्यावर घडून आलेली क्रांती ही कितीतरी जास्त पटीने जीवनाचे सार कधी सांगून गेली हे खुद मनुबाबांनाही कळत नाही ... आणि येथेच लेखकाची लेखणी परत एकदा जग जिंकते.

'बजरंगी भाईजान' सिनेमाच्या शेवटच्या भागामध्ये नवाजुद्दीन सिद्दिकी यांचं एक फार प्रसिद्ध वाक्य आहे की, "हम दोनो मुल्को के लोग अपने बच्चों को नफरत की

नही बल्की प्यार भरे रिश्तो की सीख देना चाहते है" ... सांगायचा मुद्दा एवढाच की सिनेमाच्या अनुशंगाने जरी या वाक्यामागचा अर्थ सर्वत्र प्रेमाची आणि शांततेची आत्मियतेची शिकवण देण्याचा असला तरी तात्पर्य हेच की मुलांना शिकवण कशाची द्यावी हे महत्वाच ठरत ... त्यामुळे किशोरवयीनांसाठी वाचन साहित्य लिहीत असतांना साने गुरुजी स्वत:ही गोष्ट कबुल करतात की त्यांना आवडलेली एखादी कुठलीही बाब असो, पण ती गोष्टीच्या रुपात पुढे आणायची असेल तर बालवयासारख दुसर वय नाही, ती गोष्ट समजायला, अनुकरण कारायला ... आणि त्यामुळेच की काय गुरुजींच नात परमेश्वराशी जुळल कारण त्यांनी आजीवनभर मुलांच्या मनोरंजनाचा ध्यास धरला ... मग ती कुठलीही गोष्ट असू देत मग, 'स्वर्गातली माळ' असो की 'न्याय देणारा गुराखी', 'खरा मित्र' असो की 'मनुबाबा' ... आणि म्हणूनच कदाचित या गोष्टीची साक्ष आजही पटते, आजही गोष्टीच्या पुस्तकातले ! वर सोनीला हातात धरुन खेळवत असणारे मनुबाबा ८०-९० वर्षानंतरही तेवढेच आपलेसे वाटतात ... येणाऱ्या भविष्यातही बालवाचकांना आवर्जून या अवीट गोड साहित्याची समर्पकता समजावी ... किंबहुना सानेगुरुजी समजावे ... हीच परमेश्वर चरणी प्रार्थना ...

**- ॲड. वैष्णवी चंद्रशेखर डुमरे / नागपूर**
**मो.- 9021089839**

# नॅशनल बिबलियोग्राफी

# Indian National Bibliography 2021




Proforma of Application form for the...

**Indian National Bibliography भारतीय राष्ट्रीय ग्रंथसूची २०२१**

**International ISBN Directory आंतरराष्ट्रीय आयएसबीएन सूची**

- Last date for submission of information - **25 December 2021**
- Separate form to be filled foreachbook
- Date of publication of new and revised edition - **26 January 2022**
- Kindly confirm our service charges before you apply.
- Duly filled application form should be submitted before the due date along with the hard copy of the book and applicable service charges




Bibliography (from Ancient Greek: , romanized: biblion, lit. 'book' and -, -graphìa, 'writing'), as a discipline, is traditionally the academic study of books as physical, cultural ob-

| | |
|---|---|
| ISBN Number आय एस बी एन क्रमांक - | |
| Title पुस्तकाचे नाव | |
| Price किंमत | |
| Author / Editor लेखक / संपादक / संकलक | |
| Introduction प्रस्तावना | |
| Publisher प्रकाशक | |
| Publisher Agency / Publication प्रकाशन | |
| Imprint | |
| Year of Publication प्रकाशनाचे वर्ष | |
| Date of Publication प्रकाशनाची तारीख | |
| Volume खंड | |
| Edition आवृत्ती | |
| e-Book link ई-बुक लिंक | |
| Pages पृष्ठे | |
| Language भाषा | |
| Subject पुस्तकाचा विषय | |
| Book Version पुस्तकाचा प्रकार | |
| Copyright हक्क | |
| Printer मुद्रक | |
| Cover मुखपृष्ठ | |
| Proofreader मुद्रितशोधक | |
| Copies छापलेल्या प्रती | |

jects; in this sense, it is also known as bibliology (from Ancient Greek: -, romanized: -logìa). English author and bibliographer John Carter describe bibliography as a word having two senses: one, a list of books for further study or of works consulted by an author (or enumerative bibliography); the other one, applicable for collectors, is "the study of books as physical objects" and "the systematic description of books as objects" (or descriptive bibliography).

The word bibliographia () was used by Greek writers in the first three centuries CE to mean the copying of books by hand.

In the 12th century, the word started being used for "the intellectual activity of composing books." The 17th century then saw the emergence of the modern meaning, that of the description of books. Currently, the field of bibliography has expanded to include studies that consider the book as a material object. Bibliography, in its systematic pursuit of understanding the past and the present through written and printed documents, describes a way and means of extracting information from this material. Bibliographers are interested in comparing versions of texts to each other rather than in interpreting their meaning or assessing their significance.

The bibliography is a specialized aspect of library science (or Library and Information Science, LIS) and documentation science. It was established by a Belgian, named Paul Otlet (1868-1944), who was the founder of the field of documentation, as a branch of the information sciences, who wrote about "the science of bibliography." However, there have recently been voices claiming that "the bibliographical paradigm" is obsolete, and it is not today common in LIS. A defense of the bibliographical paradigm was provided by Hjørland (2007).

The quantitative study of bibliographies is known as bibliometrics, which is today an influential subfield in LIS and is used for major collection decisions such as the cancellation of big deals, through data analysis tools like Unpaywall Journals.

Carter and Barker describe bibliography as a twofold scholarly discipline the organized listing of books (enumerative bibliography) and the systematic description of books as physical objects (descriptive bibliography). These two distinct concepts and practices have separate rationales and serve differing purposes. Innovators and originators in the field include W. W. Greg, Fredson Bowers, Philip Gaskell, and G. Thomas Tanselle.

Bowers (1949) refers to enumerative bibliography as a pro-

cedure that identifies books in "specific collections or libraries," in a specific discipline, by an author, printer, or period of production. He refers to descriptive bibliography as the systematic description of a book as a material or physical artifact. Analytical bibliography, the cornerstone of descriptive bibliography, investigates the printing and all physical features of a book that yield evidence establishing a book's history and transmission. It is the preliminary phase of bibliographic description and provides the vocabulary, principles, and techniques of analysis that descriptive bibliographers apply and on which they base their descriptive practice.

Descriptive bibliographers follow specific conventions and associated classification in their descriptions. Titles and title pages are transcribed in a quasi-facsimile style and representation. Illustration, typeface, binding, paper, and all physical elements related to identifying a book follow formulaic conventions, as Bowers established in his foundational opus, The Principles of Bibliographic Description. The thought expressed in this book expands substantively on W. W. Greg's groundbreaking theory that argued for the adoption of formal bibliographic principles. Fundamentally, analytical bibliography is concerned with objective, physical analysis, and history of a book while descriptive bibliography employs all data that analytical bibliography furnishes and then codifies it with a view to identifying the ideal copy or form of a book that most nearly represents the printer's initial conception and intention in printing.

In addition to viewing bibliographic study as being composed of four interdependent approaches (enumerative, descriptive, analytical, and textual), Bowers notes two further subcategories of research, namely historical bibliography, and aesthetic bibliography. Both historical bibliography, which involves the investigation of printing practices, tools, and related documents, and aesthetic bibliography, which examines

the art of designing type and books, are often employed by analytical bibliographers.

D. F. McKenzie extended previous notions of bibliography as set forth by Greg, Bowers, Gaskell, and Tanselle. He describes the nature of bibliography as "the discipline that studies texts as recorded forms, and the processes of their transmission, including their production and reception" (1999). This concept broadens the scope of bibliography to include "non-book texts" and an accounting for their material form and structure, as well as textual variations, technical and production processes that bring sociocultural context and effects into play. McKenzie's perspective contextualizes textual objects or artifacts with sociological and technical factors that influence production, transmission, and, ultimately, ideal copy (2002). Bibliography, generally, concerns the material conditions of books as well as other texts how they are designed, edited, printed, circulated, reprinted, collected.

Bibliographic works differ in the amount of detail depending on the purpose and can generally be divided into two categories: enumerative bibliography also called comparative, reference or systematic, which results in an overview of publications in a particular category, and analytical or critical bibliography, which studies the production of books. In earlier times, the bibliography mostly focused on books. Now, both categories of bibliography cover work in other media including audio recordings, motion pictures, and videos, graphic objects, databases, CD-ROMs, and websites.

An enumerative bibliography is a systematic list of books and other works such as journal articles. Bibliographies range from "works cited" lists at the end of books and articles, to complete and independent publications. A notable example of a complete, independent publication is Gow's A. E. Housman: A Sketch, together with a List of His Classical Papers (1936). As separate works, they may be in bound volumes such as

those shown on the right, or computerized bibliographic databases. A library catalog, while not referred to as a "bibliography," is bibliographic in nature. Bibliographical works are almost always considered to be tertiary sources.

Enumerative bibliographies are based on a unifying principle such as creator, subject, date, topic or another characteristic. An entry in an enumerative bibliography provides the core elements of a text resource including a title, the creator(s), publication date, and place of publication. Belanger (1977) distinguishes an enumerative bibliography from other bibliographic forms such as descriptive bibliography, analytical bibliography, or textual bibliography in that its function is to record and list, rather than describe a source in detail or with any reference to the source's physical nature, materiality, or textual transmission. The enumerative list may be comprehensive or selective. One noted example would be Tanselle's bibliography that exhaustively enumerates topics and sources related to all forms of bibliography. A more common and instance of an enumerative bibliography relates to specific sources used or considered in preparing a scholarly paper or academic term paper.

Citation styles vary. An entry for a book in a bibliography usually contains the following elements: (1) creator(s), (2) title, (3) place of publication, (4) publisher or printer, (5) date of publication.

An entry for a journal or periodical article usually contains (1) creator(s), (2) article title, (3) journal-title, (4) volume, (5) pages, (6) date of publication.

A bibliography may be arranged by author, topic, or some other scheme. Annotated bibliographies give descriptions about how each source is useful to an author in constructing a paper or argument. These descriptions, usually a few sentences long, provide a summary of the source and describe its relevance. Reference management software may be used to keep

track of references and generate bibliographies as required.

Bibliographies differ from library catalogs by including only relevant items rather than all items present in a particular library. However, the catalogs of some national libraries effectively serve as national bibliographies, as the national libraries own almost all their countries' publications.

Fredson Bowers described and formulated a standardized practice of descriptive bibliography in his Principles of Bibliographical Description (1949). Scholars to this day treat Bowers' scholarly guide as authoritative. In this classic text, Bowers describes the basic function of bibliography as, "providing sufficient data so that a reader may identify the book described, understand the printing, and recognize the precise contents".

Analytical bibliography - This branch of the bibliographic discipline examines the material features of a textual artifact such as type, ink, paper, imposition, format, impressions, and states of a book to essentially recreate the conditions of its production. Analytical bibliography often uses collateral evidence such as general printing practices, trends in format, responses, and non-responses to design, etc. to scrutinize the historical conventions and influences underlying the physical appearance of a text. The bibliographer utilizes knowledge gained from the investigation of physical evidence in the form of a descriptive bibliography or textual bibliography. Descriptive bibliography is the close examination and cataloging of a text as a physical object, recording its size, format, binding, and so on, while textual bibliography or textual criticism identifies variations and the etiology of variations in a text with a view to determining "the establishment of the most correct form of [a] text".

Bibliographers - A bibliographer is a person who describes and lists books and other publications, with particular attention to such characteristics as authorship, publication date,


edition, typography, etc. A person who limits such efforts to a specific field or discipline is a subject bibliographer."

A bibliographer, in the technical meaning of the word, is anyone who writes about books. But the accepted meaning since at least the 18th century is a person who attempts a comprehensive account sometimes just a list, sometimes a fuller reckoning of the books written on a particular subject. In the present, the bibliography is no longer a career, generally speaking; bibliographies tend to be written on highly specific subjects and by specialists in the field.

The term bibliographer is sometimes in particular subject bibliographer today used about certain roles performed in libraries and bibliographic databases.


One of the first bibliographers was Conrad Gessner who sought to list all books printed in Latin, Greek, and Hebrew in Bibliotheca Universalis (1545).

**- डॉ. सुनील दादा पाटील / जयसिंगपूर**
**मो.- 8484986064**



व्यक्तिमत्व विकास
दिवाळी अंक २०२१
FACEBOOK!
TWITTER!
INSTAGRAM!
संपादक - श्री. मंगेश विठ्ठल कोळी.


व्यक्तिमत्व विकास
दिवाळी अंक २०२०


व्यक्तिमत्व विकास
दिवाळी
अंक
2019
- संपादक -
श्री. मंगेश विठ्ठल कोळी.


व्यक्तिमत्व विकास
दिवाळी अंक 2018
संपादक - मंगेश कोळी.
मो.९०२८७१३८२०


व्यक्तिमत्व
विकास
दिवाळी अंक
२०१७


व्यक्तिमत्त्व
विकास
दीपावली
विशेषांक
२०१६